








संपादिका :

शांता ज. शेळके
वृंदा लिमये
सरोजिनी वैद्य




प्रकाशक :
शांता ज. शेळके
लता मंगेशकर रौप्यमहोत्सव गौरव-ग्रंथ समिती,
१, इब्राहीम बिल्डिंग,
तुळशी पाइप रोड, मुंबई २८

पहिली आवृत्ती : २५ एप्रिल १९६७

किंमत अकरा रुपये

मुखपृष्ठ आणि सजावट :
पद्मा सहस्रबुद्धे

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४



गेले पाव शतक
लताच्या गाण्यावर ज्यांनी अकृत्रिम प्रेम केले
त्या सर्व ज्ञात-अज्ञात रसिकांस

निवेदन

गेली अनेक वर्षे लताबाईंची गाणी आम्ही ऐकत होतो. पार्श्वगायिका म्हणून त्यांचे नाव गाजताना पाहात होतो. कीर्तीचे आणि प्रसिद्धीचे झगझगीत वलय जिच्या भोवती अहोरात्र फिरत आहे अशी एक अत्यंत नामवंत व्यक्ती म्हणून त्यांना आम्ही दुरून ओळखत होतो. पुढे त्यांच्या प्रत्यक्ष परिचयाचा योग आला. त्यांच्या सहवासात काही काळ घालवण्याची संधी मिळाली. स्नेहाचे एक वेगळे नाते त्यांच्याशी प्रस्थापित झाले. आणि मग असे जाणवू लागले की बाह्यतः दिसणाऱ्या प्रसिद्धीच्या लखलखाटामागे, प्रचंड कीर्तीमागे आणि डोळे दिपवणाऱ्या वैभवामागे वेगळ्याच लताबाई उभ्या आहेत. त्या साध्या आहेत. अनौपचारिक आहेत. त्यांना उत्तम विनोदबुद्धी आहे, त्याबरोबरच दुसऱ्याचे मन जाणून घेणारी सूक्ष्म संवेदनशीलताही त्यांच्या ठिकाणी आहे. कलावंत म्हणून तर त्या थोर आहेतच. पण कन्या, बहीण, मैत्रीण, व्यावसायिक व्यक्ती आणि समाजाचा एक घटक अशा इतर कितीतरी नात्यांमध्ये त्यांचे मोठेपण सतत प्रकटते आहे. हे जेव्हा ध्यानी आले तेव्हा तीव्रतेने वाटले की पार्श्वगायन हा लताबाईंच्या व्यक्तिरवाचा एक पैलू. त्यांचे इतरही अनेक पैलू आहेत. मानवी तसेच मनोज्ञ. त्यांचीही इतरांना ओळख पटवून दिली पाहिजे.

योगायोगाने लताबाईंच्या कलाजीवनाचा रौप्यमहोत्सव याच वर्षी साजरा होणार होता. या शुभप्रसंगी लताबाईंवरील लेखांचे एक संकलन प्रसिद्ध करण्याचा विचार आम्ही केला आणि अनेकांना लेख पाठविण्याची विनंती केली. सर्वांनीच सहजतेने व विपुलतेने लेखनसाह्य केले. त्यातही लताबाईंच्या मोठेपणाचा आणि त्यांच्याबद्दल सर्वांच्या मनात वसत असलेल्या प्रेमादराचा आम्हाला प्रत्यय आला.

राष्ट्रपती डॉ० राधाकृष्णन, गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी ग्रंथासाठी संदेश धाडले. साहित्यिकांपासून तो राजकारणी लोकांपर्यंत आणि चित्रपटव्यावसायिकांपासून तो शास्त्रीय गायकवादकांपर्यंत सर्वांनी आमच्या विनंतीला मान देऊन आमच्याकडे लेख पाठवले. गायनाच्या व चित्रपटाच्या क्षेत्रातील थोर व्यक्तींचे अभिप्राय व

आशीर्वादही 'लता'ला लाभावेत म्हणून 'सप्तस्वरां'ची योजना केली. ही कल्पना श्री. पु. ल. देशपांडे यांची. आणि ती मूर्त करण्यास श्री. सुरेश गजेंद्रगडकरांचे सहकार्य मिळाले. या सर्वांच्या आम्ही अत्यंत आभारी आहोत.

लेखकांव्यतिरिक्त आमच्यावर असलेले इतर स्नेही मंडळींचे ऋणही फार मोठे आहे. मंगेशकर कुटुंबियांनी आम्हाला अनेक दुर्मिळ छायाचित्रे मिळवून दिली तशीच लताबाईंनी मिळवलेल्या शेकडो पारितोषिकांपैकी काही निवडक पारितोषिके रेखाचित्रांसाठी त्यांनी उपलब्ध करून दिली. श्रीमती उषा मंगेशकर यांना विनंती करण्याचा अवकाश, त्यांनी मा. दीनानाथ आणि लताबाई यांची दोन सुरेख रंगीत चित्रे खास या ग्रंथासाठी काढून दिली. श्री. हृदयनाथ मंगेशकर यांनीही आम्हाला वेळोवेळी असेच बहुमोल साह्य केले आहे. प्रसिद्ध संगीतसमीक्षक श्री. वा. ह. देशपांडे यांनी 'घरंदाज गायकी' या आपल्या पुस्तकातील खांसाहेब अमान अली खां भेंडीबाजारवाले यांचा ब्लॉक वापरण्याची आणि 'मौज प्रकाशन'ने मा. दीनानाथांचा ब्लॉक व खांसाहेब बडे गुलाम अली खां यांचे छायाचित्र वापरण्याची परवानगी दिली. श्री. वसंत भालेकर यांनी अनेक चित्रपटव्यावसायिकांना भेटून आम्हाला लेख मिळवून दिले. सौ. पद्मा सहस्रबुद्धे यांच्यावर सोपवलेली ग्रंथाच्या मुखपृष्ठाची व अंतर्गत सजावटीची जबाबदारी त्यांनी तत्परतेने, हौसेने व कल्पकतेने पार पाडली. मौजेचे श्री. विष्णुपंत भागवत यांच्या मार्गदर्शनाचा व स्नेहाचा लाभ तर या कामी सतत होत राहिला. त्याचप्रमाणे श्री. प्रभाकर भागवत यांनी पुस्तक उत्तम रीतीने छापले जावे म्हणून अपार परिश्रम घेतले. श्री. श्री. पु. भागवत, श्री. राम पटवर्धन, श्री. जयवंत दळवी, श्री. ल. मो. प्रभुणे, श्री. मनोहर वैद्य, श्री. राम मोहाडीकर, श्री. बाबूभाई जव्हेरी या स्नेहीमंडळींचे साह्यही फार मोठ्या प्रमाणात झाले. श्री. डी. बी. नेरॉय यांनी ब्लॉक्स उत्तम व वेळेवर करून दिले. त्याचप्रमाणे 'मौज छापखान्या'तील श्री. शांताराम तारी व त्यांचे सहकारी यांनी 'मौज'च्या लौकिकाला साजेशी पुस्तकाची छपाई केली. या सर्वांचे ऋण शब्दांनी फिटण्याजोगे नाही. आम्ही त्याबद्दल कृतज्ञ आहोत.

निवेदन

ग्रंथासाठी आलेल्या लेखांमधील हिंदी आणि इंग्रजी लेख आम्ही अनुवादित केले. पृष्ठमर्यादेमुळे काही लेखांचा अपरिहार्यपणे संक्षेप करावा लागला व मजकुराची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून पण शक्यतो लेखाचा मूळ गाभा कायम ठेवून आम्ही हे संपादकीय संस्कार केले. यासाठी लेखकांची आधी संमती घेणे आवश्यक होते. तथापि वेळेअभावी ते करता आले नाही. लेखांच्या सौंदर्याला ढळ पोचू नये अशी काळजी आम्ही घेतलेली आहेच. तरीही काही उणीवा राहिल्या असल्यास लेखकांनी क्षमा करावी.

'लता' हा ग्रंथ सर्वांगपरिपूर्ण नाही याची नम्र जाणीव आम्हाला आहे. ज्यांचे लेख या ग्रंथात अवश्य अंतर्भूत व्हायला हवे होते असे काही लेखक येथे येऊ शकले नाहीत. वेळेच्या अभावी काही मंडळींशी आम्हालाच संपर्क साधता आला नाही तर काहींना इच्छा असूनही वेळेची मर्यादा कार्य-व्याप्ततेमुळे सांभाळता आली नाही. कोणाची उपेक्षा करण्याचा मुळीच हेतू नव्हता. आमची हौस उदंड असली तरी आमच्या शक्ती आणि वेळ यांना शेवटी मर्यादा पडल्या हे ध्यानी घेऊन ग्रंथातल्या अपुरेपणाबद्दल सर्व सुहृद क्षमा करतील अशी आशा आहे.

उण्यापुऱ्या चार महिन्यांत हा ग्रंथ सिद्ध केला आहे. या कामी अनेकांनी अनेकपरीने साह्य केले आहे. हा सर्व काळ खूप धावपळीत पण तेवढ्याच उत्साही व प्रसन्न मनःस्थितीत गेला. ग्रंथ पूर्ण करीत असताना त्या सर्व आठवणीही मनात जाग्या होत आहेत. ही दुर्मिळ व सुंदर संधी लताबाईंच्या स्नेहामुळे आम्हाला लाभली, याचा आम्हाला मनापासून आनंद वाटतो.

दि० १४-४-१९६७

शांता ज. शेळके
वृंदा लिमये
सरोजिनी वैद्य

राष्ट्रपति भवन, नई दिल्ली-4.
RASHTRAPATI BHAVAN,
NEW DELHI-4.

February 25, 1967.

On the occasion of the celebratio of her Silver Jubilee in the film worl I send my best wishes and congratulati to Kumari Lata Mangeshkar, whose versatility has made her one of the mo popular singers of our time.

S. Radhakrishnan

(S. Radhakrishnan)

३

HOME MINISTER
INDIA.

नवी दिल्ली


दिनांक-१५ मार्च १९६७

कु. लता मंगेशकर हे अद्भुततेचा स्पर्श झालेले भारतीय संगीत सृष्टीचे लेणी आहे. त्यांची गीतें ऐकण्याची संधि मला बरेंच वेळा मिळाली. शब्द आणि भावना यांना जोडणाऱ्या त्यांच्या मधुर स्वरांतून संगीताची नवी सृष्टी उभी राहते व त्या स्वरांनी रसिकांची हृदयें हेलावतात. गीतांतील भावनांचा उत्कट अनुभव येतो. १९६३ सालच्या प्रजासत्ताकदिनानिमित्त दिल्लीस झालेल्या कार्यक्रमाच्यावेळी सीमेवरुन परत न आलेल्या सैनिकांच्या स्मृतिचे 'ये मेरे वतन के लोगों' हे प्रसिद्ध गीत त्यांनी गाइलें तेव्हां स्व.पं.नेहरूंचे डोळे पाणावलेले मी पाहिले आहेत. ते अश्रु लताबाईंच्या स्वरांतील भिजलेल्या भावनांचे होते. तसेंच लताबाईंनी १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या जन्मक्षणीं आळविलेल्या ज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या ओव्यांची आठवण आजहि मला रोमांचित करते.

येत्या एप्रिलमध्ये कु.लता मंगेशकर यांच्या पार्श्वगायनाच्या कारकीर्दीची पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. याप्रसंगी मी त्यांचे अभिनंदन करतो.

माझ्या शुभेच्छा

[illegible]



मुख्य मंत्री

महाराष्ट्र

सचिवालय, मुंबई-३२

दि.२० मार्च १९६७.

केवळ महाराष्ट्रासच नव्हे, तर अखिल भारतास ज्यांच्या कलागुणांविषयी अभिमान वाटावा अशा जागतिक कीर्ती पावलेल्या सुप्रसिध्द पार्श्वगायिका श्रीमती लता मंगेशकर यांनी, चित्रपट व्यवसायात पदार्पण केल्याला येत्या एप्रिल महिन्यात पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत याबद्दल अत्यंत आनंद वाटतो.

महाराष्ट्र ही जशी साधुसंतांची, विद्वानांची, त्यागी समाजसेवकांची गुरुजनांची व शूर वीरांची भूमी आहे, तशीच ती थोर कलावंतांची व रसिकांचीही भूमी आहे. अशा या थोर महाराष्ट्र भूमीस पंचवीस वर्षांपूर्वी एका अत्यंत मधुर आवाजाच्या स्वरलतेचा शोध लागला. ही स्वरलता म्हणजे श्रीमती लता मंगेशकर या होत. श्रीमती लता मंगेशकर यांनी आपल्या गोड गळ्याने अक्षरश: लाखो रसिकांना वेड लावले. संगीत कलेचा थोर वारसा लताबाईंना आपले वडील कै.मा. दीनानाथ यांच्याकडून मिळाला. कलेच्या सेवेसाठी सर्व कुटुंबाने आपले आयुष्य वाहिल्याची उदाहरणे अगदी विरळा. श्रीमती लता मंगेशकर यांच्या सर्व कुटुंबियांनी गायन कलेच्या क्षेत्रात अत्यंत मानाचे स्थान प्राप्त करुन घेतले आहे ही गोष्ट या कुटुंबास खरोखर भूषणावह अशी आहे.

आपल्या कलेच्या द्वारे रसिकांचे मनोरंजन करण्याचे कार्य तर लताबाईंनी केलेच; परंतु अनेक सत्कार्यासाठी आपल्या कलेच्या द्वारे त्यांनी सहाय्यही केले आहे.

अखिल भारतास ललामभूत झालेल्या या थोर महाराष्ट्र कन्येने संगीत क्षेत्रात केलेल्या महान सेवेचा गौरव करण्यात येत असून त्या प्रसंगी 'लता' हा गौरवग्रंथ प्रसिध्द होणार आहे हे यथोचितच होय. येत्या २४ एप्रिल रोजी कै. मा. दीनानाथ यांच्या पंचविसाव्या पुण्यतिथीच्या वेळी हा गौरवग्रंथ प्रकाशित करण्याचे योजिण्यात नियोजकांनी उचितच औचित्य साधले आहे. महाराष्ट्राच्या या थोर सुकन्येस उत्तम आरोग्य व उदंड आयुष्य लाभो अशी शुभेच्छा व्यक्त करुन 'लता' गौरवग्रंथाचे प्रकाशनास मी आपले शुभाशीर्वाद पाठवीत आहे.

वसंतराव नाईक

(वसंतराव नाईक)



मास्टर दीनानाथ

गोमंतकातील मंगेशाची पूजा करणाऱ्या सेवेकऱ्यांपैकी अभिषेकी नावाच्या एका ब्राम्हण घराण्यात दिनांक २९ डिसेंबर १९०० या शुभ दिवशी मास्टर दीनानाथांचा जन्म झाला. गौरवर्ण, उभट चेहरा, तेजस्वी डोळे, तरतरीत नाक, रेखीव जिवणी असे त्यांचे रूप होते. देवालयात सहज कानावर पडणारे मंत्र आपल्या तीक्ष्ण स्मरण-शक्तीमुळे ते लहान वयात अचूक म्हणत असत. गायन, नर्तन, वादन ऐकत राहण्याचा, पाहण्याचा आणि ऐकलेले—पाहिलेले जसेच्या तसे प्रकट करून दाखविण्याचा त्यांना छंद होता.

कै. भास्करबुवा बखले यांचे गुरुबंधू बाबा माशेलकर यांच्याकडे दीनानाथांच्या संगीतशिक्षणाला प्रारंभ झाला.

दीनानाथ बारातेरा वर्षांचे असतानाच गोमंतकात महाराष्ट्रातील किर्लोस्कर नाटक मंडळी आली. देशभक्तांशी, विद्वानांशी आणि बालगंधर्व, गणपतराव बोडस, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या श्रेष्ठ नटवर्यांशी संबंधित असलेल्या या नाटकमंडळीत गोमंतकाच्या मुक्कामातच काही फाटाफूट झाली. तेव्हा नाटक मंडळीचे व्यवस्थापक शंकरराव मुजुमदार यांना गुणी मुलांची आवश्यकता वाटू लागली. शोध घेत असताना छोट्या दीनानाथांची कीर्ती त्यांच्या कानावर आली. महिना तीस रुपयांवर, दीनानाथ आपल्या आईसह या मंडळीत येऊन दाखल झाले.

पुढे बालगंधर्वांनी दीनानाथांबद्दल म्हटले, "हा मुलगा माझ्या हाती लागता तर मंगेशी ते मुंबई असा रुपयांचा गालिचा अंथरून, त्यावरून वाजतगाजत मी याला माझ्या मंडळीत आणले असते!"

किर्लोस्कर नाटक मंडळीत चिंतोबा गुरव, कृष्णाजी अनंत कोल्हापुरे अशा गुणीजनांच्या संगतीत नाट्यगुणांचे पाठ दीनानाथांनी घेतले. रूपाच्या अनुकूलतेमुळे प्रथम दीनानाथांकडे स्त्रीभूमिका सोपविल्या गेल्या. 'सुंदोपसुंद'मधील वेत्रवती, 'शारदे'तील वल्लरी अशा छोट्या संगीतप्रधान भूमिका, आणि 'काँटोमे फूल', 'ताजे वफा' या उर्दूमिश्रित हिंदी नाटकांतून विनोदी भूमिकाही त्यांनी केल्या. या निमित्ताने नव्या शैलीचे गाणे आणि नृत्य त्यांना शिकता आले. लवकरच 'पुण्यप्रभावा'तील वृंदावन,

किंकिणी आणि वसुंधरा यांच्या भूमिका अनुक्रमे चिंतामणराव कोल्हटकर, दीनानाथ, कोल्हापुरे या त्रिकुटाने गाजवल्या. किंकिणीच्या भूमिकेतील दीनानाथांचा अभिनय आणि गाणे यांनी रंगभूमीवर एक नवे पर्व सुरू केले.

१९२० मध्ये अकोला येथे 'भावबंधना'चा प्रथम प्रयोग झाला. या पहिल्या प्रयोगात दीनानाथ—लतिका, कोल्हटकर—घनश्याम, कोल्हापुरे—मालती, दिनकर ढेरे—महेश्वर उर्फ कामण्णा अशा भूमिका होत्या. चौघांनीही जीव ओतून कामे केली. विदर्भात अमाप यश मिळवून 'बलवंत'च्या 'भावबंधना'ने मुंबईपुण्याकडेही नाव केले.

बालगंधर्वांकडून काही अटींवर 'एकच प्याला' करण्याची परवानगी घेऊन दीनानाथांनी बालगंधर्वांपेक्षा वेगळी अशी सिंधूची भूमिका करून दाखविली.

मिरजेचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे यांच्याबद्दल दीनानाथांना फार आदर होता. त्यांच्याकडून रजपूत इतिहासावरील 'उग्रमंगल' हे नाटक त्यांनी लिहून घेतले. दीनानाथ त्यातील राणी पद्मावतीची भूमिका करीत. नायिका पद्मावती नर्तिकेच्या वेषात शत्रूच्या शिबिरात जाऊन त्याच्या मुलाला मोहित करून आणते असा प्रसंग नाटकात आहे. त्यासाठी दीनानाथांनी पंडित सुखदेव ह्यांच्याकडून कथ्थक नृत्याचे पाठ घेतले. आपल्या सर्वसंग्राहक स्वभावानुसार घराणेदार ठुंबऱ्याही त्यांनी त्यांच्याकडून शिकून घेतल्या. या नाटकातील उत्तम दृश्ये व भरजरी पोशाख यांसाठी दीनानाथांनी अमाप पैसा खर्च केला. नृत्य, गायन, अभिनय आणि जन्मजात लाभलेले रूप यांमुळे 'उग्रमंगल' मधील पद्मावती हा दीनानाथांचा यशाच्या कळस ठरला.

या नाटक मंडळीतील तरुण कलाकारांनी महाराष्ट्रीय प्रेक्षकांचे मन जिंकले असतानाच तिच्यातील कलवंतांचे व्यवस्थापकांशी काही मतभेद निर्माण झाल्याने १९१७ साली दीनानाथांनी आपल्या काही सहकाऱ्यांसह कंपनी सोडली. ग. ना. उर्फ तात्यासाहेब परांजपे या नावाचे किर्लोस्कर मंडळीचे एक हितचिंतक होते. त्यांनी किर्लोस्कर मंडळीतून बाहेर पडलेल्या या कलाकारांना 'बलवंत संगीत मंडळी' ही नवी नाटक मंडळी काढण्यास साह्य केले. 'बलवंत' या नावाने अण्णासाहेब किर्लोस्कर व लोकमान्य टिळक या दोघा पूजनीयांचे स्मरण एकत्रच होणार होते. अठरा सालच्या जानेवारीमध्ये शाकुंतलाच्या तालमींनी मंडळीच्या कामाला प्रारंभ झाला. दीनानाथांकडे शकुंतलेची भूमिका आली. त्यांच्या जोडीला चिंतामणराव कोल्हटकर, कोल्हापुरे, नेवरेकर, बाळकोबा गोखले, शंकरराव आणि गणपतराव मोहिते, परशराम सामंत असा संच होता. लवकरच दिनकरराव ढेरे ऊर्फ कामण्णा आणि दामुअण्णा मालवणकर ही विनोदी जोडगोळी मंडळीला येऊन मिळाली.

२९ मार्च १९१८ रोजी नामदार जयकरांच्या अध्यक्षतेखाली 'बलवंत'च्या शाकुंतलाचा पहिला प्रयोग मुंबईत झाला. त्याचे फार उत्साहाने स्वागत झाल्यामुळे मंडळीने 'सौभद्र', 'पुण्यप्रभाव', 'काँटोमे फूल', 'ताजेवफा' ही नाटके बसवून धूमधडाक्याने त्याचे प्रयोग केले. नवीन नाटके रंगभूमीवर आणावीत या हेतूने गडकऱ्यांचे 'भावबंधन', श्री. कृ. कोल्हटकरांचे 'जन्मरहस्य' आणि तात्यासाहेब केळकरांचे 'वीरविडंबन' यांचा विचार सुरू झाला. पण मंडळीच्या या ऐन उमेदीच्या काळातच दीनानाथांवर एक नैसर्गिक आपत्ती कोसळली. त्यांचा आवाज फुटला.

परंतु दिवसातून आठदहा तास तालीम करून, स्वतःच्याच स्वरांशी द्वंद्व खेळून दीनानाथांनी नवा रुंद, ढाला, पहाडी, पल्लेदार, खणखणीत असा आवाज कमावला. त्यांच्या आवाजाची फेक अधिक तडफदार, तळपत्या तलवारीसारखी, तान भिंगरीसारखी आणि गोळीबंद अशी झाली. सानुनासिक स्वर लावण्याच्या पद्धतीने दीनानाथांच्या गायनाला एक वेगळेच माधुर्य आले होते. गळ्याची लोचदार फिरत आणि तालाचा पक्केपणा या साऱ्या अपूर्व स्वरवैभवानिशी दीनानाथ पुन्हा रंगमंचावर आले.

तात्यासाहेब केळकरांच्या 'वीरविडंबना'त दीनानाथ 'उत्तरा' आणि दिनकर कामण्णा 'उत्तर' ही जोडगोळी विलक्षण गाजली. गंभीर आणि अल्लड अशा दोन्ही प्रकारच्या भूमिका एकाच वेळी दीनानाथ करू लागले.

यानंतर 'बलवंत'मध्ये काही अंतर्गत मतभेद झाले आणि दीनानाथ, कोल्हापुरे व कोल्हटकर हे तिघे नट कंपनीचे मालक झाले. रुपयात सात आणे मालकी दीनानाथांची, पाच आणे कोल्हापुरे यांची आणि तीन आणे चिंतामणराव कोल्हटकरांची असा करार झाला. बलवंतच्या या गुणी नटांवर कै. गडकऱ्यांचे फार प्रेम होते. गडकऱ्यांनी त्यांच्यासाठी 'भावबंधन' लिहायला घेऊन अगदी मृत्युशय्येवर असताना ते पूर्ण केले आणि 'बलवंत'ला ते कायमचे हक्काने देऊन टाकले. गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर मार्च १९२२ मध्ये 'बलवंत' इंदूरला गेली असताना भावबंधनचा प्रयोग श्रीमंत तुकोजीराव होळकर यांनी पाहिला. आणि खास आग्रहाने गडकऱ्यांचे अपूर्ण 'राजसंन्यास' रंगभूमीवर आणण्यास सांगितले. त्या नाटकासाठी लागणारी भरजरी वस्त्रे राजेसरकारांनीच दिली. तीन महिन्यांचा सर्व मंडळींचा शिधा आणि नक्त एक हजार रुपयेही पाठवून दिले. या नाटकातील दीनानाथांची 'शिवांगी' सरकार आणि सामान्य नागरिक सर्वांनाच आवडली. नाटक मंडळी महाराष्ट्रात परतली ती 'राजसंन्यास'ला प्रेक्षकांचे मुजरे घेतच. मुंबईत सतत तीन महिने या नाटकाचे प्रयोग चालले.

याच वर्षी पश्चिम खानदेशातील थाळनेर गावच्या श्री. हरिदास रामदास नामक सावकारांच्या नर्मदा नावाच्या मधल्या मुलीशी दीनानाथांचा विवाह इंदूर येथे मोठ्या थाटामाटाने झाला. श्रीमंत होळकरांच्याबरोबरच दीनानाथांवर प्रेम करणाऱ्या इंदूरनिवासी सामान्य रसिकांनीही नूतन परिणीत दांपत्यावर बहुमोल आहेरांचा नुसता वर्षाव केला. दीनानाथांनी पत्नीचे नाव श्रीमती असे ठेवले.

याच सुमारास श्री जगद्गुरु शंकराचार्य कुर्तकोटी यांनी मंडळीच्या अमरावतीच्या मुक्कामात 'उग्रमंगल' पाहिले आणि 'संगीतरत्न' अशी पदवी दीनानाथांना दिली. अशा रीतीने राजसत्ता, धर्मसत्ता आणि सामान्य जन सर्वांकडूनच दीनानाथांच्या कलेचे चीज होत चालले.

अपार वैभव आणि कीर्ती मिळवून दीनानाथ मंगेशाच्या दर्शनासाठी गोमंतकात गेले. तेथे दीनानाथांचे स्वागत मोठ्या थाटाने आणि आपुलकीने झाले.

बेळगावला मंडळीचा मुक्काम असताना गडकऱ्यांचे 'वेड्यांचा बाजार' हे प्रहसन 'बलवंत'ने बसवले. प्रहसनात दिनकर कामण्णा बाळाभाऊची आणि दीनानाथ वेणूची भूमिका करून हास्याची धमाल उडवून देत. मग अण्णासाहेब किर्लोस्करांचे रामराज्यवियोग 'बलवंता'साठी कोल्हटकरांकडून पूर्ण करून घेऊन दीनानाथांनी ते रंगभूमीवर आणले. त्यात रामाची शांत आणि संयत भूमिका करून आपण पुरुषांची भूमिकाही यथायोग्य करू शकतो हे दीनानाथांनी दाखवून दिले. १९२४मध्ये विदर्भाचा दौरा चालू असताना 'चौदावे रत्न किंवा त्राटिका' या ठसकेबाज हास्यरसप्रधान नाटकाच्या तालमी दीनानाथांनी सुरू केल्या होत्या. या नाटकातील कोल्हटकरांची प्रतापरावाची, दीनानाथांची त्राटिकेची, कामण्णाची राणोजीची आणि मालवणकरांची रणधीराची या भूमिका विलक्षण गाजल्या. नाटक सर्व दृष्टीने अत्यंत यशस्वी ठरले.

दीनानाथांनी अद्यापपर्यंत कोणा गायनाचार्यांचा गंडा बांधलेला नव्हता. व्यवसायाच्या दृष्टीने त्यांना तशी फारशी आवश्यकताही नव्हती. परंतु गायनाचार्य वझेबुवांचे शिष्यत्व पत्करावे असे त्यांच्या मनाने घेतले. ते म्हणाले, माझ्या गानविद्येवर ब्रम्हमुखाने आपल्या शिष्यत्वाची मुद्रा उठविली पाहिजे. या विद्येचे मूळ यावनी संस्कारात रुजले आहे ते उपटून या विद्येवर पुन्हा हिंदुत्वाचे संस्कार करावेत म्हणून मी वझेबुवांना गुरू करून घेणार आहे. त्यांनी जेव्हा नम्रपणे शिष्यत्वाबद्दल वझेबुवांकडे विचारणा केली तेव्हा चकित होऊन बुवा म्हणाले, "तू माझा गंडा बांधून घेणार म्हणजे करणार तरी काय?" शेवटी दीनानाथांच्या आग्रहामुळे बेळगावला गंडा बांधण्याचा समारंभ

मोठ्या थाटाने झाला. थोड्याच दिवसात बुवांच्या ध्यानात आले की आपल्या जवळच्या शेदीडशे चिजा या बुद्धिमान शिष्याने अगोदरच हस्तगत केलेल्या आहेत.

१९२७ मध्ये वीर वामनराव जोशांचे 'रणदुंदुभी' 'बलवंत'ने स्वीकारले. भरगच्च पोशाख व दृश्ये यांच्यासह मुंबईच्या रसिक प्रेक्षकांसमोर प्रथम ते सादर केले गेले. 'रणदुंदुभी' मधील तेजस्विनीची भूमिका आणि 'परवशता पाश दैवे' 'दिव्य स्वातंत्र्य रवि' ही पदे विलक्षण गाजली. मराठी रंगभूमीवरील हा धगधगता कालखंड होता. मिठाच्या सत्याग्रहाचे वेध देशाला लागलेले होते. शेवटी या पदांवर बंदी घातली गेली.

याच सुमारास दीनानाथांची सुलक्षणी पत्नी प्रसूतिरोगाने मृत्यू पावली. त्यांची ललिता नावाची लहानगी कन्या व वडील गणेशभटही त्याच वर्षी दिवंगत झाले. दीनानाथांचे वय यावेळी फक्त सत्तावीस वर्षांचे होते. रीतीप्रमाणे एका वर्षाच्या आत पुनर्विवाह करावयाचा होता. तेव्हा प्रथम पत्नीचीच धाकटी बहीण शुद्धमती हीस वधू नेमस्त करून अगदी साध्या पद्धतीने थाळनेर मुक्कामी दुसरा विवाह उरकण्यात आला. दुसऱ्या पत्नीचे नावही त्यांनी श्रीमती असेच ठेवले.

वयानुसार आता दीनानाथांची शरीरयष्टी पुरुषभूमिकेला अनुकूल झाली होती. मानापमानातील धैर्यधराची भूमिका त्यांना विशेष आवडलेली होती. तेव्हा ती वेगळ्या पद्धतीने त्यांनी रंगमंचावर आणण्याचे ठरविले. पोशाखांतील आणि पदांच्या चालींतील बदल सनातनी प्रेक्षकांना रुचला नाही. पण नाटकाचे लेखक कै. काकासाहेब खाडिलकर म्हणाले, "माझे हे नाटक कालमानानुरूप आहे असा जो मला मुळापासून एक आत्मविश्वास होता तो दीनानाथांच्या या स्थित्यंतरित भूमिकेनेही बळावलाच!"

यानंतर १९३१ मध्ये 'बलवंत'ने स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'संन्यस्त खड्ग' रंगभूमीवर आणले. नाटकातील भाषा आणि संदेश दोन्हीही अत्यंत जळजळीत होती. 'सुकतातचि जगी या' हे यातील पद लोकप्रिय झाले पण नाटक फारसे लाभदायक मात्र झाले नाही.

१९३२ मध्ये सिमला येथील असेंब्लीच्या अधिवेशनाच्या वेळी आबासाहेब मुजुमदारांच्या आग्रहाने अनेक देशी-परदेशी पाहुण्यांपुढे दीनानाथांचे गाणे झाले. व्हाइसरॉयकडून पंचवीस तोळे वजनाचे सुवर्णकमळ या कार्यक्रमाबद्दल मानधन म्हणून दीनानाथांना मिळाले. या उच्चपदस्थांच्या बैठकीत पारतंत्र्याने दाटलेल्या दिवसांत 'परवशता पाश दैवे' हे गीत दीनानाथांनी म्हटले.

परंतु या चढत्या आलेखाला १९३२ सालानंतर मात्र उतरती कळा लागली.

'बलवंत'च्या तिघा मालकांनी उमेदीच्या काळात जी अनेक स्वप्ने पाहिलेली होती त्यांपैकी एक प्रकाशन संस्था व छापखाना चालविण्याचे होते. परंतु हे स्वप्न आर्थिक दृष्ट्या व्यवहारात तोट्याचे ठरले. भरभराटीच्या काळात 'बलवंत'चे मासिक उत्पन्न पंधरा-सोळा हजार असावयाचे. नुसते पाच लाखांचे सामानच मंडळीच्या मालकीचे होते. शिवाय दीनानाथांना लक्षावधी रुपयांच्या वैयक्तिक देणग्या मिळालेल्या होत्या. पाऊण लाखाचे 'स्त्रीधन' त्यांच्याजवळ होते. खानदेशात चोवीस बिघे जमीन, गोमंतकात एक आंबा, फणस, काजू यांचे उत्पन्न देणारा डोंगर, सांगलीस चाळ आणि पुण्यात एक घर अशी स्थावर इस्टेटही होती. याखेरीज विमे, ठेवी इत्यादीत गुंतलेला पैसा निराळाच होता. परंतु या सर्व वैभवाला अनेक बाजूंनी वाटा फुटल्या. 'बलवंत'चा पहिला उत्साह आणि जोम सरला. निरनिराळ्या व्यसनांची पावले मंडळीच्या बिऱ्हाडी शिरली. तीन मालक मित्रांचीही तोंडे तीन दिशांना झाली. 'गैरसमज' आणि 'ब्रह्मकुमारी' ही नवीन आणलेली नाटके बुडत्याचा पाय अधिकच खोलात घालून अंतर्धान पावली. त्यातच एक दिवस 'बलवंत पिक्चर्स कॉर्पोरेशन' काढण्याची बुद्धी दीनानाथ —कोल्हटकर या जोडीला झाली. 'कृष्णार्जुनयुद्ध' हा त्यांचा पहिला चित्रपट अनेक कारणांनी कोसळला आणि आर्थिक दृष्ट्या होणाऱ्या दाणादाणीला केवळ पारावार राहिला नाही. एके काळी आपल्या संगीताने महाराष्ट्रावर अधिराज्य गाजविणारा हा थोर कलावंत लहानमोठ्या फिर्यादींनी गांजून गेला.

एक दिवस वॉरंट चुकविण्यासाठी भरल्या ताटावरून उठून दीनानाथांना नाहीसेही व्हावे लागले. दोघे स्नेही जामीन राहिल्यानंतर रीतसर खटला सुरू झाला. या काळात कायदेशीर पळवाट शोधून आणि सगळा भार कोल्हटकरांच्यावर टाकून दीनानाथांना सर्व जबाबदारीतून सुटणे शक्य होते. पण दीनानाथांनी ते नाकारले. या सर्व प्रकरणात चित्रपट कंपनीची वाट लागली आणि फिरून 'बलवंत संगीत मंडळी' सुरू करावी असा विचार सुरू झाला. दीनानाथांना कुटुंबाच्या उपजीविकेची फारशी चिंता नव्हती. केवळ गाण्याच्या बैठकीवर ते पोटापुरते मिळवू शकले असते—परंतु 'बलवंत'चे सगळेच घटक त्यांचे आत्मीय होते. त्यांचा विचार करून १९३८ मध्ये दीनानाथांनी पुन्हा नाटक मंडळी सुरू केली. यावेळी विशेष पुढाकार घेतला परशराम सामंत यांनी. नटसंचाची जमवाजमव वगैरे सर्व धावपळ त्यांनीच केली. कोल्हटकरांनी स्वतः होऊन मालकी सोडून दिली आणि केवळ नट म्हणून मंडळीत ते राहिले. मालक म्हणून सर्व जबाबदारी दीनानाथांच्यावर आली. आणि टाकलेले प्रत्येक नवे पाऊल आर्थिक दृष्ट्या त्यांना खोलातच घेऊन गेले. आर्थिक ओढाताणीच्या या दिवसात मित्रमंडळींच्या संबंधांनाही विचित्र स्वरूप येऊ लागले. मालक चिंतामणराव कोल्हटकर मालकी आणि तिच्याबरोबर येणारी जबाबदारी सोडून देऊन पगारदार नट म्हणून काही दिवस कंपनीत राहिले. आणि नंतर कंपनी सोडून गेले. पण दीनानाथांना आपल्या कलेचा विलक्षण विश्वास होता. ते म्हणाले, "अरे, चिंता कशाला? माझा गळा आहे ना!"

दीनानाथांची गृहस्थिती नाटक कंपनीच्या परिस्थितीबरोबरच आंदोलत होती. सत्तावीस साली विवाहबद्ध झालेल्या दीनानाथांचा एकोणीसशे बत्तीसपर्यंतचा कालखंड पुष्कळच सुखासमाधानात गेला होता. पण त्यानंतर परिस्थितीची झळ सर्व कुटुंबाला लागत होती. दीनानाथांना एकंदर पाच अपत्ये झाली. चार मुली आणि एक मुलगा. लता, मीना, आशा, उषा आणि हृदयनाथ. सर्वांत मोठ्या लतेच्या गळ्यात देवदत्त गंधार होता. त्या गंधाराच्या रूपाने जणू नादब्रह्मानेच तिला आपला आशीर्वाद दिलेला होता. तिला बरोबर घेऊन मध्ये दीनानाथांनी गाण्याचा एक जलसा केला. 'शूरां मी वंदिले' हे पद या लहानग्या गायिकेने ज्या तयारीने गाइले त्याला जाणकारांनी आश्चर्यमुग्ध होऊन माना डोलवल्या. दीनानाथांचा आत्मविश्वास वाढला. मग त्यांनी वि. ना. कोठीवाले यांच्याकडून 'गुरुकुल' या नावाचे लहान मुलांच्या भूमिका असलेले नाटक लिहून घेतले. त्यात लता श्रीकृष्णाची आणि मीना सुदाम्याची भूमिका करीत. पण हे प्रयत्न केवळ पूरकच होते; त्यावर कंपनीचा खर्च चालणे शक्य नव्हते.

अशाही परिस्थितीत अखेरची धडपड म्हणून दीनानाथ कंपनीसह महाराष्ट्रात प्रयोग करीत हिंडत होते. मुंबई, सिन्नर, नांदगाव, धुळे असा प्रवास चालला होता. कंपनीतील किंमती वस्तू काही ठिकाणी गहाण पडत होत्या, विकल्या जात होत्या आणि काही बरोबर घेऊन कंपनीतील माणसेही निघून जात होती. अखेर धुळ्याला असताना कंपनीचा उरलासुरला कारभार गुंडाळून टाकून दीनानाथांनी जन्मभर जडवून घेतलेल्या ध्यासाची इतिश्री करून टाकली.

दीनानाथांनी पुण्यात स्थायिक व्हायचे ठरवले. आता त्यांचे कुटुंब, ते स्वतः, पत्नी आणि पाच लहान अपत्ये एवढेच राहिले होते. शुक्रवारपेठेतील ७५०$\frac{1}{3}$ हे दुमजली घर विकत घेऊन ते तेथे राहू लागले. दीनानाथांनी फार पूर्वीच ज्योतिषशास्त्राचा उत्तम अभ्यास केलेला होता. संगीतशास्त्रावर एक प्रबंध लिहायला घेतला होता. परंतु त्या कशातच त्यांचे मन आता रमत नव्हते. नाटकातील संवाद मनाशी म्हणत ते बसायचे, गेल्या दिवसांचा सतत विचार करायचे. हा एवढाच त्यांना छंद उरलेला होता. अतिविचाराने त्यांचा ब्लडप्रेशरचा विकार अधिकच वाढत गेला.

एका हितचिंतकाने या पितापुत्रीच्या गाण्याचे काही जलसे करवले. लोकांनी एकदा 'मानापमाना'त दीनानाथांना आग्रहपूर्वक धैर्यधरही व्हायला लावले परंतु नाटकाची घडी पहिल्यासारखी जुळेना.

अखेरच्या दिवसांत दीनानाथ परत एकदा मंगेशीला गेले. तिथे त्यांचे लोकानी चांगले आतिथ्य केले. परंतु दीनानाथच आता मनाने इतके विरक्त झाले होते की त्यांनी आपल्याजवळील होते नव्हते ते सर्व वाटून टाकून भगवी कफनी परिधान केली. रोगाने पोखरलेले शरीर वागवीत उदास, हताश वृत्तीने दीनानाथ परत पुण्याला आले.


त्यानंतर प्रकृती बिघडतच गेली. तेवीस एप्रिल एकोणीसशे बेचाळीसच्या रात्री त्यांना रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या. ते बेशुद्ध झाले. काही हितचिंतकांनी औषधोपचारासाठी त्यांना ससूनमध्ये नेले परंतु थोड्याच वेळात तेथे त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

ते मोहक डोळे आणि तो अद्‌भुत स्वर अनंतात विलीन झाला. अभिनयाने आणि गायनाने रंगलेल्या धुंद रात्रींच्या आठवणी फक्त मागे उरल्या.

दीनानाथ आजारी असताना लहानग्या लतेला जवळ घेऊन म्हणाले होते, "तो कोपऱ्यातला माझा तंबोरा, ही उशाशी ठेवलेली चिजांची वही आणि श्री मंगेशाची कृपा यावेगळे तुला देण्यासारखे माझ्याजवळ काही नाही."

वडलांनी दिलेला हा अद्‌भुत वारसा लताने श्रद्धेने सांभाळला, जोपासला आणि वाढवला. छोट्या लताचा आकाशवाणीवर झालेला एक कार्यक्रम ऐकताना अंथरूणाशेजारी बसलेल्या आपल्या पत्नीला डबडबलेल्या डोळयांनी आणि गहिवरल्या आवाजाने दीनानाथ म्हणाले होते "अग, माझा आवाज मी आज ऐकतो आहे."

त्या दीनानाथांचा स्वर—ही लता.



लता

लता ही मा. दीनानाथांची सर्वांत थोरली मुलगी. तिच्या जन्माच्या वेळी तिच्या मातुश्री माई इंदूरला आपल्या बहिणीकडे होत्या. तेथे दि. २८ सप्टेंबर १९२९ रोजी शनिवारी रात्री साडेदहाच्या सुमारास लताचा जन्म झाला. जन्मपत्रिकेनुसार 'ह' हे अक्षर आले होते. म्हणून 'हेमा' हे तिचे नाव ठेवले होते. दीनानाथांनी आपल्या आवडीचे म्हणून 'हृदया' असे तिचे नामकरण केले. शिवाय लताच्या पहिल्या मातुश्रींना म्हणजे माईंच्याच थोरल्या बहिणीला एक मुलगी झाली होती. ती नवव्या महिन्यांतच निधन पावली. तिचे नाव ललिता ठेवलेले होते. तिची स्मृती म्हणून या नवजात बालिकेचे नावही 'लता' ठेवले.

पहिली मुलगी म्हणून बाळपणी लताचे खूपच कोडकौतुक झाले. भरपूर जावळ असलेली ही मुलगी गुटगुटीत, हंसतमुख, खेळकर अशी होती. वडील तिचे फार लाड करीत. आईचा मार क्वचित लताने खाल्ला असेल. पण दीनानाथ मात्र चुकूनही कधी तिला मारीत नसत. त्यांना तिच्यावाचून मुळीच चैन पडत नसे.

लताच्या जन्माचे वेळी दीनानाथ हे मराठी रंगभूमीवरचे एक अत्यंत गुणी नायक नट म्हणून सर्वत्र मान्यता पावले होते. महाराष्ट्रातल्या एका अत्यंत गाजलेल्या नाटक मंडळीचे—'बलवंत संगीत मंडळी'चे—ते मालक होते. कंपनी जोरात चालत होती. यावेळी दीनानाथांचा नेहमी रहिवास सांगली येथे असे. तेथे हे कुटुंब दहा वर्षे राहात होते. दीनानाथांनी स्वतः बांधलेले खूप मोठे चाळवजा घर तिथे होते. पहिल्या मजल्यावरच्या तेरा खोल्या मंगेशकरांनी स्वतःकडे राखून ठेवल्या होत्या. हे घर ज्या रस्त्याला होते तो रस्ता 'दीनानाथ रस्ता' म्हणून ओळखला जाई. आजही तो त्याच नावाने ओळखला जातो. या काळी मंगेशकरांचे घर चांगले संपन्न होते. घरांत सैपाकीण, गडी, चाकर नोकर असा थाट असे. रोज साठसत्तर माणसे पंक्तीला जेवत. लता व धाकट्या दोघी बहिणी मीना आणि आशा या भावंडांचे सांगलीचे जीवन स्वास्थ्यपूर्ण, निश्चिंत, निर्वेध असे गेले.

लताचा आवाज बालपणापासूनच अत्यंत पातळ, धारदार, लवचिक असा होता. आणि गाण्याकडे

तिचा नैसर्गिक कल होता. ती अवघ्या अकरा महिन्यांची असताना एके दिवशी दीनानाथ सारंगी वाजवत होते. सारंगीचे सूर ऐकता ऐकता लताने नकळत आपला आवाज त्या सुरात अलगत मिसळून दिला. त्याबरोबर दीनानाथ चटकन उद्गारले, "ही मुलगी गाणार!" वडील दीनानाथ हेच गायनकलेतले लताचे पहिले गुरु. त्यांचे गाणे ऐकून आणि ते आपल्या शिष्यांना जी तालीम देत तिच्याकडे अवधान देऊन लताने आपल्या विद्येला प्रारंभ केला. एकदा ती आपल्या धाकट्या बहिणीला—आशाला—खेळवीत असता जवळच दीनानाथांचा एक शिष्य 'पूरिया धनाश्री' हा राग आळवत बसला होता. गाताना तो चुकला. तेव्हा लताने लगेच त्याची चूक त्याला सांगितली, इतकेच नव्हे तर कसे गावयास हवे होते हे तिने स्वतः त्याला गाऊन दाखवले. दीनानाथांनी जेव्हा हे ऐकले तेव्हां या मुलीला आता पद्धतशीर गाणे शिकवले पाहिजे असे त्यांना तीव्रतेने वाटले आणि ते लताला म्हणाले,

"उद्यापासून सकाळी उठून तंबोरा घेऊन तू गाणे सुरू कर. मी स्वतः तुला गाणे शिकवीन."

दुसऱ्या दिवशी सकाळीं साडेपाच वाजताच दीनानाथांनी लताला उठवले आणि तिच्या हाती तंबोरा देऊन तिला गावयास बसवले. त्या पहाटे त्यांनी तिला सदारंगांची 'पूरिया धनाश्री'तली चीज दिली. लता रोज तास अर्धा तास त्यांच्यापुढे गात असे. संध्याकाळीही साडेसहा सात वाजता दीनानाथ तिला गाणे म्हणण्यास बसवीत. यावेळी लताचे वय पांच सात वर्षांचे असेल. यानंतर तिला गाण्याचा पक्काच नाद लागला. वडलांच्याकडून अनेक राग व चिजा तिने मिळविल्या.

मंगेशकरांकडे सांगलीला विठ्ठल नावाचा एक नोकर होता. त्याने लताच्या हाती प्रथम पाटी-पेन्सिल देऊन ग म भ न ही अक्षरे तिला गिरवायला लावली. सांगलीला लता शाळेला जाई. पण तिला शाळेची तशी गोडी कधी लागली नाही. तिच्या डोक्यांत सतत गाणे भरलेले असे. लताची बुद्धी जात्या तल्लख होती. तिचे निरीक्षण सूक्ष्म असे. तीव्र संवेदनाशीलता आणि जबरदस्त स्मरण-शक्ती हे तिचे गुणही फार बालवयापासून प्रकट होऊं लागले होते. उत्तम ग्रहणशक्तीमुळे जे गाणे ऐकावे ते ती लगेच आत्मसात करून टाकी. गाण्याची नादिष्ट असलेली ही मुलगी एरव्हीच्या जीवनात आग्रही, जिद्दीची, कांहीशी बंडखोर अशी होती. उघड्या डोळ्यांनी ती जग बघत होती आणि अनेक संस्कार घेत मोठी होत होती.

सांगलीचे सुखाचे जीवन फार काळ टिकले नाही. लता चारपांच वर्षांची झाली न झाली तोच काही मित्रमंडळीच्या व सहकाऱ्यांच्या सल्ल्याने दीनानाथांनी 'बलवंत संगीत मंडळी' बंद करून 'बलवंत पिक्चर्स कॉर्पोरेशन' नावाची चित्रपटसंस्था काढली. पण हा व्यवहार आर्थिकदृष्ट्या त्यांना लाभदायक ठरला नाही. तेव्हा त्यांनी नाटकमंडळीचे पुनरुज्जीवन केले. हे अडतीस एकूणचाळीस साल होते. दीनानाथांनी पुन्हा कंपनीतर्फे नाटके बसविण्यास सुरुवात केली. पण पूर्वीची घडी एकदा मोडली ती मोडलीच. मनमाड मुक्कामी कंपनीने 'सौभद्र' नाटक जाहीर केले होते. त्यावेळी नारदाची भूमिका करणारा नट आजारी पडला. ऐन वेळी नारद कोणाला करावे असा प्रश्न उभा राहिला. लता म्हणाली "मी होते नारद!" आणि ती आत्मविश्वासाने रंगभूमीवर नारदाच्या भूमिकेत उभी राहिली. 'राधाधरमधुमिलिंद' आणि 'पावना वामना' ही पदे तिने अशा गोड आर्जवीपणाने गाऊन दाखवली की प्रेक्षक अगदी थक्क होऊन गेले. दीनानाथांनी आधी गाणी गाऊन 'वन्समोअर' मिळवले होते. पण लताने त्यांच्यानंतर काम करून त्यांच्यासमोर प्रेक्षकांचे 'वन्समोअर' घेऊन दाखवले.

यानंतर लता वडलांबरोबर नाटकांतून छोट्या छोट्या भूमिका करू लागली. 'पुण्यप्रभावा'तील युवराजाचे काम ती करी. युवराजाच्या शेवटच्या पदाला ती कधीही 'वन्समोअर' घेतल्यावाचून राहिली नाही. 'भावबंधन' मधले 'लाडकी असेचि पोर' हे एक तिचे असेच पेटंट गाणे होते. 'त्राटिका' नाटकात 'तान्या'ची भूमिका ती उत्तम रीतीने करी. त्याच्या तोंडची 'बगितलं ग्वाड

पाखरू' ही लावणी ती रंगवून म्हणे. वस्तुतः या वेळी तिचे वय इतके लहान होते की रंगमंचावर ती फार छोटी दिसे. पण आपल्या धीटपणाने, आत्मविश्वासाने आणि अत्यंत मधुर सुरेल आवाजाने ती प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून टाकी.

याच सुमाराला सोलापूरकरांनी दीनानाथांच्या गाण्याचा जाहीर जलसा करण्याचे ठरवले. त्यावेळी लतानेही त्या जलशात भाग घ्यायचा हट्ट धरला. दीनानाथांनीही लाडक्या लेकीची हौस पुरवायचे ठरवले. 'पितापुत्रीचा जलसा' अशी या जलशाची जाहिरात केली गेली. या जलशात लताने 'खंबावती'तली एक चीज गाइली आणि मग नाटकातली दोन पदे गाऊन दाखवली. छोटी लता यावेळी प्रेक्षकांची मने अशी जिंकून गेली की त्यांनी तिचे गाणे पुन्हा झाले पाहिजे असा आग्रह धरला. पण गाऊन थकलेली लता केव्हाच गाढ झोपी गेली होती!

लताची कला एकीकडे अशी आकाराला येत होती आणि दुसरीकडे दीनानाथांचे जीवन नाना काळज्यांनी, अडचणींनी ग्रासले जात होते. चित्रपटाचा व्यवहार अंगाशी आला होता. आर्थिक विवंचना वाढत होत्या. आणि सुखाच्या वेळी साथ देणारे सोबती आता तोंडे चुकवू लागले होते. दीनानाथांसारख्या मनस्वी कलावंताच्या वृत्तीवर या सर्व घटनांचा परिणाम होणे अपरिहार्य होते. ते विषण्ण, उदास होऊ लागले. शेवटी कंपनी बंद करून सर्व मंडळी पुण्यास आली. पुण्याला बुधवार पेठेत रेवडीवाल्याच्या बोळात दीनानाथांनी जागा घेतली. लताला ते गाणे शिकवीतच होते. त्यांचा सर्व भरवसा आता तिच्यावर होता. कलाविषयक आकांक्षा तिच्या ठायी केंद्रित झाल्या होत्या. लताचे वय अजून लहानच होते. पण जन्मजात शहाणपणामुळे आणि संवेदनाशील वृत्तीमुळे आपली परिस्थिती, वडलांचे मन ती जाणू शके.

१९४१ साली पुण्यात 'खजांची' चित्रपट लागला होता. गुलाम हैदर यांनी या चित्रपटाला दिलेले पंजाबी ढंगाचे संगीत सर्वांना मोहून टाकीत होते. या स्पर्धेत नाव दाखल करण्याचे लताने ठरवले. दीनानाथांना ती गोष्ट मान्य नव्हती. कारण या स्पर्धेत लता जर पहिली आली नाही तर ते मोठ्या मानहानीचे होईल असे त्यांना वाटत होते. लताला मात्र आपल्या यशाची खात्री होती. योगायोगाने दीनानाथ याच वेळी परगावी कार्यक्रमासाठी गेले. आणि लताने स्पर्धेत भाग घेतला. त्यात तिने पहिले पारितोषिक मिळवले. तिला एक दिलरुबा बक्षीस मिळाला. लताला अतिशय आनंद झाला, त्या बालिश आनंदाच्या भरात घरी ती दुसऱ्या कुणालाही आपल्या दिलरुब्याला हात लावू देईना. दीनानाथांनी हे जेव्हा पाहिले तेव्हा त्यांनी रागारागाने दिलरुब्याचा 'बो' दूर भिरकावला. त्याची तार तुटली. लताला दुःख झाले. तेव्हा दीनानाथ तिला म्हणाले, "लता, आपल्याला मिळालेल्या यशाने माणसाने कधीही हुरळून जाऊ नये. कलावंत नम्र असावा." वडलांचा हा उपदेश लताने सदैव अंतःकरणावर कोरून ठेवला.

मा. दीनानाथांच्या जीवनाच्या अखेरचा काळ मोठ्या हताश मनःस्थितीत गेला. दि. २४ एप्रिल १९४२ रोजी पुणे येथे त्यांचे अकस्मात निधन झाले. लताचे वय यावेळी होते बारा तेरा वर्षांचे. दुःखीकष्टी विधवा आई आणि छोटी अजाण भावंडे यांची सर्व जबाबदारी, संसाराचा भार या लहानग्या मुलीवर येऊन पडला. देवदत्त गोड गळा, वडलांकडून संपादन केलेली गायनकला आणि अत्यंत स्वाभिमानी तशीच जिद्दीची मनोवृत्ती एवढेच काय ते लताचे भांडवल होते. त्यावर तिचा सारा भार होता. न डगमगता ती ताठ उभी राहिली आणि डोळ्यांतले पाणी पुसून तिने पुढली वाट आक्रमण्याचा निर्धार केला.

यापूर्वीच पार्श्वगायनाच्या क्षेत्रात तिचे पाऊल पडले होते. दीनानाथ असतानाच वसंतराव जोगळेकर यांच्या 'किती हंसाल' या चित्रपटांत काम करण्याची लताला संधी मिळाली होती. या चित्रपटासाठी 'नाचू या गडे खेळू सारी। मनी हौस भारी' हे आपले पहिले गाणे तिने

ध्वनिमुद्रित केले. या ध्वनिमुद्रणाला जाताना लता वडलांच्या पाया पडून त्यांचा आशीर्वाद घेऊन गेली होती. पुढे हा चित्रपट निघालाच नाही. यानंतर दीनानाथांच्या कंपनीतले एक नट श्रीपाद जोशी यांनी दीनानाथांना गळ घातली की त्यांनी लताचे गाणे विनायकांना एकदा तरी ऐकवावे. मा. विनायक यावेळी कोल्हापूरहून पुण्याला आले होते. 'हंस' मधून फुटून ते 'नवयुग कन्सर्न'मध्ये नुकतेच आले होते. दीनानाथांना ही कल्पना मुळांत पसंत नसतानाही श्रीपाद जोशांनी लताचे गाणे विनायकांना ऐकवलेच. तिचे गाणे ऐकून विनायक भारावून गेले. त्यांच्या डोळ्यात पाणी आले. त्यानंतर एका महिन्याच्या आतच दीनानाथ निधन पावले. मग लताने विनायकांच्या कंपनीत नोकरी धरली. 'पहिली मंगळागौर' चित्र सुरू झाले. लताला त्यांत एक छोटी भूमिका मिळाली. हे चित्र चालू असतांच विनायक कंपनींतून भांडून कोल्हापूरला निघून गेले. लताने हे काम पुरे केले आणि मग ती आपल्या आई-भावंडांसह कोल्हापूरला आली. विनायकांनी आपली 'प्रफुल्ल' ही नवी कंपनी स्थापन केली होती. तीत लता काम करू लागली. कोल्हापूरला ती बाबूराव पेंटरांच्या बंगल्याशेजारी मिस्त्रींच्या घरात भाड्याने जागा घेऊन राहत असे.

'प्रफुल्ल' कंपनींतला लताचा काळ चांगला गेला. तेथे अनेक स्नेही मंडळी तिला लाभली. सर्व मंडळी छोट्या लतावर लोभ करीत. लता त्या वातावरणांत रमली. तिचा पोषाख अगदी साधा असे. कधी कधी शर्ट पायजमा घालून सायकल पिटाळीत ती स्टूडिओत जाई येई. तिच्या कलागुणांचा 'प्रफुल्ल'मध्ये विकास होऊ लागला. तेथे ती कथ्थक नृत्य शिकली. तिला 'टॅप डान्स' शिकवण्यासाठी पीटर नावाचा एक शिक्षकही ठेवलेला होता. विनायकरावांनी तिच्याकडे जातीने लक्ष देऊन अभिनयातले अनेक सूक्ष्म बारकावे तिला समजावून दिले. 'प्रफुल्ल'मध्ये असताना लताने काही चित्रपटांतून भूमिका केल्या. पण या वेळीही चित्रपटांत भूमिका करण्यात तिला फारशी गोडी वाटत नसे. आपण शास्त्रीय गायिका व्हावे हीच तिची आकांक्षा होती.

या काळी लताच्या घरी दारिद्र्य होते. माई दुःखीकष्टी. भावंडे छोटी. बाळच्या पायाचे दुखणे. नाना अडचणींना लता तोंड देत होती. पण या परिस्थितीतही तिची जिद्द कायम होती. तिच्या मुखावरचे हसू कधी मावळले नाही की कोणापुढे तिने कधी तोंड वेंगाडले नाही. आपला स्वाभिमान तिने सतत जपला आणि कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या जिवापाड श्रम करून पार पाडल्या.

सहा वर्षे लोटली. आणि मग मा. विनायक कोल्हापूर सोडून मुंबईला आले, लता व तिचे कुटुंबही त्यांच्या समवेत मुंबईला येऊन स्थायिक झाले. त्यानंतर माई व धाकटी मुले थाळणेरला गेली आणि लता व मीना लॅमिंग्टन रोड येथे 'कुमुद व्हिला' या कंपनीच्या बिऱ्हाडीच राहू लागल्या. लता विनायकरावांकडे कामे करीत होतीच. पण यावेळी तिच्या जीवनात एक महत्त्वाची घटना घडली. विनायकांनी दि. ११ जून ४५ रोजी अमान अली खां भेंडीबाजारवाले यांचा लताला रीतसर गंडा बांधून घेतला. अमान अली खां लताला फार प्रेमाने व आस्थेवाइकपणे शिकवू लागले. त्यांनी तिला यमन, खेम, हंसध्वनि, भूप, इत्यादी राग शिकवले.

यावेळी सुभद्रा, जीवनयात्रा, मंदिर या विनायकांच्या चित्रपटातून लताने छोट्या छोट्या भूमिका केल्या. अमान अली खां यांजकडे लता दहा अकरा महिने गाणे शिकली. पुढे हे गुरुजी तळेगावला गेल्यामुळे देवास घराण्याचे अमानतखां यांच्याकडे ती शिकू लागली. हे गुरुजी विनोदी व प्रेमळ होते. त्यांचेही लतावर फार प्रेम असे. ते म्हणत, "लडकी फार उत्तम आहे. ही शास्त्रीय गाणे गाऊ लागली तर भल्याभल्यांना गप्प बसवील."

जरा स्थिरस्थावर झाल्यावर लताने माईना व भावंडांना मुंबईला आणले आणि मग हे कुटुंब नाना चौकात नाना शंकरशेट मंदिरातील बिऱ्हाडी स्थायिक झाले. वसंतराव जोगळेकर यांच्या

'आपकी सेवामें' या चित्रासाठी लताने प्रथम हिंदी गीतांचे रेकॉर्डिंग केले. या गाण्याचे संगीत दत्ता डावजेकर यांनी दिले होते.

१९४७ साली मा. विनायकाचे अकस्मात निधन झाले. लतावर व तिच्या कुटुंबीयांवर हा मोठाच आघात होता. लताला पुन्हा एकवार नोकरीसाठी वणवणण्याची पाळी आली. पण आता तिला हळूहळू पार्श्वगायनाची कामे मिळू लागली होती. या काळांत अनेकांनी तिला साह्य केले, स्नेहभावाने सूचना केल्या. योगायोगाने याच वेळी गुलाम हैदर यांचा व लताचा परिचय झाला आणि त्यांनी आपल्या 'मजबूर' चित्रात तिला गाणे दिले. या गाण्याने लताचा विशेष बोलबाला झाला. नंतर एका पाठोपाठ एक कितीतरी नामवंत संगीत दिग्दर्शकांनी लताला गाणी द्यायला सुरुवात केली. तिला भराभर कामे मिळू लागली. खेमचंद प्रकाश, अनिल बिश्वास, श्यामसुंदर, नौशाद यांच्याकडे लताने खूप गाणी गाइली. या वेळी लताला अतोनात कष्टही करावे लागले. मालाड, अंधेरी, गोरेगाव अशा दूरदूरच्या ठिकाणी तिला लोकल गाडीने प्रवास करून रेकॉर्डिंगला जावे लागे. खूप पायपिटी करावी लागे. वेळी दिवस दिवस नुसत्या चहावर ती राही. दिवसांतून चार चार सहा सहा गाणी ती रेकॉर्ड करी. कित्येकदा सर्व काम आटोपून घरी परत यायला तिला पहाटेचे तीन चार वाजत. १९४८ साली तिने आपली पहिली 'हिलमन' गाडी घेतली. आणि मग तिची धावपळ जराशी कमी झाली.

लताने गाणी गाइलेले 'मजबूर' चित्र रौप्य महोत्सवी ठरले. त्याच वेळी 'अंदाज' चित्र प्रकाशित झाले. ते ज्युबिली साजरी करून गेले. 'बडी बेहेन' चित्रपटातली लताची गाणी अतोनात लोकप्रिय झाली. आणि 'बरसात' चित्रपटाने तर सुवर्णमहोत्सव साजरा केला. 'लता' हे नांव एकदम विलक्षण प्रसिद्ध झाले. सर्वत्र तिच्या रेकॉर्डस वाजू लागल्या. तिचे सूर वातावरणात भरून राहिले. लताच्या धडपडीचे सार्थक झाले होते. कष्टांचा काळ संपला होता. यशाची नवी तेजस्वी परंपरा सुरू झाली होती.

ती यशाची कमान सतत चढती राहिली आहे. एकदा मिळवले ते स्थान लताने कायम टिकवले इतकेच नव्हे तर वर्षानुवर्षे ते तिने अधिकाधिक उंचावत नेले. उत्कर्षाची एकाहून एक मोठी शिखरे ती आक्रमीत राहिली. आज या व्यवसायातली ती सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिका होऊन बसली आहे. लताची सर्वच भावंडे उत्तम गातात. आशाने तर मोठेच नांव मिळवले आहे.

चित्रपटसृष्टींतल्या लताच्या अत्यंत यशस्वी अशा कारकीर्दीचा रौप्यमहोत्सव आज १९६७ मध्ये साजरा होत आहे.

गेल्या पंचवीस वर्षांची ही अखंड कलासाधना चालू असताना लताने आपले व्यक्तित्व कसो-शीने जपले. सांभाळले. उपजत शहाणपणाने तिने जीवनाचा मार्ग आखला आणि काही मूल्ये, काही निष्ठा मनाशी बाळगून ती पुढे पावले टाकीत राहिली. कुटुंबप्रमुख म्हणून तिने आपली जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली. लाभलेले नाव अधिकाधिक उज्ज्वल केले. मिळालेल्या वैभवाचा संयमाने स्वीकार करून अडल्यानडल्यांना सतत साह्याचा हात पुढे केला. महत्त्वाच्या सामाजिक व राष्ट्रीय कार्यांना उदार देणग्या दिल्या. अनेक विद्यार्थ्यांचा शिक्षणखर्च बोलबाला न करता केला. कलेवरील अव्यभिचारी निष्ठा, श्रद्धाळू अंतःकरण, जीवनावरील प्रेम, तीव्र बुद्धिमत्ता, संवेदनाशील हृदय आणि कोणत्याही प्रसंगी सतत साथ देणारी उत्कृष्ट विनोदबुद्धी ही लताच्या व्यक्तित्वाची काही वैशिष्ट्ये आहेत.

तथाकथित शालेय वा उच्च शिक्षणाचा लाभ लताला झालेला नाही. पण भोगलेले कष्ट, सूक्ष्म अवलोकन, वाचन, मनन, चिंतन यांच्या साह्याने ती उणीव लताने भरून काढली आहे आणि एक अभिजात, सुसंस्कृत व शालीन असे व्यक्तिमत्त्व तिने संपादन केले आहे. तिच्या वागण्याबोलण्या-पासून तो तिने हौसेने जमवलेल्या छोट्यामोठ्या सुंदर कलावस्तूंपर्यंत सर्वत्र तिच्या अभिरुचिसंपन्नतेचा

ठसा उमटलेला दिसून येतो. तीव्र ग्रहणशक्ती आणि भाषाबोलींची वैशिष्ट्ये आत्मसात करण्याकडे जात्याच असलेला कल यामुळे अनेक भाषांवर लताने आश्चर्यकारक प्रभुत्व संपादन केले आहे. ती अतिशय संवादचतुर आहे, आणि स्नेहीमंडळीत बसल्यावर गप्पांमध्ये ती चांगला रंग भरते. इतरांच्या हुबेहूब नकला करण्यांतही ती प्रवीण आहे.

लताला माणसांचे अगत्य आहे. तिच्या मित्रमैत्रिणींचा परिवार विस्तृत आणि विविध असून तो दूरवर पसरलेला आहे. कामाच्या अफाट व्यापांतूनही ती त्यांना भेटण्यासाठी व पत्रे लिहिण्यासाठी वेळ काढते. परिचितांचे, मित्रमैत्रिणींचे वाढदिवस ध्यानी ठेवून त्यांना ती आठवणीने शुभेच्छा, भेटीच्या वस्तू धाडते. आपला देश तिने मोठ्या आत्मीयतेने व रसिकतेने पाहिलेला आहे. लता स्वतः उत्तम गायिका आहेच. पण गाण्याची ती मोठी शौकिनही आहे. बीथोव्हन, शॉपां, बाख, मोझार्ट इत्यादी संगीतकार; फैरूझ, उमे कुलसूम, अब्दुल वहाब या अरबी गायकगायिका, पाश्चात्य देशांतले नामांकित गायक यांच्या उत्तमोत्तम ध्वनिमुद्रिका तिने साक्षेपाने गोळा केल्या आहेत. आपल्या वडलांचे गाणे तर ती मोठे मानतेच पण बडे गुलामअली खां, अमीर खां, नजाकत अली सलामत अली, भीमसेन जोशी, द. वि. पलुस्कर हे तिचे आणखी काही आवडते गायक आहेत. फोटोग्राफीची कला लताला उत्तम अवगत आहे, आणि पेंटिंगचाही एके काळी तिला फार नाद होता.

लताचे वाचन विस्तृत व चौफेर आहे. उर्दू कवी तिने साक्षेपाने वाचले आहेत. व त्या काव्याचे तिचे जबरदस्त पाठांतर आहे. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचे साहित्य तिला फार आवडते. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांची तिने पारायणे केली आहेत. गडकरी, खांडेकर, बालकवी, कुसुमाग्रज, तांबे असे कांही तिचे आवडते लेखक–कवि आहेत. ज्ञानेश्वर, रामदास हे संतकवीही तिने वाचलेले आहेत. शिवछत्रपती, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी तिच्या मनांत परमभक्ती आहे. देव, देश, धर्म, परंपरा यांच्या बद्दलच्या सुजाण अभिमानातून आलेली निष्ठेची भावना तिच्याजवळ आहे.

चित्रपटांसाठी अक्षरशः हजारो गाणी लताने गाइली आहेत. पण आपल्या खास आवडीच्या अशा मराठी कविता निवडून त्या तिने मुद्दाम ध्वनिमुद्रित केल्या आहेत. या कवींत माधव ज्यूलियन, बी, सावरकर, तांबे यांसारख्या जुन्या पिढींतल्या कवींपासून तो अगदी आधुनिक अशा आरती प्रभूंसारख्या तरुण कवींपर्यंत अनेकांचा समावेश झालेला आहे. नुकतीच रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने लताने एक 'लाँग प्लेइंग' रेकॉर्ड ध्वनिमुद्रित केली. तीत एका बाजूला ज्ञानेश्वरीचे मंगलाचरण, ज्ञानदेवांची तीन पदे आणि ज्ञानेश्वरीचे पसायदान लताने म्हटले आहे तर दुसऱ्या बाजूला भगवद्गीतेचा संपूर्ण पंधरावा अध्याय तिने ध्वनिमुद्रित केला आहे.

पार्श्वगायिका म्हणून लताचे कर्तृत्व श्रेष्ठ दर्जाचे आहेच, पण संगीत दिग्दर्शन हाही तिच्या कलेचा एक तेजस्वी पैलू आहे. 'रामराम पाव्हणं' या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन काही वर्षांपूर्वी लताने केले होते. व ती गाणी खूप गाजली होती. गेल्या काही वर्षांत 'आनंदघन' या नांवाने काही चित्रांचे संगीत लताने दिले आहे. अस्सल मराठमोळ वळण, लोकगीतांचा गोडवा असणाऱ्या श्रुतिमधुर चाली आणि वाद्यांचा परिमित पण औचित्यपूर्ण वापर हे या संगीताचे खास वैशिष्ट्य होय.

कलाक्षेत्रांत फार मोठे नाव आणि अपरंपार वैभव मिळवलेली ही कलावती खाजगी आयुष्यात साधी, प्रसिद्धीविन्मुख, आतिथ्यशील आणि कुटुंबियांवर प्रेम करणारी आहे. तिला तिचे आग्रह, रागद्वेष, आवडीनिवडी आहेत पण एका विलक्षण समजूतदारपणाने तिने साऱ्या व्यक्तित्वाला तोल आणलेला आहे. अस्सल कलावंताचा लहरीपणा तिच्यात आहे. तसेच त्याच्याजवळ असावे ते दैवी असमाधानही तिला लाभलेले आहे.

अशी ही लता. कलावंत म्हणून मोठी. माणूस म्हणूनही मोठी.

वि. स. खांडेकर

लता? छे, कल्पलता

फलज्योतिषावर माझा विश्वास नाही. पण दोन तपे उलटून गेली तरी एक भविष्य माझ्या मनात घर करून राहिले आहे. मी ते ऐकले ऐन मध्यरात्री. सांगलीच्या सदासुख नाट्यगृहात. 'मानापमान' नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी, दोन अंकांच्या मध्यंतरात. ते भविष्य वर्तवणारे होते मास्टर दीनानाथ. ऐकणारे होतो आम्ही दोघे—दिग्दर्शक विनायक आणि मी.

हा योग घडून आला तो असा. हंस पिक्चर्सचा कथालेखक म्हणून एकोणीसशे अडतीस साली मी कोल्हापूरला आलो. आलो कसला? विनायकांनी मला करवीर क्षेत्री ओढून आणले. त्यानंतरच्या वर्ष दीड वर्षातली गोष्ट. एके दिवशी अचानक विनायक मला म्हणाले, "आज रात्री सांगलीला जायचंय आपल्याला. दीनानाथांनी बोलावलंय. ते कंपनी पुन्हा सुरू करताहेत. आज 'मानापमान' आहे त्यांचे."

त्या दिवशी रात्री नाटक सुरू होण्याच्या सुमारास आम्ही दोघांनी सदासुख नाट्यगृहात प्रवेश केला. अर्धेअधिक नाटकगृह रिकामे होते. ते पाहून माझे मन चरकले. मराठी रंगभूमीचा तो अगदी ओहोटीचा काळ होता. भरतीची पूर्वचिन्हे कुठेच दिसत नव्हती. त्यामुळे 'बलवंत नाटक मंडळी'चे पुनरुज्जीवन होत असूनही नाट्यगृहात उत्साहाचे वारे कुठेच जाणवत नव्हते. अशा स्थितीतही दीनानाथांनी त्या रात्री धैर्यधराची पदे—विशेषतः 'शूरा मी वंदिले' हे पद—आपले सारे कौशल्य पणाला लावून कशी म्हटली हे अद्यापि माझ्या स्मरणात आहे. दोन अंक झाल्यावर विनायक आणि मी चहा घेण्याकरता आत गेलो. दीनानाथांशी गप्पागोष्टी करू लागलो. संभाषण चटकन भविष्य-कथनाकडे वळले. एक तर विनायकांचा फलज्योतिषावर फार विश्वास होता. शिवाय दीनानाथ भविष्य अतिशय चांगले जाणतात हे त्यांना ठाऊक होते. त्यामुळे असेल किंवा प्रतिकूल परि-स्थितीत कंपनीचा पुनर्जन्म होत असल्यामुळे असेल; हा विषय बोलण्यात निघाला. आणि दीनानाथांची मुद्रा एकदम प्रफुल्लित झाली. आपले पुढले ग्रह फार उच्चीचे आहेत, मागे आपण जसा ऐश्वर्याचा काळ पाहिला तसा, किंबहुना त्याहुनही अधिक उज्ज्वल असा कीर्तीचा आणि

वैभवाचा काळ आपल्याला पुढे लाभणार आहे हे त्यांनी इतक्या आत्मविश्वासाने सांगितले की त्या भविष्याबद्दल शंका व्यक्त करण्याचा धीर माझ्या पाखंडी मनाला झाला नाही. मी मुकाट्याने ऐकत राहिलो. चित्रपट संगीताच्या क्षेत्रातले गेल्या दीड तपातले लताबाईंचे कर्तृत्व पाहिले म्हणजे मनात येते, दीनानाथ जो उज्ज्वल भविष्यकाळ पाहत होते तो अक्षरशः सत्यसृष्टीत उतरायचा होता. त्या भविष्यात फक्त एक चूक होती. त्यांच्या बाबतीत ते घडायचे नव्हते. त्यांची थोरली लाडकी लेक ते भविष्य खरे करून दाखविणार होती.

अल्लड लताला मी पहिल्यांदा पाहिले, ते पुण्यात. 'सरकारी पाहुणे' या बोलपटाच्या सेटवर. त्यावेळी नवयुग चित्रपट कंपनी कोल्हापूरहून पुण्याला गेली होती. चिं. वि. जोशांच्या 'स्टेट गेस्ट' या कथेवरून 'सरकारी पाहुणे' या बोलपटाची पटकथा व संवाद मी लिहिले होते. चित्रित करावयाच्या पुढल्या भागात विनायकांना कुठे काही बदल हवे असतील तर पहावे म्हणून मी स्टुडिओत गेलो होतो. बोलता बोलता विनायक दोन नवीन मुलींशी माझी ओळख करून देत म्हणाले, "ही बेबी आचरेकर. ही लता, दीनानाथांची मुलगी. या दोघींनाही आपल्या पुढल्या चित्रात कामं हवीत हं! लताचा आवाज फार गोड आहे, तो ऐकल्याशिवाय त्याची गोडी कळायची नाही तुम्हाला!"

पुढे लौकरच विनायकांनी 'प्रफुल्ल पिक्चर्स' ही स्वतःची संस्था कोल्हापुरात स्थापन केली. साहजिकच विनायकांशी ऋणानुबंध असलेली सर्व मंडळी कोल्हापुराला आली. त्यात मंगेशकर कुटुंबही होते. प्रफुल्ल पिक्चर्सचे पहिले चित्र 'माझं बाळ' मी लिहिले. त्या चित्रात लताला शोभेल अशी भूमिका देणे कठीण होते. ते होते कुमारी मातेच्या समस्येवर आधारलेले चित्र. त्याची ठेवण मूलतःच गंभीर होती. अशा कथेत मोडतोडीला किंवा तडजोडीला फारशी जागा नसते. शिवाय मला हुकमेहुकूम काही लिहिता येत नाही. मनात फुललेल्या कथानकात फालतू पात्रे घालून पुन्हा त्याला बंदिस्त स्वरूप देणे मला जमण्याजोगे नव्हते. पण विनायकांना दहाबारा वर्षांच्या लताचा गोड आवाज या चित्राच्या द्वारे लोकांना ऐकवायचा होता. त्यासाठी कुठेतरी गाण्याची एक जागा शोधून काढणे प्राप्त होते. पण मोठ्या शहरात राहायची जागा मिळवणे जितके कठीण, तितकेच गंभीर बोलपटांत रसपरिपोषक अशी गाण्याची जागा शोधून काढणे अवघड!

विनायकांना लहान मुलांचा खोडकर स्वभाव चित्रित करण्याची व अशा एखाद्या प्रसंगाच्या साहाय्याने बालस्वभावाला शोभेल असे गाणे घालण्याची हौस होती. अशा गाण्याचा नाट्यात्मक उपयोग करून घेण्याचे त्यांचे चातुर्य मला परिचित होते. माझ्या 'देवता' चित्रपटात नायिकेच्या घरचे गरीबीचे वातावरण चित्रित करीत असताना तिचा धाकटा भाऊ प्रभाकर आणि धाकटी बहीण प्रेमा यांच्या तोंडी 'तुझ्या गळा माझ्या गळा' हे तांब्यांचे गीत घालून त्यांनी मोठी रंगत आणली होती. 'माझं बाळ' मध्ये असेच काहीतरी हवे होते त्यांना. पण तशी जागा कुठे सापडेना. कविवर्य तांबेही माझ्या मदतीला येईनात. शेवटी अण्णांच्या आश्रमातल्या एका खोडकर मुलीचे काम त्यांनी लताला दिले. ती मुलगी अण्णांच्या खोलीतल्या नाना प्रकारच्या वस्तूंशी खेळत आणि मोठ्या माणसांच्या नकला करीत गाणे म्हणते अशी कल्पना त्यांनी सुचवली. कसेबसे ते गाणे मी केले. 'नाही मी एकटी' असा काही तरी त्या गाण्याचा प्रारंभ असावा!

त्या गाण्याला योग्य अशी जागा सापडली नव्हती. दुधात साखर विरघळून जावी तसे ते कथेच्या ओघात एकरूप होऊ शकत नव्हते. शिवाय गीतरचनेची माझी शक्ती मुळातच तोकडी आहे. या सर्व वैगुण्यांमुळे या गाण्याकडे प्रेक्षकांचे दुर्लक्ष झाले. तथापि पुढे लौकरच प्रफुल्ल पिक्चर्सने बंगालच्या दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक कार्यक्रम केला. त्यात गीते, नृत्ये, मूकनाट्ये वगैरे अनेक गोष्टींचा समावेश विनायकांनी केला होता. कार्यक्रम भरगच्च होता. झालाही चांगला. पण त्यात अधिक उठून दिसली ती लताची गाणी! दोनतीनच गाणी म्हटली असतील तिने. पण जाणकारांना त्यांनी

दीनानाथांची आठवण करून दिली. पुढे प्रफुल्ल पिक्चर्सच्या 'गजाभाऊ' 'सुभद्रा' वगैरे चित्रपटात लताला लहानसहान कामे दिली गेली. पण मुळात अतिशय गोड असलेल्या आणि संगीताची उपजत जाण असल्यामुळे अमृतमधुर वाटणाऱ्या तिच्या आवाजाचा उपयोग प्रफुल्ल पिक्चर्स पुरेसा करून घेऊ शकले नाही. त्यासाठी अल्लड वयाच्या एखाद्या मुलीभोवती संगीताला पोषक असे कथासूत्र गुंफणे आवश्यक होते. तशी कथाकल्पना माझ्यापाशी नव्हती. त्यामुळे याविषयी विनायकांचे व माझे अनेकदा बोलणे होऊनही त्यांतून काही निष्पन्न झाले नाही.

मात्र या काळात लताचे गाणे वाढावे म्हणून विनायकांनी जसे प्रयत्न केले तसे पोरवय असूनही अंतःप्रेरणेने आपली कला समृद्ध करण्याकडे तिने लक्ष वळवले. या कामी तिला सर्वांत अधिक उपयोग झाला असावा तो नूरजहान या नटीचा. 'बडी मा' या प्रफुल्ल पिक्चर्सच्या चित्रपटाची ती नायिका होती. तिचा आवाज जेवढा गोड तेवढाच मोकळा. गाण्यात विलक्षण सहजता. त्यामुळे तिचे गाणे सैगलप्रमाणे मनाची चटकन पकड घेई. अर्थाला रसमयता प्राप्त करून देणारी तिची उच्चारपद्धती आणि स्वरसाधना अभ्यसनीय होती. 'बडी मा' चे शूटिंग सुमारे वर्षभर चालू होते. या काळात नूरजहानच्या रूपाने कलेच्या आणि कीर्तीच्या शिखराकडे जाणारी पाऊलवाट लताला प्रथम दिसली.

प्रफुल्ल पिक्चर्सचा संसार अवघी दोन अडीच वर्षे कोल्हापुरात होता. त्या अवधीत विनायक अनेकदा माझ्याकडे येत. कधी कथेच्या चर्चेकरता, कधी मनमोकळेपणाने गप्पागोष्टी करण्याकरता. क्वचित लताही त्यांच्याबरोबर असे. आमची बैठक रंगली म्हणजे ती दोन दोन तीन तीन तास चाले. 'माझं बाळ' च्या वेळची अशी एक आठवण माझ्या मनात अजून जागृत आहे. सुमारे दहा वाजता विनायक माझ्याकडे आले. तिसऱ्या मजल्यावरच्या हॉलवजा खोलीत आमची चर्चा सुरू झाली. लता थोडा वेळ स्वस्थ बसून ती ऐकत होती. पण घटकाभरात ती या घटपटादी खटपटीला कंटाळली. ती उठली. इकडे तिकडे पडलेली माझी पुस्तके तिने चाळून पाहिली. त्यांत मुग्ध वयाला आकृष्ट करील असे एकही पुस्तक नव्हते. मग मन रमविण्याकरता काही तरी गुणगुणत ती खोलीत इकडे तिकडे फिरू लागली. तिच्या गुणगुणण्यातल्या गोडव्याने माझे लक्ष वेधून घेतले. एखादे फुलपाखरू एका फुलावर बसते न बसते तोच चटकन जसे अगदी दूरच्या फुलावर उडून जाते तसे अगदी भिन्न भिन्न प्रकारचे सूर ती सहज आळवीत होती.

पुढे कंपनी मुंबईला गेली. कथेच्या निमित्ताने अधूनमधून मला मुंबईला खेप टाकावी लागे. एखाद्या वेळीं मी विनायकांकडे जेवायला राहत असे. लता तिथे दिसे. क्वचित पंक्तीला असे. गाण्यामध्ये तिची चांगली प्रगती होत आहे असे विनायक म्हणत. पण माझे गाण्याचे ज्ञान अकटोपासून विकटोपर्यंत असल्यामुळे त्याचा पडताळा घेण्याचा मी कधीच प्रयत्न केला नाही.

एकोणीसशे सत्तेचाळीस साली विनायक अगदी अकाली दिवंगत झाले. मराठी चित्रपटसृष्टीवर तो एक जबरदस्त आघात होता. पण त्यापेक्षाही त्यांच्या कुटुंबावर झालेला तो वज्राघात होता. मंगेशकर मंडळींनाही तो तितक्याच तीव्रतेने जाणवला असावा! विनायकरावांसारख्या कलावंत पण अव्यवहारी दिग्दर्शकाचा जो काही पुराअपुरा आधार या कुटुंबाला होता तो अचानक कोसळून पडला. मुंबईसारख्या अफाट शहरात आई आणि चार भावंडे एवढा प्रपंच चालवण्याची जबाबदारी थोरली मुलगी म्हणून पंधरासोळा वर्षांच्या लतावर येऊन पडली. गाण्याखेरीज चरितार्थाचे दुसरे काही साधन हाती नव्हते. अशा स्थितीत पार्श्वगीतगायनाचे काम मिळवणे, ध्वनिमुद्रणाकरता बसने अगर आगगाडीने वेळी अवेळी स्टूडिओत जाणे, रात्री अपरात्री बरोबर सोबतीला कोणी नसणे आणि हे सारे चित्रपटाच्या मायानगरीत एका पंधरासोळा वर्षांच्या मुलीने करणे हे मोठे दिव्य होते. पण लता निग्रही वृत्तीने त्या दिव्याला सामोरी गेली. जिचे मुग्धत्व अजून पुरते संपलेले नव्हते अशी ही मुलगी मनाने प्रौढ झाली. आई व भावंडे यांना सांभाळण्याची जबाबदारी तिने जिद्दीने पार पाडली.

त्या आरंभीच्या काळात लताबाईंना जे कडूगोड अनुभव आले ते त्या शब्दबद्ध करतील तर चित्रपट-सृष्टीच्या दुरून साजऱ्या दिसणाऱ्या डोंगरावर किती काटे आणि खाचखळगे असतात याची बाहेरच्या जगाला कल्पना येईल. मुंबईसारखे अकाली शहर, स्टूडिओ स्टेशनापासून मैल दीडमैल लांब, ध्वनि-मुद्रण संपायला रात्रीचे अकरा वाजून गेलेले. अशा वेळी जीव मुठीत धरून स्टेशन गाठायला त्या जात असताना अशोककुमारांनी दिलेल्या 'लिफ्ट'चे बोलता बोलता एकदा लताबाईंनी कृतज्ञतेने स्मरण केले होते. त्यांची ती ओझरती आठवण फार फार बोलकी होती.

मात्र पार्श्वगायिका म्हणून चित्रपटसंगीताच्या क्षेत्रात लताबाईंनी पाऊल टाकताच त्यांच्या अगदी आगळ्या अशा कंठमाधुर्याने आणि कोणत्याही प्रकारचे गाणे त्याला शोभेल अशा ढंगाने म्हणण्याच्या शैलीमुळे संगीतप्रेमी लोक तात्काळ त्यांच्याकडे आकृष्ट झाले. कानन, सुरैया शमशाद बेगम, नूर-जहान वगैरे अनेक गायिका त्यापूर्वी आपापल्या परीने लोकप्रिय होत्या. पण लताबाईंचा या क्षेत्रात उदय होईपर्यंत ते चांदण्यांनी भरलेले आकाश होते. त्यांत चंद्रकोर उगवलेली नव्हती. 'बरसात', 'महल' वगैरे चित्रपटांतील लताबाईंची गीते ऐकणारांना कलेकलेने वाढणाऱ्या त्या चंद्रकोरीचे दर्शन झाले. लताबाईंच्या यशाचे 'She came, she sang and she conquered' असे वर्णन केले तर त्यात अतिशयोक्ती नाही. या क्षेत्रात पदार्पण केल्याबरोबर मिळालेल्या विजयाची परंपरा त्यांनी वर्षानुवर्षे अखंड चालवली आहे. बुधवारी 'बिनाका' लागल्यावर केवळ शाळाकॉलेजांतील मुलेच नव्हेत, तर मोठी माणसे सुद्धा आजचे 'टॉप' गाणे कुणाचे असेल याची मोठ्या उत्सुकतेने चर्चा करतात—अंदाज बांधतात, आणि अपेक्षेप्रमाणे ते बहुधा त्यांच्या लाडक्या लताचेच असते.

कोणत्याही कलेच्या क्षेत्रात दीर्घकाळ शिखरावर राहणे कठीण असते. शिवाय शिखर ही जागाच अशी आहे की उंचीमुळे तिथून खाली पाहणाऱ्याचे डोळे फिरतात. त्याचा तोल जाण्याचा संभव निर्माण होतो. पण लताबाईंच्या ठिकाणी आवाजाची दैवी देणगी, विवेकशील मनोवृत्ती आणि कला ही उग्र तपश्चर्येखेरीज प्रसन्न होणारी देवता नाही याची रोमरोमात भिनलेली जाणीव यांचा त्रिवेणीसंगम झाला आहे. त्यामुळे शिखरावर दीर्घ काळ उभ्या असूनही खरे शिखर अजून दूर आहे या भावनेने त्यांची कलासाधना चाललेली असते.

त्यांच्या या साधनेसंबंधाने काही लिहिण्याचा अधिकार मला नाही. मात्र राहून राहून माझ्या मनात एक गोष्ट येते ती ही. सॉमरसेट मॉमच्या 'ए रायटर्स नोटबुक' या पुस्तकातील साहित्य-विषयक टिपणांप्रमाणे आपल्या स्वरसाधनेविषयी लताबाई अशी काही टिपणे करतील तर ती जेवढी मनोरंजक तेवढीच उद्‌बोधक होतील. मला मात्र नेहमीच वाटत आले आहे की लताबाईंची स्वरसाधना चालते ती एकनाथांनी वर्णन केलेल्या दत्ताच्या साधनेसारखी—' जो जो ज्याचा घेतला गुण। तो तो गुरू म्या केला जाण। गुरूंसी आले अपारपण। जग संपूर्ण गुरू दिसे '

यामुळेच स्त्रियांच्या वेषभूषेपेक्षाही अधिक वेगाने जिथल्या आवडीनिवडी बदलतात अशा चित्रपटसंगीताच्या प्रांतात त्यांच्या अग्रपूजेच्या स्थानाला कधी ढळ पोचला नाही. चालीचा ढंग तारेवर कसरत करणाऱ्या सर्कससुंदरीचा असो अथवा ' ॐ तत्सवितुर्वरेण्यं ' असा गायत्री मंत्र जपत उगवत्या सूर्यनारायणाला अर्घ्यदान करणाऱ्या भाविकाचा असो; त्याला धक्का लागू नये ही दक्षता घेऊन लताबाई ते गाणे आपल्या खास वैशिष्ट्यांनी नटवतात. मधमाशीप्रमाणे टिपलेल्या अगणित स्वर-सौंदर्यांपैकी कोणते कुठे योजावे याची जाण त्यांच्याइतकी चित्रपटातील अन्य गायकांना क्वचितच असेल. 'घनश्याम सुंदरा श्रीधरा' 'ओऽ सजना बरखा बहार आयी' 'नैना बरसे रिमझिम रिमझिम' 'कहीं दीप जले कहीं दिल' 'ऐ मेरे वतनके लोगो' 'कैसे दिन बीते' 'जाने कैसे सपनोंमें खो गइ अंखियां' अशी त्यांची दहापंधरा निवडक गाणी ऐकली तरी त्यांच्या प्रतिभेच्या नवनव्या उन्मेषांची आणि परिश्रमांच्या पराकाष्ठेची साक्ष पटेल. या गुणविशेषांमुळेच त्यांच्या कितीतरी गाण्यांना अबोलीचा रंग आणि बकुळीचा गंध लाभला आहे.

चित्रपटातले गाणे असते अवघे तीन मिनिटांचे. त्याचे वरवरचे अनुकरण करणे तितकेसे अवघड नसते. त्यामुळे गोड गळा असलेल्या अनेक मुलींच्या आईबापांना आपली कन्यका लतासारखी गाते असा भ्रम उत्पन्न होतो. पण या गाण्यात लताबाई जो जीव ओततात आणि जिव्हाळा निर्माण करतात त्याची प्रचीती बाह्य अनुकरणातून कशी येणार! 'ओऽ सजना' सारखे गाणे जेव्हा लताबाई गातात तेव्हा त्या लताबाई राहात नाहीत. त्या ते गाणे जगतात. चांगल्या गाण्याच्या शब्दाशब्दांतले सुखदुःख त्या भोगतात आणि स्वरास्वरांतून ते उत्कटतेने प्रकट करतात. त्यांचे गाणे एखाद्या फुलाप्रमाणे उमलत जाते. मग त्यातून भावनेचा सुगंध दरवळू लागतो. चित्र असो, शिल्प असो, साहित्य असो वा संगीत असो; प्रत्येक कलेच्या अंतरंगी एक प्रकारचा दर्द असतो. जो कलाकार त्याचा सुंदर रीतीने आविष्कार करू शकतो तोच सामान्यापासून रसिकश्रेष्ठापर्यंत सर्वांची मने जिंकू शकतो.

हा दर्द व्यक्त करण्याच्या कामी गोड गळ्याची देवाने दिलेली देणगी लताबाई अतिशय चतुरतेने वापरतात. तसे पाहिले तर 'गोड' या शब्दाने त्यांच्या आवाजाचे वर्णन करण्यात काही स्वारस्य नाही. कोशात अधिक सुलभ आणि अर्थवाहक असा दुसरा शब्द नाही म्हणूनच तो वापरायचा. साध्या भाषणातही त्यांच्या आवाजाचा विलक्षण गोडवा जाणवल्यावाचून राहत नाही. एकोणीसशे एकसष्टच्या डिसेंबरातली गोष्ट. डोळ्यांवर शस्त्रक्रिया करवून घेण्यासाठी मी मुंबईला चाललो होतो. शस्त्रक्रियेनंतर पूर्ण विश्रांती मिळावी म्हणून मी लताबाईंच्याकडे राहावे अशी त्यांची व हृदयनाथांची इच्छा होती. त्याप्रमाणे त्यांच्याकडे उतरण्याचे ठरले होते. पुण्याला पोहोचल्यावर आम्ही कोणत्या गाडीने येत आहोत हे कळवण्यासाठी माझी थोरली मुलगी मंदा हिला मी मुंबईला फोन करायला सांगितले. तो केला असे सांगायला ती आली तेव्हा पर्णभारांत लपलेल्या कोकिळेचा आवाज ऐकून चकित झालेल्या बालकाप्रमाणे ती मला म्हणाली, "लताबाईच फोनवर आल्या होत्या. फोनवरनं सुद्धा किती गोड लागतो त्यांचा आवाज! अगदी गाण्यातल्यासारखा!"

त्यांच्या आवाजातला गोडवा त्यांच्या अंतःकरणातही पाहायला मिळेल. आस्तिक्यबुद्धी, देशभक्ती, कुटुंबप्रेम आणि स्नेहशीलता या साऱ्या भावना त्यांच्या ठिकाणी किती जागृत आहेत हे त्यांच्या परिचयाची संधी ज्यांना मिळाली आहे त्यांना वर्णन करून सांगायला नको. एकोणीसशे एकसष्टच्या डिसेंबरात त्यांचा पाहुणा म्हणून मी गेलो त्या रात्रीची गोष्ट. मुंबईला नेहमी नऊ वाजता पोहोचणारी गाडी कशाने कुणाला ठाऊक मध्येच रुसून बसली. तिचा रुसवाफुगवा संपून घर गाठायला अकरा वाजून गेले. पण आम्ही पाहतो तो लताबाई व घरची मंडळी आमची वाट पाहात बसली आहेत. न जेवता. गाण्याच्या ध्वनिमुद्रणाची कामे कशी वेळीअवेळी चालतात, आणि झोपायला रात्रीचे दोनतीन कसे होतात याची कल्पना असल्यामुळे आपल्यासाठी ही मंडळी उपाशी तिष्ठत राहिली आहेत या जाणिवेने मला फार संकोचल्यासारखे झाले. पण ते लताबाईंच्या गावीही नव्हते. त्यांच्या दृष्टीने तो अतिथिधर्माचा आवश्यक असा भागच होता!

चित्रपटसृष्टीतल्या बहुतेक गोष्टी लुटूपुटीच्या असतात. या जगात अहर्निश पैशाची पूजा केली जाते. जीवन हा जुगार आहे ही समजूत बळावते. बेगडी यश आणि क्षणभंगुर सुख यांची मोहिनी भल्याभल्यांना एखाद्या वावटळीप्रमाणे कुठल्याकुठे उडवून नेते. अशा या सृष्टीशी सतत निकटचा संबंध येऊनही लताबाईंनी आपल्या श्रद्धा आणि भावना कसोशीने सांभाळल्या आहेत. पाण्यातल्या कमलपत्राप्रमाणे त्या या व्यवसायात वावरतात. आपले गाणे चांगले व्हावे म्हणून त्या जिवाचे रान करतील. पण ते गाणे उत्कृष्ट रीतीने ध्वनिमुद्रित झाले की त्यांचा त्या जगाशी संबंध संपतो. मग उरतात त्या देवघरांतल्या मंगेशाच्या मूर्तीपुढे भक्तिभावाने लीन होणारे एक लेकरू. माईच्या प्रकृतीची काळजी करणारी लेक. भांवडांवर मायेची अखंड वृष्टी करणारी दिदी. या लताबाई ज्ञानदेवांपासून शरच्चंद्रांपर्यंत श्रेष्ठ भारतीय प्रतिभावंतांच्या साहित्याचे चोखंदळपणे वाचन करतील. साहित्यनिर्मितीतील सौंदर्यावर

नेमके बोट ठेवतील. जे त्यांना आवडत नाही त्याविषयी आग्रहपूर्वक आपले मत सुनावतील. या लताबाई मराठी चित्रपटनिर्मितीला उभे राहायला जागा असावी म्हणून कोल्हापूरचा 'जयप्रभा' स्टूडिओ फायदेशीर होत नसूनही तो चालवण्याची जबाबदारी अंगावर घेतील. या लताबाई सुंदर चित्र, सुंदर शिल्प किंवा सुंदर निसर्ग यांच्याशी समरस होतील आणि देशोदेशीच्या संगीताच्या ध्वनि-मुद्रिका भान विसरून ऐकतील. हे सारे त्या जेवढ्या तन्मयतेने करतात तेवढ्याच हौसेने त्या आल्या-गेल्याचे स्वागत करतील. स्नेह्यांशी गप्पागोष्टी करण्यात रंगून जातील. त्यांची विनोदबुद्धी तल्लख आहे. त्यामुळे त्या चतुर संभाषण करू शकतात आणि संभाषणाची गोडीही मनसोक्त चाखू शकतात. भारतीय संस्कृतीतील चिरंतन मूल्यांचा—शुचिता, त्यागबुद्धी, गृहस्थधर्म, कुटुंबवत्सलता, वडिलधाऱ्या माणसां-विषयीचा आदर इत्यादिकांचा—त्यांना विलक्षण अभिमान आहे.

परंपरागत चांगले संस्कार त्या कटाक्षाने पाळतात. पांचसहा वर्षांपूर्वीची गोष्ट. त्यांच्या एका वाढदिवसाला त्या कोल्हापुरात होत्या. मला याची काहीच कल्पना नव्हती. संध्याकाळी नेहमीप्रमाणे एका स्नेह्यांना बरोबर घेऊन मी फिरायला गेलो. मी गेल्यावर लताबाई आमच्या घरी आल्या. माझी फिरायला जाण्याची वाट ठरलेली आहे. मंदाने ती त्यांना सांगितली. मग गाडी घेऊन लताबाई माझा माग काढीत आल्या. मी माझ्या स्नेह्यांबरोबर माळावर हवा खात बसलो होतो. रस्त्यावरून हळूहळू येणारी एक गाडी आम्हाला दिसली. काही क्षणांनी तिच्यातून लताबाई उतरल्या व आम्ही बसलो होतो त्या दिशेने येऊ लागल्या. वाढदिवसादिवशी नमस्कार करून माझा आशीर्वाद घ्यायचा होता त्यांना. तो त्यांनी त्या माळरानावर घेतला.

'सूनबाई' चित्रपटाच्या वेळची गोष्ट. शस्त्रक्रिया झाल्यावर डॉक्टरांना डोळा दाखवण्याकरता मी मुंबईला गेलो होतो. 'सूनबाई'ची गाणी तयार होत होती तेव्हा. या मराठी बोलपटाचे संगीत-दिग्दर्शक होते सलिल चौधरी. त्यांनी काढलेली चाल मोठी मोहक पण अचपळ होती. बंगालीतील कोळ्यांच्या एका गाण्याची. त्या चालीवर गाणे करायचे होते ते बारशाच्या समारंभाला शोभेल असे. त्या चालीवर गाणे होणे कठीण आहे असे काही मंडळींचे मत असल्याचे मला हृदयनाथांनी सांगितले. म्हणून मी त्या चालीशी कुस्ती आरंभिली. ती चाल हृदयनाथांच्याकडून अनेकदा म्हणवून घेतली. गाणे कसेबसे पुरे केले. गाणे चालीबरहुकुम झाले आहे की नाही हे पाहण्याकरता सलिलबाबू आले. हृदयनाथांच्या खोलीत आम्ही तिघे बसलो. पण बंगाली व मराठी शब्दोच्चारांत आणि शब्दांवरील आघातांत फरक असल्यामुळे सलिलबाबूंच्या तोंडून सुद्धा ते गोड लागेना. इतक्यात लताबाई तेथे आल्या. त्यांनी एकदोनदा कागदावरल्या ओळींवरून नजर फिरवली आणि 'हलव पालख ना' हे गाणे त्या म्हणू लागल्या. लगेच त्या गाण्याची रया बदलली. म्हणण्याच्या दृष्टीने त्यात कुठे काही खटकत नाही हे स्पष्ट झाले.

लताबाईंची कला राजवाड्यांच्या भिंतीत किंवा कलावंतांच्या मैफलीत कोंडून पडलेली नाही ही सर्वसामान्य मनुष्याच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट आहे. त्यांच्या गाण्याचा गोडवा झोपडीपर्यंत पोहोचला आहे. कष्ट करून थकलेल्या जीवांना तो रिझवीत आहे. ही कला त्यांच्या दैनंदिन विरंगुळ्याचे एक साधन बनली आहे. हल्ली संध्याकाळी मी फिरायला जातो तेव्हा संध्यारंगांची पश्चिमेकडली कलाकुसर पाहून मन आनंदून जाते. पण फिरून परत येताना ती कलाकुसर दिसत नाही. काळोखाने ती नाहीशी करून टाकलेली असते. मात्र त्या गमावलेल्या आनंदाची भरपाई करणाऱ्या दोन गोष्टी वाटेत मला हटकून भेटतात. रातराणीचा सुगंध आणि लताबाईंच्या कुठल्यातरी गाण्याचे गोड सूर. बंगल्यांतून, घरांतून, झोपड्यांतून नाचत नाचत बाहेर येणारे सूर! जनजीवनात असे अढळ स्थान मिळण्याचे भाग्य असामान्य कलावंताखेरीज दुसऱ्या कुणाला लाभू शकेल?

माई मंगेशकर

थोरली

आम्ही मंगेशीला होतो तेव्हाची गोष्ट. नेहमीप्रमाणे सोमवारी महारुद्राच्या वेळी मी गोमुखीत तीर्थ घ्यायला गेले असताना माझ्या हातात सुपारी आणि बेलपत्र आले. त्यानंतर मला दिवस गेले. हा मंगेशाचाच अनुग्रह असे मी समजले. पुढे बाळंतपणासाठी मी इंदोरला माझ्या माहेरी गेले आणि दिनांक अठ्ठावीस सप्टेंबर एकोणीसशे एकोणतीस रोजी शनिवारी रात्री साडेदहा वाजता लताचा जन्म झाला. जन्मवेळी तिचे वजन दहा पौंड होते. बाळसे छान होते. आणि जावळही खूप होते. मला आठवते आहे, तान्हेपणीसुद्धा ती चळवळी आणि धडपडी होती. नवव्या महिन्यातच ती चालायला लागली. बोबडेही कधी बोलली नाही. एकदम स्वच्छ बोलू लागली.

लता दहाअकरा महिन्यांची होती तेव्हाची एक आठवण अगदी सांगण्यासारखी आहे. त्यावेळी आमचा मुक्काम पुण्याला होता. कशी कोण जाणे तिला माती खाण्याची बुद्धी झाली. मालक तेव्हा सारंगी वाजवत बसले होते. त्यांचे लक्ष गेले. तिला माती खाताना पाहून ते खूप रागावले. अचानक त्यांच्या रागाचे पर्यवसान अश्रू ढाळण्यात झाले. आणि त्यांना रडताना पाहून चिमुरड्या लतानेही सारंगीच्या सुरातच आपला सूर मिसळला. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ते असे. पुढे सव्वा वर्षाची झाली नाही तो ती ऐकलेली रेकॉर्ड जशीच्या तशी गाऊन दाखवू लागली.

लहानपणापासूनच तिला वडलांचा फार लळा. त्यांचाही तिच्यावर फार जीव. पहिलीच असल्याने त्यांनी तिचे खूप कोडकौतुक केले. लताचा स्वभाव लहानपणापासून भोळा, पाचपेच बिलकूल नाहीत. परंतु उपजत शहाणपणा मात्र खूप. वयाच्या मानाने समज फार चांगली. मालकांना तिचा फार अभिमान वाटे. तिचा शब्द तर ते अगदी फुलासारखा झेलत असत. ते नेहमी म्हणत की मी जे कमावले नाही, ते ही कमावून दाखवील. माझे नाव झाले नाही परंतु हिचे फार नाव होईल.

आमच्या नाटक कंपनीच्या कॅशची पेटी घरातच असे. त्यात भरलेल्या रुपयांच्या ढिगावर लता जाऊन बसत असे. मी जमिनीवर बसणार नाही असे ती म्हणत असे. मालक तिचा हा बालहट्ट पुरा करीत.

एखादे दिवशी लहर लागली की ती आपल्या वडलांना म्हणे, बाबा मला अमुक राग शिकवा. ती चार वर्षांची असताना आम्ही इंदूरला गेलो होतो. राजवाड्यावरचे निशाण चढता उतरताना सनई वाजे. एका संध्याकाळी सनईचे ते सूर तिने ऐकले आणि ती आपल्या वडलांना म्हणाली, बाबा मला अशीच चीज पाहिजे. तेव्हा त्यांनी तिला 'सदारंग नित उठकर देत दुहाई' ही पूरिया धनाश्री रागातली चीज शिकवली.

तिच्यावाचून मालकांना मुळीच करमत नसे. ते बाहेरगावी गेले होते तेव्हा तिने शाळेत जायला सुरुवात केली. ते परत आले तर त्यांच्या जेवणाच्या वेळी ती घरी नव्हती. शाळेत गेली होती. मग ते खूप रागावले. माझी मुलगी समोर नसली तर मी जेवणार नाही म्हणाले. तेव्हापासून तिची शाळा सुटली. मग घरीच संस्कृत शिकवण्यासाठी एक पंडित ठेवला. त्याने तिला आणि तिच्या पाठच्या साऱ्या भावंडांना गायत्री मंत्र शिकवला. पुढे पुण्याला एकेचाळीस साली आम्ही नवीन घर घेतले. घराची वास्तुशांत करतेवेळी मालकांनी पाची मुलांना बसवून पूजा केली. त्यावेळी या सगळ्या मुलांनी गायत्री मंत्र अस्खलित म्हटला.

मालक दररोज सकाळी साडेचार वाजता रियाझाला बसत. 'ए मान्दे मडू' ही भैरव बहारमधील चीज त्यांची विशेष आवडती होती. पुष्कळदा ही चीज ते या वेळी गात असत. त्यावेळी चिमुकली लता जागी होई आणि अंथरुणात पडल्या पडल्याच सारे लक्षपूर्वक ऐकत राही. तिच्या शाळेत जाण्याविषयी मघाशी सांगितलेच आहे. जेमतेम दोनचार दिवस ती शाळेत गेली असेल नसेल. तिथेही एक दोन तीन या आकड्याऐवजी सा रे ग म या स्वरांनी तिने मोजायला सुरवात केली तेव्हा मास्तरांनी घरी तक्रार केली की शिकण्याऐवजी गाण्यातच या मुलीचे लक्ष आहे. माझ्या आठवणीप्रमाणे तिच्या वयाच्या पाचव्या वर्षापासून मालकांनी तिला स्वतः शिकवायला आणि चिजा द्यायला सुरवात केली. तुला कुठली चीज पाहिजे आहे असे ते तिलाच विचारत आणि ती सांगेल ती चीज तिला शिकवत असत. त्यांचा रियाज ऐकून ऐकून तिला बऱ्याच चिजा माहीत झाल्या होत्या. त्या बालवयांतही ती त्यांनी शिकवलेल्या चिजा व्यवस्थित घेत असे हे विशेष. मालक हयात असेपर्यंत हा क्रम चालू होता. हळूहळू पाठची एक एक भावंडे शिकवण्यात सामील होऊ लागली. तेव्हा चिजा देताना मालक प्रत्येकाला वेगळी चीज देत असत. यमन, देसी, मुलतानी, बिलावल, मालकंस, केदार, भैरवी या प्रचलित रागांबरोबरच बडहंस सारंग, सुंदरकली, बिहागडा, खेम कल्याण, श्री गौरी, मलुहा केदार, सुगराई, पंचम, खट, बहादुरी तोडी, गुणकली यासारख्या अनेक अनवट अप्रचलित रागांतल्या चिजाही त्यांनी तिला शिकवल्या.

वयाच्या सातव्या वर्षी लता सोलापूर येथे जलशात गायली. हा तिचा पहिला सार्वजनिक कार्यक्रम. त्यानंतर पुण्याला आणि बेळगावला मालकांच्या जलशातच तिचेही स्वतंत्र गाणे झाले.

तिच्या वडलांनी जन्मात एकदाच तिला शिक्षा केली. त्याचे असे झाले, तिचे गाणे तालात येत नव्हते. सारख्या चुका होत होत्या. तेव्हा ते फार रागवले. घडवंचीवर गाद्या रचल्या होत्या त्यांवर त्यांनी तिला बसवून ठेवले आणि तेवढा ताल पाठ होईपर्यंत जेवण मिळणार नाही असे सांगितले. ताल पाठ झाल्यावरच तिला खाली उतरवले. त्यानंतर ती कधीही बेताल गायली नाही.

मालकांच्या आयुष्यातल्या अखेरच्या दोनतीन वर्षांत प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे त्यांनी तिच्या गाण्याकडे विशेष लक्ष दिले नाही. तिला शिकवलेले चांगले ग्रहण करण्याची ताकद आली आणि ते गेले हा दैवदुर्विलास नव्हे काय? त्यांच्या अखेरच्या दिवसांत ते स्वतःच चिजा विसरत असत. मग अचानक एखाद्या चिजेचा अंतरा आठवला की तो समोरच्या भिंतीवर नाहीतर मिळेल त्या कागदावर लिहून ठेवीत आणि तिला हाक मारून तो कुठल्या रागाचा आहे वगैरे माहिती तिला सांगत.

खरोखर लता म्हणजे तिच्या वडलांचा जीव की प्राण होती. ते आजारी असताना एकदा

त्यांनी रेडिओवर तिचा कार्यक्रम ऐकला. 'पावना वामना' आणि 'सौभद्रा'तली एकदोन पदे ती गाइली होती. त्यावेळी तिचे गाणे ऐकून "आता मला मरायला हरकत नाही. माझा स्वर मी ऐकला" असे उद्गार त्यांनी मजजवळ काढले.

वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षीच लता रेडिओवर गाऊ लागली. त्यावेळी रेडिओवर ती नाटकातली पदे म्हणत असे. काही पदे तिच्या वडलांनी तिला शिकवली होती तर काही नुसती ऐकून ऐकून तिने स्वतःच शिकून घेतली होती. शेवटच्या आजारात मालक मला म्हणाले, "घाबरू नकोस. हा सूर्यास्त होत असला तरी समोरच या सूर्याचा उदय होत आहे. सर्व काही ठीक होईल."

मालक गेल्यावर तिने त्यांचा मोठा फोटो लावला. गुरुवारचा उपास सुरू केला. तेव्हापासून आजतागायत ती गुरुवार करीत आहे. त्यांच्या फोटोची पूजा करून त्यांना मनोमन वंदन करून ती गाण्याचा रियाज करीत असे. गुरुवारी तर ती नेहमीपेक्षाही अधिक रियाज करी.

मालक गेल्यावर आम्हाला हलाखीचे दिवस आले. तिचे वय त्यावेळी बारा वर्षांचे होते. पण ती मला म्हणाली, "बाबा गेले तरी मी आहे. काळजी करू नकोस. मी कष्ट करीन आणि तुमचा सर्वांचा सांभाळ करीन." आणि आपले हे शब्द तिने खरे करून दाखवले.

दिवस कठीण होते तरी आमचे जुने विश्वासू नोकर आम्हाला धरून राहिले. तरीपण एखादे वेळेस आचारी नसला तर ती मला स्वैपाक करू देत नसे. आपण स्वतः ती जबाबदारी अंगावर घेई.

मालक गेल्यावर लता विनायकरावांकडे प्रफुल्ल पिक्चर्समध्ये ऐशी रुपयावर नोकरी करू लागली. कधी ताप आला, काही दुखले खुपले तरी ती मला पत्ता लागू देत नसे. "माईने काम करू दिले नाही तर माझी भावंडे काय खातील?" असे ती म्हणे. 'गजाभाऊ' चित्रपटाचे शूटिंग चालू होते तेव्हा तिला ताप आला. पण तिने कुणाला कळू न देता तापातच काम केले. गजाभाऊ चित्रपटातलाच आणखी एक प्रसंग. या चित्रपटात लताने एका लहान मुलीची भूमिका केली होती. तिचा सांभाळ करणारी प्रौढ बाई तिचे हाल करते, तिला मारते असा एक सीन होता. नलिनी नागपूरकर यांनी या प्रौढ बाईचे काम केले होते. खरे मारल्याशिवाय रडू येणार नाही असे विनायकराव म्हणाले. त्यांच्या सूचनेनुसार नागपूरकर बाईंनी खरोखर तिच्या कानशिलात जोरात मारली. इतकी की ती कळवळली एवढेच नव्हे तर तिच्या कानातून रक्त आले. पण ही गोष्ट तिने मला सांगितली नाही. आपल्या भावंडांजवळ ती कधी कधी हे बोले आणि त्यांच्याकडूनच ते मला कळे. एकोणीसशे सत्तेचाळीस सालापर्यंत ती विनायकरावांकडे कामाला होती. हे दिवस अतिशय हलाखीचे गेले.

सत्तेचाळीस साली विनायकराव वारले. त्यावेळी आमच्या घरात फार वाईट परिस्थिती होती. बाळ (हृदयनाथ) फार लहान होता. घरात कर्ता पुरुष कोणीच नव्हता. सगळी जबाबदारी लतावरच पडली. तिने हळूहळू प्लेबॅक द्यायला सुरुवात केली होती. पण प्रारंभी पैसे खूप बुडवले जात. केलेल्या कष्टांचा पुरेसा मोबदलाही मिळत नसे. त्यावेळी नाना चौकांतल्या शंकरशेट मंदिरात आमचे बिऱ्हाड होते. ग्रँटरोडहून लोकलने लता अंधेरी, मालाड, गोरेगांव येथील स्टुडिओंमध्ये गाण्यासाठी जाई. लोकलमधून उतरल्यावर ही दोनतीन मैलांची पायपीट तिला करावी लागे. तिच्या खाण्यापिण्याचे तर फारच हाल होत. सकाळी कपभर चहा घेऊन जाई ती संध्याकाळी उशीरा परत येई. स्टूडिओत कोणी तिच्या जेवणाखाण्याची चौकशी करीत नसे की कधी चहाचा कपही मिळत नसे. कधीकधी तर तिला भुकेमुळे चक्कर येई. पण याही परिस्थितीत ती शक्य तो घरी कुणाला पत्ता लागू देत नसे.

मला आठवते आहे, खेमचंद प्रकाश यांच्याकडे ती गाऊ लागली तेव्हा हे दिवस बदलू लागले. खेमचंद तिची काळजी घेत. खाण्यापिण्याची वास्तपुस्त करीत. पण तरीही रखडपट्टी चालूच होती. पुढे वर्षभर काम करून थोडे पैसे जमल्यावर अठ्ठेचाळीस साली तिने हिलमन कार–पहिली गाडी

घेतली. तेव्हा कुठे पायपीट थांबली. मग एकुणपन्नास साली दुसरी गाडी घेतली. त्यानंतर पुढे सतत भरभराटच होत गेली.

त्याच काळातली आणखी एक आठवण. आमची परिस्थिती बरी नव्हती तेव्हा सोन्याच्या बांगड्या, पाटल्या, तोडे, चंद्रहार वगैरे माझे सर्व दागिने एकेक करीत मोडावे लागले होते. लताजवळ थोडेसे पैसे साचल्यावर तिने प्रथम जर काही केले असेल तर ते हे की ते सारे अलंकार नव्याने घडवून घेऊन तिने ते माझ्या स्वाधीन केले. त्यावेळच्या माझ्या भावना व्यक्त करण्यास पुरेसे शब्द माझ्याजवळ नाहीत.

घरात इतकी स्थित्यंतरे होत गेली तरी तिचा स्वभाव बदलला नाही. ती होती तशीच साधी, निगर्वी राहिली आहे. घरात जेवणास उशीर झाला, इतर कसलाही त्रास झाला किंवा एखादी गोष्ट मनाविरुद्ध झाली तरी तिने शांतपणे सहन केले आहे. घर सोडण्याचा विचार कधीही तिच्या मनात आला नाही. पण रस्त्यावरून सामानाने भरलेली बैलगाडी चालली आहे, बैलांना बोजा ओढता येत नाही किंवा रस्त्यावरच्या बेवारशी कुत्र्याला कुणी मारत आहे असे काही पाहिले की तिच्या मनाला फार यातना होतात. आणि एकदम एका चमत्कारिक वैराग्याचा तिला झटका येतो.

रस्त्यावरली कितीतरी बेवारशी कुत्री शोधून त्यांचे औषधपाणी करून पैसे भरून त्यांना पांजरपोळात सोडणे हा पूर्वी एक उद्योगच असे. कित्येकदा लताने बैलगाडीवाल्यांना पैसे देऊन ओझ्यांच्या दोन खेपा करायला लावल्या आहेत. आमच्या घरात तर अनाथ बेवारशी अशी जवळ-जवळ दहाबारा कुत्री आम्ही सांभाळली होती. त्यांचा थाट काही विचारू नका. त्यांना झोपायला गाद्या, पिले झाली की ती ठेवायला पाळणा, असे त्यांचे लाड होत. लोक हाल करतील, नीट सांभाळणार नाहीत या भीतीने पिले बाहेर कुणाला द्यायची नाहीत. मग आमच्या घरात मात्र हा मोठा उत्सव !

लता जरी आजच्या काळातली मुलगी असली, फॅशनेबल जगात वावरत असली तरी तिच्या आवडीनिवडी मात्र जुन्या घरंदाज वळणाच्याच आहेत. याचे एक गमतीचे उदाहरण सांगते. वयोमानामुळे मला आता नऊवारी साड्या जड वाटतात. आणि घरातल्या घरात सहावारी साड्या नेसणे सोयीचे पडते. पण लताला मात्र हे फारसे पसंत नसते. तिचा आपला हट्ट असा की मी नऊवारीच नेसावे. मग ती काय करते तर एकदम बाजारात जाते आणि माझ्यासाठी दहाबारा उत्तमपैकी नऊवारी लुगडी घेऊन येते.

अशा या माझ्या थोरल्या मुलीच्या किती गोष्टी सांगाव्यात ? पितृभक्त, मातृभक्त, भावंडांवर प्रेम करणारी अशी ही आमची लता. सर्व जबाबदाऱ्या अंगावर घेऊन हसतमुखाने पार पाडणारी. कुटुंबाचे ऋण फेडणारी. घराण्याचे नाव मोठे करणारी.

बाळासाहेब देसाई

आंतरराष्ट्रीय कलाकार

संगीतक्षेत्रात अनेक वर्षे ज्याची आठवण राहावी, न भूतो न भविष्यति या शब्दांतच खरोखर ज्याचे वर्णन करता यावे असा अलौकिक गोड गळा घेऊन आलेली आणि चित्रपटसृष्टीत सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिका म्हणून ख्यातनाम झालेली एक फार मोठी कलावंत म्हणून गेली अनेक वर्षे लता मंगेशकर यांना मी ओळखत होतो. त्यांच्या प्रत्यक्ष परिचयाचा योग मात्र अगदी अलिकडे म्हणजे सहासात वर्षांपूर्वी आला. अठ्ठावन्न किंवा एकूणसाठ मध्ये लताबाईंच्या वडलांच्या पुण्यतिथीला प्रमुख पाहुणा म्हणून मी गेलो आणि त्यावेळी लताबाईंचा आणि त्यांच्या सर्व भावंडांचा माझा परिचय झाला. प्रसिद्धीचे झगझगीत वलय सतत सभोवती फिरत असणाऱ्या लताबाई प्रत्यक्ष भेटीत मला फारच साध्या, नम्र व सभ्य असल्याचे प्रत्ययास आले. तशीच त्यांची भावंडेही मला फार गुणी व सालस वाटली. बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व या त्यांच्या गुणांना अभिजात विनयशीलतेची जोड मिळालेली पाहून मला त्यांचे मोठे कौतुक वाटले. त्यांच्याशी बोलत असताना मन एकदम खूप मागच्या काळात गेले आणि अनेक जुन्या आठवणी मनात दाटून आल्या.

फार लहानपणी, ज्यावेळी नाटकाची चैन माझ्यासारख्याच्या खिशाला परवडणारी नव्हती त्यावेळी रंगभूमीवरच्या केवळ एकाच नटाच्या दर्शनासाठी मी पुन्हा नाटके बघत होतो. तो नट म्हणजे मास्टर दीनानाथ. उंचापुरा धिप्पाड देह, राजबिंडे रूप, अत्यंत आकर्षक आणि परिणामकारक व्यक्तिमत्त्व अशा दीनानाथांना स्टेजवर बघताना देहभान हरपून जाई. रंगभूमीवर ते पाऊल टाकीत ते देखील कडाडून टाळी घेतच. आपल्या भरदार पहाडी आवाजात 'परवशता पाश दैवे' सारखे गीत ते गाऊ लागले की सर्वांगावर थरथरून रोमांच उभे राहात. विजेसारखी त्यांची तान रंगभूमीवर फिरू लागली की आश्चर्याने प्रेक्षक श्वास रोधून बघत राहात. केवळ दीनानाथांना बघण्यासाठी पिटात दोन आण्याच्या जागी मी आनंदाने बसून राही. त्यांचे 'रणदुंदुभी' नाटक मी पन्नास वेळा तरी पाहिले असेल. लताबाई व त्यांची भावंडे बघताना मला एकसारखी दीनानाथांची आठवण येत होती. दीनानाथांना पाहताना हा अगदी वेगळा, स्वयंभू कर्तृत्वाचा व प्रतिभेचा कलावंत आहे हे

तत्काळ जाणवत असे. लताबाईही मला तशाच वाटल्या. तीच स्वतंत्र प्रज्ञा, तेच तेजस्वी व्यक्तिमत्त्व आणि कलेच्या ऐश्वर्याचा तोच वरदहस्त.

लताबाईंची आणि माझी प्रत्यक्ष भेट पाच दहा वेळाच झाली असेल नसेल. आणि तीही अगदी थोड्या वेळापुरती. पण त्या अल्पकालीन भेटीतही त्यांची सुसंस्कृतता, संभाषणचातुर्य आणि स्वाभाविक सुजनता यांची माझ्या मनावर फार अनुकूल छाप पडली. रूढ अर्थाने शिक्षणाचा फारसा लाभ झालेला नसूनही एखाद्या पदवीधरालाही सुसंस्कारांच्या दृष्टीने लाजवील असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. एकदा लताबाई आमच्याकडे जेवायलाही आल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या संगतीत आम्हा सर्वांचा वेळ मोठ्या आनंदात गेला. एवढ्या मोठ्या गायिकेला जेवणात कितीतरी काळजी घ्यावी लागत असेल आणि पथ्ये सांभाळावी लागत असतील अशी माझी कल्पना होती. तथापि प्रत्यक्षात तसे काही आढळून न आल्यामुळे मला मोठी गंमत वाटली.

कामाच्या व्यापात करमणुकीसाठी वेळ काढणे आज जरी मला अवघड होऊन बसलेले असले तरी वेळात वेळ काढून लताबाईंची गाणी मी ऐकत असतो. त्यांच्या व आशाबाईंच्या गाण्याचा मी एक निस्सीम चाहता आहे. ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली त्या शुभ प्रसंगी लताबाईंच्या कंठातून निघालेली "घनश्याम सुंदरा" ही होनाजी बाळाची भूपाळी प्रत्यक्ष ऐकताना थरारून जाण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्याचप्रमाणे चिनी आक्रमणाच्या प्रसंगी मुंबई येथील ब्रेबॉर्न स्टेडियमवर सहस्रावधी श्रोत्यांसमोर राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी 'ऐ मेरे वतनके लोगो' हे जे अप्रतिम गीत त्यांनी गाइले, जे गीत ऐकताना प्रत्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरूही गहिवरले, त्या प्रसंगी मी हजर होतो. या दोन्ही आठवणी मनावर ठसून राहिल्या आहेत.

लताबाई या केवळ महाराष्ट्रीय नव्हेत, केवळ राष्ट्रीय नव्हेत, तर आंतरराष्ट्रीय गायिका आहेत. 'जागतिक कलाकार' हे विशेषण सर्वार्थाने जर आज कोणा भारतीय कलावंताला लागू पडत असेल तर ते लताबाईंनाच. संगीत ही विश्वभाषा आहे. म्हणून श्रेष्ठ संगीतकार हा कोणत्याही एका प्रांताच्या मालकीचा राहूच शकत नाही. त्याचे साऱ्या जगाशीच नाते जडलेले असते. असे लताबाईंनी सर्व विश्वाशी नाते जोडले आहे.

राजकारणातली मोठी स्थाने फार अनिश्चित असतात. लोकशाहीत कुणाची सत्ता केव्हाही डळमळीत होते. कलावंताचे राजेपण काही वेगळेच असते. त्याचे ऐश्वर्य पैशात नसते, सत्तेत नसते, त्याचे ऐश्वर्य त्याच्या कलेत असते. गुणात असते, गळ्यात असते. असे असामान्य ऐश्वर्य जन्मतःच घेऊन आलेल्या लताबाई या एक भाग्यशाली कलाकार आहेत. त्यांच्या कलेला परिश्रमशीलतेची जोड लाभलेली आहे. त्यांचा पिंड महाराष्ट्रीय संस्कृतीतले जे स्पृहणीय ते ते घेऊनच बनला आहे. अशा या लताबाईंसाठी त्यांच्या चाहत्यांनी ईश्वराकडे वेगळे ते काय मागायचे? माझ्यासारख्या त्यांच्या कलेच्या एका चाहत्याच्या मनात या प्रसंगी एवढेच येते: लताबाईंच्या हातून त्यांच्या थोर पित्याचे, कै. दीनानाथांचे एक उचित स्मारक उभे व्हावे. त्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाच्या बहुविध गरजा भागवाव्यात आणि नव्या कलाकारांना ते एक आधाराचे स्थान व्हावे.

लताबाईंची कदर जनतेने केलीच आहे. सरकारही आज ना उद्या ती केल्यावाचून राहणार नाही अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

प्रल्हाद केशव अत्रे

स्वरसम्राज्ञी

सौंदर्य (Beauty), संगीत (Music) आणि सुगंध (Fragrance) ही आमच्या जीवनाची तीन तत्त्वे आहेत. मनुष्याच्या ह्या तीन भुका भागल्यावाचून त्याच्या आत्म्याचा संपूर्ण विकास होऊ शकत नाही अशी आमची श्रद्धा आहे. म्हणून रोज सकाळी उठल्यानंतर डोळे, कान आणि नाक ह्या तीन अवयवांना यथास्थित आनंद दिल्यावाचून आमच्या दैनंदिन कार्यक्रमाला आम्ही प्रारंभ करीत नाही.


या आमच्या जीवनसाधनेत लताबाईंच्या गायनाला सर्वांत मोठे स्थान आहे. 'घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' या त्यांच्या महन्मधुर भूपाळीने सारा महाराष्ट्र जागा झाला. 'चाफा बोलेना, चाफा चालेना' या 'बी' कवींच्या 'चाफा' गीताने त्यांनी सारा महाराष्ट्र 'फुली फुलवून' आणला आणि भास्करराव तांबे कवींच्या 'जन म्हणतील पळभर हाय हाय। मी जाता राहिल कार्य काय' या मृत्युगीताने त्यांनी साऱ्या महाराष्ट्राच्या काळजाचे लचके तोडले आहेत.

या व्यतिरिक्त आकाशवाणीवरील त्यांच्या गाण्याच्या शेकडो नव्हे लाखो आवर्तनांनी त्या गेली पंचवीस वर्षे रोजच्या रोज भारतातील कोट्यवधि जनतेला आनंदाच्या महापुरात अक्षरशः बेहोष करीत आहेत. भारतीय संगीताचे अभिजात स्वरमाधुर्य त्यांनी साऱ्या भारतवर्षांत कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचविलेले आहे. त्यांची लोकप्रियता केवळ भारतांतच नाही. सारे जग त्यांची गाणी आकाशवाणीवरून रोजच्या रोज ऐकत आहे. भारतीय चित्रपटांतील संगीताची लोकप्रियता केवळ त्यांच्यामुळेच वाढलेली आहे. चित्रपटांमध्ये पार्श्वगायनाला जे महत्त्व नि जो दर्जा लाभलेला आहे तो केवळ लताबाईंच्या पुण्याईमुळेच यांत काय शंका आहे? ध्वनिमुद्रित संगीताच्या हजारो मुद्रिका काढून तर त्यांनी जागतिक विक्रम केला आहे. त्यांची ही कीर्ती ध्यानात घेऊन, 'टाईम' (Time) या विश्वविख्यात अमेरिकन साप्ताहिकाने लताबाईंचा परिचय आपल्या एका अंकात दिलेला होता. भारतीय आकाशवाणीच्या 'विविध भारती' मधील लोकप्रिय चित्रपटगीतांमधील शेकडा सत्तर गाणी लताबाईंची असतात हे आम्ही सांगण्याचीही आवश्यकता नाही.

मधुर आणि मुलायम आवाज, स्पष्ट आणि अर्थपूर्ण शब्दोच्चार यामुळे लताचे गाणे ऐकणाराचे

देहभान गळून पडते. दुःख, क्लेश, यातना यांना विसरायला लावण्याचे विलक्षण सामर्थ्य लताबाईंच्या स्वर्गीय गळ्यात आहे. जवळजवळ सर्व भारतीय भाषांत गाणी गाऊन त्यांनी आपले दिव्य स्वर कन्याकुमारीपासून ते काश्मीरपर्यंत पोहोंचविले आहेत.

महाराष्ट्राची संस्कृति नि परंपरा यांच्याबद्दल स्वरसम्राट दीनानाथ मंगेशकर आणि त्यांचे कुटुंब यांना केवढा ज्वलंत अभिमान आहे, तो सर्वविश्रुत आहे. महाराष्ट्रराज्यस्थापनेच्या महोत्सवाचे उद्घाटन लताबाईंनीच आपल्या मधुर मंगलाचरणाने केलेले सर्वांनी ऐकलेले आहे. महाराष्ट्र सरकार आणि भारत सरकार यांनी लताबाईंची ही महान संगीतसेवा लक्षात घेऊन त्यांच्या ह्या असामान्य गुणांचा सत्कार करावयाला नको काय ?



भालजी पेंढारकर

खरी लता?

स्वरसुंदरी, गायनसम्राज्ञी, सरस्वती, कोकिलकंठी या आणि आणखी अशा, अनेक खऱ्याखोट्या भूषणांनी विभूषित असलेली पार्श्वगायिका कु. लता इजबद्दल काही लिहिण्याचा मला आदेश आला आणि माझ्या मनःचक्षूं-समोर फार लहानपणी पाहिलेले, कै० गणपतराव जोश्यांचे 'हॅम्लेट' नाटक तरळून गेले. त्या नाटकात वेडाचे सोंग पांघरलेल्या राजपुत्राजवळ जाऊन, त्याच्या खऱ्या विचारांचा काही थांगपत्ता लागतो की काय याची चांचपणी 'शालेय' करू लागला. राजकुमाराने शेजारच्या माणसाजवळची बासरी घेऊन ती शालेयाच्या हातात दिली आणि सांगितले, "या बासरीतून उत्कृष्ट संगीत, कधी हृदय पिळवटून टाकणारे करुणस्वर, तर कधी सर्व गोपगोपींना मोहून टाकणारे विश्वप्रेम-संगीत काढता येते. तुम्ही ते काढून दाखवाल का?" शालेय बोलला, "मला ते करता येत नाही." त्यावर राजपुत्र म्हणाला, "या टीचभर लाकडाच्या निर्जीव नळकांड्यातले सुंदर सूर तुम्हाला काढता येत नाहीत. आणि या साडेतीन हात देहात, विश्वकर्म्याने अजब करामतीने निर्मिलेल्या माझ्या अंतः-करणातले लपलेले विचार समजून घेण्याचा प्रयत्न करता!"

लता,—तिचे चाहते म्हणतात त्याप्रमाणे—भगवंताची बासरी आहे. आणि राजपुत्र म्हणतो त्याप्रमाणे साडेतीन हात देहाची स्त्री आहे. खरेच, ती काय आहे? अगोदर स्त्री, त्यातून दयामय भगवंतांनी दिलेली आवाजाची अनमोल देणगी, सिनेमावाल्यांनी (स्वतःच्या सोयीसाठी) अफाट जाहि-रातींचे वलय तिच्याभोवती निर्माण केलेले. चंचलत्वाबद्दल प्रसिद्ध असलेल्या लक्ष्मीच्या कृपेचा तिला लाभलेला साजशृंगार—खरी लता या सगळ्या सुंदर गर्दीतून पाहायची केव्हा आणि कशी? कोडेच आहे हे. जो तो आपल्या आवडीप्रमाणे, कधी करमणूक म्हणून, तर कधी हौस म्हणून; कधी रिकाम्या सुताराप्रमाणे, तर कधी कुठलीही कुलंगडी सापडली तर पितर स्वर्गाला गेल्याचा नूपुरी आनंद वाटतो म्हणून; हे कोडे सोडविण्यात वेळ दवडतो. फार थोडे, लता समजण्यासाठी लताचा विचार करीत असतील. लताच्या आवाजाचा, संगीताचा, तिच्या अचूक शब्दफेकीचा, सूर आणि शब्द यांच्या द्वारा ती उभवीत असलेल्या अमृतमय भावविश्वाचा आनंद लुटणारे शेकडो, नव्हे सहस्रावधी गानप्रेमी सज्जन

तिचे गाणे ऐकतात. आनंदी होतात. 'वा! ईश्वराची काय देणगी आहे' असे म्हणतात. आणि तिला अगत्य, आशीर्वाद, शाबासकी, यांपैकी काहीतरी देऊन पुन्हा आपल्या दैनंदिन उद्योगात मग्न होतात. त्यांच्या दृष्टीने लता म्हणजे फक्त गीत. लता म्हणजे थकल्याभागल्या जीवांचा एक सुंदर विरंगुळा!

या चाहत्यांप्रमाणेच, रणमैदानावरून तिला आलेली, शूर सैनिकांपासून तो धुरंधर सेनापतींपर्यंत अनेकांची पत्रे मी वाचली आहेत. देशापासून दूर, आप्तविरहाने कष्टी आणि मातृभूमीच्या कुशीत येण्यासाठी उत्सुक असे ते जीव तिला लिहितात, "लताबाई, तुमच्या गाण्यात आम्हाला आमची घरंदारं दिसतात. आप्तांचे आवाज ऐकू येतात. बालबच्चांचे बोलके बोल त्यातून उमटतात. आणि त्यात आमचं एकाकीपण विरून जातं. आम्ही सज्ज होतो नव्या दमानं..."

घरीदारी कष्ट करणाऱ्या बायाबापड्या लताच्या गाण्याच्या सुरांबरोबर कष्ट विसरून राबतात. क्वचित, स्वतःही गातात. सुखावतात. तृप्त होतात.

पोटासाठी दिवसरात्र राबणाऱ्या हमालापासून तो खुर्चीत अडकलेल्या हपीसरापर्यंत सारेजण; माणूस, जात, गोत, पंथ, भेद विसरून लताचे गाणे ऐकतात. कानांतून हृदयात प्रवेशणाऱ्या संगीताच्या या सुखद प्रवाहात मनसोक्त डुंबतात. प्रसन्न होतात. त्यापलिकडे लता कोण, कशी, कुठे, काय करीत असेल याचा विचारही त्यांना शिवत नाही.

पण आपल्याला प्रिय अगर अप्रियही व्यक्तीच्या जीवनाची जादा चौकशी हाही मनुष्यस्वभाव आहे. एवढेच नव्हे तर आपल्या आवडीच्या व्यक्तीला नसते सद्गुण चिकटवणे आणि नावडत्या माणसावर नसते दुर्गुण लादणे हेही अनेक प्रसंगी घडते. लताच्या बाबतीत हा दुसरा प्रकार विशेषपणे घडत आला आहे.

देशाच्या सर्व भागांतून आणि परदेशी स्थिर झालेल्या भारतीयांकडून तिला दररोज अनेक पत्रे येतात. त्यात कोणी तिला सरस्वतीचा अवतार म्हणतो. कोणी गानदेवता म्हणतो. कोणी तिचा फोटो मागतो. कोणी तिला प्रेमपत्रे लिहितो. आणि काहीजण पत्रात तिचा उद्धारही करतात. कारण? त्यांचे तेच जाणोत! काही गानप्रेमी सज्जन स्त्रीपुरुष तिच्या देवदत्त देणगीचे मनापासून कौतुक करून सत्यप्रेमाने तिला आशीर्वाद देतात. हे सारे जिला लाभलेले आहे ती लता खरेच कशी आहे असाही प्रश्न काहीजण करतात. त्यांत अस्वाभाविक असे काहीच नाही. पण लता खरी कशी आहे?

लता खरी कशी आहे हे तिच्या स्वतःखेरीज सत्यतेने कोण सांगणार? या व्यवहारी जगात जगत असताना स्वतःबद्दलचे सत्य स्वच्छ सांगणारी माणसे क्वचितच जन्माला येतात. लताही त्याला अपवाद असेलसे मला वाटत नाही. आणि मग? मग काय? तिच्याबद्दल ऐकावयास मिळणाऱ्या गोष्टी, तिच्या प्रत्यक्ष सहवासात पाहावयास, अनुभवावयास मिळालेले क्षण, कारणपरत्वे आलेले संबंध, त्या प्रसंगीचे तिचे वागणे यावरूनच माणूस तिच्यासंबंधी आपले मत बनवितो. बोलणे युक्त ठरवतो. पण ते तिचे संपूर्ण चित्र होते का?

खरी लता लतानेच निःस्पृहपणे चितारली पाहिजे. एरव्ही तिने स्वतः अगर इतरांनी 'रिटच्' केलेला तिचा फोटोच पाहावयास मिळतो. त्या रिटचिंग, कलरिंग, स्पॉटिंगमध्ये कधी तिच्या तोंडावर, अंगावर, गुणांवर पदरचा शृंगार चढवला जातो. तर कधी कधी तिच्यावर नसत्या दोषांचे डांबर अगदी तिचे मित्र म्हणवणारांच्या हातून बरबटले जाते. खरी लता मध्येच अज्ञात राहते. चित्र आणि प्रत्यक्ष व्यक्ती यांत जो जिवंतपणाचा फरक असतो तोच या रंगीत लतात आणि खऱ्या लतात राहतो.

लतावर ढोंगीपणाचे, उर्मटपणाचे, थापेबाजीचे आणि इतरही अनेक अनुल्लेखनीय दुर्गुणांचे, घालण्यात आलेल्या घावांचे व्रण खोल आहेत. याउलट तिच्या उदारतेचे, दानशूरत्वाचे आणि इतर कितीतरी सद्गुणांचे तिच्या चाहत्यांनी तिच्यावर लादलेले दागिनेही इतके आहेत की त्यांच्या ओझ्याखाली ती खाडीलकरी लक्ष्मीधराची आई शोभावी, कोलमडून पडावी. तिच्या-

बद्दलच्या या सर्व खऱ्याखोट्या, चांगल्यावाईट गोष्टी वर्तमानपत्राच्या चव्हाट्यावर इतक्या हिरीरीने मांडल्या जातात की त्या खोटया म्हणण्याची प्रत्यक्ष लताची ताकद नाही. तेथे इतरांची काय कथा!

माणसाच्या सर्व आशाअपेक्षा, गुणदोष, सुखाची आवड, दुःखाच्या यातना, या बाबतीत लताही माणूसच आहे. स्तुतीने आनंद वाटणे, दुःखाने रडू येणे, प्रेमाने गुदगुल्या होणे, शिव्यांचा संताप येणे, खावे, प्यावे आणि साधे का होईना, ल्यावे असे वाटणे; या सर्वसाधारण गोष्टी तिच्यातही आहेत. दैवी देणगीने अलंकृत झालेला तिचा गळा आणि तिने आत्मसात केलेल्या कलेचे अलौकिकत्व सोडल्यास लता ही लताच आहे. माणूस आहे.

लताचे काही दोष ध्यानात घेऊनही तिला लाभलेल्या ईश्वरदत्त देणगीप्रमाणेच तिची कर्तबगारी तिच्या वैऱ्यांनाही मानावी लागेल. वयाच्या बाराव्या चौदाव्या वर्षांपासून अनुभव, विशेष शिक्षण अगर कोणाचा पाठिंबा यांपैकी जवळ कांहीही नसताना केवळ स्वतःच्या श्रमाने आजची सुबत्ता संपादणे, एवढा लौकिक मिळवणे आणि हे सर्व सातत्याने आज बावीस पंचवीस वर्षे अबाधित सांभाळणे, वाढवणे ही काय साधारण गोष्ट आहे? हे काय केवळ दैवाच्या दयेने घडले? बहुतेक भारतीय भाषांच्या खाचाखोचा, त्यांतले निर्दोष उच्चार आत्मसात करण्यासाठी त्या त्या भाषेतील अधिकारी शिक्षकांजवळ तिने केलेला अभ्यास, पदातील भावनांचा प्रसंगाला साजेल असा आविष्कार करण्यासाठी जरूर असलेले विचार, उच्चार आणि स्वरांचे सौंदर्य हे काय श्रमाशिवाय, अभ्यासाशिवाय केवळ आवाजाच्या देणगीने घडते? तिला तिच्या आवाजाचे सोने भगवंतांनी दिले हे जितके खरे तितकेच त्या सोन्याचे नवनवीन सुंदर अलंकार घडवून ते मोहक करणे हे लताचे स्वतंत्र कर्तृत्व आहे.

एकत्र कुटुंब हा लताच्या वैशिष्ट्याचा, अनेकांपैकी एक अभिनंदनीय पैलू आहे. आई, बहीण, भाऊ, आप्त या सर्वांचा एकत्र संसार चालवणे आणि तो प्रेमाने, अभिमानाने आणि मानमान्यतेने निभावणे ही एक गोष्टही, म्हाताऱ्या आईबापांची देखील अडचण वाटण्याच्या आजच्या काळात, आजच्या जगात लताचे मोठेपण सिद्ध करावयास पुरी आहे.

पद्धतशीर अभ्यासाची संधी नाही, पाहायचे आणि शिकायचे असेच जीवन गेल्यामुळे तिच्या जीवनविषयक विचारांची आणि आचारांची काही प्रसंगी संगती लावणे अवघड वाटते. घोड्यांना गाडीला जोडतात, बैलांना बळजबरीने राबवतात, मुक्या जनावरांना छळतात, याचा राग येण्याइतकी सहृदयता तिच्यात आहे, त्याबरोबरच, बरोबरीच्या मनुष्यप्राण्याला जिभेच्या चाबकाने प्रसंगी अयोग्य ताडन करण्याचा कठोर फटकळपणाही तिच्यात आहे. स्वश्रमाने हजारो रुपयांच्या देणग्या मिळवून देण्याच्या उदारतेबरोबर हजार दोन हजारांसाठी जिकीर करण्याचा व्यवहारी कट्टरपणाही तिच्यात कधीतरी दिसेल. हळुवार सहानुभूतीबरोबर वेडा उपहासही तिच्यात प्रसंगी प्रतीत होतो. स्वतःशी स्वतःचाच विरोध हा या जिवंत लतेला येणारा बहर आहे. लहर हा कलावंताचा स्वभाव आहे म्हणतात. लता कलावंत आहे हे काय नव्याने सांगावे? काही प्रसंगी कामाच्या दगदगीत अव्यवहार्यपणे तिजकडून दुखवले गेलेले काही सज्जन आहेतही. पण सज्जन ते सारे समजून घेऊन तिला क्षमा करतात. तिच्या अमोल गुणाच्या गौरवार्थ ते झाले गेले विसरून जातात. त्याचा डांगोरा पिटीत नाहीत.

लताची आपल्या वडलांवर, भारतावर, शिवछत्रपतीवर, धर्मावर (तिला समजतो तो) श्रद्धा आहे. कोणाला लुबाडण्याची तिला गरज नाही आणि सवय नाही. कर्जाला ती फार घाबरते. फार विलक्षण नसले तरी चांगले संस्कार तिच्यावर झालेले आहेत. ती भावनाप्रधान आहे. पण म्हणून ती आग्रही, प्रसंगी दुराग्रही नाही असे मी कसा म्हणेन? क्रोध, मद, मत्सरही अगदीच उद्भवत नसावा असे मी कसे सांगू? चटकन अपसमज करून घेण्याचा क्वचित उतावळेपणा तिच्यात आहे. तसा चुकले असे पटले तर ते कबूल करण्याचा प्रांजलपणाही तिच्याजवळ आहे.

भालजी पेंढारकर


गाण्याखालोखाल लताचा वाखाणण्यासारखा आणखी एक गुण म्हणजे सृष्टिसौंदर्य बघण्याची, ते कॅमेऱ्याने टिपण्याची तिची आवड व त्यात दिसून येणारी तिची कलात्मक दृष्टी. तिने घेतलेली काही छायाचित्रे पहिल्या प्रतीच्या छायाचित्रकाराला, कलावंताला शोभतील.

थोडक्यात म्हणजे भगवंतांनी खूप खैरात करून ठेवली आहे तिला पुष्कळच देऊन!

आणि म्हणूनच, जगात नित्य असे काही नाही हे ध्यानात घेऊन ती आपल्या कलेचा, गुणांचा उपयोग आवडत्या देशासाठी, तोही बदलत्या मूल्यांचा विचार करून करील, तर खरी लता लोकांना दिसेल-आवडेल. रंगेल प्रसंगी गोड गळ्याने करमणूक करणारा मानवी ग्रामोफोन म्हणवून घेण्यापेक्षा प्रयत्नांनी ती देवी सरस्वतीचा सुस्वर साक्षात्कार ठरेल. हे अवघड असेल, तरी लताला अशक्य नाही. आवश्यक ती श्रीची कृपा, बुद्धी, संधी आणि जनाशीर्वाद तिला लाभलेला आहे. म्हणूनच, अवतार-समाप्तीनंतर भूलोकी विसरून गेलेली भगवंतांची बासरी ठरावयाचे की केवळ पार्श्वगायिका म्हणूनच जगा-मरावयाचे हे ठरवून त्याप्रमाणे ती आचरण करील अशी मला आशा आहे.

खरी लता दाखवण्यासाठी मी वाट पाहातो आहे ती वरील सर्व गुणांनी पूर्णालंकृत होण्याची. तिला स्वतःला आहे यापेक्षा पुष्कळच हवे असेलही. पण सर्वच सर्वांना मिळत नाही. हवे ते कष्टाने मिळवावे लागते.

अपूर्णतेतच पूर्णत्वाच्या प्रयत्नांची जिद्द जन्मते!



शिवाजी गणेशन

पाखरू

संध्याप्रकाश. ढगांच्या सतत पालटत्या आकारांच्या पार्श्व-भूमीवर घरट्यांकडे परतणारी पाखरे. या दृश्याइतके अद्‌भुत, सुंदर आणि उत्तेजक दुसरे काहीही असेलसे मला वाटत नाही. ही पाखरे मला मुक्तता, स्वतंत्रता, शक्ती, कर्तृत्व आणि इतर अनेक स्पृहणीय गुणांची प्रतीके वाटतात.

लता मंगेशकर आणि तिचे कुटुंबीय हे मला सतत अशा पाखरांचे स्मरण करून देतात. मीही असाच एक मुक्त पक्षी आहे. त्यामुळे माझा आणि या कुटुंबाचा घनिष्ठ स्नेह असावा हे स्वाभाविकच आहे. आम्ही सारीच पाखरे आहोत आणि कलेचे एकच क्षितिज आक्रमण्याचा आम्हाला ध्यास आहे. पाखरांमध्ये भाऊबहिणी असतील की नाही? असतीलच. त्यांना एकमेकांविषयी काय वाटत असेल बरे? प्रेम, जिव्हाळा, अभिमान. होय ना? मग तेच मला लताच्या घराबद्दल वाटते. तिलाही आमच्या कुटुंबाबद्दल तीच आत्मीयता आहे. या भावंडांच्या गुणांबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल मला सतत विलक्षण कौतुक वाटत आले आहे.


'लता' या शब्दाचा संस्कृतमध्ये 'वेल' असा अर्थ आहे. आमची लता ही वेलीसारखी नाजूक आहे. पाखरासारखी कोमल, मृदू आहे. हे पाखरू एका क्षणी मुग्ध, असहाय, निरागस असे खांद्या-वर अलगद विसावेल तर दुसऱ्याच क्षणी मुक्त, स्वतंत्र, बंडखोर वृत्तीने आभाळात उंच भरारी घेईल. मोठे लहरी, गोड आणि लोभस पाखरू आहे हे!

या मंगेशकर कुटुंबात आणि पाखरांत एक अनाकलनीय नाते आहेच. एकदा ही भावंडे आमच्याकडे पाहुणचारासाठी आली होती. त्याच वेळी माझ्या एका मित्राने काही कोयाळ जिवंत पकडून ते माझ्याकडे धाडून दिले होते. त्यांच्या रुचकर मांसावर मी ताव मारणार होतो. पण पिंज-ऱ्यात कोंडलेली ती गरीब, गोजिरवाणी, असहाय पांखरे पाहिली मात्र, लताला आणि तिच्या बहिणींना असे रडू कोसळले आहे म्हणून सांगू! मी ती पांखरे ताबडतोब सोडून दिली. एवढेच नव्हे, तर तेव्हापासून कधीही मी कोयाळ म्हणून पुन्हा खाल्लेला नाही.

आज भारतात, इतकेच नव्हे, तर भारताबाहेरच्या जगातही सर्वांत अधिक प्रमाणात जर कुणाचा

स्वर ऐकला जात असेल तर तो लताचा—या माझ्या आवडत्या बहिणीचा. गेली कित्येक वर्षे हे असे चालले आहे. आणि यापुढेही अनेक वर्षे ते असेच चालत राहील याविषयी मला तिळमात्र शंका वाटत नाही. लताचा स्वर हा शतकाशतकांतून एकदाच निर्माण होणारा स्वर आहे. तसा स्वर पुन्हा सिद्ध होणे अवघड—नव्हे, अशक्य आहे. मी ज्यावेळी इतर देशांतून हिंडत असतो त्यावेळीही लता माझ्यापासून दूर आहे असे मला कधी वाटतच नाही. आपल्या स्वरांच्या रूपाने ती माझ्या समीप सदा असतेच. मी नुसता रेडिओ सुरू करण्याचा अवकाश, हे लाडके पाखरू आपले अद्‌भुत स्वरजाल लगेच माझ्याभोवती विणू लागते. सौंदर्याचे, माधुर्याचे आणि जीवनाच्या एका खोल समंजस जाणिवेचे विविध आकृतिबंध तयार होऊ लागतात. ते बघताना माझे देहभान हरपून जाते.

या अद्वितीय पाखराने यापुढेही सतत अशाच उंच उंच भराऱ्या घेत राहावे, कलेची याहूनही अधिकाधिक विस्तीर्ण क्षितिजे आक्रमीत राहावे एवढीच माझी इच्छा आहे.



पंकज मलिक

सुधाकंठिनी कल्याणीया

एकावन्न किंवा बावन्न सालची गोष्ट असेल. स्थळ : नागपूर. प्रसंग : एक संगीत महोत्सव. या महोत्सवाच्या संचालकांनी उत्सवात भाग घेण्यासाठी मला निमंत्रण केले होते. आणि त्याला अनुसरून मी नागपूरला आलो होतो. याच कार्यक्रमासाठी श्रीमती लताही तेथे उपस्थित होती. त्यावेळी देखील ती चित्रपटरसिकांच्या गळ्यांतला ताईत बनलेली होती. कारण 'महल' सारख्या चित्रपटातील 'आयेगा आनेवाला' वगैरे अत्यंत गाजलेल्या तिच्या गीतांनी तेव्हाही जनतेला वेड लावलेले होते.

कार्यक्रमाच्या संचालकांनी माझी व लताची ओळख करून दिली. तिच्या त्या प्रथमदर्शनाने मी किती चकित होऊन गेलो होतो याचे आजही मला चांगले स्मरण आहे. कल्पनेलाही ज्याचा विचार करताना भोवळ येईल अशी गगनचुंबी कीर्ती आणि त्या कीर्तीची ही अधिष्ठात्री मात्र अगदी एवढीशी, बाहुलीवजा. लाजाळूपणा आणि गोडवा त्या छोट्याशा मूर्तीत पुरेपूर भरलेला. हा विरोध मला जेवढा विस्मयकारक तेवढाच आनंददायक वाटला. श्रीमती लताच्या वागण्याबोलण्यांत तिचा अभिजात साधेपणा, सौजन्य आणि सभ्यता यांचे मोठे हृद्य असे दर्शन मला घडले आणि त्यामुळे तिच्याबद्दल माझ्या हृदयात विलक्षण जिव्हाळा आणि आपुलकी दाटून आली. कितीतरी वर्षांचा परिचय असावा अशी आत्मीयता तिच्यासंबंधी मला वाटू लागली. एवढी मोठी कीर्ती आणि वैभव संपादन केलेले, पण त्याची ओझरतीही जाणीव लताच्या वर्तनात मला कोठे दिसली नाही. या साधेपणाने मी मोहित होऊन गेलो. तिच्या कलागुणांविषयी मला वाटणारी कौतुकाची भावना मी जेव्हा तिला बोलून दाखवली त्यावेळी अत्यंत विनयाने व लीनपणे तिने त्या स्तुतीचा स्वीकार केला. हे सारे किती अकृत्रिम होते. मनाच्या सरलतेचे आणि नम्रतेचे दर्शन घडवणारे होते जी माणसे अकस्मात कीर्तिशिखरावर जाऊन पोहोचलेली असतात, प्रसिद्धी आणि लोकप्रियता ज्यांच्याकडे झंझावाती वेगाने आलेली असते, अशी माणसे 'स्वाभाविक' राहू शकत नाहीत. त्यांच्या वागण्याबोलण्यांत कृत्रिम उपचार, दंभ, आत्मगौरवाची भावना, खोटाखोटा विनय यांचा मनाला अगदी उबग आणणारा प्रत्यय पावलोपावली येत असतो. त्यांच्या संगतीत जीव गुदमरू

लागतो. पण अशा ढोंगीपणाचा, विनयाचे मिथ्या आवरण घेतलेल्या दांभिक गर्विष्ठपणाचा लताच्या व्यक्तित्वात लवलेशही नव्हता. तिच्या पहिल्या भेटीने एक अत्यंत अनुकूल असा ठसा माझ्या मनावर उमटवला.

या कार्यक्रमात लताने जी गाणी गाइली त्यानेही मी असाच विस्मयचकित होऊन गेलो. त्या दिवशी तिने आपल्याजवळच्या शास्त्रीय बैठकीवर आधारलेल्या गाण्यांचे भांडारच जणू उघडले होते. त्या क्षेत्रांतले तिचे ज्ञान, तिचा आवाका आणि झेप यांनी मी अक्षरशः मंत्रमुग्ध झालो होतो! हा वेळपावेतो लताबद्दलची माझी समजूत अशी होती की या मुलीला जादूचा गळा लाभलेला असला तरी काही विशिष्ट प्रकारच्या गीतांवरच तिची हुकमत चालते, शास्त्रीय गाणे तिला बहुधा येत नसावे. पण त्या दिवशी शास्त्रीय गायनांतले तिचे कौशल्य आणि त्या क्षेत्रातला तिचा जबरदस्त अधिकार जेव्हा माझ्या प्रत्यक्ष अनुभवास आला त्यावेळी तिच्याबद्दलचा माझा हा पूर्वग्रह किती चुकीचा होता ते मला स्वतःशी मान्य करावे लागले. तिच्या तेजाळ आणि समृद्ध स्वराने त्या दिवशी स्वर्गीय गानमाधुर्याचे असे उन्मेष प्रकट केले की माझ्या अज्ञानाचे व गैरसमजाचे धुके त्यापुढे क्षणार्धात विरघळून गेले!


लताचा गळा अत्यंत गोड आहे, स्वरांची समृद्धी आणि संपन्नता तिच्याजवळ फार मोठी आहे, हे तर खरेच. पण तिचा आवर्जून उल्लेख करण्यासारखा आणखी एक विशेष म्हणजे आवाज हवा तसा वळवण्याचे तिचे असामान्य कसब. या बाबतीत ती केवळ अनन्य आहे असे म्हणावयास काही प्रत्यवाय नाही. हे वैभव तिला निसर्गतःच लाभले आहे. गाणाऱ्या पक्ष्यांइतक्याच सहजतेने लता गुणगुणते, किलबिलते, स्वरसंपदा उधळीत राहाते. विशेषतः कंपयुक्त स्वरांची फेक ती ज्या सफाईने करते, त्यासाठी गळ्यावर जो विलक्षण ताबा ती ठेवू शकते त्याला तोडच नाही!

गेली पंचवीस वर्षे श्रीमती लता गात आहे. या दीर्घ अवधीत विजयाकडून आणखी मोठ्या विजयाकडे अशी तिची वाटचाल सतत होत राहिली आहे. आणि आज तर ती कीर्तीच्या नि वैभवाच्या ऐन शिखरावर उभी आहे. अशा वेळी सारा देश तिचा गौरव करील, आणि लताच्या समतोल व्यक्तित्वाला, सदभिरुचीला नि अभिजात सुसंस्कृततेला साजेसे त्या गौरवाचे साधे सुंदर स्वरूप असेल याविषयी मला काडीमात्र शंका वाटत नाही. चित्रपटांतली आणि ध्वनिमुद्रिकांवरली तिची अक्षरशः असंख्य गीते तिच्या मखमली स्वराची, कलात्म सौंदर्यदृष्टीचा प्रत्यय आणून देणाऱ्या तिच्या सहज शैलीची आणि तिच्या सूक्ष्म भावसंपन्नतेची साक्ष पटवतात. अशा कौतुकास्पद कलागुणांचा अपूर्व मेळ तिच्याठायी झालेला असल्यामुळेच भारताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत, लहानापासून थोरापर्यंत साऱ्यांचीच ती एकमेव लाडकी कलाकार होऊन बसली आहे. यत्किंचितही अतिशयोक्ती न करता मी अगदी निश्चयपूर्वक असे म्हणू शकतो की श्रीमती लता हिने चित्रपटांतील गीतांचा दर्जा, प्रतिष्ठा आणि कलात्मक ऐश्वर्य कितीतरी प्रमाणात वाढवले आहे, इतकेच नव्हे तर आपल्या अगदी वेगळ्या आणि खास स्वतःच्या अशा शैलीचे नि तंत्राचे सौंदर्य पार्श्वगायनाला देऊन कधीही न कोमेजणारा, अक्षयी टवटवीत असा बहर त्या कलेला प्राप्त करून दिला आहे!

तिच्या आणखी एका खास वैशिष्ट्याचा मी जर निर्देश केला नाही तर हे वर्णन अपुरेच राहणार आहे. लताचे हे वैशिष्ट्य म्हणजे तिचे अचूक निर्दोष शब्दोच्चार. या तिच्या गुणाचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. कारण आपल्या अंगच्या या वैशिष्ट्यामुळे आजच्या नामांकित पार्श्वगायकांत तिने सर्वाधिक मानाचे स्थान मिळवले आहे. आपल्या स्वतःच्या मातृभाषेखेरीज इतर भाषांतही लता ज्या सफाईने गाते; त्या भाषेतील स्वरांचे विशिष्ट वळण राखणे, बिनचूक शब्दोच्चार करणे, विशिष्ट आघात आणि हेलकावे आवाजाला देणे आणि त्या त्या भाषेचे प्रांतिक वैशिष्ट्य अचूक व्यक्त करणे हे सर्व ती ज्या अधिकाराने सहज साधू शकते त्या बाबतीत तिची बरोबरी करणारे

फारच थोडे कलाकार चित्रपटसृष्टीत आज सांपडतील! श्रीमती लताची या क्षेत्रातली सफाई बघावयाची असेल तर दक्षिण भारतीय भाषांतली तिची गाणी एकदा ऐकावीत! तमीळ, तेलगू या भाषांतल्या तिने गाइलेल्या गाण्यांचे शब्दोच्चार असे साफ, अचूक आणि निर्दोष आहेत की अत्यंत चोखंदळ आणि दोषान्वेषी टीकाकाराच्या कसोटीलाही ती गाणी पूर्णतया उतरतील. त्यांत खोड काढणे त्याला शक्य होणार नाही. ही गाणी कोण गाते आहे हे जर ऐकणारापासून लपवून ठेवले तर गायिका कोणत्या देशातली किंवा प्रांतातली आहे, तिची मातृभाषा कोणती आहे हे श्रोत्याला प्रयत्न करूनही सांगता येणार नाही!

सरतेशेवटी ईश्वराच्या चरणी एकच प्रार्थना करून हा छोटासा लेख संपवतो. संगीत ही देवभाषा आहे असे म्हटले जाते. ती देवभाषा आहे हे खरेच पण व्यथित अशा मानवी हृदयाचाही तो एक मोठा दिलासा आहे. श्रीमती लता हिच्या चित्रपटक्षेत्रातल्या कारकीर्दीच्या रौप्यमहोत्सवाच्या या मंगल प्रसंगी मी मनापासून असे इच्छितो की तिच्या कलेची ही ज्योत दैवी तेजाने अशीच सतत झळकत राहावी. तिचा प्रकाश भारतातल्याच नव्हे तर जगभर पसरलेल्या मानवांपर्यंत पोचावा, आणि तिच्या कलेचा सुवर्णमहोत्सवही अशाच चढत्यावाढत्या वैभवाने नि रसिकांच्या कौतुकाने साजरा व्हावा!



पंकज मलिक

दयानंद बांदोडकर

गोमंतक-कन्या

स्वरसम्राज्ञी म्हणून मान्यता पावलेली कु. लता मंगेशकर ही एक गोमंतकीय, आमच्या गोमंतकाचे कलातपस्वी कै. मा. दीनानाथ यांची सुकन्या म्हणून मला प्रथम परिचित होती. तिच्या सुरेल गळ्यातून निघणाऱ्या स्वर्गीय स्वरलहरींनी लाखो संगीतप्रेमी मुग्ध झालेले मी पाहिले आहेत. कु. लताचे ध्वनिमुद्रित संगीत ऐकून आपल्या थोर पित्याची अतृप्त इच्छाच ती पूर्ण करीत आहे असे सार्थपणे म्हणावेसे वाटते. कै. दीनानाथ हे एक महान संगीतज्ञ होते. त्यांची संगीतसाधना फार उच्च श्रेणीची होती. निरनिराळ्या रागदारीच्या चिजा शोधण्यासाठी त्यांनी अतिशय परिश्रम घेतले. त्या चिजांवर आपल्या प्रतिभेने नवीन साज चढवून त्यांनी मराठी नाट्यसंगीत समृद्ध केले. त्यावर स्वतःचा असा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवला. एक नवा संप्रदाय निर्माण केला. एक नवी बैठक स्थापन केली. त्या बैठकीला साक्ष ठेवून, त्या संगीतसाधनेचा आधार घेऊन गानकोकिळा गणली जाणारी लता आज कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झाली आहे. केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही इतकी लोकप्रियता मिळवलेली दुसरी व्यक्ती सापडणार नाही.

कु. लताचा पहिला जाहीर कार्यक्रम मी ऐकला तो मुंबईत रंगभवनमध्ये. चीनच्या आक्रमणानंतर संरक्षणनिधीसाठी तो कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पुण्याच्या मिलिटरी कॉलेजसाठी जो निधी जमवण्यात आला त्यावेळी लताच्या कार्यक्रमाचा मी मुख्य पाहुणा होतो. लतानंतर तिची धाकटी भगिनी श्री. आशा भोसलेही तेथे गाइली. त्यावेळी माझ्यावर प्रभाव पडला तो आशाचाच. आशा एका वेगळ्याच तडफेने गाते. तिच्या आवाजात भेदकता आहे. तिच्या गळ्यातून निघालेला स्वर श्रोत्यांच्या अंतःकरणात कुठेतरी खोलवर स्पर्श करून जातो. नाट्यसंगीतातला एक एक तुकडा अशा चपलतेने ती फेकते की ऐकणाराचे देहभान हरपावे! हीच ती मा. दीनानाथ यांची कन्या अशी जाणीव व्हावी.

लता आणि आशा यांचा लौकिक सर्वश्रुतच आहे. पण उषा, मीना, हृदयनाथ या त्यांच्या इतर भावंडांना देखील संगीतातली चांगली समज आहे. प्रत्येकाचे त्याचे त्याचे स्वतःचे म्हणून एक

खास वैशिष्ट्य आहे. कुणी बालगीतांत तरबेज, तर कुणाचा समरगीत गाण्यात हातखंडा. पित्याची पुण्याई आणि ईश्वराची देणगीच ती. सर्व कुटुंबियांवर कसा वरदहस्त आहे.

या प्राथमिक ओळखीनंतर मंगेशकर भावंडांचे पणजीला आमच्याकडे वास्तव्य झाले व जवळच्या घरगुती स्वरूपाच्या परिचयात त्याचे रूपांतर झाले. कुणाच्या तरी मायाळू कृपाछत्राखाली वाढण्याचा या मुलांचा ऐन उमेदीचा काळ पोरकेपणात गेला. या गुणी कलावंतांना कुणातरी वडीलधाऱ्या माणसाचा आधार असावा असे मला तीव्रतेने वाटले. कु. लताची आणि तिच्या बंधुभगिनींची साधी राहणी माझ्या विशेष नजरेत भरली. परमेश्वरावरील त्यांची दृढ श्रद्धा पाहण्यात आली. सगळीजणे वडील माणसांशी यथायोग्य आदरभाव बाळगून वागणारी दिसली.

गोमंतक या आपल्या पितृभूमीविषयी कु. लताच्या मनात पूज्यभाव आहे. तिच्या या उत्कट भावनेचे दर्शन मला गोवा साहाय्यक समितीच्या वतीने षण्मुखानंद हॉल, माटुंगा येथे दि. १९ जून १९६५ रोजी लताने जो भव्य कार्यक्रम सादर केला त्यावेळी झाले. जणू ते तिला आपल्या घरचेच कार्य वाटले. केवळ माझा एक शब्द तिला पुरेसा वाटला. आठपंधरा दिवस केवढी तिची तयारी चालली होती. त्या वेळचे आवाडीचे संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या दिग्दर्शनाखाली तिचा कार्यक्रम सादर होणार होता. लक्ष्मीकांत प्यारेलालना तिच्यासाठी कधी खोळंबून राहावे लागले नाही. आपले नित्याचे गर्दीचे कार्यक्रम आटोपूनही ठरलेल्या वेळेपेक्षा पंधरा मिनिटे अगोदर लता तालमींना हजर राहत असे. सहसा जाहीर कार्यक्रम न स्वीकारण्याकडेच लताचा कल. कधी चुकून स्वीकारला तरीही तो एका गीतापुरताच मर्यादित स्वरूपाचा. पण आमच्या कार्यक्रमाच्या वेळी तिने एकंदर सहा गीते सादर केली. आपले सर्व कसब, आपली सर्व तपश्चर्या तिने त्या दिवशी पणाला लावली. मिलिटरी कॉलेजच्या मदतीसाठी झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी आशा मला प्रभावित करून गेली होती. पण षण्मुखानंद हॉलमध्ये मला कळले की लता ती लताच ! तिची सर दुसऱ्या कुणाला येणार नाही. तिच्या स्वरांतील कंप, आर्तता, एक एक संवेदना जागृत करण्याचे तिचे सामर्थ्य ! मी तर खरोखरच भारावून गेलो. केवळ मीच नव्हे, षण्मुखानंदमध्ये उपस्थित असलेला प्रत्येकजण हेच म्हणत होता. षण्मुखानंद हॉलला त्या दिवशी गंधर्वनगरीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

भारत सरकारने कु. लताविषयी दुजाभाव का दाखवावा समजत नाही. पद्मश्री, पद्मभूषण वगैरे बहुमान ज्या कलावंतांना मिळाले त्यांची नामावली पाहता आमच्या कु. लताची योग्यता काकणभर जास्तच आहे. सरकारने आपली चूक सुधारून वेळीच लताचा यथोचित गौरव करावा.

चित्रपटक्षेत्रांत वावरत असूनही लताने आपल्या व्यक्तित्वाची जाणीवपूर्वक जोपासना केली आहे. तिच्या स्वभावातील शालीनता समोरच्या व्यक्तीला प्रभावित करते. देशाविषयी, धर्माविषयी जाज्वल्य अभिमान तिच्या रोमरोमांत भिनला आहे. गोमंतकाचे नांव निघताच लताचे संस्कारक्षम मन वेडेपिसे होते. आध्यात्मिकतेकडे तिचा कल आहे. आपल्या पूज्य पिताजींचे एक भव्य स्मारक उभारण्याचा लताचा मनोदय आहे. मा. दीनानाथांनी संगीतात नाविन्य आणले. अगदी शेवटच्या क्षणी आपल्या कन्येच्या गळ्यात गंधार असल्याची जाणीव त्यांना झाली होती. मा. दीनानाथांच्या त्या ऋणातून मुक्त होण्यासाठी संगीताशी एकरूप झालेल्या लताने संगीताद्वारेच अपार्थिव स्वरूपाचे त्यांचे भव्य स्मारक उभारावे. भारतीय शास्त्रीय संगीताचा कोपरान कोपरा लताने हस्तगत करावा. आज चित्रपटांतून पाश्चात्य संगीताचा उपयोग केला जातो. पण तो उथळ स्वरूपाचा, गल्लाभरू असतो. त्या ऐवजी अभिजात शुद्ध स्वरूपातील पाश्चात्य संगीत आणि भारतीय संगीत यांचा मिलाफ घडवून त्यांतून एक नवचैतन्यदायी धून, नादब्रह्माशी तादात्म्य घडवणारा एखादा सूर देता आला तर लताने बघावे. ते सामर्थ्य लताजवळ आहे. प्रयत्न केला तर केवळ लतालाच ते शक्य होईल.

नौशाद

लता आणि मी

एकोणीसशे शेहेचाळीस साल. कारदार स्टूडिओतला एक नित्याचा कामाचा दिवस. म्यूझिक रूमला लागून असलेल्या छोट्या 'बूथ' मधून मी कोणाला तरी फोन करीत होतो. तेवढ्यात एक मुलगी माझ्याशेजारून पुढे गेली. ती स्वतःशीच काहीतरी गुणगुणत होती. तिच्या त्या गुणगुणण्याने माझे चित्त एकदम वेधून घेतले. तिच्या स्वरात होतेच तसे काही तरी. अतिशय मुलायमपणा आणि असामान्य लवचिकपणा हे त्या स्वरांचे सहज जाणवलेले दोन विशेष. माझ्या एकदम मनात आले : योग्य संधी लाभली तर हा स्वर लक्षावधी लोकांची हृदये काबीज करू शकेल.

फोन करून झाल्यानंतर मी माझ्या खोलीत आलो आणि लगेच मी त्या मुलीची चौकशी करू लागलो. मी माझ्या सहकाऱ्यांना म्हणालो, "लाखात एक आहे या मुलीचा आवाज. त्यात विलक्षण गोडवा आणि गोलाई आहे." त्यावर ते काहीच बोलले नाहीत. त्यांनी 'त्यात काय मोठेसे' अशा काहीशा उपेक्षावृत्तीने खांदे उडवले. पण मी नामोहरम झालो नाही. उत्तेजित स्वरात मी पुढे म्हणालो, "मी या मुलीला माझं एक तरी गाणं म्हणायला लावणारच!" त्यावर मात्र त्यांचे डोळे आश्चर्याने विस्फारित झाले. त्यांच्या आश्चर्याचा अर्थ माझ्या ध्यानात आला. जोहराबाई, राजकुमारी, नूरजहाँ, सुरैय्या, शमशाद बेगम यांच्यासारख्या एकाचढ एक अशा नामांकित गझल गायिकांनी पार्श्वगायनाचे जे क्षेत्र गाजवले आहे तेथे या एका कुठल्या कोण, किरकोळ, पोरसवदा मराठी मुलीची काय डाळ शिजणार आहे असेच जणू त्यांना म्हणावयाचे होते!

पण माझ्या सहकाऱ्यांनी मला कितीही निरुत्साह करण्याचा प्रयत्न केला तरी मी माझ्या निर्धारापासून ढळणार नव्हतो. त्या मुलीच्या स्वरातला गोडवा, त्यातली तीव्र झार ही ज्याने एकदा ऐकली त्याला तिचा विसर पडणे केवळ अशक्यच होते. मला तो स्वर इतरांनाही ऐकवावयाचा होता. ताबडतोब, क्षणाचाही विलंब न लावता मी माझा दोस्त अन् सहकारी पुण्यवान याला त्या मुलीची चौकशी करून तिचा पत्ता काढून आणण्यास आग्रहपूर्वक बजावले. संधी मिळताच शक्य तेवढ्या त्वरित त्या मुलीचे गाणे पदरात पाडून घेण्याची खटपट करायची असे मी मनोमन ठरवून टाकले होते. आणि माझ्या

म्हणा किंवा तिच्या म्हणा, सुदैवाने अशी संधीही लगेच चालून आली. 'चांदनी रात' या चित्र-पटासाठी एक गीत घ्यावयाचे होते. मी लगेच त्या मुलीच्या आवाजाची चाचणी घेण्यासाठी तिला बोलावणे धाडले.

त्या दिवशी सकाळपासून पावसाच्या सरी येत होत्या. राहून राहून येत होत्या. मुंबईचा पाऊस. तरीही बरोबर ठरलेल्या वेळी त्या मुलीने माझ्या खोलीत पाऊल टाकले. ती खूप भिजली होती. आणि एक जुनी फाटकी छत्री तिने आपल्या हातात घट्ट धरली होती. मी तिचे स्वागत केले. तिनेही हसून मला नमस्कार केला. मी तिला बसायला सांगितले. ती बसली. मग मी तिच्याकडे प्रथमच नीट न्याहाळून पाहिले. तिचा बांधा कृश, सडसडीत होता. आपल्या लांब दाट केसांच्या दोन वेण्या तिने पाठीवर सोडल्या होत्या. साधी सुती पांढरी साडी ती नेसली होती. आणि तिच्या पायांतल्या चपला पार झिजून गेल्या होत्या. तिच्या चेहऱ्यावर देवीचे वण होते. तरीही तो चेहरा विलक्षण उत्कट वाटत होता. आणि बालकाच्या अव्याजतेने चमकणारे पाणीदार डोळे जणू दूरच्या अज्ञात भविष्याचा वेध घेत होते. खोलीत येऊन बसल्यावर क्षणभर खाली मान घालून ती स्तब्ध राहिली. मला वाटते आपल्या बावरलेल्या मनाला शांत करण्याचा ती प्रयत्न करीत असावी. मला ती एखाद्या पैलू न पाडलेल्या हिऱ्यासारखी वाटली. होय. हिराच. आज ओबडधोबड वाटणारा, पण पुढे केव्हा तरी साऱ्या जगाकडून कौतुकाची खंडणी वसूल करणारा—

आम्हा उभयतांत एक विचित्र शांतता पसरली होती. क्षणमात्र वाट पाहून मीच त्या शांततेचा भंग केला. मी तिला म्हटले, "तुम्ही तर पार भिजून गेला आहात."

माझे शब्द ऐकून तिने चटकन् वर पाहिले. तिच्या मुद्रेवर संकोचयुक्त स्मित उमटले आणि ती म्हणाली,

"मी ट्रॅममधून खाली उतरले आणि नौशादसाहेब, पावसाची खूप मोठी सर आली. मला परळ टी. टी.पासून इथपर्यंत चालतच यावं लागलं. बरोबर छत्री होती. पण ती ही अशी." बोलता बोलता तिने आपल्या जुन्या फाटक्या छत्रीकडे नजर टाकली आणि ती पुन्हा हसली.

मीही त्या जुन्यापुराण्या छत्रीकडे पाहिले. ती फारच केविलवाणी दिसत होती.

मग मी वेळ न घालवता मुख्य विषयाकडे वळलो. मी तिला विचारले, "तुमचं नाव ?"

"मी लता मंगेशकर."

"तुम्ही आतापर्यंत चित्रपटात एखादं गाणं स्वतंत्रपणे एकटीनं म्हटलं आहे ?"

"होय. एकदा म्हटलं आहे. 'बॉंबे टॉकीज'च्या 'मजबूर' चित्रपटासाठी संगीत दिग्दर्शक गुलाम हैदर यांनी मला एक गाणं एकटीला दिलं होतं."

"तुमचे वडील ?—"

"माझे वडील म्हणजे श्री. दीनानाथ मंगेशकर. मराठी रंगभूमीवरचे प्रसिद्ध संगीत नट होते ते."

बोलता बोलता तिचे डोळे अभिमानाने चमकले.

"तुमच्या सहज गुणगुणण्यावरूनही हे ध्यानात येतं की तुम्हाला गाण्याची चांगली तालीम मिळाली आहे." मी म्हणालो, "शास्त्रीय संगीताचं शिक्षण तुम्ही कोणाकडून घेतलं ?"

"सुरुवातीला अर्थात् मी माझ्या वडलांकडेच शिकले." लता म्हणाली, "पण तशी गंडा बांधून मी तालीम घेतली अमानत खां साहेबांकडून."

आता ती बरीच शांत झालेली दिसली. तिचा प्रारंभीचा संकोच, बुजरेपणा मावळून गेला आहे हे पाहून मी तिला थोडेसे गाऊन दाखवण्याची विनंती केली. ती तिने तात्काळ मान्य केली. खरोखरच या मुलीला गाण्याची दैवी देणगीच लाभलेली होती. या कलेची अद्भुत समज तिला

जन्मतःच प्राप्त झालेली होती. स्वराला योग्य तो आकार देण्याचे तिचे कसब असामान्य होते. आणि तिचे गाणे स्वच्छ, निर्मळ, सुरेल होते. मला आता एकच गोष्ट जाणून घ्यायची होती. नव्या गाण्याचे सूर तिला सहजपणे आत्मसात करता येतील की नाही ?

चित्रपटातले जे गाणे तिला देण्याचा माझा विचार होता ते मी हार्मोनियमवर तिला वाजवून दाखवू लागलो. त्या गाण्याची अस्ताई तिने चटकन उचलली. अंतराही तिला अगदी सहज जमला. तिचे गाणे अगदी निर्दोष होते. बदकाच्या पिलांनी पाण्यात जितक्या स्वाभाविकपणे पोहावे तितक्या सराईतपणे तिचा स्वर त्या गाण्यात फिरत होता. या मुलीबद्दलच्या माझ्या सर्व अपेक्षा संपूर्णतः खऱ्या ठरल्या होत्या. लौकरच ते गाणे तिने आत्मसात केले.

गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या दिवशी मात्र प्रारंभी ती थोडीशी संकोचलेली, बावरलेली दिसली. तिची ती अवस्था पाहून मी ध्वनिमुद्रणासाठी ती जेथे उभी होती त्या खोलीत गेलो आणि तिला धीर देत म्हणालो,

" इथं जमलेल्या लोकांपैकी कोणालाही गाण्यातलं काही कळत नाही असे समज तू. या विषयात तू शहाणी आहेस आणि ते सारे एकजात खुळे आहेत हे पक्कं ध्यानात ठेव. गाण्याला तुझ्यावर ताबा गाजवू देऊ नकोस. तू गाण्यासाठी नाहीस. गाणं तुझ्यासाठी आहे. समजलीस ? "

त्यावर लता हसली. 'समजले' अशा अर्थी तिने मान डोलावली. तिच्या लांबलचक वेण्याही जणू समजूत पटल्यासारख्या तिच्या पाठीवर हेलावल्या. मी समाधानपूर्वक तेथून बाहेर पडलो.

गाण्याचे पहिले ध्वनिमुद्रण ठीक झाले. आम्ही बाहेर येऊन ते ऐकले. ते लोकगीत लताने गाइले होते चांगले. पण तिचा आवाज अरुंद, पातळ वाटत होता. चित्रपटातल्या ज्या उप-नायिकेच्या तोंडी ते गाणे घातले जाणार होते ती पुष्ट, भरदार देहाची स्त्री होती. तिच्या तोंडी हे गाणे विसंगत तर वाटणार नाही ना अशी शंका आमच्या मनांत आली. ध्वनिमुद्रक ईशान घोष यांच्याशी मी थोडी चर्चा केली आणि तेच गाणे पुन्हा एकदा घेतले. यावेळी लताच्या स्वराचा भरगच्चपणा आणि त्याची गोलाई पाहून सारे जण अगदी थक्क झाले. ईशान घोष आणि मी एकमेकांकडे बघून हसलो आणि आम्ही दोघांनीही समाधानपूर्वक मान डोलावली. आम्ही परस्परांचे मूक अभिनंदन करीत होतो.

गाण्याचे ध्वनिमुद्रण संपल्यावर चित्रपटाचे निर्माते एहसान यांनी लताला साठ रुपये दिले. लताने त्या रकमेचा स्वीकार केला आणि माझ्याकडे बघून एका लाजऱ्या स्मिताने माझे आभार मानीत तिने माझा निरोप घेतला.

'चांदनी रात' चित्रपटाने लताला पार्श्वगायनाच्या क्षेत्रात प्रथम ओझरता प्रवेश मिळवून दिला तर 'दुलारी' चित्रपटाने त्या क्षेत्रात तिचे पाऊल भक्कमपणे स्थिर केले. हे स्थान तिला सहजासहजी लाभले असेल अशी जर कोणी समजूत करुन घेईल तर ते मात्र फार चुकीचे होईल. कारण प्रारंभीच्या काळात लताला खूप कष्ट सोसावे लागले आहेत. अपरंपार परिश्रम करावे लागले आहेत. उर्दू शब्दांच्या अचूक उच्चारांच्या घनदाट अरण्यातून प्रथम तिला वाट काढावी लागली. गाण्याच्या तालमी घेण्या-पूर्वी आधी किती तरी वेळा केवळ लताचे उर्दू शब्दोच्चार स्वच्छ, निर्दोष व्हावेत म्हणून तिला गाण्याच्या ओळी पुन्हा पुन्हा म्हणाव्या लागत. त्याच त्या शब्दावर अनेकदा आम्ही तिला जीभ वळवायला लावत असू. आणि हे सारे ती न थकता, न चिडता करीत राही. लता ही आदर्श विद्या-र्थिनी आहे. ती कष्टाळू आहे. आज्ञाधारक आहे. कंटाळा तिच्या गावीही नाही. इतकी वर्षे ती उर्दू गीते, गझल गाते आहे पण आज सुद्धा नवा गझल गायचा असेल तर मी त्या गाण्याची चाल तिला समजावून सांगण्यापूर्वी प्रथम ती तो गझल मला वाचून दाखवते. अशा वेळी तिचे डोळे मिष्किलपणे चमकत असतात. निर्माते कारदार हे तसे विलक्षण चोखंदळ. सहजगत्या त्यांचे समाधान होणे

कठिणच. पण त्यांच्या चित्रपटासाठी लताने गाइलेले 'कौन सुने फरियाद हमारी' हे गाणे त्यांनी ऐकले मात्र, ते अगदी खूष होऊन गेले. त्यांच्या अवघड परीक्षेला लता उत्तम रीतीने उतरली होती. त्यानंतर नायिकेची सारी गाणी तिलाच मिळाली. आणि पार्श्वगायनाच्या क्षेत्रातले तिचे उज्ज्वल भवितव्य निश्चित झाले.

त्या काळातली एक गोष्ट अजूनही माझ्या पक्की ध्यानात राहिली आहे. एकदा आजारामुळे दोन दिवस मी स्टूडिओत आलो नव्हतो. माझी गैरहजिरी लताला तेवढी जाणवली. आणि माझे घर शोधीत शोधीत ती वांद्याला आली. मी कोठे राहतो याची तिला काहीच कल्पना नव्हती. एक तासभर ती घराघरांतून माझे नाव विचारीत हिंडत होती. सरते शेवटी आमच्या घरी ती येऊन पोहोचली तेव्हा ती खूप दमली, शिणली होती. पण तिचा तर्क अचूक ठरला होता. मी आजारी असलो पाहिजे ही तिची भीती खरी होती. ती सर्व संध्याकाळ लताने माझ्या बिछान्याशेजारी बसून काढली. आणि त्या अवधीत नवी गाणी, नवे करार, चित्रपटांची कामे यांसंबंधी अवाक्षरानेही तिने चौकशी केली नाही. तो विषयच मुळी निघाला नाही. ती आली होती फक्त माझ्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी. "कसे आहात तुम्ही, नौशादसाहेब?" एवढे विचारण्यासाठी. हा लताच्या स्वभावाचा आणखी एक मनोज्ञ पैलू आहे. दुसऱ्याच्या दुःखाने ती सदाच कळवळते. ही गाढ सहानुभूती हे संवेदनाशील कलावंताचे एक अस्सल लक्षण आहे. आणि ते लताच्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात आढळून येते.

यानंतर मेहबूब यांनी आपले 'अंदाज' चित्र सुरू केले. त्यावेळी चित्रपटातली नायिका नर्गिस हिच्या गाण्यासाठी कोणाचा आवाज घ्यावा असा जेव्हा प्रश्न निघाला तेव्हा मी मेहबूबना लताचे नाव सुचविले. त्यावर ते लगेच मला म्हणाले, "भाई, या बाबतीत तर तुम्हालाच जास्त कळते. तुम्हाला योग्य वाटेल तो निर्णय तुम्ही घ्या. मला तो प्रमाण आहे."

आणि मग एका सुरेख सकाळी लताने मेहबूब स्टूडिओत 'तोड दिया दिल मेरा' हे 'अंदाज'-मधले नंतर खूप गाजलेले गाणे गाइले. या गाण्याचे ध्वनिमुद्रण चालू असताना स्टूडिओत एक गोरागोमटा, तरतरीत तरुण उपस्थित होता. तो मन लावून ते गाणे ऐकत होता. आणि त्याच्या मुद्रेवर विलक्षण तन्मयतेचा, हर्षाचा भाव उमटला होता. हा तरुण म्हणजे चित्रपटसृष्टीतला एक बुद्धिमान आणि प्रतिभाशाली कलावंत राज कपूर होय. लताचे गाणे ऐकताना 'बरसात' चित्रपटाची कल्पना त्याच्या मनात भिरभिरत होती. पुढचा इतिहास सर्वश्रुतच आहे.

या साऱ्याचा अर्थ असा मात्र नव्हे की एका रात्रीत लता ही वैभवाच्या आणि सुखसोयींच्या सृष्टीत प्रविष्ट झाली! छे छे. तसे मुळीच नाही. एकीकडे चित्रपटाच्या सृष्टीतली अवघड वाट आक्रमीत असता दुसरीकडे तिच्यापुढे अनेक कठिण समस्या होत्या. कौटुंबिक अडचणी होत्या. वैयक्तिक प्रश्न होते. तिचे वडील निधन पावले होते आणि वाढत्या कुटुंबाची कठिण जबाबदारी लताच्या कृश, अशक्त, छोट्याशा खांद्यांवर पडली होती. त्या वयात ते सारे पेलणे तिला फार अवघड जात होते. त्यावेळी दैनंदिन जीवनात ती अनेकदा माझा सल्ला विचारीत असे. कधी कधी ती आपले मन माझ्याजवळ मोकळे करी. त्यावेळी मीही प्रारंभीचे माझे कठिण दिवस तिला सांगून तिच्या जिवाला धीर देत असे. रेल्वेचे तिकीट घेण्यापुरतेही पैसे जवळ नसल्यामुळे दररोज कुलाब्या-वरून दादरपर्यंत मी पायी कसा येत होतो, हे तिला सांगत असे. मग मी तिला म्हणे,

"लता, कष्ट, पुन्हा कष्ट आणि अविरत कष्ट हेच अंतिम यशाचे एकमेव साधन आहे हे ध्यानात ठेव. त्याचप्रमाणे ईश्वरावर दृढ श्रद्धा आणि आपल्या कलेशी अव्यभिचारी निष्ठा यांखेरीज कोणीही कलावंत श्रेष्ठ पदवीला पोहोचू शकत नाही हेही लक्षात असू दे!"

त्या काळात लताने दररोज देवपूजा करण्याची सवय स्वतःला लावून घेतली आणि आजपर्यंत तिची ती सवय टिकून राहिली आहे. या श्रद्धेला तिने विलक्षण शिस्तीची आणि कठोर आत्मसंयमाची

जोड देऊन गाण्याचा रोजचा रियाजही सुरू केला. कलेच्या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त प्रगती करून घ्यावी हे एकमेव ध्येय तिने आपल्या डोळ्यांपुढे ठेवले होते. व त्याची पूर्वतयारी करण्यास तिने प्रारंभ केला होता.

लता ही अत्यंत हळवी आणि संवेदनाशील अशी कलावंत आहे. मी तर म्हणेन की ती वाजवीपेक्षा अधिक हळवी आहे. त्यामुळे चित्रपटांतील वेगवेगळ्या भूमिकांसाठी गाताना त्या त्या भूमिकांच्या भावभावनांशी, सुखदुःखांशी ती चटकन समरस होते. त्यांच्या वेदना, व्यथा तिच्या हृदयाला जाऊन भिडतात. कधी कधी या साऱ्यांचा फारच तीव्र परिणाम तिच्यावर होतो. कित्येकदा एखाद्या दुःखी गाण्यामागची भूमिका दिग्दर्शक लताला समजावून सांगत असताना तिचे डोळे भरून येताना आणि तिच्या गालांवरून आसवे ओघळताना मी पाहिले आहे.

तिच्या या अतिरिक्त हळवेपणामुळे कधी कधी मोठे चमत्कारिक प्रसंग उद्भवतात. 'अमर' चित्रपटासाठी तिचे एक गाणे मी बसवून घेत होतो. त्या गाण्यातली एक विशिष्ट जागा मला हवी होती तशी तिच्या गळ्यातून येईना. त्या दिवशी तिचे काहीतरी बिनसले होते. काही घरगुती घटनेमुळे तिचे मन त्रस्त झाले होते. मग मीही फारसा आग्रह धरला नाही, आणि गाण्यातल्या त्या विशिष्ट 'मुरकी' बद्दल फारशी चिंता करण्याचे कारण नाही असे लतालाही मी सांगून टाकले. त्यावेळी आम्ही 'हिज मास्टर्स व्हॉइस' कंपनीच्या 'रेकॉर्डिंग रूम' मध्ये होतो. आणि कंपनीचे माडगावकर ध्वनिमुद्रण करीत होते. गाणे ध्वनिमुद्रित झाल्यावर आम्ही सर्वजण ते ऐकू लागलो. मी माझ्या नेहमीच्या सवयीनुसार डोळे मिटून लक्षपूर्वक गाणे ऐकत होतो. लता माझ्याशेजारी बसली होती. गाणे चालू असता ती विशिष्ट अवघड जागा येऊन गेली आणि एकदम माझ्या शेजारी धाडकन काहीतरी पडल्याचा आवाज कानी आला. मी चमकून डोळे उघडले. बघतो तो लता मूर्च्छित होऊन खाली जमिनीवर पडली होती! सगळीकडे एकच गोंधळ उडाला. मी घाईघाईने पाणी मागवले आणि ते तिच्या तोंडावर शिंपडले. जरा वेळाने ती शुद्धीवर आली. मी तिला विचारले,

"लता, काय झाले?"

ती बावरल्या स्वरात एकसारखी पुटपुटत राहिली,

"ती मुरकी हवी तशी आली नाही...नौशादसाहेब...ती मुरकी हवी तशी आली नाही!"

दुसऱ्या दिवशी आम्ही ते गाणे पुन्हा ध्वनिमुद्रित केले. अगदी मला हव्या होत्या तशा मुरकीसकट. ती मुरकी इतक्या सफाईने लताच्या गळ्यातून बाहेर आली की जणू कमीत कमी दोन शतके तिने त्यावर परिश्रम घेतले होते!

लताच्या कलाजीवनाच्या प्रारंभापासून तिच्याबरोबर काम करण्याची मला संधी मिळाली हे मी माझे मोठे भाग्य समजतो. कला, कीर्ती आणि वैभव यांच्या पायऱ्या क्रमाक्रमाने ती चढून जात असताना तिची ती प्रगती मी मोठ्या आनंदाने बघत आलो आहे. या अवघड चढणीत कदाचित एखादे वेळी तिची अडखळती पावले मी स्थिर केली असतील. पण यापेक्षा अधिक काहीही नाही. आज जे श्रेष्ठ कलात्मक व्यक्तिमत्त्व लताने संपादन केले आहे, त्याच्या जडणघडणीला मी हातभार लावला आहे असे म्हणणे केवळ अहंकाराचेच नव्हे तर निखालस चुकीचेही होईल.

लताच्या असंख्य चाहत्यांच्या दृष्टीने लता ही गगनचुंबी हस्तीदंती मनोऱ्यांत राहणारी एक चालती बोलती दंतकथा असेल. पण माझ्यासारख्या ज्या काही लोकांनी तिला जवळून पाहिले आहे त्यांच्या दृष्टीने ती एक फार वेगळ्या प्रकारची व्यक्ती आहे. साधी शुभ्र साडी परिधान केलेली, गळ्यात एखादी साधी माळ घातलेली लता पूर्वी ट्रॅममधून प्रवास करण्याच्या काळात जितक्या सहजपणे मजकडे बघून स्मित करीत असे तेच निर्भर हास्य आज आपल्या उंची शेव्हरोलेट गाडीतून उतरतानाही तिच्या चेहऱ्यावर उमटलेले दिसते. मधल्या या साऱ्या वर्षांतून ती पहिल्या-

इतकीच साधी, सरलमनस्क राहिली आहे. तिचा हा साधेपणा तिच्या वेषभूषेपासून तो केशरचने-पर्यंत सर्वत्र दिसतो. दाट केस असूनही लता विक्षिप्त वा चित्रविचित्र केशरचना करताना कधी दिसत नाही. पूर्वीप्रमाणेच आजही तिच्या दोन लांबसडक वेण्या पाठीवर सोडलेल्या असतात. ती साधी लिपस्टिकसुद्धा लावीत नाही. मग मेक अप करणे दूरच. मीरेची भजने तिला फार आवडतात. पांढरा रंग तिला अत्यंत प्रिय आहे. आणि औदार्य हा तिचा सर्वात मोठा गुण आहे.

लताच्या या औदार्याचा लाभ अनेकांना झाला आहे. किती तरी वादकांना, संगीत दिग्दर्शकांना लताने आपण होऊन मनापासून साह्य केले आहे. अडचणीत सापडलेल्या निर्मात्यांना मदत करण्याच्या आपल्या जुन्या खोडीमुळे तर आजही ती स्वतः अनेकदा अडचणीत येते. अनेक राष्ट्रीय आणि सामाजिक कार्यासाठी तिने सढळ हाताने साह्य केले आहे.

आणि लताच्या बाबतीत याहून काही वेगळे घडणेही संभवत नाही. तिचे व्यक्तिमत्त्वच मुळी असामान्य घटकांनी बनलेले आहे. लताची आपल्या वडलांचे ठायी अढळ भक्ती आहे. आणि दर वर्षी उचित कार्यक्रमांची जोड देऊन ती त्यांची पुण्यतिथी साजरी करते. बडे गुलाम अली खां, नजाकतअली व सलामतअली हे तिचे आवडते शास्त्रीय गायक आहेत. तिची स्मरणशक्ती अजब आहे. वीस वीस वर्षांपूर्वी गायिलेली गाणी त्यांतल्या बारीकसारीक तपशिलासकट आणि साथीच्या सुरावटीसकट आजही म्हणून दाखवून ती मला चकित करते. असामान्य परिश्रमशीलतेच्या जोरावर आपल्या गाण्यात तिने विलक्षण सहजता, सफाई आणि कलात्मक परिपूर्णता आणली आहे. या सर्व गोष्टींमुळेच या क्षेत्रांतले अद्वितीय स्थान तिने मिळवले आहे. ईश्वराने तिला सोनेरी स्वर दिला आहे. तसेच उमदे दिलदार हृदय आणि साधा स्वभावही त्याने तिला बहाल केला आहे. मला वाटते, लताच्या अपूर्व यशाचे हेच रहस्य आहे.

प्रत्येक पिढी आपले स्वतःचे असे काही खास कलावंत निवडीत असते. आणि त्या त्या पिढीचे लक्षावधी लोक आपल्या असंख्य हृदयांच्या गाभाऱ्यात त्या कलावंतांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करतात. सैगल हा असा जनमनाच्या सिंहासनावर अधिष्ठित झालेला कलाकार होता. लता ही देखील लोकहृदयां-वर सत्ता गाजविणारी अशीच एक अभिषिक्त सम्राज्ञी आहे. भारतीय चित्रसृष्टीने निर्माण केलेली ती सर्वाधिक यशस्वी आणि केवळ अद्वितीय अशी पार्श्वगायिका आहे. तिच्यानंतर अनेक पार्श्वगायिका होतील. त्यांतल्या काही कदाचित तिच्याहून अधिक प्रसिद्धी मिळवतील. पण दुसरी लता मंगेशकर मात्र पुन्हा निर्माण होणार नाही.

तो जगन्नियंता लतावर आपल्या कृपेचा अविरत वर्षाव करो आणि त्याचे प्रेमळ आशीर्वाद तिला सदैव लाभोत. तथास्तु.

नौशाद

आशा भोसले

आमचे छोटे बाबा

नेहमीच उघडे असणारे आठवणीचे डोळे मी आज पुन्हा उघडीत आहे. जे मी मनातल्या सात पेटाऱ्यांत जपून ठेवलेले आहे ते आज सर्वांसाठी खुले करीत आहे.

माझ्या आठवणीचे डोळे मी जेव्हा उघडते तेव्हा त्या डोळ्यांना माझे बाबा, माई, लता, (होय. तेव्हा मी दिदीला लताच म्हणत असे) मीना, उषा, बाळ दिसतात. त्याप्रमाणेच एक लांबच लांब गॅलरी असलेले घर, त्या घरासमोर खूप जोरात भांडणाऱ्या बायका, एक हिरवे तळे, अशा खूप खूप गमती दिसतात. आणि मग नजर पुन्हा माझ्या दिदीकडे वळते. एका सकाळी मी डोळे उघडले. तंबोऱ्याच्या चार तारा छेडल्या जात होत्या. मी किलकिले डोळे करुन बघितले. कारण थंडी मी म्हणत होती. आम्ही पाच भावंडे एकमेकांना चिकटून नेहमीच झोपत असू. आणि दादागिरी करुन लतटली नेहमी आम्हाला मध्ये घालून स्वतः मात्र कोपऱ्यातली जागा घेई. कारण ती स्वतःला फार स्वच्छ समजते. आम्ही मात्र सगळी घाणेरडी. आणि वर इतक्या थंडीत झोपू सुद्धा देत नाही. बसली तंबोरा वाजवत. मी आणखी जरा डोळे उघडले. तंबोऱ्याचा एक मोठा भोपळा आणि त्याच्यासमोर ही, 'मिया मूठभर दाढी हातभर' बसली होती. तंबोरा वाजवताना बसतात तशी ती जय बजरंगबली थाटात बसली होती. निमगोरा रंग, गोबरे गोबरे गाल, जाड भिवया, छोटी कपाळपट्टी, जाड भिवयांखाली खूप चमकदार डोळे, आणि सगळ्यांत जर सुंदर काय असेल तर ती नाजुक, पातळ, अरुंद, लालगुलाबी ओठांची जोडी. ती इतकी अरुंद जिवणी की जास्त जोरात 'आ' केला तर दोन्ही कडा फाटून रक्त तर नाही ना येणार असे वाटावे. मला लांबट जिवणी आवडत नसल्यामुळे त्या सुरेख ओठांचा मी नेहमीच हेवा केला आहे. निमुळती हनू, खूपच बारीक अंगकाठी, आणि केस खूप जाड व लांब—लांब म्हणजे किती? ती बसली होती तर तिच्या दोन्ही बाजूंना वेण्यांची दोन वेटोळी पडली होती. मला अजून आठवते, तिला न्हायला घालायचे असले म्हणजे आमची माई व ती, दोघी रडायच्या. केसांत फणी घातली की हिची ओय ओय सुरू. तर काय सांगत होते? हं. ती तंबोऱ्याजवळ बसली होती आणि तंबोऱ्याच्या तारा लावण्यासाठी हात वर करुन खुंटी पिळण्याचे प्रयत्न करीत होती. त्यावेळी ती मला खूप मोठ्या

चकरी भोपळ्याजवळ एक छोटीशी नाजुक खारोटी बसावी तशीच दिसली. आणि मी परत डोक्यावरून दुलई घेऊन झोपले.

पुन्हा धूसर धूसर असे काहीतरी आठवते. असे की सोलापूरला आमच्या कंपनीचा मुक्काम आहे. तिथे ही कधी खेळताना तर कधी मारामारी करताना दिसत आहे. कागदाची विमाने करण्यात तर ती प्रवीण होती. तिची विमाने खूप उंच जायची. आम्ही तिच्याकडे सारखे जाऊन 'हे दे ना करून', 'ते दे ना करून' असे सारखे तिला सतवायचे. मग सोलापूरची एक रात्र आठवते. त्या रात्री ऑडियन्समध्ये मी माईच्या मांडीवर डोके ठेवून झोपायच्या तयारीत आहे. आमचे बाबा गाऊन थकले आहेत. कारण दोन तास ते सारखे गात आहेत. लोक वाहवा करीत आहेत. बाबांना पण विश्रांती पाहिजेच आहे. नाही का? मी मात्र कंटाळून गेले आहे. तितक्यात मी समोर बघते. अरे, ही तर लतटली. ही काय गाणार वाटते? मी सरळ होऊन बघू लागले. फ्रॉक चिटाचा, दोन प्रसिद्ध वेण्या, आणि सरळ येऊन बसली की मांडी घालून स्टेजवर! जरासुद्धा भीती नाही की काही नाही. आणि 'लरा माई सजनी' हा जयजयवंतीचा ख्याल सुरू केला. आता आहे की नाही? तुम्हाला माहीत नाही. ही अशीच त्रासदायक आहे. आम्हाला सारखी म्हणते कशी, सकाळी उठा लौकर आणि सा रे ग म प ध नि सा शुद्ध सुरांत लावा. म्हणजे एक तर लौकर उठा अन दुसरे, गात रहा. मग खेळणार कोण? मोठी आली आहे सांगायला! पण सगळ्या भावंडांत थोरली आहे ना. शिष्ट कुठली!

तेवढ्यात किती जोरात टाळ्या पडल्या. सगळे लोक म्हणत होते, बाप सवाई बेटी होणार बरे का.

परत काही आठवत नाही. आणि मग ही बघा लता आणि मीना. दोघीजणी हळूहळू रसोईघरात चालल्या आहेत. कारण माई झोपली आहे ना! दोघीजणी बारकुड्या. अरे, डब्यावर डबे ठेवून काय काढताहेत या? शी, त्या तर तिखट, मीठ आणि कच्चे तेल काढून कालवून खाताहेत. ही यांची खाण्याची आवड! चांगले जावे, इतके मोठे पातेलेभर दूध पडले आहे, त्याच्यावर साय किती घट्ट जमली आहे. ती पसा भरून खावी. तर—पण बरे झाले. नाहीतर मला काहीच ठेवणार नाहीत या. आणि वर मी साय खाते म्हणून मला चोरटी मांजर म्हणतात. म्हणजे तिखट चोरले तर ती चोरी नाही वाटते! काय न्याय तरी.

पुढे मग काहीतरी उलथापालथ झाली व आम्ही सगळे पुणे मुक्कामी आलो. त्यावेळी 'खजांची' मधल्या गाण्यांची स्पर्धा होती. आमच्या मावशीचे पतिराज श्री. गोडबोले दादा यांनी बाबांची परवानगी न घेताच दिदीचे नाव त्या स्पर्धेत दाखल केले. मग काय विचारता! बाबा असे रागावले की ज्याचे नाव ते. ते दिदीला म्हणाले, "आता माझे नाव तू घालवणार. जा. या स्पर्धेत पहिली होऊन ये. नाहीतर पुन्हा घरी येऊच नकोस." ते एकसारखे असे बोलत होते. त्यावेळी दिदी कितीतरी रडली होती, आता काय होणार म्हणून. पण म्हणतात ना, पुताचे पाय पाळण्यात दिसतात! त्यानंतर एकदम आठवते ती कार्यक्रमाहून परत येणारी दिदी. तिच्याबरोबर बाबा आणि मी गाडीत होतो. बरोबर आणखी कोण होते ते नाही आठवत. दिदी साडीत होती की तिने फ्रॉक घातला होता तेही नाही आठवत. आठवतात फक्त तिच्या छातीवर लावलेले बिल्लेच बिल्ले आणि तिचे खूप चमकणारे डोळे. ते डोळेच सांगत होते की मी पहिलीच येणार. आताच नव्हे, या स्पर्धेपुरतीच नव्हे, तर हमेशा. आयुष्यभर!

आणि यानंतर आठवतो एक अगदी वेगळा प्रसंग. त्या दिवशी आमची माई गावाला गेली होती. आणि दिदी घरात पुरणाचे जेवण करणार होती. गणपती जवळ आले होते. आई घरात नसल्यावर जो उधम चालतो तोच आमच्या घरी चालला होता. तेवढ्यात काय झाले, एक छोटासा उंदीर कुठून आला होता कुणास ठाऊक, तो रसोईत सारखा नाचत होता. दिदीला कसला राग आला होता कोण जाणे. ती जी उठली तो तिने हातातले लाटणे घातले उंदरावर. पण हाय रे!

मेले की ते पिटुकले! आणि मग काय विचारता. पुरणाचे जेवणबिवण राहिले सगळे एकीकडेच. गणपती आले असताना गणपतीचे वाहनच मारले मी म्हणून दिदी रडत बसली किती दिवस.

नंतर ते अशुभ वर्ष आले. सगळीकडे अंधार झाला. कुठलाही आसरा नव्हता. आम्ही अगदी निराधार झालो. छे. चुकले मी. आमचे बाबा वारले होते. पण दुसरे बाबा फक्त बारा वर्षांचे, परकरपोलका नेसून आम्हाला सांभाळायला सज्ज झाले होते. दिदीने सगळा भार आपल्या एवढ्याशा खांद्यावर उचलला होता. आम्ही कोल्हापूरला गेलो. दिदी विनायकांच्या कंपनीत काम करू लागली. काम करताकरता माईच्या मागे तिचा सारखा लकडा चालू असे. "माई, मुलांना शाळेत घाल. त्यांची वये गेली नाहीत अजून. मी त्यांना खूप शिकवणार आहे. माझ्या भावंडांना मी डॉक्टर करणार आहे. इंग्लंडला पाठवणार आहे." त्यावेळी ती कशी कामे करी याची एक आठवण सांगते. 'गजा-भाऊ' चित्रपटातल्या एका गाण्याचे शूटिंग होते. आणि दिदीच्या अंगात एकशे चार ताप होता. माई तिला म्हणाली, "लता, आज तू कामाला जाऊ नकोस." पण दिदी म्हणाली, "नाही, गेलेच पाहिजे." तिला आपल्यावरच्या जबाबदारीची कल्पना होती. तशा अवस्थेत ती कामाला गेली आणि भर तापात ते गाणे तिने केले. गाणे देखील विलक्षण होते. दिदीच्या अंगात परीचे कपडे घातले होते. आणि पंखांना दोऱ्या बांधून बिचारीला टांगून ठेवले होते. तशा अवघडलेल्या स्थितीत तिने शूटिंग केले. अशी ही कामसू मुंगी.

पण दिदी भांडकुदळ सुद्धा तितकीच बरे का. एका साध्या सेफ्टीपिनसाठी माझ्याशी इतकी भांडायची की शेवटी तिची माझी मारामारी ही ठरलेलीच. ती नंबर एकची हट्टी. आणि मी म्हणजे पहिलवान; पठाण याच नावांनी ओळखली जाणारी. मग काय? मारामारी ही हवीच. कधी कधी दुपारच्या वेळी आम्ही बहिणी खेळ खेळायच्या. भातुकलीचा खेळ. त्या खेळासाठी डाळीचे लाडू, चुरमुऱ्याचा भात अशी रसोई आम्ही तयारी करून ठेवायच्या, आणि अशा वेळी दिदी एक नवाच खेळ सुचवायची. ती म्हणायची, "मी जसा काही चोर. तुम्ही घरात सगळे झोपलेले असणार. मग मी हळूच येऊन चोरी करणार. मग मला तुम्ही पकडणार!" झाले. आम्हाला कल्पना पसंत पडायची. दिदी आमच्या घरकुलात येऊन चोरी करून जायची. आणि आम्ही तिला पकडीपर्यंत भातुकलीतल्या साऱ्या जेवणाचा तिने चट्टामट्टा केलेला असायचा. तेव्हा कुठे तिचा डाव आमच्या ध्यानात यायचा. की मग पुन्हा भांडण सुरू. कधी कधी दिदी मीनाताईला नि मला बाहेर गॅलरीत न्यायची "मी भूत आहे. हाऽहाऽहाऽ! आता मी जे सांगेन तेच तुम्हाला केले पाहिजे. नाहीतर मी तुम्हाला खाऊन टाकीन. आऽऊऽ!" आम्ही भिऊन तिची सारी कामे करायच्या. घरात माईने जेवायला बोलावले की आम्ही डोळे पुसत, भीतभीत पानावर येऊन बसावे. एकदा वाटे, दिदी कशी भीती दाखवते ते माईला सांगून टाकावे. पण ही आमच्याकडे टवकारून बघत असायची. डोळे मोठे करून नाही नाही अशा अर्थाची मान हलवायची. परत आम्ही 'आप' करून डोळे पुसत बसायचे. अशी ही खट्याळ दिदी.

माझी मते आणि तिची मते यांत दोन टोकांचे अंतर आहे. मी बॉब करते तर ती दोन वेण्या घालते. मी रुंद गळ्याचे ब्लाऊज घालते तर ती बंद गळ्याचे. ती सारखीच पांढऱ्या रंगाचा पोषाख करते तर मला गुलाबी रंग प्रिय. माझ्या तिच्या राहणीत, विचारात फार फरक आहे. एवढेच काय, मी एकदम फटकळ तर ती सगळे मनात ठेवणारी. ती बारीक सडसडीत, तर मी चांगली गरगरीत. ती नाजुक सॅड गाणी गाते तर मी सगळ्या ढंगांची गाणी गात असते. ती म्हणते, मी कलेसाठी जगते तर मी म्हणते, कला माझ्यासाठी आहे. सगळे म्हणतात, या दोघीजणी दोन डोळ्यांसारख्या आहेत. दोन डोळे शेजारी, भेट नाही संसारी. पण त्यांना हे माहीत नाही की दोन डोळ्यांना प्रकाशाची जाणीव देणाऱ्या नसा एकच आहेत आणि जर एका डोळ्यात काही गेले तर दुसऱ्यात पाणी येते!

ललिता पवार

सदाफुली

माझी आणि लताबाईंची मैत्री फार जुनी आहे. ज्या काही व्यक्तींबद्दल मला नितांत प्रेम, आदर आणि भक्ती वाटते त्यांत लताबाई प्रमुख आहेत. आम्हा दोघींच्याही कार्यबाहुल्यामुळे मनात इच्छा असूनही प्रत्यक्ष सहवास मात्र क्वचित घडतो. तरीही मनाने मी त्यांच्या सन्निध असते. आणि या मानसिक जवळिकीवर शेवटी समाधान मानून घ्यावे लागते. गुलाबाच्या फुलासारखे सुंदर, बाळसेदार, टवटवीत बालक पाहिले की त्याला हृदयाशी कवटाळून धरावेसे वाटते. पण शेवटी त्याच्या गोड गालाला ओझरता स्पर्श करून त्यातच समाधान मानून घ्यावे लागते. तसेच काहीसे आहे हे!

लताबाईंचा जो थोडासा सहवास लाभला आहे त्यातल्या स्मृती मी सतत जतन करून ठेवल्या आहेत.

एकेचाळीस बेचाळीस साली मुंबई येथे सुप्रसिद्ध लेखक कै. राम गणेश गडकरी यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक समारंभ झाला होता. त्या समारंभात लताबाई गायल्या होत्या. माझ्या समजुतीप्रमाणे ते त्यांचे प्रथमच झालेले प्रकट गायन असावे. त्यावेळी त्यांना पहिले पारितोषिक जाहीर करण्याचे भाग्य मला लाभले होते. आणि मी त्यांना कर्णफुले अर्पण केली होती. आपल्या गानमाधुर्याने अगणित लोकांचे कर्ण तृप्त करणाऱ्या कलावतीला कर्णफुले वाहण्याची मला जी स्फूर्ती झाली तीत एक औचित्य सहजगत्या साधले गेले असे मला वाटते. ईश्वरी कृपेनेच ती इच्छा मला झाली असावी. लताबाईंनी त्यानंतरच्या काळात असंख्य पारितोषिके पटकावली असतील. पण एका कलाकार मैत्रिणीने आपलेपणाने अर्पण केलेल्या पहिल्या पारितोषिकाचा त्यांनी आनंदाने व कौतुकाने केलेला तो स्वीकार मी कधीही विसरणार नाही. तो क्षण माझ्या अभिमानाचा एक अमूल्य ठेवा आहे.

आणखी एक संस्मरणीय प्रसंग मी मनात असाच सतत जपून ठेवला आहे. 'अमरपूजा' नावाचा एक चित्रपट मी मागे काढला होता. त्या चित्रपटासाठी आम्ही लताबाईंची गाणी घेतली होती. त्या गाण्यांचा त्यांना साजेसा मोबदला द्यावा म्हणून मी लताबाईंकडे गेले. पण लताबाईंनी

त्यावेळी काय केले असेल ? त्यांनी मोबदल्याच्या रकमेला स्पर्शही केला नाही. त्या हसून इतकेच म्हणाल्या,

"बाई, ते असू द्या आता. मला गरज पडेल तेव्हा मी हे मागून घेईन !"

त्यांचे ते उदात्त बोल ऐकून मला गहिवरून आले. आणि मी नकळत मनोमय हात जोडून देवाला निःशब्द प्रार्थना केली, "देवा, माझ्या या दिलदार मैत्रिणीची सुरसरिता अशीच अखंड तुडुंब वाहो. गरजेच्या रखरखीत कोरडेपणा तिला कधीही न भासो !"

लताबाईंकडे पाहिले म्हणजे दोन गोष्टी प्रामुख्याने मनावर बिंबतात. ठसतात. पहिली गोष्ट म्हणजे त्यांचे ते अत्यंत पाणीदार पण नितांत शांत, गंभीर डोळे ! जगाकडे बघणाऱ्या साक्षी संता-सारखे निर्विकार. कारणपरत्वे त्या नेत्रजलावर भावतरंग उमटत असले तरी त्यांचा मूळचा स्थायीभाव 'शांत' हाच आहे. लताबाईंच्या व्यक्तिमत्वातली मनाला जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचा अभिजात साधेपणा. इतके अफाट वैभव, दिगंत कीर्ती आणि अपूर्व लोकप्रियता लाभूनही लताबाईंचा सुसंस्कृत साधेपणा तसाच निर्मळ राहिला आहे. कितीही पाणी ओतले तरी कमलपत्र कोरडेच राहते त्याप्रमाणे आधुनिक जगात वावरत असूनही फॅशनच्या, शृंगारसाजाच्या व भपक्याच्या मोहापासून त्या नेहमीच अलिप्त राहिल्या आहेत. हा त्यांचा सहज दैवी गुण दुर्मिळ आहे.

लताबाईंना सरकारी पदवी न मिळाल्यामुळे त्यांच्या असंख्य चाहत्यांना हळहळ वाटते. पण माझ्या मते, यातच लताबाईंचे असामान्यत्व नाही काय ? जिथे प्रत्यक्ष जनता जनार्दनाने त्यांना भक्तिभावाने मस्तकी धारण केले आहे, त्या अजोड सन्मानापुढे सरकारी पदवीच्या व्यावहारिक मोठेपणाचे काय मोल ?

आमची ही गायनाची सदाफुली ईश्वराने सदैव प्रफुल्लित ठेवावी आणि त्या फुलांचा गोड परिमळ आम्हाला अनंत काळ मिळावा.



ग. दि. माडगूळकर

अंकुराची लवलव

लता मंगेशकर हे नाव आता केवळ गोमंतकाच्या, महाराष्ट्राच्या वा भारताच्या मालकीचे राहिलेले नाही. साऱ्या जगातल्या संगीतशौकिनांना या नावाविषयी आदर उत्पन्न झाला आहे. आपुलकी निर्माण झाली आहे. संगीत ही विश्वभाषा आहे. साहित्याला देखील भाषांतरावाचून देशादेशांच्या सीमा उलंघता येत नाहीत. लताच्या स्वरांना कुठेच अटकाव नाही. वायुलहरी जाऊ शकतात तेथे तेथे लताचा साद पोचला आहे. तिच्या सादाला एक बाणासारखे टोक आहे. आणि ते टोक नेहमी जणू मधाने माखलेले असते. कित्येक अंतःकरणांना या बाणाच्या मधुर जखमा झाल्या असतील. त्या जखमी रसिकांचे देश, भाषा आणि स्वभाव लतेला माहीत असण्याचा सुतराम संभव नाही.

आपल्या चित्रपटीय जीवनाचा रजतमहोत्सव साजरा होतो आहे याची जाण लतेला मुळीच नसेल. ती गात राहिली आहे. कोकिळा कशाला गणती करील, किती वसंत आले आणि किती गेले.

लता आता खूप मोठी झाली आहे. तिच्या कीर्तिविस्ताराने साऱ्या अवकाशाचा मांडव व्यापून टाकला आहे. पाहणाऱ्यांचे डोळे आश्चर्याने थक्क व्हावेत असे अलौकिक वैभव तिने मिळवले आहे. मिळवते आहे. तिच्या जीवनाच्या शताब्दीअखेर ती तसेच मिळवीत राहील. लतेनंतरही लतेचे स्वरवैभव दरवळत राहील.

माझे भाग्य असे की मी या लतेची लवलव तिच्या अंकुरावस्थेत पाहिली आहे. तिच्या स्वरांचा अभावित गोडवा नकळत माझ्या कानी पडला आहे. तिच्यासाठी गीत लिहिण्याची संधी मला फार पूर्वी मिळाली आहे. सुमारे दोन तपांपूर्वी.

तो काळ मला अजून जसाच्या तसा आठवतो आहे. बहुधा एकोणीसशे बेचाळीस त्रेचाळीस साल असावे. मोठ्या प्रयासाने मला मा. विनायकांच्या 'प्रफुल्ल'मध्ये नोकरी मिळाली होती. त्या नोकरीला नाव नव्हते. दिग्दर्शकाचा सहकारी, प्रकाशन विभागातील कर्मचारी, तत्कालीन कथा-लेखकांचा लेखनिक अशा अनेक भूमिका माझ्याकडे येत होत्या. मी त्या वठवीत होतो. त्याच वेळी

किंवा थोडे आधी, लता 'प्रफुल्ल' मध्ये आली असावी. 'मास्टर दीनानाथांची मुलगी' हे लतेचे ओळखपत्र होते. तेवढीच तिची संपत्ती होती.

दीनानाथांचा उत्कर्षकाल मी पाहिलेला नव्हता. भारदस्त आवाजातली त्यांची गायकी मला ज्ञात होती ती ग्रामोफोनच्या तबकड्यांमुळे. तसे मी त्यांना पाहिले होते. पण ते त्यांच्या उतरत्या काळातच. छत्तीस साली किर्लोस्करवाडीच्या समाजमंदिरात दीनानाथांची नाटके झाली तेव्हा मी कुंडलच्या हायस्कुलात शिकत होतो. 'ब्रह्मकुमारी' नाटकातल्या गौतमाच्या वेषात तेव्हा त्यांना मी पाहिले होते. दाढी आणि मिशा नसलेला गौतमऋषी, खरे सांगायचे तर, मला आवडलेला नव्हता. गाणे समजण्याची पात्रताच तेव्हा माझ्यात नव्हती. नाही म्हणायला दीनानाथ या नटाचे व्यक्तिमत्त्व मात्र माझ्या मनावर एक जबरदस्त ठसा उमटवून गेले होते. तो माणूस सुंदर होता. पुरुषी सौंदर्याचा जणू आदर्श होता.

त्या दीनानाथांची ही मुलगी मात्र किडकिडीत, सावळी, खुरटलेली. फक्त डोळे तेवढे तेजाळ. अप्पा जाधवाला की कुणाला, मी म्हणालो देखील, "अरे, ही आपल्या बापाच्या आक्रसलेल्या सावलीसारखी दिसते." लता दिसायला क्षीण आणि किडकिडीत होती पण त्या वयातही तिला समज विलक्षण होता. वाचनाचेही वेड तिने लावून घेतलेले होते. 'प्रफुल्ल' संस्थेत साहित्याविषयी चर्चा करणारा एक छोटासा कंपू होता. अप्पा जाधव त्याचा म्होरक्या. आणखी पाचदहा माणसे होती. बघता बघता लता या कंपूत सामील झाली. मी आणि दिनकर पाटील त्यावेळी 'धडपड्या मुलां'त जमा होतो. चित्रपटकथाकार म्हणून फडके-अत्रे-खांडेकरांचे ध्वज मिरवत होते. त्यांच्या कथा म्हणजे विनायकरावांना 'ब्रह्मलिखिता'सारख्या वाटायच्या. विनायकराव भोळे होते. त्यांच्या श्रद्धा पुष्कळदा आंधळ्या असत.

आम्ही जग मुळीच बघितले नव्हते. पण पाहण्याची पात्रता आल्याचा भ्रम आम्हाला झाला होता. मोठ्या लेखकांच्या कथांतील छोटे दोष काढून त्यावर टीका-टिप्पणी करीत बसणे हा एक आमचा उद्योग होता. लताही मोठ्या हौसेने आमच्या त्या मंडळात सामील व्हायची. विनायकरावांच्या कुटुंबियांपैकीच एक अशी त्यावेळी लतेची अवस्था होती. तिच्यातला गुण विनायकरावांनी हेरला होता. एका अर्थाने अनाथ झालेल्या त्या चिमुरडीला विनायकरावांनीं आसरा दिला होता, एवढेच नव्हे तर तिच्या साऱ्या संसाराचा भारच त्या भावुक कलाकाराने आपल्या खांद्यावर घेतला होता.

लतेचे कुटुंब केवढे आहे हे कळायला मला फारसा अवधी लागला नाही. योगायोगाने ती माझ्या शेजारीच राहायला आली. कोल्हापूर येथील मंगळवार पेठेत फिरंगाळे तलावाच्या काठावर बाबूराव पेंटरांची बंगली होती. त्या बंगलीला लागूनच परशुराम मिस्त्रींनी दाटीवाटीच्या जागेत आपले स्वतःचे घरकुल उभे केले होते. परशुराम मिस्त्रींच्या मुली त्यावेळी लहान लहान होत्या. त्या चित्रपटांतून भूमिका करीत. त्यातल्याच एका बेबी विमल नावाच्या मुलीच्या ओळखीने मी त्या घरकुलात राहायला आलो होतो. पूर्वी माझ्याकडे एकच एक खोली होती. आता इमारतीतल्या दोन खोल्या माझ्याकडे आल्या होत्या. मी नुकताच 'पिवळा' झालो होतो. पत्नी आलेली होती.

आम्ही सैपाकघर म्हणून वापरीत होतो, त्या खोलीच्या पलिकडे एक मोठी गराजवजा जागा होती. या दोन्ही जागांवर तीन खोल्यांची एक माडी होती. त्या जागेतच मंगेशकर कुटुंब राहायला आले. लता माझी शेजारीण झाली.

एव्हापर्यंत 'प्रफुल्ल'ने 'गजाभाऊ' नावाचा चित्रपट हाती घेतला होता. लतेला त्या चित्रपटात भूमिका मिळाली होती. अशीच भूमिका. एका आईवेगळ्या अनाथ मुलीची. मीही त्या चित्रपटात काम करणार होतो. खलपुरुषाचे. लताची माझी चांगलीच ओळख झाली होती. हळूहळू तिची लहान धाकटी भावंडे माझ्या परिचयाची झाली. झगा घालून मिरवणारी आशा, अंधुकल्या डोळ्यांची

मीना, आजारी दिसणारी उषा आणि पायाने अधू असलेला हृदयनाथ. लतेच्या मातुःश्रींचा न् माझा कधी नमस्कार चमत्कार झाला असेल इतकेच. त्या दुःखी होत्या. त्या फारशा बोलत नसत. शेजाऱ्यापाजाऱ्यांतही मिसळत नसत.

माझ्या बैठकीच्या खोलीतून लतेचे घर दिसे. या घरातला कर्ता पुरुष निघून गेला आहे हे पाहताक्षणी जाणवावे असेच त्या घराचे रूप असे. एक मात्र नवल होते. वरवर पाहणाऱ्याला ते दृश्य अतिरंजित वाटण्याचाही संभव होता.

लतेच्या बिऱ्हाडातील मधल्या खोलीत एक मोठा चौरंग भिंतीला लागून ठेवलेला होता. त्यावर कै. दीनानाथांची तसबीर आणि त्या तसबिरीपुढे त्यांचे जोडे, पादुका. कोवळ्या वयातली लता त्या पादुकांची पूजा करी आणि हाती तंबोरा घेऊन त्यांच्यापुढे बसे. गाण्याचा रियाज करी. वडिलांचे आवडते गीत पुन्हापुन्हा आळवून म्हणे, 'भाली चंद्र असे धरिला.' मा. दीनानाथ तिचे वडील होते. तसेच गुरूही होते. त्या गुरूदेवतेच्या पादुका याच जणू तिला आता मार्गदर्शिका होत्या. वडिलांच्या पादुकांसमोर बसून लतेने आळविलेली सुरावट ऐकतांना खरोखरीच आम्हा करंट्याना कधी कळले नाही की ही भाववेडी गायिका पुढच्या काळात साऱ्या भारताला आपल्या गाण्याने वेड लावणार आहे.

मधूनमधून लता माझ्या बिऱ्हाडी येई. एखाद्या छोट्या बहिणीने वागावे इतक्या मोकळेपणाने ती माझ्याशी वागे. गाणे तिला देवानेच आपल्या सहस्र हातांनी दिलेले होते. भाषणातील चातुर्य आणि वागण्यातली हुषारी त्या पोरीने कुठून आत्मसात केली होती देव जाणे.

'गजाभाऊ'च्या लिखाणाच्या वेळची गोष्ट. चित्रपटाची गोष्ट चं. वि. बावडेकर आणि भा. वि. नाडकर्णी या दोघा साहित्यिकांनी सिद्ध केली होती. तिच्या पटकथालेखनासाठी संस्थेने सुविख्यात नाटककार स. अ. शुक्ल यांना पाचारण केलेले होते. माझी नोकरी शुक्लांकडे रुजू करविण्यात आली होती. शुक्ल संवाद सांगत आणि मी ते लिहून घेई. हे काम हल्लीच्या शालिनी स्टूडिओतील चित्रणगृहाच्या माडीवरील एका खोलीत चाले.

एका सकाळी मी आणि शुक्ल बोलत बोलत जिन्याकडून खोलीत आलो. खोली नेहमी-सारखी उघडून ठेवलेली होती. शुक्लांसाठी बसायची गादीतक्क्यांची बैठक तयार होती. माझे बैठे डेस्क समोर मांडलेले होते. त्या खोलीच्या भिंती अगदी ओबडधोबड होत्या. त्यांवर चित्रांच्या फ्रेम्स वगैरे टांगण्याची काही सोय नव्हती. खोलीत एकही चित्र नव्हते. आज मात्र भिंतीवर एक छोटे चित्र लटकवलेले दिसले. बाजारात विकत मिळणारे ते एक रंगीत कार्ड होते.

एका वृक्षाखाली बसून भगवान वेदव्यास, 'जय' नांवाचा इतिहास सांगत आहेत आणि महाकाय अन् चतुर्भुज श्रीगणेश तो लिहून घेत आहे. माझ्या स्थूलपणाची चेष्टा तर त्या चित्राला अभिप्रेत होतीच पण 'चित्रकथालेखन ते काय आणि त्याचे हे केवढे अवडंबर' असा सूरही त्याला काढायचा होता. आम्ही ते चित्र पाहिले. शुक्लही मनमोकळेपणाने हसले.

ही उठाठेव केली कुणी, याची चौकशी करता करता शेवटी पत्ता लागला की, हा चहाटळपणा 'लते'चा.

या चेष्टेतून 'तक्रार' मुळीच उत्पन्न झाली नाही. लतेच्या चतुरपणाचे कौतुकच झाले. इतक्या लहान वयात तिच्या ठायी असली प्रगल्भ विनोदबुद्धी होती.

'गजाभाऊ' आणि 'चिमुकला संसार' या दोन्ही चित्रपटांत लताने गाइलेली गाणी होती. ती वाजली पण निनादली नाहीत. गंगेचे दर्शन झाल्याखेरीज गंगोत्रीची धार ओळखतो कोण ? लता या नव्या गायिकेला संधी मिळाली हे मात्र खरे. मला तीही मिळाली नाही. या दोन्ही चित्रपटांत एखादे गीत तरी आपल्याला लिहायला मिळावे अशी माझी इच्छा होती. पण ते झाले नाही. जमले नाही.

ग. दि. माडगूळकर

चव्वेचाळीस साली बंगालमध्ये मोठा दुष्काळ पडला. आणि मा. विनायक यांनी बंगाल फंडाच्या मदतीसाठी कार्यक्रम करायचे ठरविले. वसंतराव जोगळेकर आणि दत्ता डावजेकर कार्यक्रमांची जमवा-जमव करू लागले. मा. विनायकरावांनी मला सांगितले, "बंगालच्या दुष्काळावर गाणे लिहा" आणि मी लिहिले. विष्णुपंत जोगांनी चालीचा एक मुखडा दिला : " देस बंगाल न जा "

मी रचना केली. कवित्व थोडेच. रचनाच अधिक—

"ऐका ऐका ही घोर विलापिका
देश बंगाल भुका"

हे गाणे डावजेकरांनी बसवले. जोगळेकरांनी त्याला अभिनय नृत्य इत्यादी कलाप्रकारांची जोड दिली. दुष्काळ फंडासाठी माझे शब्द आणि लतेचे स्वर एकत्र आले. बेळगाव आणि मुंबई येथील नाट्यमहोत्सवांत या गाण्याचे कार्यक्रम झाले. कार्यक्रमाच्या शेवटी लता, रेणुका वगैरे 'प्रफुल्ल'मधल्या मुली प्रेक्षकांत जात आणि फुले विकून पैसे गोळा करीत. ते पैसे बंगाल फंडाकडे दिले जात.

पुढे 'प्रफुल्ल' मुंबईला गेली. लतानेही आमचा शेजार सोडला. 'प्रफुल्ल'ने घेतलेल्या जागेत (नाना शंकरशेठ मंदिर) पुढे अनेक वर्षे लता राहत होती.

निकदवरी लेनमध्ये 'प्रफुल्ल' कंपनीचे बिऱ्हाड असताना मी परत एकदा 'प्रफुल्ल'मध्ये आलो होतो. लता, दिनकर, अप्पा, मी यांच्या गाठी पुन्हा पडल्या. पण जुना मजा पुन्हा आला नाही. आता प्रत्येकजण प्रवाहात पडला होता. धारेला लागला होता...

एकोणीसशे सत्तेचाळीस साली देश स्वतंत्र झाला आणि मा. विनायक हे जगच सोडून गेले. सारा जमाव विस्कटला. लता मुंबईत स्थायिक झाली. तिच्या अंगच्या गुणांनी यशाची एक एक पायरी ती भराभर चढू लागली. सारी हिंदी चित्रसृष्टी तिच्या मुखाने गाऊ लागली. तमिळसारख्या परभाषिक व्यवसायालाही तिने आत्मसात करून टाकले. एका लतामुळे साऱ्या मंगेशकर कुटुंबाचे भाग्य उजळले. निराधार असलेले ते कुटुंब अनेकांना आधार देण्यासाठी समर्थ झाले. शक्तिशाली झाले. साऱ्या देशात विख्यात झाले. चित्रपटांव्यतिरिक्तही पुष्कळ गाणी लता गायली. कै. भा. रा. तांबे यांच्या कविता तिने आपल्या गानमोहिनीने आणखी उज्ज्वल केल्या. पी. सावळाराम या माझ्या मित्राच्या रचनाही लतेच्या आवाजामुळे लोकप्रियतेचा फड जिंकून गेल्या.

माझी गीते आणि लताचा साद यांची गाठ मात्र नंतरच्या काळात फार कमी वेळा पडली. हे असे का झाले याला कारण काही नाही. दोघांची भ्रमणवर्तुळे वेगळी होती. लताने उमाप कीर्ती कमवली. धनदौलत मिळवली. तिने वाळकेश्वरला जागा घेतली. पेडर रोडला फ्लॅट घेतला.

तिच्या घरी जाण्याचा योग मला पुन्हा कधी आला नाही. तिचे गाणे आणि कीर्ती मी तृप्त मनाने ऐकत राहिलो. तिचा स्वर कानी आला की मला ते मेस्त्रींचे घर आठवते. त्या पादुका आठवतात. ते गीत आठवते, 'भाली चंद्र असे धरिला'.

एखादे तप सहज उलटून गेले. अधिकच. पुणे आकाशवाणीसाठी मी आणि सुधीर फडके 'गीतरामायण' सादर करीत होतो. मी सीतात्यागानंतरचे, सीतेने लक्ष्मणाला उद्देशून गायलेले गीत लिहिले—

मज सांग लक्ष्मणा जाउ कुठे ?
पतिचरण फिरुन मी पाहु कुठे ?

"कविमहाराज—" फडके म्हणाले.

"जी?" मी बोललो.

"या गाण्याला गायिका कोण पाहिजे?"

"आपण सांगा." लडात आलो की आम्ही एकमेकांना असे अतिसन्मानाने बोलत असू.

"दिदी. लता चाहिए लता." फडक्यांना जणू तिचा स्वर दिसत होता. लक्ष्मणाच्या रथातून खाली उतरून निश्चयी पण आर्त स्वराने त्याला ऐकवणारी सीता त्यांच्या डोळ्यासमोर साकारली होती,

"कठिन है." मी म्हणालो.

"का?" फडक्यांनी विचारले.

"तिचा आपला योग नाही. पेशव्यांच्या दरबारात पंतांच्या कवितेला मज्जाव होता. तसा दिदीच्या साम्राज्यात माडगूळकरच्या गीतांना—"

"कोण म्हणतं?"

"म्हणत कुणीच नाही. आतापर्यंतचा इतिहास."

फडके झटक्याने उठले. लताबाईकडे गेले. कसलेही आढेवेढे न घेता लताबाई आल्या. त्यांनी ते गीत गायले. गीतरामायणाच्या मंदिरावर सोनेरी कळस चढला.

आकाशवाणी, जाहीर कार्यक्रम या गोष्टींत भाग घेण्याइतका वेळ आज लतेकडे नाही. तरी देखील ती आली. का? कशासाठी आली? फडक्यांच्या आग्रहामुळे? माझा जुना परिचय ध्यानी घेऊन? नाही. मग? माझे निदान कदाचित चुकीचेही असेल. पण मला निश्चितपणे वाटते की, सीतेसारख्या अलौकिक स्त्रीच्या जीवनांतील कारुण्याचा तिला मोह पडला असावा. लतेच्या स्वरांत अलौकिक गोडवा आहे. कुठल्याही रसाचे गाणे तिने गायले तरी ती त्या रसाचा पूर्ण परिपोष साधल्यावाचून राहत नाही. तिने गायलेले प्रत्येक गाणे श्रवणीय होते. कुणाही लतेवरच्या साऱ्या कळ्यांची फुले होत नाहीत. या लतेच्या कंठातला प्रत्येक स्वर श्रोत्यांना कानांच्या ओंजळी करून झेलावासा वाटतो. तिचा स्वर म्हणजे चमत्कार आहे. कारुण्याची भावना गाताना तर हा चमत्कार 'परतत्त्वा' पर्यंत झेपावल्यासारखा वाटतो. आर्ततेचा आविष्कार करणारी गीते लतानेच म्हणावीत. तिच्या स्वराला कारुण्याची बारिक केसाएवढी किनार आहे. कारुण्यरसात तिची स्वरकौमुदी पूर्णिमेला पोचते—चांदण्यात गूढ सावल्या मंदपणे आंदोळू लागतात.

लतेच्या अत्यंत यशस्वी आयुष्यात कुठेतरी कारुण्याची छटा आहे. ती शोधल्याने सापडणार नाही. साऱ्या मानवी आयुष्यालाच तो शाप आहे. साऱ्या मनुष्यमात्रांनाच ते वरदान आहे. अलौकिकातले लौकिक तेच आहे. लौकिकात 'अलौकिक' तेच आहे.

माझी लतेची गाठ फार क्वचित् पडते. पण मला ऐकून ठाऊक आहे की, ती 'ज्ञानेश्वरी' वाचते, तिची पारायणे करते. अध्यात्मविषयाचा तिला छंद लागला आहे. आता नाही. यश सुरू झाले तेव्हापासूनच...

मला वाटते, नदीचा प्रवाह योग्य दिशेने चालला आहे.

ऐहिक यश तिने खूप कमावले. थोड्या वयात कमावले. वयाच्या मर्यादा सामान्यांना असतात. ज्ञानेश्वरांच्या, बालकवींच्या महाराष्ट्रातच लता लहान वयात मोठी झाली आहे.

भारत सरकारने तिला यापूर्वीच सन्मानपदक द्यायला हवे होते. लतेला पदकाची आवश्यकता नाही. सरकारला स्वतःचे कर्तव्य उमगायला हवे होते. ते उमगेल तेव्हा उमगो. आप्तस्वकीय, चाहते संतोषाने म्हणतात: "लतेला चित्रपटव्यवसायात येऊन पंचवीस वर्षे झाली."

लता चित्रपटव्यवसायात कधीच नव्हती. तिचे साम्राज्य वेगळे आहे. त्या साम्राज्याची ती राणी आहे. पंचवीस वर्षे त्या साम्राज्याशी संबंध आला हे चित्रपटसृष्टीचे भाग्य. लताचे साम्राज्य चिरंतन आहे.

ग. दि. माडगूळकर

अगदी अलिकडे केव्हातरी लतेची आणि माझी गाठ पडली. मी म्हणालो,

"लताबाई—" आणि थांबलो.

"का?" जीभ गालात खेळवीत, नेहमीच्या लकबीने लताने विचारले.


"तुला 'लताबाई' म्हणणे साधत नाही."

"म्हणताच कशाला? तुम्ही नुसतंच 'लता' म्हणायचं."

"दिदी दिदी" करीत लताचा शब्द झेलणारे शेकडो निर्माते आज लतेच्या दाराशी रांगा लावून उभे आहेत. माझ्यासारख्या तिच्या जुन्या परिचितांना मात्र ती अजून 'लता'च राहिली आहे. तिला ज्ञानेश्वरीची पारायणे करावीशी वाटतात. या वाटण्यामागे आणखी काही मोठें भवितव्य उभे असेल. त्याचा प्रकाश आणखी देदीप्यमान असेल. लतेच्या स्वरांतील मूल्यवान कारुण्य त्या प्रकाशाकडेच ओढ घेत असेल. कुणी सांगावे, कसे सांगावे. तुकारामाने 'मुक्ती' मागितली नव्हती. मिरेने तरी ती मागितली असेल कशावरून? आपण माणसे 'आहे' त्याच्या पलिकडचे काही देखील जाणू शकत नाही.

परवा बातमी आली होती की लताबाईना अन्नातून विषबाधा झाली. त्या अत्यवस्थ आहेत. कोट्यवधी मनांत चर्रर्र झाले. तो विषप्याला तिच्या पचनी पडला. तो प्रसंग टळला. तिचा स्वर जसा बुलंद तशीच तिची शरीरप्रकृतीही सुदृढ राहावी. वयाच्या वडीलकीने मी एवढेच म्हणेन,

"शतायुषी हो. यशस्वी हो. आणि चिरंजीव हो!"



सुलोचना

माझी छोटी मैत्रीण

एकोणीसशे त्रेचाळीस साली खडकलाट या कोल्हापूर-जवळच्या एका लहानशा खेड्यातून मी कोल्हापूरला आले आणि मास्टर विनायक यांच्या 'प्रफुल्ल' कंपनीत दाखल झाले. खेड्यातून प्रथमच मुंबईला येणाऱ्या माणसाची जी अवस्था होते ती कोल्हापूरला आल्यावर माझी झाली. त्यातून मी तर सिनेमा कंपनीत आले होते. म्हणजे सगळे जगच तिथे अगदी निराळे होते.

सकाळी अकरा वाजल्यापासून तो संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मला स्टूडिओत राहावे लागे. पहिल्या दिवशी मी स्टूडिओत गेले आणि सगळेजण माझ्याकडे अशा दृष्टीने पाहू लागले की ही खेडवळ मुलगी कुठली आली? त्यांचे सर्वांचे ते तसे पाहणे बघून मी तर अगदी बावरून नि गांगरून गेले. पण तिथे दहा अकरा वर्षांची परकरपोलके घातलेली आणि खूप लांबसडक केस असलेली एक चुणचुणीत मुलगी होती. तीच फक्त माझ्याकडे बघून प्रेमाने हसली. कदाचित माझी ती अवस्था बघून तिला माझ्याबद्दल सहानुभूति वाटली असेल. काहीशा बावरलेल्या मनःस्थितीतच मी घरी परतले आणि परत सिनेमा कंपनीत जाणार नाही म्हणून रडायला सुरुवात केली. परंतु घरच्या लोकांनी माझी कशीबशी समजूत घातली, आणि दुसऱ्या दिवसापासून घाबरलेल्या मनानेच मी पूर्ववत कंपनीत जाऊ लागले.

रोज जात असे मी. पण माझ्याशी कुणी बोलत नसे. मी होऊन कुणाशी बोलायला गेले तर सगळे मला हसायचे. कारण मला मराठी चांगले बोलता येत नसे. त्यावेळी 'प्रफुल्ल' कंपनीमध्ये दोन तीन मोठ्या अभिनेत्री होत्या. त्या माझ्याशी बोलायच्या तर नाहीतच पण माझ्याकडे नुसत्या बघायच्या सुद्धा नाहीत. अशा त्या वातावरणात थोडासा मला आधार जर कुणाचा असेल तर तो त्या लहानग्या मुलीचाच. मला कंपनीतले रीतिरिवाज काहीच माहीत नव्हते. त्यामुळे एक दिवस माझ्यावर अपमानित होण्याचा प्रसंग आला. त्या वेळीही मला दिलासा दिला तो या छोट्या मैत्रिणीनेच. त्याचे असे झाले. त्या दिवशी त्या मुलीला मी कंपनीत सगळीकडे शोधीत होते. परंतु ती मला कुठेच दिसेना. म्हणून मी तिला शोधीत शोधीत एका अभिनेत्रीच्या खोलीत गेले. आणि त्या मुलीची वाट

बघत तिथेच बसून राहिले. तेवढ्यात ती अभिनेत्री तिथे आली. मला तिथे बसलेली पाहून तिच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरले. आणि ती आली तशीच बाहेर निघून गेली. काय झाले त्याची मला काहीच कल्पना नव्हती. थोड्याच वेळात मला कंपनीच्या मॅनेजरकडून बोलावणे आले. मी त्यांना भेटायला गेले तेव्हा काहीशा रागातच ते मला म्हणाले, "तुम्ही ज्या खोलीत बसला होता ती खोली त्या अभिनेत्रीची आहे. यापुढे तिथे तुम्ही बसत जाऊ नका."

मॅनेजरांचे शब्द ऐकून मला खूपच वाईट वाटले. आणि मी दुसरीकडे जाऊन रडत बसले. एवढ्यात ती माझी छोटी मैत्रीण मला शोधीत तिथे आली आणि मोठ्या आस्थेने तिने माझी विचारपूस केली. तिची ती आपुलकी पाहून तर मला जास्तच रडायला येऊ लागले. माझे रडे ओसरल्यावर झालेला सर्व प्रकार मी तिला सांगितला. माझ्या मैत्रिणीला ते ऐकून खूप राग आला आणि ओढीतच मला तिने त्या अभिनेत्रीच्या खोलीत नेले. मी तिला सारखी सांगत होते, "मला नेऊ नकोस. त्या बाई रागावतील." पण तिने ते मुळीच ऐकले नाही. ती मला म्हणाली, "मी आहे तुझ्या बरोबर. तू घाबरू नकोस. तू तिथे बसलीस तर ती अभिनेत्री काय करते तेच मला बघायचे आहे." असे बोलून तिने मला धीर दिला. आणि तिच्याबरोबर मी खोलीत आलेली पाहून त्या अभिनेत्रीलाही काही बोलता येईना. त्या दिवसापासून त्या माझ्या मैत्रिणीबरोबर मीही त्याच खोलीत बसू लागले.

त्यानंतर त्या छोट्या मैत्रिणीच्या सल्ल्यानेच मी कंपनीत वावरू लागले. ती मला नेहमी म्हणायची, "मला सिनेमात काम करायला मुळीच आवडत नाही. मला रेडिओस्टार व्हायचे आहे." रेडिओस्टार म्हणजे काय हे त्यावेळी मला मुळीच कळायचे नाही. पण मी आपली तिच्या म्हणण्याला मान डोलावून होकार द्यायची. प्रफुल्ल कंपनीत अगदी मालकापासून तो गड्यापर्यंत सर्वजण या चुणचुणीत मुलीवर प्रेम करायचे. आणि तिचे लाडही पण खूप व्हायचे. तिनेही आपल्या गोड अन खेळकर स्वभावाने सर्वांना अगदी आपलेसे करून घेतले होते. ही माझी छोटी मैत्रीण कोण होती माहीत आहे का? ही माझी छोटी मैत्रीण म्हणजेच आजची जगप्रसिद्ध स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर होय.

प्रफुल्ल कंपनीत मी फक्त सहासात महिनेच होते. पण त्या अवधीत लताबाईंची आणि माझी खूप मैत्री जमली होती. कंपनीतून संध्याकाळी घरी आल्यावर त्या सायकलीवर बसून माझ्याकडे यायच्या. आणि मग आम्ही दोघी मिळून त्यांच्या घरी जात असू. घरी जाताच लताबाईंच्या मातुश्री, माई, लताबाईंच्या बरोबर मलाही खायला द्यायच्या. मी खात नाही म्हटले तर आईच्या मायेने त्या माझ्यावर रागवायच्या आणि वाढलेले सारे आग्रह करून मला खायला लावायच्या. लताबाईइतकेच त्या माझ्यावरही प्रेम करायच्या. आणि तितकेच अजूनही करतात. लताबाईंची बाकीची भावंडे फार लहान होती. मला तर आठवते की त्यांच्या घरी गेले म्हणजे पहिले काम आशाबाईंची वेणी घालणे हे असायचे! माईंना विडा खायला आवडे. माझ्या गावाहून विड्याची पाने आली की मी ती माईंना नेऊन देत असे. माई मोठ्या प्रेमाने ती पाने खायच्या आणि मी ती आणून दिली आहेत असे बाहेरच्या माणसांना मुद्दाम सांगून माझे कौतुक करायच्या.

पुढे काही दिवसांनी प्रफुल्ल कंपनी मुंबईला गेली. मला मुंबईला येण्याविषयी लताबाईंनी खूपच सांगितले. पण मी जाऊ शकले नाही. पुढे मी चित्रपटसृष्टीतले माझे गुरू बाबा-भालजी पेंढारकर-यांच्या कंपनीत दाखल झाले. अशीच काही वर्षे गेली. अभिनेत्री म्हणून थोडीफार प्रसिद्धीही मला मिळाली होती. आणि एके दिवशी प्रथमच एक रेडिओ मी विकत आणला. मोठ्या उत्सुकतेने मी रेडिओ सुरू केला तो त्यांतून सर्व दुःखांचा विसर पाडणारा असा एक अलौकिक स्वर्गीय स्वर माझ्या कानी पडला. मी अगदी थरारून गेले. पहिले गाणे संपून दुसरे कधी सुरू झाले ते कळले सुद्धा नाही. आणि मग त्याच स्वरात एकापाठोपाठ एक अशी बरीच गाणी मी

ऐकली. ती गाणी ऐकताना मन भरून येत होते. सर्वस्वाचा विसर पडत होता. अशी त्या स्वराने माझ्यावर विलक्षण मोहिनी घातली. तो आवाज कुणाचा आहे हे जाणून घेण्याची अतोनात उत्सुकता वाटू लागली. शेवटी त्या गायिकेचे नाव जेव्हा मी ऐकले तेव्हा माझ्या कानांवर माझा विश्वासच बसेना. मी आश्चर्याने अगदी थक्क होऊन गेले. कारण तो अलौकिक मधुर आवाज माझ्या त्या छोट्या मैत्रिणीचा म्हणजे लताबाईंचाच होता. लताबाई कोल्हापूरहून गेल्यापासून तो त्यांचे ते गाणे मी ऐकेपर्यंत मधल्या काळात मला त्यांची काहीच हकिकत कळली नव्हती. पण त्या दिवशी अकस्मात त्यांचा आवाज आणि त्यांचे नाव ऐकून मला जो विलक्षण आनंद झाला त्याचे वर्णन शब्दात करणे मला तर अशक्य आहे. त्यानंतर लताबाईंचे गाणे ऐकल्याशिवाय माझा एकही दिवस जाईनासा झाला.


एकोणीसशे चव्वेचाळीस सालानंतर मधली जवळजवळ आठदहा वर्षे मी त्यांना पाहिलेही नव्हते. आणि पुन्हा कधी काळी लताबाईंची भेट होईल ही आशाही नव्हती. फक्त त्यांची गाणी ऐकण्यावरच मला समाधान मानावे लागत होते. कधी कधी मनात यायचे, कधी लताबाई भेटल्याच तर त्या ओळख देतील का? की बालपणातली भाबडी मैत्री त्या विसरून गेल्या असतील?

आणखीही काही वर्षे गेली. आणि मी चित्रपटांत काम करण्यासाठी पुण्याला आले. मला आता नीटसे आठवत नाही, पण 'बाळा जो जो रे' किंवा 'स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी' यांपैकी कोणत्या तरी एका चित्रपटाचा रौप्यमहोत्सव साजरा झाला होता आणि त्या निमित्त दत्ता धर्माधिकारी यांनी एक भोजनसमारंभ आयोजित केला होता. त्या समारंभाला मी गेले होते. बरीच मंडळी तिथे जमली होती. आणि एवढ्यातच लताबाई आपली धाकटी बहीण मीना हिच्यासह आल्या. सगळी मंडळी त्यांच्याभोवती गोळा झाली. मी मात्र त्यांचे ते कौतुक पाहत एका बाजूला बसले होते आणि स्वतःशीच विचार करीत होते, लताबाईंना जाऊन भेटावे की नाही? कारण आता त्या खूप मोठ्या पार्श्वगायिका झाल्या होत्या. त्या आपल्याला ओळखतील का? आपल्याशी पहिल्याइतक्या आपुलकीने बोलतील का? अशा अनेक प्रश्नांनी माझा गोंधळ उडविला होता. आणि एवढ्यात लताबाईंचे माझ्याकडे लक्ष गेले. त्याबरोबर पूर्वीइतक्याच मनमोकळेपणाने माझ्याकडे बघून त्या हसल्या. मग मात्र मला राहवले नाही. मी लगेच उठून त्यांच्यापाशी गेले. त्या माझ्याशी खूपच आपुलकीने बोलल्या. माझी व माझ्या आईची त्यांनी आस्थेवाइकपणे चौकशी केली. एवढेच नव्हे तर मधल्या काळातले माझे सर्व मराठी चित्रपट आपण पाहिले असल्याचे त्यांनी मला सांगितले. तसेच 'मीठभाकर' चित्रपटातले माझे काम त्यांना व माईंना खूप आवडल्याचेही त्या आवर्जून बोलल्या. मला किती आनंद झाला असेल याची कल्पनाच करावी. यावेळी लताबाईंना केवढी तरी प्रसिद्धी मिळालेली होती. वयाने, मानाने, सर्वच दृष्टींनी त्या मोठ्या झाल्या होत्या. पण मला मात्र 'प्रफुल्ल' कंपनीतल्या माझ्या त्या छोट्या प्रेमळ मैत्रिणीत आणि आताच्या लताबाईत काहीच फरक जाणवला नाही. ते साधेपणाने वागणे, मनमोकळे हसणे, आपुलकीने बोलणे–सारे काही जसेच्या तसे कायम होते. पूर्वी ज्या पद्धतीने त्या वागत असत तशाच आताही त्या माझ्याशी वागत होत्या. त्यांच्यात मला जाणवलेला फरक म्हणजे पूर्वी मी त्यांना परकरपोलक्यात पाहत असे, आणि आता साडीत बघत होते एवढाच. बाकी त्या दोन लांबसडक वेण्यादेखील तशाच पाठीवर रुळत होत्या.

पुढे लताबाई कोल्हापूरला येऊ लागल्या. आणि त्यानंतर आमच्या गाठीभेटी होऊ लागल्या. त्यावेळी त्यांनी एका मराठी चित्रपटाच्या निर्मितीची तयारी चालवली होती. त्या चित्रपटाचे नाव होते 'वादळ'. 'वादळ'मधल्या प्रमुख भूमिकेसाठी वेगवेगळ्या अभिनेत्रींची नावे घेतली जात होती. पण लताबाईंनी त्या भूमिकेसाठी माझीच निवड केली. आणि एकप्रकारे माझ्या कलेबद्दल त्यांनी विश्वास व्यक्त केला. त्यामुळे मला केवढे समाधान वाटले असेल बरे! माझ्या अभिनयाचे

लताबाईंनी नेहमीच कौतुक केले आहे. नुसते शाब्दिक कौतुक नव्हे तर स्मृतिचिन्हे देऊन त्यांनी ते कौतुक माझ्याजवळ चिरंतन केले आहे. यावरून त्यांच्या मजवरच्या लोभाचा मला प्रत्यय येतो. माझ्याप्रमाणेच माझ्या मुलीवर – कांचनवरही – त्या प्रेम करतात. आजवर या प्रेमात कधी अंतर पडले नाही. आणि पुढेही कधी पडणार नाही. ज्या ज्या वेळी मी लताबाईंकडे जाते त्यावेळी त्या स्वतः ट्रेमधून चहा आणून मला देतात. यावर कदाचित कुणाचा विश्वास बसणार नाही, पण हे अगदी सत्य आहे. मला मात्र अशा वेळी खूपच लाजल्यासारखे होते.

महाराष्ट्र हा दोन व्यक्तींच्यामुळे ओळखला जातो असे म्हणतात. या दोन व्यक्ती म्हणजे एक छत्रपति श्री शिवाजीमहाराज आणि दुसऱ्या लताबाई. ज्यावेळी मी हे ऐकते त्यावेळी माझा ऊर आनंदाने व अभिमानाने भरून येतो. आणि एवढ्या मोठ्या लताबाई या आपल्या आहेत, महाराष्ट्राच्या आहेत या जाणिवेने आपणच कुठे तरी मोठे झालो आहोत असे वाटून मस्तक उंचावते. कुणी काही म्हणो, पण आपल्या माधुर्याने व आर्ततेने ऐकणाराच्या काळजाचा ठाव घेणारा असा अलौकिक आवाज पूर्वी कधी निर्माण झाला नाही आणि पुढेही होणार नाही. असे कलावंत युगायुगांतून एकदाच जन्माला येतात. लताबाईंना गायिका होऊन आज पंचवीस वर्षे पुरी होत आहेत. त्यांचा रौप्यमहोत्सव आज साजरा होत आहे. पण माझी तर ईश्वराजवळ अशी प्रार्थना आहे की त्याने लताबाईंना उदंड आयुष्य द्यावे आणि त्यांच्या कलाजीवनाचा शतसांवत्सरिक महोत्सव साजरा करण्याचे भाग्य आमच्यासारख्या त्यांच्या असंख्य चाहत्यांना लाभावे.



विश्वनाथ कोल्हापुरे

चिरंजीव लता

आज अखंडित पंचवीस वर्षे आपल्या गोड आवाजाने रसिकांच्या हृदयाची पकड घेणारी ही हृदया. हो हृदयाच. बारशाच्या दिवशी पाळण्यात तिचे हेच नाव ठेवलेले होते. मला वाटते गडकऱ्यांच्या लतिकेमुळे हृदयाची 'लता' झाली. कारण दीनानाथांची 'भावबंधना' मधील लतिकेची भूमिका अगदी पेटंट होती. त्यावेळी लतासाठी घेतलेल्या भातुकलीतील भांड्यांवर नावे होती 'हृदया दीनानाथ मंगेशकर.'

लतेचे वडील हे माझे मामा. मी त्यांना अप्पा म्हणत असे. ते ज्योतिषावर बोलताना सांगायचे, "विश्वनाथ, लतेच्या पत्रिकेतील गुरू, चंद्र, शुक्र, शनी आणि राहू यांच्या शुभयोगामुळे ही मुलगी मोठी कीर्तिवंत होईल." त्यांचे बोल अक्षरशः खरे ठरले. अखेरच्या दिवसांत ते तिला म्हणायचे, "लते, गळ्यातला पंचम सांभाळ. तो तुला सर्व काही देईल. हे दोन तंबोरे आणि ही चिजांची वही–हीच माझी तुला देणगी." हे हृदयस्पर्शी बोल ऐकताना सर्वांचे मन गहिवरून येई.

लतेला वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षापासून गाणी म्हणण्याचा अन् लक्षपूर्वक ऐकण्याचा नाद होता. त्यावेळी तिच्या कानांवर येणारी गाणी म्हणजे नाटकांतील पदे आणि चित्रपटांतील सैगलची गाणी. लता तेव्हाही अगदी सही सही गायची. ही तिची आवड लक्षात येताच दीनानाथराव तिला निवडक रागदारी चिजा सांगू लागले. 'आलीरी मैं जागी' ही खंबावतीतील चीज वयाच्या दहाव्या वर्षी झालेल्या तिच्या व दीनानाथांच्या जलशात तिने प्रथम गाइली. ती ऐकताना पित्याला गहिवरून आले. त्याच्या कानांचे पारणे फिटले. मी स्वतः हा गोड प्रसंग पाहिलेला आहे.

'आली तेरी जोबन' (सुगराई), 'बसंत आयी' (बहार), 'सदारंग नित उठकर देत दुहाई' (हमीर) अशा अनेक रागांतील चिजा त्या बालवयातही ती फार चांगली म्हणायची. लतेबरोबरच मीना, आशा यांनाही दीनानाथराव चिजा सांगत. त्या तिघींनाही एकदा चीज ऐकवली की बैठक मारून शिकवत बसायची गरजच पडायची नाही. वयाच्या बाराव्या वर्षी एखाद्या चांगल्या गवयाइतका चिजांचा संग्रह लताजवळ तयार होता. 'हे हुवारे गया' ही मीनाची आवडती चीज अन् 'महादेव शंकर' (कुकुभ) ही आशाची आवडती चीज. चारचौघांत मोठ्या कौतुकाने वडील

आपल्या गुणी कन्यकांना ह्या चिजा गायला सांगत. सोलापूरच्या नूतन संगीत थिएटरमध्ये तारीख नऊ सप्टेंबर एकोणीसशे एकूणचाळीसच्या रात्री पितापुत्रीच्या जलशात लताचे अगदी प्रथमच स्टेजवर पाऊल पडले. लताचा पहिलाच जलसा, आणि तो 'नूतन संगीत' मध्ये. नियतीला असे जणू सुचवायचे होते की ही इवलीशी बालिका भविष्यकाळात संगीतात काही नूतन करून दाखवील. सोलापूरकरांनी बापलेकीचे मनापासून कौतुक केले. खंबावतीनंतर 'ब्रह्मकुमारी'तील दीनानाथांचे 'मधुमीलनात या' हे पद लताने सुरेख गायले. त्या वेळेपासून लता आणि संगीत यांच्या झालेल्या मधुमीलनाचे फळ म्हणजेच तिचा सत्काराचा हा प्रसंग.

त्या जलशाच्या अपूर्व यशानंतर 'बलवंत' मधील गुणी बालगोपालांना जमवून 'बालबलवंत'-तर्फे 'गुरुकुल' या नाटकाचा प्रयोग पंढरपूर येथे लताने केला. त्यात तिने कृष्णाची, पंढरीनाथ कोल्हापुरे यांनी सांदिपनीपुत्र कौशिकाची, चंद्रकांत गोखले यांनी सांदिपनीची अशा भूमिका केल्या. मीना, आशा, उषा या मंगलाचरणात होत्या. बालकलाकारांचा इतका गुणी संच आणि त्यांचे दिग्दर्शन करणारे होते कै. दिनकर कामण्णा. प्रयोग फारच सुंदर झाला. त्याच मुक्कामात 'पुण्यप्रभावा'तील बाल युवराजाच्या भूमिकेत लता रंगभूमीवर आली. युवराजाची तीनही पदे लतेने दणकावून म्हटली. 'सौभद्रा'तील नारद, 'भावबंधना'तील कुसुम, 'चौदावे रत्न'मधील तान्या या भूमिकाही त्यानंतर तिने गाजवल्या. विशेषतः तान्याची 'बधितलं ग्वाड पाखरू' ही लावणी तिने फार गोड ठसक्यात म्हटली.

मोठेपणी तिने फक्त एकदाच नाटकात काम केले. अठ्ठेचाळीस साली दीनानाथांच्या पुण्यतिथीच्या वेळी चित्तरंजन कोल्हटकर (घनश्याम), पंढरीनाथ कोल्हापुरे (कामण्णा) यांच्यासमवेत ती 'लतिका' झाली. भालचंद्र पेंढारकर 'प्रभाकर' झाले आणि छोट्या मीनाने 'बिंदू'ची खेळकर विनोदी भूमिका केली. रंगभूमीवरील एके काळच्या प्रसिद्ध कलावंतांची ही मुले एका रंगमंचावर पाहण्याचे भाग्य फक्त मुंबईकरांना व पुणेकरांनाच लाभले. लतिकेची सगळीच पदे चांगली झाली, पण माझ्या मनात घोळत राहिले ते तिचे 'सकल चराचरी या तुझा असे निवास' हे पद.

तसे पाहिले तर बाळपणापासूनच लताचा देवपूजेकडे विलक्षण ओढा. पाचसहा वर्षांची असल्यापासून नित्यनियमाने तिची देवपूजा चाललेली आहे. त्या बालवयात एका भांड्यात देवांच्या सर्व मूर्ती नेऊन बुडविल्या की तिच्या देवांची आंघोळ व्हायची. मग एका रांगेने सर्व देवांना उभे करून हळदीकुंकू वाहिले जाई. दुसरा एक लतेचा आवडता खेळ सांगलीला असताना चालायचा. चाळीतल्या सर्व मुलांना एकत्र जमवून त्या काळी गाजलेल्या 'तुकाराम' बोलपटातील अभंग, संवाद अडीचतीन तास ती म्हणत राहायची. त्यावेळी लता 'तुकाराम' व्हायची. वडील मंडळी हा खेळ कौतुकाने बघत बसायची.

मीही त्यावेळी त्या सर्वांमध्ये एक होतो, हे केवढे मोठे समाधान आहे!

दत्ता डावजेकर

ते सुरुवातीचे दिवस

एकोणीसशे एकेचाळीस सालचा ऑक्टोबर महिना. मी माझे पहिलेच 'म्युनिसिपालिटी' या चित्राचे संगीत दिग्दर्शन संपवून 'नवयुग' मध्ये मा. विनायक यांच्याकडे नोकरीला राहिलो होतो. 'पहिली मंगळागौर' या चित्राचे काम चालू होते. दादा चांदेकर संगीत देत होते. आणि मी 'सरकारी पाहुणे' चित्रासाठी चाली हुडकत वेळ काढीत होतो.

अशा वेळी एका दुपारी सातआठ वर्षांची एक मुलगी; जुना फ्रॉक, त्यावर ब्राउन रंगाचा जुना कोट, पाठीवर दोन वेण्या सोडलेल्या, अशी आमच्या म्युझिक हॉलमध्ये आली. तिच्याबरोबर मला अपरिचित असलेले एक गृहस्थ होते. आणि त्या उभयतांबरोबर होते विनायकराव. ते घाईत असल्यासारखे मला म्हणाले, "ड.वजेकर, या मुलीचं गाणं ऐका आणि मला रिपोर्ट द्या." एवढे बोलून ते तसेच लगबगीने स्टूडिओकडे पळाले.

मी त्या मुलीला खुर्चीवर बसण्यास सांगितले आणि स्वतः हार्मोनियम घेऊन तिच्याजवळ बसलो. तिला कुठलेही गाणे म्हणण्याची सूचना केली. तिने गाणे सुरू केले अन् मी हार्मोनियमवर सूर शोधू लागलो. पण कसचे काय नि कसचे काय! आम्ही नावापुरतेच पेटी वाजवणारे. तिचा एक स्वर मी शोधताशोधता ती पुरा तानेचा पलटा मारून षड्जावर आलेलीही असायची. त्या गंधर्व-गायनात मी मुळी पेटी वाजवणेच विसरून गेलो. आणि तिच्या तोंडाकडे पाहात गाणे ऐकत राहिलो.

पहिले गाणे संपले. ती मुलगी थांबली. मी पुन्हा तिला एक गाणे गावयास सांगितले. तिने पुन्हा गाणे सुरू केले. मी व माझा अखिल वाद्यवृंद तिच्याभोवती कोंडाळे करून स्तिमित होऊन ऐकत राहिलो. मला आश्चर्य वाटले की इतकी लहान मुलगी इतके तयार आणि मधुर गाणे गाऊ तरी शकते कशी? हिला कुणी शिकवले असावे? मी आमचे सतारवादक पी. शंकर यांना कुतूहलाने त्या मुलीसंबंधी विचारले. त्यांनी माझ्या कानात हलकेच सांगितले, "अहो, ही लता, कै. दीनानाथ मंगेशकर यांची मुलगी."

दीनानाथांचे नाव मी ऐकले आणि एकदम माझ्या डोळ्यापुढे 'रणदुंदुभी' नाटक उभे राहिले.

समोर मला स्टेज दिसू लागले. दीनानाथांचे मी एकच नाटक पाहिलेले. आणि तेही अविस्मरणीय असे 'रणदुंदुभी'. त्यावेळी त्या नाटकातल्या दीनानाथांच्या गायकीने मला अक्षरशः वेडे केले होते. पुढे मी अनेकदा त्यांची नाटके बघण्याची धडपड केली होती. पण आमच्या अठराविश्वे दारिद्र्यामुळे ते मला शक्य झाले नव्हते. तरीही पाहिलेल्या त्या एकाच नाटकाचा, त्यातल्या दीनानाथांच्या त्या अलौकिक गायकीचा कानामनांवरचा ठसा कधीच पुसून गेला नव्हता.

त्या दीनानाथांची ही मुलगी हे कळताच त्या सर्व जुन्या स्मृती विजेसारख्या मनात चमकून गेल्या. लताचे नुकतेच ऐकलेले गाणे मनात घर करून बसले होतेच. मी तसाच उठलो आणि धावतच 'सेट' वर गेलो. विनायकराव शूटिंगमध्ये गुंतले होते. मी तिथल्या त्या वाकड्यातिकड्या फळ्या, पट्ट्या, पडदे, दिवे, सान्यांतून वाट काढीत वेगाने त्यांच्याजवळ गेलो आणि घाईघाईने सांगू लागलो,

"विनायकराव, गाणं ऐकलं. ती मुलगी मागेल तो पगार तिला द्या. पण तिला आपल्या संगीत संचात ठेवून घ्या."

माझ्या हावऱ्या आणि उतावीळ चेहऱ्याकडे पाहात विनायकराव मिस्किलपणे म्हणाले,

"ठीक आहे. तुम्ही म्हणताच तर ठेवू या तिला आपल्या स्टाफवर. पण पगार काय द्यावा?"

"काहीही" मी म्हणालो, "तुमच्या इच्छेला येईल तेवढा, पण जास्तीत जास्त द्या."

विनायकराव हसू लागले व म्हणाले,

"तुम्ही जा आता. मी सर्व नक्की करतो."

आणि असा आम्हाला लता मंगेशकरचा लाभ झाला. आमच्या संगीतसंचाला गंधर्वअप्सरेचा लाभ झाला. मग आम्हाला प्रतिदिवशी लताचे मधुर व अकल्पित असे स्वर्गीय संगीत ऐकावयाला मिळू लागले. मनातल्या मनात मी माझ्या संगीतरचनेशी लताच्या गायकीची तुलना करीत असे. अशा वेळी कधी कधी मी अगदी निराश होऊन जाई. वाटे की छे! हे खरे नव्हेच. आपण करतो ते सारे कृत्रिम आहे. प्रदर्शनात मांडलेल्या चित्रातल्या नदीसारखे, डोंगरासारखे आहे. तात्पुरते दृष्टीला सुखवणारे. त्यात आत्मा नाही. चैतन्य नाही. अंतःकरणाला प्रफुल्लित करणारे काहीही नाही. अरण्यातल्या खऱ्या अकृत्रिम निसर्गसौंदर्याच्या अनुभूतीची सर त्याला केव्हाही येणे शक्य नाही...या जाणिवेची व्यथा मनात सतत असल्यामुळेच की काय, 'सरकारी पाहुणे' या चित्राला मी दिलेले संगीत बरेचसे चांगले वठले. लता त्यावेळी माझ्या जीवनात येती ना, तर इतके तरी बेताचे संगीत मी देऊ शकलो असतो की नाही याची मला शंकाच वाटते.

नंतर माझे नि लताचे सांन्निध्य वाढत गेले. पुढे आम्ही कोल्हापूरला गेलो. तेथे विनायकरावांनी आपली स्वतःची 'प्रफुल्ल पिक्चर्स' ही संस्था सुरू केली. संस्थेचे पहिले चित्र 'माझं बाळ' याच्या तालमी सुरू झाल्या. या चित्रात प्रथम लता माझ्याकडे गाइली. त्यापूर्वी ती दादा चांदेकर यांच्या दिग्दर्शनाखाली 'पहिली मंगळागौर' मध्ये गाइली होतीच. तिचा आवाज वयोमानाप्रमाणे काहीसा बालिश पण तितकाच तयार, चढ्या सुराचा असा होता. बालआवाजामुळे तिला नायिकेची गाणी देणे शक्यच नव्हते. शिवाय 'माझं बाळ'च्या नायिका मीनाक्षी या स्वतःच गाणाऱ्या असल्यामुळे त्यांना 'प्लेबॅक' देणेही अशक्य! तेव्हा मी स्वतः आणि विनायकराव दोघांच्याही मनात लताला गाणे देण्याची जबर इच्छा असून सुद्धा 'माझं बाळ' चित्रासाठी तिचा कसा उपयोग करून घ्यावा ते कळेना. विनायकराव मला रोज विचारीत, "डावजेकर, काही सापडली का सिच्युएशन?" आणि मी "नाही हो!" म्हणून गप्प बसे. शेवटी स्वतः विनायकरावांनीच अनाथाश्रमाच्या सीनमध्ये मुलांच्या मिरवणुकीचे दृश्य घालून त्यांच्या तोंडी "चला चला नवबाला गुंफु चला सुममाला" असे गीत घालावयाचे ठरवले. त्यावेळी प्रथम लता व तिची भावंडे गाइली. पण ते समूहगीत असल्याने लताच्या गायकीचा पुरेपूर उपयोग त्यात मला करून घेता आला नाही. त्यानंतर मात्र 'चिमुकला संसार' व

'गजाभाऊ' या चित्रांतून लता पुष्कळच गाइली. आणि त्या गीतांनी तिला भरपूर स्तुतीही मिळवून दिली.

त्यावेळी मी, लता व बेबी आचरेकर तिघे रोज कंपनीत आलो की आमचा ठराविक कार्यक्रम म्हणजे शालिनी स्टूडिओच्या कांपाउंडाच्या बाजूबाजूने पुरी एक रपेट करायची व मग म्युझिक हॉल-मध्ये जायचे. तसेच कंपनी सुटण्यापूर्वीही संध्याकाळी आमची दुसरी रपेट ठरलेली. 'प्रफुल्ल पिक्चर्स'चे बोधचिन्ह होते कमलपुष्पाकडे झेप घेणारे बाळ. त्यामुळे आम्हां तिघांना 'प्रफुल्लची बाळे' म्हणून सर्वजण चिडवीत असत. या रपेटीत आमचा विषय संगीत हाच असे. लताला संगीताबद्दल जास्तीत जास्त बोलायला लावायचे आणि तिच्या तोंडून जेवढे म्हणून ऐकायला मिळेल—अर्थात् संगीतातच-तेवढे ऐकायचे असा माझा तेव्हाचा ठरलेला क्रम असे. लता तेव्हा कधी वडलांची गाणी मला म्हणून दाखवी तर कधी अस्सल रागदारीच्या चिजा, तर कधी जुन्या गझला. कधी कधी मी बेबी आचरेकरला चुकवून फक्त लतालाच रपेटीसाठी नेत असे. मग खिशातले चॉकलेट हळूच काढून तिला देत मी म्हणे, "लता, काल तू ऐकलेली ती चाल मला पुन्हा ऐकव ना!" मग काय, चॉकलेटने तोंड गोड करून लता अधिकच गोड गात असे. माझेही काम होऊन जाई आणि मग मी नवीन चाली करायला उत्साहाने सुरुवात करीत असे. याच वेळी माझ्यावर मंगेशकर घराण्याच्या गायकीचा खूप प्रभाव पडला. अर्थात असे केवळ वर्ष दोन वर्षे ऐकून ती गायकी आत्मसात होणे शक्यच नव्हते. पण साधारणतः नवा ढंग आणि वेगळेपणा म्हणजे काय ते मला समजू लागले आणि अजूनही माझ्या काही चालींत मंगेशकर गायकीची थोडी छाप दिसून येते. ही मला लतापासून मिळालेली फार मोठी देणगी होय असे मी समजतो.

'गजाभाऊ' नंतर कंपनीवर मोठे गंडांतर आले. आम्ही सर्वजण कोल्हापूर सोडून मुंबईला आलो. लता शंकरशेट मंदिरातल्या जागेत राहू लागली. मी माझ्या आतेभावाकडे राहावयास गेलो. यानंतर पूर्वीसारखे आमचे निकट सान्निध्य अर्थातच राहणे शक्य नव्हते. मीही पुढे 'प्रफुल्ल'ची नोकरी सोडली आणि चरितार्थासाठी इतर ठिकाणी कामे करू लागलो. याच सुमारास वसंत जोगळेकर यांच्या 'आपकी सेवामें' या चित्रात लताने माझ्याकडे पाच गाणी हिंदीमध्ये प्रथमच गाइली. ती सर्व गाणी राजकमल स्टूडिओत ध्वनिमुद्रित केली होती. यानंतर लताला हिंदी चित्रांतून भराभर कामे मिळत गेली. हिंदी चित्रसृष्टीत तिचा जम बसला. मी मात्र मराठीतच रखडत पडलो.

एकोणीसशे एकेचाळीस बेचाळीस सालापासून लताच्या चित्रपटसृष्टीतल्या संगीत जीवनाला प्रारंभ झाला आणि आज तर त्या क्षेत्रात ती केवळ अजिंक्य होऊन बसली आहे. अखिल भारतातच नव्हे, तर जागतिक संगीतक्षेत्रातही लताच्या गीतांचा उच्चांक असावा. महाराष्ट्रातील एका मुलीने भारतीय चित्रसृष्टीत अजिंक्य व अग्रेसर असावे हे खरोखरच महाराष्ट्राला भूषणावह आहे. व म्हणूनच प्रत्येक महाराष्ट्रीयाने या गोष्टीची जाणीव ठेवणे अगत्याचे आहे. लता मंगेशकरनंतर तिची कनिष्ठ भगिनी आशा भोसले हिचा क्रम लागतो. म्हणजे या दोन्ही कलावंत महाराष्ट्रीय आहेत. हे आमचे केवढे भाग्य म्हटले पाहिजे. पार्श्वगायनातील गुणवत्तेमुळे तर लता सर्वप्रसिद्ध आहेच. पण तिच्या कलेचा आणखी एक तेजस्वी पैलू म्हणजे तिने केलेले संगीत दिग्दर्शन. 'रामराम पाव्हणं' या चित्राला प्रथम तिने संगीत दिले. आणि अगदी अलिकडे अवघ्या चार पांच वर्षांत 'मोहित्यांची मंजुळा' पासून 'साधी माणसे' पर्यंतच्या चित्रपटांतून शुद्ध मराठी वळणाची सुंदर सुंदर गीते तिने जनतेला सादर केली. विशेष म्हणजे अगदी कमी वादक घेऊन तिने हे कौशल्य दाखविले आहे. या संगीताचे वैविध्य आणि वैचित्र्य दीर्घकाळ रसिकांच्या ध्यानी राहील!

कमलनाथ मंगेशकर

मंगेशाची कृपा

नवमहाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा तो दिवस. शिवतीर्थावर अफाट जनसमुदाय लोटला होता. पंडित जवाहरलाल नेहरू या समारंभासाठी मुद्दाम महाराष्ट्रात आले होते. त्यांच्या शुभ हस्ते एका नव्या राज्याची स्थापना होणार होती. अशा त्या सुंदर समारंभात, संध्याकाळच्या कोवळ्या उन्हात, एक गायिका महाराष्ट्रगीत गात होती. वातावरण त्या मधुर स्वरांनी भरून उचंबळून गेले होते. सूर उमटत होते. चढत होते. पसरत होते—

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा

मी एका कोपऱ्यातून ते गीत ऐकत होतो. गायिकेकडे डोळे भरून बघत होतो. बघता बघता छाती अभिमानाने उंचावली. मन गहिवरून आले. गालांवर अश्रू ओघळले. जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटले. कारण ती गायिका माझी सख्खी पुतणी होती. माझ्या बंधूंची–मा. दीनानाथांची-लेक होती. पित्याने मराठी रंगभूमीला नववैभव प्राप्त करून दिले होते. त्याची मुलगी भारताची स्वरसम्राज्ञी बनली होती. आमचे मंगेशकर घराणे धन्य झाले होते.

व्यासपीठावर तन्मयतेने गाणारी आमची लता पाहून हे सारे विचार मनात दाटून आले आणि त्या गर्दीतही मी आमच्या कुलदेवतेला–शितळादेवीला–मनोमन दंडवत घातले. लता हा तिचाच कृपाप्रसाद होता. मला लतेच्या बाळपणीचा तो भयंकर प्रसंग आठवला. छोट्या लतेला देवी आल्या होत्या. पायाच्या नखापासून डोकीच्या केसापर्यंत सारे अंग फुलून गेले होते. तो बाळजीव सारखा तगमगत, तडफडत होता. अंथरुणाचा स्पर्शही तिला सहन होत नसल्यामुळे आम्ही तिला केळीच्या पानावर झोपवीत होतो. तिच्याकडे बघताना नाही नाही त्या शंका मनात दाटून येत होत्या. 'मन चिंती ते वैरी न चिंती' अशी आमची साऱ्यांची अवस्था झाली होती. पण शितळादेवी पावली. श्रीमंगेशाने कृपा केली. आणि देवीसारख्या भयानक दुखण्यातूनही आमची लता सुखरूप आम्हाला

परत मिळाली. ती वाचली. इतकेच नव्हे तर त्या कोवळ्या वयातही आपले वैशिष्ट्य स्पष्टपणे प्रकट करणारा, अनेक अवघड हरकती मुरक्या सहजपणे घेणारा तिचा असामान्य सुरेल गळाही आपल्या सर्व सुरेलपणानिशी टिकून राहिला.

आज महाराष्ट्राचे गुणगान करीत असलेल्या लतेला बघताना हे सारे मला आठवत होते. त्याबरोबरच तिच्या बाळपणच्या इतरही अनेक आठवणी उचंबळून वर येत होत्या. बघता बघता 'नामांकित पार्श्वगायिका लता मंगेशकर' हिच्या जागी मला परकरपोलक्यांतली छोटी चुणचुणीत लता दिसू लागली.

एकोणीसशे तेहतीस चौतीस साल. आम्ही तेव्हा सांगलीला राहत असू. लता असेल तेव्हा सरासरी तीनचार वर्षांची. या वयाची मुले खेळण्याबागडण्यात अधिक रमतात. पण लता कधी आपल्या बरोबरीच्या मुलांत खेळत रमून गेलेली आम्हाला पहायलाच मिळाली नाही. ती बहुधा व्हरांड्यात एकटीच खेळत असे. अशावेळी अप्पांनी—दीनानाथांनी—तंबोऱ्याची गवसणी काढली, तारा झंकारू लागल्या की लताने तिकडे धाव घेतलीच म्हणून समजावे. त्यांनी गाणे म्हणायला प्रारंभ केला की लताही गाऊ लागे. अनेकदा तो एवढासा जीव कठीण कठीण चिजा आपल्या गळ्यातून अशा सफाईने साकार करी की अप्पासुद्धा तिच्याकडे आश्चर्याने बघत राहत.

आता जुन्या गोष्टी आठवल्या म्हणजे नवल वाटते. पण लतेची ग्रहणशक्ती किती छोट्या वयापासून तीव्र आणि तल्लख होती. अप्पा कधी तिला जवळ घेऊन तासन तास शिकवीत बसले नाहीत. पण सहजगत्या, येता जाता, चालता बोलता त्यांनी जे तिला शिकवले ते तिने एकाग्र चित्ताने ऐकून घेतले. मनात साठवले. घोळवले. आणि त्यांतून आपली संगीतविद्या ती वाढवीत गेली. अनेकदा अप्पा एखादी कठीण तान घेत. लता अगदी हुबेहूब तीच तान आपल्या गळ्यातून काढून त्यांची शाबासकी मिळवी. इतकेच काय, पण एखादे वेळी अप्पांनी घेतलेली हरकत त्यांना पुन्हा घेता आली नाही तर लता स्वतः ती त्यांना घेऊन दाखवी. तिच्या या जबरदस्त ग्रहणशक्तीमुळे या मुलीला शिकवावे तरी काय असा अप्पांनाही पुष्कळ वेळा प्रश्नच पडे. कारण त्यांनी एखादी चीज शिकवायला प्रारंभ केला की लतेने म्हणावे, "बाबा, ती चीज तर तुम्ही केव्हाच शिकवली आहे!" मग ते दुसरी चीज सुरू करीत. तीही आपण मागेच आत्मसात केली असल्याचे लता त्यांना स्मरण करून देई. असा काही जबरदस्त शागीर्द अप्पांना भेटला होता. अर्थात आमचे बंधुराजही काही कमी नव्हते. अनेक उत्तमोत्तम नि कठिणातील कठीण चिजांचे भांडारच भरलेले होते त्यांच्याजवळ. चिमुकली लता त्यांतून घेऊन घेऊन किती घेणार? असा अजब उस्ताद नि अशी अजब शागीर्द यांची जोडी क्वचितच निर्माण झाली असेल!

लतेच्या दांडग्या स्मरणशक्तीची अशीच एक आठवण सांगण्याजोगी आहे. मी तेव्हा सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये मॅट्रिकचा अभ्यास करीत होतो. अनेकदा मी इतिहासातल्या सनावळ्या पाठ करीत बसे. लता तेव्हा कुठेतरी आसपास खेळत असावयाची. तिच्या कानांवर त्या सनावळ्या ओझरत्या पडत. पण त्या देखील तिला चटकन पाठ होत. आणि मग कित्येकदा तीच मला सांगे, अमुक अमुक घटना अमुक अमुक सालात घडली म्हणून. याच आपल्या अजब स्मरणशक्तीमुळे ऐकलेले गाणेही ती 'डिट्टो' म्हणून दाखवीत असे.

एकोणीसशे पस्तीस सालची गोष्ट. स्वरसम्राट सैगल यांचा 'चंडीदास' हा चित्रपट सांगलीला लागला होता. लताने अप्पांबरोबर तो चित्रपट पाहिला. सैगल यांचे काम आणि त्यांचे गाणे तिला इतके काही आवडले की त्यानंतर कितीतरी दिवस ती आपण मोठ्या झाल्यावर सैगलशीच लग्न करणार असे आम्हाला सांगत असे! सैगल यांच्या रसपूर्ण गायकीने ती एवढी भारावून गेली होती की तिने हट्ट धरून पहिली ध्वनिमुद्रिका खरेदी केली ती सैगल यांची 'देवदास'

चित्रपटातल्या 'बालम आवो बसो मोरे मन मे' या गीताचीच. मग ती ध्वनिमुद्रिका घरातल्या ग्रामोफोनवर सतत वाजवून त्या गीताबरहुकुम गाण्याचा एक नवाच छंद तिला जडला. त्या अल्पवयात सैगलची इतरही कितीतरी गाणी लतेने मुखोद्गत केली होती. त्या असामान्य गायकाच्या दर्दभऱ्या गायकीचा लतेच्या गाण्यावर निश्चित परिणाम झाला आहे असे मला वाटते. सैगलशी तिचे आणखीही साधर्म्य आहे. स्वरसम्राट सैगल एकच होऊन गेले. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर हीही एकच आहे.

लतेच्या जन्मापासून तो छत्तीस सालापर्यंतचा तिचा सहासात वर्षांचा बाल्यकाळ अत्यंत मजेत गेला. या काळात तिचे शालेय शिक्षण फारसे झाले नाही. घरी ती थोडेफार काय शिकली असेल तेवढेच. कारण शालेय अभ्यासात तिचे मन कधीच रमले नाही. या बाबतीत ती अगदी आपल्या पित्याच्याच वळणावर गेली असे म्हटले तरी चालेल. आमच्या अप्पांनी संस्कृतचा अभ्यास केला. अनेक धर्मग्रंथ वाचले. ज्योतिषशास्त्राचे कसून अध्ययन केले. पण अप्पा चार भिंतींच्या आड शाळेत कधी रमलेच नाहीत. लतानेही अभ्यास केला तो शालेय नाही तर संगीताचाच. तंबोऱ्याशीच तिचा बालजीव खेळला रमला आणि सप्तसुरांवरच तिचा पिंड पोसला गेला.

छत्तीससदतीस साल आमच्या कुटुंबाला तसे फार वाईट गेले. अप्पा नाटक–चित्रपटांच्या सीमेवर उभे होते. त्यांना व्यवहार जमला नाही. त्यामुळे सारेच वातावरण अस्थिर झाले होते. लताच्या गाण्याकडे त्यांचे साहजिकच काहीसे दुर्लक्ष झाले. पण लतेने अशाही परिस्थितीत गाण्यावरचे आपले मन विचलित होऊ दिले नाही. परिस्थितीचे आकलन करण्याइतके तिचे वयही तेव्हा मोठे नव्हते. पण तिला मुळातच समज फार. त्यामुळे त्या बालवयातही अनेक नाट्यगीते देखील तिने आत्मसात केली होती. इतकेच नव्हे तर रंगभूमीवर ती निर्भयपणे गाऊनही दाखवली होती.

वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी तिने रंगभूमीवर नारदाचे काम केले होते. पुढे एकोणीसशे एकेचाळीस साली आकाशवाणीवर तिने मोठ्या तन्मयतेने नाट्यगीते गाइली होती. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून अप्पांचा व तिचा म्हणजेच बापबेटीचा एकाच दिवशी गाण्याचा कार्यक्रम झाला होता. व तो अतिशय रंगला होता. त्या दिवशी लतेने गाइलेली 'पावना वामना' आणि 'राधाधरमधुमिलिंद जयजय' ही गाणी मला आजही चांगली आठवत आहेत.

अभिमानाने छाती फुलून यावी अशी आणखी एक घटना याच काळात घडली होती. पंचेचाळीस सालची गोष्ट आहे. अप्पा तेव्हा आम्हाला सोडून गेले होते. लतेने विनायकांच्या कंपनीत नोकरी धरली होती. गडकरी पुण्यतिथीच्या निमित्ताने प्रभाकर गुप्ते यांनी मुंबईच्या ऑपेरा हाउसमध्ये गायनवादनाचा एक खास कार्यक्रम आयोजित केला होता. लतेला या कार्यक्रमात गडकऱ्यांची काही गीते गाण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. अनेक नामवंत कलाकार या कार्यक्रमात भाग घेणार असल्यामुळे प्रेक्षागृह तुडुंब भरले होते. रसिक, चोखंदळ, कलाप्रेमी अशा प्रेक्षकांचा तो जमाव होता. तथापि एकंदर कार्यक्रम इतका कंटाळवाणा आणि निराशाजनक होत होता की श्रोते नाराज होऊन जांभया देऊ लागले होते. अशा वेळी पडदा वर गेला आणि रंगभूमीवर एक छोटी बालिका त्यांना दिसली. ही एवढीशी पोर काय गाणार अशा समजुतीने सर्वजण काहीशा उपेक्षावृत्तीनेच तिजकडे बघत होते. आणि त्या पोरीने गायला सुरुवात केली. बाबूराव बोरकरांची पेटी नि पंढरीनाथ नागेशकरांचा तबला सफाईने वाजू लागला. त्या साथीबरोबर 'लाडकी असेचि पोर' या 'भावबंधना'तल्या गाण्याचे सूर उमटले. तत्क्षणी सारी चुळबूळ एकदम थांबली. गाणे रंगतच गेले. प्रेक्षक थरारून ऐकत राहिले. गाणे संपताच कडाडून टाळी पडली. पुढची गाणी तशीच रंगत गेली. ही छोटी पोर होती आमची लता!

आज लता साऱ्यांचीच लाडकी गायिका बनली आहे. पण व्यक्तिगत जीवनांतही अनेक

वैशिष्ट्यपूर्ण गुण तिच्या अंगी आहेत. आपल्या सुमधुर स्वराने जगाला मोहिनी घालणारी ही आमची लता तितकीच निर्भय आणि मिष्किल पण आहे. दुसऱ्यांची नक्कल करण्यात ती पटाईत आहे, तशी इतरांच्या उपयोगी पडण्यात ती सतत आघाडीवर असते. तिची ही परोपकारी वृत्ती किती बालपणापासून तिच्या स्वभावात रुजलेली होती याचे एक गंमतीदार उदाहरण सांगतो. माझी मॅट्रिकची परीक्षा आटोपल्यावर मी महिनाभर सांगलीहून बाहेरगावी गेलो होतो. त्यामुळे माझी खोली बंद होती. मला परत यायला तीनचार दिवसांचा अवधी राहिला तेव्हा आपल्या काकाची खोली स्वच्छ करून ठेवण्याची कामगिरी लतेने आपखुषीने आपल्या अंगावर घेतली. त्याप्रमाणे माझी खोली तर तिने झाडून पुसून स्वच्छ केलीच. पण माझ्या टेबलावर एक छोटे घड्याळ होते ते देखील, त्यावरची धूळ जाऊन ते स्वच्छ व्हावे म्हणून लतेने साबण लावून, पाण्यात खळबळून, धुवून काढले. मी बाहेरगावाहून आल्यावर लतेने मला सर्वप्रथम माझी खोली स्वच्छ करून ठेवल्याची बातमी दिली नि मग ती हळूच मला म्हणाली "—आणि हे बघ कमा, तुझं घड्याळसुद्धा मी साबणानं चांगलं धुवून ठेवलंय बरं का!" आपल्या पुतणीचा तो प्रताप ऐकून मी फक्त कपाळाला हात लावला!

अशी ही आमची लता. गेली पंचवीस वर्षे ती सतत गात आहे. तिचा आवाज ही राष्ट्राची अनमोल संपत्ती होऊन बसली आहे. मला फार फार वाटते की आज तिच्या कलाजीवनाचा रौप्यमहोत्सव साजरा होत असताना शासनाने देखील तिच्या कलागुणांची कदर करावी. तिच्या कर्तृत्वाची दखल घ्यावी. लता या व्यक्तीखातर नव्हे तर तिच्या ठायी असलेल्या कलेखातर.

लतेच्या बाबतीत माझे आणखीही एक आवडते स्वप्न आहे. तिचा स्वर सातासमुद्रापलिकडे केव्हाच पोहोचला आहे. पण लतेने प्रत्यक्ष परदेशी जाऊन आपल्या अंगची गानकला प्रकट करायला हवी. अजून तिने भारताचा किनारा सोडला नाही. पण तिला प्रत्यक्ष पाहण्यासाठी अनेक परदेशी रसिक चाहते उत्सुक झाले आहेत. आणि माझी खात्री आहे की आमची लता आपल्या साध्या राहणीने, निगर्वी स्वभावाने, स्नेहशील वागणुकीने नि भावपूर्ण गायकीने परदेशी मंडळींचीही हृदये निश्चित जिंकील!



कमलनाथ मंगेशकर

त्रि. वा. शिरवाडकर

स्वर

लता मंगेशकर हे एका व्यक्तीचे नाव आहे हे सहसा माझ्या ध्यानातच येत नाही. असे नेहमी वाटते की, स्वराच्या एका अलौकिक अनुभूतीने, हे लौकिक नाव केवळ व्यवहाराच्या सोयीसाठी धारण केले आहे. रेडियोची कळ फिरविताच, सोन्याच्या कोऱ्या करकरीत मुद्रेप्रमाणे हे नाव अगणित ठिकाणी आणि अगणित वेळा रेडियोतून बाहेर पडले आहे आणि त्याच्या मागोमाग माणसाच्या सरपटणाऱ्या, कोंदटलेल्या जीवनाला अपार्थिव आनंदाचा स्पर्श करणारे तीव्र मुलायम संगीत त्या परिसरावर चांदण्यासारखे बहरले आहे. शृंगार, कारुण्य, वात्सल्य, बलिदान इत्यादी अनेक भावनांची मूलतत्त्वे या स्वराच्या रुपेरी नौकेतून आपल्या घरापर्यंत पोचली आहेत आणि शब्दार्थांची तटबंदी तोडून त्यांनी आपल्या अंतःकरणात प्रवेश केला आहे. लता मंगेशकरांची छायाचित्रे मी अनेकदा पाहिली आहेत. त्यांचा प्रत्यक्ष परिचयही झालेला आहे. नाशिक येथील एका मुक्कामात त्या माझ्या घरी आल्या होत्या आणि इतर सर्वसाधारण माणसाप्रमाणे त्या समोरच्या खुर्चीवर बसल्या होत्या, बोलल्या होत्या. पण त्यावेळी सुद्धा काही औपचारिक बोलणे चालू असता, त्यांच्या जवळपास तरंगणाऱ्या त्या असामान्य स्वराचा माझे मन अभावितपणाने शोध घेत होते. लता मंगेशकर आणि संगीत याची इतकी एकात्मता झाली आहे. निदान ऐकणाऱ्यांच्या दृष्टीने.

त्या स्वराचा हा पंचविसावा वाढदिवस. पहिली उमेदवारीची चारपाच वर्षे सोडली तर हा स्वर भारताच्या आकाशात गेली वीस वर्षे अजिंक्य अधिकाराने वावरत आहे. राजसूय यज्ञाची पूर्तता करण्यासाठी प्रांतोप्रांती आपले यश आणि सत्ता प्रस्थापित करीत जाणाऱ्या सोनेरी ध्वजासारखा. या वीस वर्षांच्या काळामध्ये देशात कितीतरी परिवर्तने घडून आली, राजसत्ता बदलल्या, राजवटी बदलल्या. राष्ट्रीय जीवनात केव्हा गौरवाचे प्रसंग आले तर केव्हा विषादाचेही. केव्हा आनंद उत्साह तर केव्हा अमर्याद यातनाही. या सर्व परिस्थितीतून, लताचा रुपेरी स्वर मागावरच्या वस्त्रातून गुंफल्या जाणाऱ्या जरीच्या धाग्याप्रमाणे सतत विणला गेला आहे. सुखाप्रमाणे दुःखाला आणि सन्मानाप्रमाणे अपमानालाही त्याने सोबत केली आहे. मुग्ध शृंगाराचे लाल मलमली दुपेटे त्याने वाऱ्यावर फुलविले

आहेत, इंद्रायणीच्या लहरींचा आर्त नाद त्याने आपल्या पंखांवर मिरवला आहे, आणि सरहद्दीवर कोसळणाऱ्या शहीदांना लक्षावधी लोकांच्या आसवांचा नजराणा त्याने पोचवलेला आहे. सृष्टीतल्या कोकिळा फक्त वसंतातच गातात, पण या कोकिळेने मात्र प्रत्येक ऋतूला वासंतिक स्वरांचा दिलासा दिला आहे. दिवसामागून दिवस आणि वर्षांमागून वर्षे गेली, पण या स्वराची मधुर मिरासदारी कमी झाली नाही. आकाशातील असंख्य स्वरांच्या गर्दीतून या स्वराचा जरीपटका राजेपणाने संचार करीत आलेला आहे. स्वतंत्र रस्त्याचा अधिकार प्रस्थापित करीत आणि इतरांचे कुर्निसात घेत. या स्वराच्या शेजारी राहून अलीकडच्या काळात वाटचाल केली ती त्याच घरातील दुसऱ्या एका स्वराने—आशाच्या.

अनुभवाची वस्तूप्रमाणे व्याख्या करता येत नाही. लता मंगेशकरांच्या गाण्याची शास्त्रीय चिकित्सा करण्याचा मला अधिकारही नाही. पण कोणत्याही कलेच्या बाबतीत शास्त्र हे प्रतिभेच्या मानाने दुय्यमच असते. इंदूरचे रामूभैया दाते हे मोठे संगीतशास्त्रज्ञ आहेत आणि नाणावलेले रसिकही आहेत. त्यांनी एका लेखात असे म्हटल्याचे आठवते की मोठमोठ्या खांसाहेबांच्या आणि बुवासाहेबांच्या गाण्याइतकेच लताचे गाणेही मला आवडते, धुंद करते. ही करामत प्रतिभेच्या स्पर्शाची आहे. या स्पर्शामुळेच गीतातील स्वररचनेचे नक्षीकाम नव्हे, तर त्यातून झिरपणारा एक अनुभव आपल्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोचतो आणि आपण काही क्षणांसाठी का होईना पण त्याच्या स्वाधीन होतो. सैगलप्रमाणेच लता मंगेशकरांच्या अनेक गीतांनी हा अनुभव मला दिला आहे, आपल्या कोशाबाहेर गेल्याचा, मुक्ततेचा आनंद, त्याचप्रमाणे सभामंडप ओलांडून एखाद्या भावनेच्या गाभाऱ्यापर्यंत गेल्याचाही. ही बहुतेक गीते कोठल्यातरी चित्रपटातील आहेत आणि हेही निर्विवाद आहे की लताच्या गायकीने हिंदी चित्रपटाला एक कलात्मक संपन्नता आणि सामर्थ्य मिळवून दिले आहे. पण तरी देखील मला वाटते की लताची गाणी म्हणजे नुसती सिनेमाची गाणी नव्हेत. त्यांचे आवाहन सिनेमापुरते अथवा सिनेमावरही अवलंबून नाही. (अर्थात हे चांगल्या गीतांसंबंधी.) मी फार थोडे हिंदी चित्रपट पाहिले आहेत. ते प्रत्यक्ष पाहताना त्यातील लताची नामांकित गीतेही मनात कोठे खोलवर जात आहेत असे सहसा मला वाटले नाही. चित्रणाच्या इतर अंगांच्या पातळीवर ओढल्यामुळे (काही अपवाद वगळता) ही गीते थिएटरांत पुष्कळदा बोथट वाटली. त्यांची असामान्यता मला जाणवली आणि नेहमी जाणवते ती सिनेमाच्या पड्द्यापासून दूर, रेडियोवरती अथवा मुद्रिकेवरती. जेव्हा ती स्वतःच्या स्वतंत्र अधिकारात माझ्या परिसरात येतात. माझ्या खोलीतील रात्रीच्या नीरवतेवर किती तरी वेळा लताच्या स्वराने आपले सोनेरी शिक्कामोर्तब केले आहे. परवाच 'ऐ मेरे वतनके लोगो—' हे गीत असेच ऐकत होतो. पूर्वी अनेक वेळा ऐकलेले. शब्द तर चांगले आहेतच. पण जाणिवेवर आणि भोवतालच्या हवेवर गाढ खोलीव भावनेचा कशिदा काढीत गेला तो त्या गीताचा स्वर.

त्या प्रतिभाशाली आणि अपराजित स्वराला मनःपूर्वक धन्यवाद.

वि. वा. शिरवाडकर

रविशंकर

ईश्वरी वरदान

लता मंगेशकर यांचा आवाज पहिल्या प्रथम मी ऐकला तो रंगभूमीवर, मुंबईतील एक्सेलशियर थिएटरमध्ये बुद्धाच्या जीवनावर आधारलेल्या एका नृत्यनाट्यातली गीते म्हणताना. मला आठवते की त्याच वेळी त्यांच्या आवाजाची विशिष्ट गुणवत्ता आणि त्यांचे स्वच्छ सुस्पष्ट शब्दोच्चार यांनी मी फार प्रभावित होऊन गेलो होतो.

तेव्हापासूनच कलाक्षेत्रातली त्यांची प्रगतिपर वाटचाल कशी होत गेली आणि आज एका दुर्मिळ आणि लोकोत्तर कलावंतात त्यांच्या प्रतिभेची परिणती कशी झाली हे सारे मी बारकाईने आणि मोठ्या कौतुकाने पाहत आलो आहे. अशा तऱ्हेचे अलौकिक प्रतिभावंत खरोखरच दुर्मिळ असतात; कारण त्यांना घडवताना वापरलेला साचा निसर्ग पुन्हा क्वचितच वापरतो. प्रत्येक संगीतदिग्दर्शकाच्या गरजेनुसार आणि कल्पनेनुसार स्वतःला हवे तसे वळवू शकणारा विलक्षण लवचिक आवाज जसा त्यांना लाभला आहे त्याप्रमाणेच कोणतेही गीत अत्यंत भावपूर्ण रीतीने कसे म्हणावे आणि त्यातून काळजाला स्पर्श करणारी असाधारण कलाकृती निर्माण व्हावी यासाठी कंप, मृदुता, कारुण्य, लयबद्धता या साऱ्यांचा यथाप्रमाण वापर कसा करावा याचीही एक उपजत समज त्यांना आहे.

आम्हा उभयतांचा एकत्र काम करण्याचा योग आला तो 'अनुराधा' आणि 'गोदान' या चित्रपटांतील गाण्यांच्या निमित्ताने. ही गीते ध्वनिमुद्रित करीत असताना कोणत्याही गीतामधली भावना जाणून घेणे, संगीतदृष्ट्या त्यात निर्माण होऊ शकणारी सौंदर्यस्थळे अचूक हेरणे आणि संगीतदिग्दर्शकाला नेमके काय हवे आहे याचा अंदाज घेऊन ते गीतातून संपूर्णतया प्रकट करणे या साऱ्याच बाबतीत लताबाईंना किती विलक्षण गती आहे याचा मला प्रत्यय आला.

बुद्धिमान आणि संवेदनशील गायकांविषयी माझ्या अंतःकरणात एक विशेष आदरभाव आहे. आणि या दोन्ही देणग्या ईश्वराने लताबाईंना अगदी मुक्तहस्ताने दिल्या आहेत.

उषा मंगेशकर

'राणीमा'च्या आठवणी

आठवू गेले तर काहीच आठवत नाही हीच दिदीबद्दलची माझी पहिली आठवण. एखाद्या माणसाच्या आठवणी काढण्यासाठी त्याच्यापासून दूर जावे लागते. दूर राहावे लागते. दिदीपासून आम्ही कधी दूर राहिलोच नाही. तर तिच्या आठवणी काढण्याचा प्रसंग कुठून येणार ?

खरे म्हटले तर अगदी लहानपणच्या आठवणींत दिदी फारशी डोकावतच नाही. ती सर्वांत थोरली बहीण. मीनाताई नंबर दोन. आशाताई नंबर तीन. आणि मग मी. दिदीच्या नि माझ्या वयांत बरेच अंतर असल्यामुळे तिची विशेष दोस्ती मीनाताईबरोबर असे. त्या दोघी अगदी पाठोपाठच्या. त्यामुळे त्यांचे खेळ, भातुकली, हितगुजे एकत्र चालत. मी अगदी लहान म्हणून त्या मला आपल्यात खेळायलाही घेत नसत. माझी दोस्ती आपली बाळशी—हृदयनाथशी—असे. कारण तो माझ्या पाठचा. आमचे खेळणे, भांडणे, रडणे सारे बरोबरीने चालायचे. मोठी झाल्यावर आमच्या 'सुरेल कलाकेंद्रा'चे कार्यक्रमही मी त्याच्याच सहकार्याने केले.

मला दिदीची पहिली आठवण आहे ती बाळबद्दलचीच आहे. बाळ लहानपणी दिसायला फार सुरेख होता. अगदी लहानपणचे मला आठवते ते हे की बाळ सुंदर दिसे म्हणून दिदी त्याला नाटकांतले राजपुत्राचे कपडे घाली. हिरवी मखमलीची चड्डी आणि लाल मखमलीचा कोट असा पोशाख तिने त्याला चढवला की तो राजबिंडा दिसे. त्याच्याबरोबर ती मलाही राजकन्येचा पोशाख घालीत असे. मखमलीचा झगझगीत लाल फ्रॉक. आणि मग जाहिरातींसाठी तयार केलेल्या उभ्या गाड्यांतून ती आम्हा दोघांना कौतुकाने फिरवीत असे.

आमचे बाबा मुलांना गाणे शिकवीत. त्यावेळी बाकीची सर्व भावंडे त्यांच्यासमोर बसून गात. मी मात्र कधी त्यांच्यात बसले नाही. मी बाबांची खूप लाडकी होते. त्यामुळे अशा वेळीं मी ऐटीत त्यांच्या मांडीवर बसे. मी बाबांच्या मांडीवर बसले आहे, ते गाणे शिकवीत आहेत आणि दिदी, मीनाताई तंबोरा धरून समोर गात आहेत हे दृश्य अजूनही मला डोळ्यांसमोर दिसते.

मला आठवते तेव्हापासून अगदी प्रारंभी आम्ही धुळ्याला होतो. वर सांगितलेल्या आठवणी

तिथल्याच. नंतर आम्ही पुण्याला आलो. यावेळी मी जेमतेम चार पाच वर्षांची असेन. दिदी आणि मीनाताई भातुकलीचा खेळ खेळत. क्वचित त्या मलाही आपल्याबरोबर खेळायला घेत. अशा वेळी दिदी आम्हाला सांगे "झोपा आता. रात्र झाली." आम्ही आपल्या वेड्यासारख्या खोट्या खोट्या झोपी जायच्या. अन् मग दिदी चोर म्हणून येऊन भातुकलीच्या खेळातल्या खाऊचा चट्टामट्टा करून टाकायची.

आमच्या बाबांचा पोषाकाच्या, वर्तनाच्या साधेपणावर फार कटाक्ष असे. त्यामुळे आम्हा भावंडांचे कपडे साधे असत. दिदी तेव्हा फ्रॉक घाली. त्याच्या बाह्या मनगटांपर्यंत असत. आणि खूप दाट केसांच्या दोन लठ्ठ वेण्या तिच्या पाठीवर रुळत असत. आम्ही पावडर लावलेली बाबांना आवडत नसे. तसेच मुलींनी पान खाल्लेलेही त्यांना बिलकूल खपत नसे. पावडरची हौस भागवण्यासाठी पिठाच्या डब्यांत हात घालून व तेच हात तोंडांवर फिरवून दिदी आणि मीनाताई कधी कधी चेहरे उजळ करीत.

पुढे माझे बाबा गेले आणि आमचे आयुष्य एकदम बदलले. नंतर दिदी काम करू लागली. तिचा मिष्किल, थट्टेखोर स्वभाव बदलून ती बरीचशी गंभीर झाली. तिच्या मुद्रेवरचे अखंड हसूही मावळले. तेव्हा ती खूप कामे करी. तेव्हापासून तो आतापर्यंत मी तिला सतत कष्ट करतानाच बघते आहे.

तथापि त्या दिवसांतही तिने आम्हाला परिस्थितीची झळ सहसा लागू दिली नाही. आम्ही सर्वजण कोल्हापूरला आलो. दिदी विनायकांच्या 'प्रफुल्ल' कंपनीत कामाला राहिली. स्टुडिओची गाडी येऊन सकाळी तिला घेऊन जाई. नंतर दिवसभर तेथे काम करून रात्री केव्हा तरी ती घरी परत येई. कित्येकदा ती यायच्या आतच आम्ही धाकटी मुले झोपी गेलेली असू. दिदी तेव्हा फार कष्ट करीत असली पाहिजे. घरच्या खूप अडचणी असल्या पाहिजेत. पण त्यावेळी आम्हाला, विशेषतः मला आणि बाळला हे जाणवू नये, आमच्या मनावर त्याचा विपरीत परिणाम होऊ नये म्हणून घरात सारे जण जपत. घरातले वातावरण कटाक्षाने प्रसन्न ठेवीत. जेवणखाण, कपडालत्ता कशातही आम्हाला उणीव जाणवू नये याची दिदी काळजी घेई. ती त्यावेळी नृत्याचे शास्त्रोक्त पाठ घेत होती. सुट्टीच्या दिवशी ती आम्हाला नाचून दाखवी. कधी कधी स्टूडिओतल्या गंमती सांगून, वेगवेगळ्या माणसांच्या नकला करून ती आम्हाला खूप हसवी. कोल्हापूरला तिने आम्हाला शाळेतही घातले. चार लोकांपुढे आम्ही मुलांनी दीन, केविलवाणे दिसू नये, आमचे शिक्षण व्हावे, आमच्या मनावर चांगले संस्कार व्हावेत यासाठी तिची सारखी धडपड चाललेली असायची.

पुढे विनायकराव अकस्मात वारले आणि परिस्थिती अधिकच विपरीत झाली. त्याच्या आधीच आमचे एकत्र घरही फुटले होते. विनायकांच्या 'प्रफुल्ल' कंपनीबरोबर दिदी आणि मीनाताई या मुंबईला आल्या होत्या. आणि माई व आम्ही सर्व भावंडे खानदेशात थाळणेर येथे आमच्या आजोळी जाऊन राहिलो होतो. कोवळ्या वयाच्या आपल्या दोन मुली मुंबईला परक्या माणसांत कशा दिवस काढीत असतील या कल्पनेने माई विलक्षण कासावीस होई. दिदीच्या पत्रांची ती आतुरतेने वाट पाही आणि पत्रातल्या मजकुरावरून मुंबईतल्या परिस्थितीचा अंदाज घेण्याचा ती प्रयत्न करी. दिदीची पत्रे संयमाने लिहिलेली असत. पण या दोघींना इकडे खूप त्रास होत असला पाहिजे हे त्या पत्रांतूनही जाणवल्यावाचून रहात नसे. चव्वेचाळीस साली मुंबईला स्फोट झाला त्यावेळी दिदी आणि मीनाताई मुंबईतच होत्या. आपल्या मुलींचे तिकडे काय झाले असेल या कल्पनेने माई तेव्हा अतोनात घाबरून गेली होती.

पुढे दिदीने आम्हा सर्वांना मुंबईला आणले आणि आम्ही नाना चौकात राहू लागलो. आता दिदीची कामे एकाएकी खूप वाढली. सारा दिवस ती गाण्यांचे रेकॉर्डिंग करण्यात गढलेली असे.

त्यावेळी दिवसच्या दिवस असे जात की सकाळी आम्ही उठावे तो दिदी पहाटेच उठून कामाला गेलेली असे आणि रात्री ती परत येई तोवर आम्ही गाढ झोपलेले असू. सकाळी फक्त कपभर कॉफी घेऊन ती जाई. नंतर तिचे दुपारचे खाणे, चहा सारे बाहेरच होत असे. आता ती साड्या नेसत असे. पांढरी सुती साडी, पांढरा ब्लाऊज, केसांच्या दोन वेण्या, कसलेही प्रसाधन न केलेला चेहरा अशी तेव्हाची दिदी आजही डोळ्यांपुढे स्पष्ट दिसते. यावेळी तिला इतकी कामे असत की कधी कधी रेकॉर्डिंग उरकून घरी परत यायला तिला पहाटेचे तीन, चार देखील वाजत.

नंतर दिदी एकदम भराभर प्रसिद्ध होऊ लागली. तिची गाणी रेडिओवर वाजू लागली. पण तिच्या या प्रसिद्धीचे खरे स्वरूप किंवा महत्त्व कळावे एवढाही समज तेव्हा आम्हाला आला नव्हता. त्यामुळे आम्हाला त्याचे काहीच विशेष वाटत नसे. तोवर आमच्या घरी रेडिओ देखील आलेला नव्हता. कित्येकदा दिदीची गाणी आम्ही लोकांकडच्या रेडिओवरच ऐकत असू.

पन्नास साली मद्रासच्या 'ज्युपिटर' कंपनीने चित्रपटासाठी दिदीची गाणी घ्यायचे ठरवले आणि रेकॉर्डिंगसाठी त्यांनी तिला मद्रासला बोलावले. दिदीला खूप आनंद झाला. ती आम्हाला म्हणाली, "आता तुम्हा सर्वांना मी मद्रासला घेऊन जाईन!" आणि आम्ही सगळीजणे मद्रासला गेलो. आम्ही सर्वांनी मिळून केलेला तो पहिलाच मोठा प्रवास. या प्रवासात आम्ही खूप मजा केली.

याच सुमारास घडलेला एक विलक्षण प्रसंग आज इतक्या वर्षांनंतरही काल घडल्यासारखा स्पष्टपणे मला आठवतो आहे. बावन्नत्रेपन्न सालची गोष्ट असेल. नागपूरकरांनी नागपूरला दिदीच्या गाण्याचा कार्यक्रम ठरवला. कार्यक्रमासाठी दिदी, मी आणि बाळ गेलो होतो. पण नागपूरचा असह्य उन्हाळा आम्हाला बाधला की आणखी काही कारण झाले कोण जाणे, आम्हा तिघांनाही खूप ताप भरला. दिदी तर बेहोष अवस्थेत होती. आम्हाला कार्यक्रमाला उपस्थित राहणे केवळ अशक्य होते. आमच्या दिमतीला तिथले डॉक्टर देखील होते. आणि त्यांनीही कार्यकर्त्यांना कार्यक्रम होऊ शकणार नाही असे निक्षून सांगितले. पण कार्यक्रमाच्या संचालकांनी मात्र प्रेक्षकांना घाबरुन की काय कुणास कळे, दिदी आता येईल मग येईल असे खोटेच सांगून त्यांना थोपवून धरण्याचा प्रयत्न केला. थोड्या वेळाने प्रेक्षक खवळले. त्यांचा संताप आटोक्याबाहेर गेला. त्यांनी खुर्च्या फेकल्या, सामानाची मोडतोड केली. कार्यक्रमासाठी उभारलेल्या मांडवाला आग लावून दिली. एकच गोंधळ उडाला. आमचा दोष नसताना आमच्यावर ठपका आला. तेव्हापासून दिदी नागपूरला जात नाही.

नाना चौकात आम्ही राहत होतो तेव्हाची आणखी एक गंमत आठवते. दिदीला भरपूर पैसे मिळू लागल्यावर तिने आम्हा भावंडांसाठी खूप भारी कापड विकत आणले. आम्हा सर्वांना हर प्रकारचे कपडे शिवून कपड्यालत्त्यांची अगदी चंगळ करून टाकायची असा तिचा बेत होता. ते सर्व कापड तिने एका शिंप्याकडे दिले. आमच्या कपड्यांची मापे घेऊन आणि कापड घेऊन शिंपी निघून गेला, तो पुन्हा आलाच नाही! कापड गेले नि कपडेही गेले.

त्या कपड्यांची नि त्या शिंप्याची आम्ही किती दिवस आशाळभूतपणे वाट बघत होतो!

नाना चौकात राहात असताना आमची मोठी चैन म्हणजे रविवारचा सिनेमा. दर रविवारी नाना चौकातून चालत चालत आम्ही थेट 'ईरॉस' पर्यंत जात असू. तेथे चित्रपट बघत असू. येताना 'पॅरिशियन डेअरी'त न चुकता नियमाने कोल्ड कॉफी घेत असू नि पुन्हा चालत चालत घरी परत येत असू. कधी कधी रात्री परत यायला आम्हाला बारा देखील वाजत. अशा वेळी आमच्या-बरोबर बहुधा आमचा आतेभाऊ पंढरीनाथ कोल्हापुरे हा असे. तो खूप विनोदी असल्यामुळे सारख्या कोट्या करून तो आम्हांला हसवायचा. या आमच्या कार्यक्रमात मंगला नागेशकर ही आमची मैत्रीण, आणि दिग्दर्शक माधवराव शिंदे हेही कधी कधी भाग घेत.

एकदा दिदीच्या मनात आले, साऱ्यांनी मिळून सिंहगड बघायला जायचे. तिने दोनशे रुपये

जमवले. माधवराव शिंद्यांनी शंभर रुपये गोळा केले. तेवढे पैसे घेऊन आम्ही पुण्याला गेलो. पुण्यातल्या पुण्यात पायीच खूप हिंडलो. 'जीवन'मध्ये जेवलो. सिंहगडला गेलो. आणि तिथून भयंकर दमून आल्यानंतर रात्री कुठल्यातरी थिएटरमध्ये लागलेले 'सीधा रास्ता' हे चित्र पाहिले. बसमध्ये स्वेटर्स चोरीला गेली, मग रात्री एक वाजता थंडीने कुडकुडत चालत घरी परत आलो !

दारिद्र्य आणि ऐश्वर्य—जीवनाच्या या दोन्ही अवस्था आम्ही अनुभवल्या. पण आमच्या घरातले वातावरण फारसे कधी बदलल्याचे मला आठवत नाही. आमच्या घरात जेवण हा मोठा समारंभ. अशा वेळी घरी असतील त्या माणसांना पंक्तीला थांबवून घेण्याची दिदीला मोठी हौस. माझ्या वडलांपासून ही परंपरा चालत आली आहे. आम्हा भावंडांचे एकत्र खाणेपिणे, थट्टामस्करी, गप्पा, हंसणेखिदळणे सतत चालू असते. त्यामुळे घर गाजत राहते. आम्ही एकमेकांत खूप भांडतो देखील. पण परक्यांपुढे मात्र आम्ही सारी एक असतो. नातेवाईकांपुढे देखील सतत आम्ही एकीने वागत आलो आहो. त्यामुळेच आजवर आमच्यांत कोणी फूट पाडू शकले नाही, गरिबी होती तेव्हाही नाही. आताही नाही.

दिदी बाहेरच्या जगात एक अत्यंत प्रसिद्ध अशी व्यक्ती आहे. मोठी कलावंत आहे. बाहेर ती कुठेही गेली तरी सर्वत्र तिला विशेष वागवणूक मिळते. पण घरात ती स्वतःचे वेगळेपण कधीही जाणवू देत नाही. थोरली बहीण म्हणूनही नाही, की मोठी कलावंत म्हणूनही नाही. घरात ती आमच्यातलीच एक सतत असते.

दिदीला शॉपिंगची भयंकर हौस आहे. त्यासाठी नाना दुकानांतून ती हिंडेल. आणि कधी दमणार म्हणून नाही. अशा वेळी मात्र मी तिला न चुकता बरोबर हवी. दिदी काय काय खरेदी करील याचा नेम नाही. साड्या, पर्सेस, माळा, सेंटस्, हातरुमाल, बहिणीच्या मुलांसाठी कपडे व खेळणी इथपासून तो क्रोकरी, रेकॉर्डस्, ट्रॅन्झिस्टर्स, रेडिओ इथपर्यंत सारे ती खरेदी करीत असते. लोकांना प्रेझेंटस् देण्याची तिला विलक्षण हौस आहे. घरातल्या माणसांपासून तो मित्रमैत्रिणींपर्यंत साऱ्यांचे वाढदिवस नेमके ध्यानी ठेवून त्या दिवशी त्यांना ती भेटी पाठवते. साड्यांच्या खरेदीबाबत ती अतिशय चोखंदळ आहे. पण तितकीच अनिश्चित. एक साडी घ्यायची असेल तर दुकानदाराला हजार साड्या काढायला लावील. आणि मग मला म्हणेल, "तू पसंत कर." मी साडी निवडते. गाडीत जाऊन बसेपर्यंत तिला ती साडी पसंत असते. पण मग पुन्हा म्हणते, "राणीमा, तू ही साडी परत करून ये. मला आता ही आवडत नाही."

सांगायला विसरलेच. ती मला 'राणीमा' म्हणते. बंगाली पद्धतीचे हे लाडके नाव तिने कौतुकाने मला दिले आहे.

एकदा तर दिदीने गाडी पसंत केली आणि मग तिची लहर फिरली. बाळला म्हणाली, "दुकानदाराला तू नाही म्हणून सांग." बाळची पंचाईत झाली. आता शब्द कसा बदलणार ? शेवटी आशाताई मदतीला धावून आली. तिने दुकानदाराची कशी समजूत पटवली कोण जाणे ! तो प्रसंग निभावला.

जेवणांत दिदी खूप चोखंदळ आहे. जेवते अगदी थोडे, पण आवडीनिवडी जास्त. मांसाहार तिला विशेष प्रिय आहे. पण वेळप्रसंगी तिखटात कच्चे तेल ओतून त्याच्याशी भाकरी आवडीने खाईल. रेकॉर्डिंग करून घरी यायला तिला रोज दुपारचे तीनचार वाजतात. अशा वेळी जेवण थंड होऊन गेलेले असते. मग ती थोडेसे काहीतरी खाल्ल्यासारखे करते. नाहीतर दुपारच्या जेवणाला अजिबात फाटा.

दिदी सतत उद्योगात गढलेली असते. त्यामुळे गेली अनेक वर्षे घरातली सारी व्यवस्था मीच बघते. पैसा अडका, ठेवरेव बघणे, आल्यागेल्यांचे स्वागत करणे, जेवणाची व चहाची व्यवस्था

पाहणे, निरोप सांगणे, फोन घेणे ही सर्व कामे आपोआपच माझ्यावर येऊन पडली आहेत. एकदा मी एकादा निर्णय घेतला तर तो सहसा घरात कोणी बदलीत नाही. दिदीसुद्धा त्यात हस्तक्षेप करीत नाही.

कित्येकदा गंमत होते. कोणाला तरी फोनवर तिच्याशीच बोलायचे असते. काम अगदी क्षुल्लक असते. अशा वेळी दिदी कामात असल्यास दिदी म्हणून मीच दोन शब्द त्या माणसाशी बोलून टाकते. फोनवर आमचे आवाज वेगळे ओळखायला येत नाहीत. तो माणूस खूष होतो. खोटे बोलण्याचे पाप मात्र माझ्या पदरी पडते. पण त्याला काय करायचे ?

दिदीबरोबर चित्रपटांतली अनेक गाणी मी गाइली आहेत. कलावंत म्हणून तर ती मोठी आहेच. पण सहकारी म्हणून ती फार मदत करणारी आहे. गाण्याचे मर्म समजावून देईल, अवघड जागा स्वतः गळ्यातून काढून दाखवील, शब्दोच्चार चुकत असल्यास ते दुरुस्त करील अशी ती गाताना पावलोपावली मार्गदर्शन करते. तिच्याबरोबर गाणे म्हणावयाची संधी मिळणे ही आनंदाची व भाग्याची गोष्ट आहे.

दिदीच्या संगतीत मी खूप भटकले आहे, सर्व महाराष्ट्र तिच्याबरोबर हिंडले आहे. कलकत्ता, दिल्ली, मद्रास, कश्मीर, कन्याकुमारी सारे तिच्याबरोबर पाहिले आहे. प्रवासात जेथे जावे तेथे तिच्या अफाट प्रसिद्धीचा व अपूर्व लोकप्रियतेचा प्रत्यय येतो.

आम्हा भावंडांना दिदीने फार ममताळूपणाने वागवले आहे. आमचे खूप लाड केले आहेत. स्वतःच्या आधी आमचा विचार तिने सतत केला आहे. माझ्यावर ती कधीही रागावलेली नाही. मग कठोर शब्द बोलून मला दुखवणे तर दूरच. आम्ही हवा तसा खर्च करतो. त्याचा जाब ती कधी विचारीत नाही. पुष्कळदा आम्ही एखाद्या वेड्या छंदांत पैसे घालवतो. मला आठवते, एकदा मी नि बाळ बाजारात गेलो नि हजारो रुपयांची खूप खेळणी मुलांसाठी घेऊन आलो. अगदी वेड्यासारखी. घरी येताना भीती वाटत होती, काय हा खर्च ? आता दिदी काय म्हणेल ?

दिदी काही म्हणाली नाही; नुसती हसली मात्र.



उषा मंगेशकर

सप्तस्वर

अभिजात शास्त्रीय गायक, नामवंत संगीत दिग्दर्शक, ख्यातनाम पार्श्वगायक, कुशल वादक आणि कला-क्षेत्रातले थोर तपस्वी यांना लताबाईंच्या कलेसंबंधी विचारले असता त्यांनी उत्स्फूर्तपणे त्यांच्याविषयी जे काही सांगितले ते हे.

बालगंधर्व

कुमारी लता चित्रपटसंगीतातल्या आपल्या कारकीर्दीची पंचवीस वर्षे पूर्ण करीत आहे हे ऐकून आश्चर्य आणि आनंद वाटला. या क्षेत्रातली तिची कामगिरी फार मोठी आहे. वडलांनी नाट्यक्षेत्र गाजवले. मुलगी आज चित्रपटक्षेत्रात आपला जमाना गाजवीत आहे. या प्रसंगी कुमारी लता हिला माझे अनेक शुभाशीर्वाद.

हिराबाई बडोदेकर

चित्रपटसृष्टीत लताच्या तोडीची दुसरी गायिका नाही. कोणत्या वेळी भावनेचा अचूक परिपोष करावा याची अचूक जाणीव आणि विलक्षण भावपूर्णता यामुळे तिने म्हटलेले कोणतेही गाणे हमखास जमून जाते आणि रंगते. स्वर हाच गाण्याचा प्राण असे मी मानते. लता स्वरात इतकी बुडून गेली आहे की ती काहीही गात असली तरी ते अत्यंत सुरेल आणि मधुरच लागते.

मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर

मा. दीनानाथांची कन्या या नात्याने मी कित्येक वर्षे लताबाईंना दुरून ओळखत असलो तरी त्यांच्या प्रत्यक्ष परिचयाचा योग फार उशीरा म्हणजे 'कीचकवध' या चित्रपटाच्या गाण्यांच्या वेळीच आला. गाण्यांचे ध्वनिमुद्रण पुण्याला होणार होते. तरीही "मास्टर कृष्णराव संगीत दिग्दर्शन करीत असतील तर मी अवश्य येईन" असे लताबाईंचे उत्तर आले व त्याप्रमाणे त्या स्वतः पुण्याला आल्या. 'उपवर झाली लेक लाडकी' 'सांगु कुणा श्रीकृष्णा' इत्यादी गाणी त्यांनी अत्यंत चापल्याने आत्मसात केली. आणि एकेका 'टेक' मध्ये त्यांचे ध्वनिमुद्रणही करून टाकले. याच चित्रपटातले 'धुंद मधुमती रात रे' हे गीत मात्र मुंबईला ध्वनिमुद्रित केले गेले. लताबाई दोन तीन दिवस या गाण्याची तालीम करीत होत्या. त्यातील गंधाराची तान त्यांनी चटकन आत्मसात केली. या गीताचे ध्वनिमुद्रण झाल्यावर "आज आपण प्रभातची आठवण करून देणारे संगीत मला दिले आणि मी ते गाईले" असे तृप्त मनाने त्या म्हणाल्या. लताबाईंचे ते गुणग्राहक उद्‌गार ऐकून मलाही मोठा आनंद झाला. हातामध्ये गीताचा कागद घेतलेला, त्या कागदावर स्वतःच्या खास अशा खुणांनी स्वरांचे बारकावे टिपलेले, यापेक्षा आणखी कसलेही साह्य न घेता सारे स्वर गळयातून बिनचूक काढणाऱ्या लताबाईंच्या बुद्धिमत्तेबद्दल मला विलक्षण कौतुक वाटले. तसेच चाली आत्मसात करताना त्यांचा जो निरलसपणा आणि परिश्रमशीलता मला दिसून आली त्यानेही मी चकित होऊन गेलो. या गुणी मुलीला ईश्वर दीर्घायुष्य देवो.

भीमसेन जोशी

'हिज मास्टर्स व्हॉइस' कंपनीचे रूपजी यांनी एकोणीसशे बावन्न साली माझी व लताबाईंची ओळख करून दिली. त्यावेळी चित्रपटसंगीतात त्यांचे नाव अद्याप आजच्यासारखे हुकमाचे पान बनले नव्हते. तरीही त्यांच्या आवाजाची अस्सल जातकुळी त्यांच्या भविष्यकालीन प्रसिद्धीची पूर्वसूचना देत होती. त्यानंतर अनेक वेळा मी त्यांना भेटलो. दीनानाथांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने माझे गाणेही त्यांच्याकडे झाले आहे.

एकोणीसशे बावन्नपासून मी त्यांचे गाणे आवर्जून ऐकत आलो आहे. अत्यंत परिणामकारक गाणे म्हणण्याची त्यांची शैली केवळ अजोड आहे. कोणत्याही भाषेतील गीते म्हणताना त्या भाषेला योग्य अशा प्रकारे स्वतःच्या आवाजाला वळण देणे आणि त्या त्या भावानुरूप शब्दोच्चार करणे या दोन गुणांनी लताबाईंच्या असाधारण लोकप्रियतेला फार मोठा हातभार लावला आहे. त्या जरी शास्त्रीय संगीत प्रत्यक्ष गात नसल्या तरी त्याच्या ज्ञानाची भक्कम बैठक त्यांच्या गाण्याला असल्याचे त्यांच्या ध्वनिमुद्रित संगीतावरून जाणत्यांच्या लक्षात येईल. किंबहुना त्यांच्या भावगीतांना व चित्रपटांतील गाण्यांना अनेकदा दिलेल्या चाली या शास्त्रीय संगीताची सुरावट घेऊनच अवतरत असतात. त्यामुळे आज शास्त्रीय संगीतही जनसामान्यांत अधिकाधिक लोकप्रिय करण्याचे श्रेय लताबाईंचेच आहे असे म्हटल्यास त्यात कसलीही अतिशयोक्ती होणार नाही.

केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही लताबाईसंबंधी विलक्षण आदरभाव आणि कौतुक आहे. मी काबूलला गेलो असताना प्रत्येकाने "तुम्ही लता मंगेशकरला ओळखता का? आम्हाला तिचे गाणे फार आवडते." हे वेगवेगळया प्रकारे मला ऐकवले होते.

अशा या जगप्रसिद्ध कलावतीला दीर्घायुरारोग्य लाभो हीच शुभेच्छा.

गजाननराव जोशी

गायकाने आपला स्वतःचा असा खास श्रोतृवर्ग तयार करणे आणि तो सतत दीर्घकाळ टिकवणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. गायकाच्या श्रेष्ठतेची ती एक महत्त्वाची कसोटी आहे. कु. लता मंगेशकर यांच्या गायनाचा चाहता रसिकवर्ग फार फार विस्तृत आहे. आणि सतत पंचवीस वर्षे तो वाढतच आहे. ही गोष्ट या दृष्टीने अर्थपूर्ण आहे.

कु. लताचा आवाज ही एक खास चीज आहे. परमेश्वराने जणू मोरपीस अमृतात बुडवून ते तिच्या गळ्यावरून अलगद फिरवले आहे! चाफ्याच्या फुलाला मिळालेले रूपगंधाचे देणे जितके नैसर्गिक तितकीच लताला लाभलेली आवाजाची देणगीही निसर्गदत्त होय. वर्षानुवर्षे आवाजाची ज्योत सतत तेवढ्याच तेजाने चमकत राहणे ही परमेश्वरी कृपाच समजली पाहिजे. लताच्या आवाजाला हिरकणीसारखी एक धार आहे. त्यामुळे प्रत्येक स्वराला ती सहजगत्या भिडते आणि त्यांना एक वेगळेच तेज प्राप्त होते. माझ्या दृष्टीने लताच्या आवाजाचे हे एक खास वैशिष्ट्य आहे. गाण्यातले खटके, मुरक्या आणि ताना खास ठेवणीतल्या असल्यामुळे लताने गाइलेल्या कोणत्याही गाण्याला अलौकिक आकर्षकता प्राप्त होते. विशेष म्हणजे लयकारीचीही तिला फार चांगली जाण आहे. आपले एक तरी गाणे लता मंगेशकर हिने गावे असे प्रत्येक गीतरचनाकाराला जे वाटते ते उगाच नव्हे!

कै. मा. दीनानाथराव यांचेही गाणे मी पुष्कळ ऐकले आहे. त्यांच्या आवाजाची नजाकत काही वेगळीच होती. तो आवाज सुंदर, मधुर व तडफदार होता. लताच्या गाण्यात आपल्या वडलांच्या गायकीची ही सारी वैशिष्ट्ये उतरली आहेत.

कु. लता मंगेशकरचे गाणे ऐकले की म्हणावेसे वाटते, "धन्य ते गायनी कळा!"

फिरोज दस्तुर

लता मंगेशकर यांचा आवाज मुळातच अत्यंत मधुर आहे. पण स्वरमाधुर्याला भावपूर्णतेची जोड असल्याशिवाय गाणे परिणामकारक होत नाही. लताबाईंचे फार मोठे वैशिष्ट्य हे की कोणतेही गीत त्या अत्यंत भावपूर्णतेने आणि समरसतेने गातात. त्यांना ती जणू ईश्वरदत्त देणगीच आहे.

लताबाईंचा गळा असा लवचिक आहे की त्याला कुठेच अटकाव नाही. अत्यंत नाजुक व अवघड हरकतीही त्या इतक्या सहजतेने आणि विनाप्रयास घेतात की ऐकणारा विस्मयाने थक्क होऊन जातो. हरकतींचा योग्य वेळी आणि योग्य जागी वापर करण्याची अचूक समज त्यांना आहे. या सर्व गुणवैशिष्ट्यांनी नटलेले त्यांचे गाणे अत्यंत सौंदर्यपूर्ण होते.

त्यांची कितीतरी गाणी मी मोठ्या आवडीने ऐकली आहेत आणि त्यातल्या कितीतरी सुरेख जागा माझ्या पक्क्या ध्यानात राहिल्या आहेत. 'अलबेला' चित्रपटातील 'धीरेसे आजा री अखियनमें निंदिया आजा री आजा' या लोरीतली एक खूबसुरत हरकत अशीच कायमची लक्षात राहून गेली आहे.

आजच्या पार्श्वगायिकांत तर लताबाई निर्विवाद सर्वश्रेष्ठ आहेतच. आणि नव्या गायिकांमध्ये आज तरी कोणीही त्यांच्या तोडीची मला दिसत नाही.

माणिक वर्मा

अलिकडील पुष्कळ चित्रपटांतून शास्त्रीय संगीतावर आधारित असलेली अनेक गाणी लताबाईंनी गाईली आहेत. आणि ती लोकप्रियही झाली आहेत. अशा गाण्यांमुळे शास्त्रीय संगीताचा प्रसार होण्यास आणि ते अधिक लोकप्रिय होण्यास लताबाईंचा फार मोठा हातभार लागला आहे. आणि पुढेही तो सतत लागत राहील. या दृष्टीने मला एक सूचना येथे करावीशी वाटते. आजकाल शास्त्रीय संगीतात पुष्कळ कलावंतांनी चांगल्या चांगल्या चिजा बांधल्या आहेत. त्यांतल्या निवडक चिजा लताबाईंकडून ध्वनिमुद्रित करून घेऊन आकाशवाणीने 'विविध भारती' वरून त्या प्रक्षेपित कराव्यात. लताबाईंच्या गाण्याचे आकर्षण श्रोत्यांना जबरदस्त असल्यामुळे अनायासे लोकांना शास्त्रीय संगीताचीही गोडी वाटू लागेल. लताबाई जातिवंत कलाकार आहेत. तेव्हा त्या स्वतःही या कामी आस्थेने लक्ष घालतील अशी माझी खात्री आहे.

ईश्वराची कृपा, वडलांची पुण्याई, रसिकांचे आशीर्वाद आणि सर्वांच्या सदिच्छा लताबाईंच्या पाठीशी असल्यामुळे यापुढेही त्यांचे आयुष्य सदैव यशस्वी आणि भरभराटीचे होईल याबद्दल मला तिळमात्र शंका वाटत नाही.

धनंजय भट्टाचार्य

आपल्या या पवित्र मातृभूमीने आतापर्यंत हजारो कवी, संत, गायक; अभिनेते आणि अभिनेत्री; उद्योगपती, शिल्पकार, खेळाडू आणि वादक, डॉक्टर, योद्धे आणि राजकारणी निर्माण केले आहेत. पण या देशाने स्वरसम्राज्ञी मात्र एकच निर्मिली आहे. आणि ती म्हणजे लता मंगेशकर. तिच्या कलाजीवनाच्या या रौप्यमहोत्सवप्रसंगी मला तिच्याविषयीं वाटणारा उत्कट भक्तिभाव मी कसा आणि कोणत्या शब्दांत प्रकट करू तेच मला कळत नाही. कारण माझे हृदय संकोचते आणि लेखणीची शक्ती अपुरी पडते. यावेळी त्या सर्वशक्तिमान ईश्वराला मी एवढेच विनवतो : "हे परमेश्वरा, या कलादेवतेच्या कलाजीवनाच्या सुवर्णमहोत्सवापर्यंत मला हयात ठेव. माझी लेखणी शाबूत राहू दे. आणि त्यावेळी माझे सर्वस्व वेचून तिचे गुणगान करण्याची संधी व सामर्थ्य मला दे!"

जितेंद्र अभिषेकी

कै. मा. दीनानाथ व माझे वडील कै. बाळूबुवा, ज्यावेळी गप्पा मारीत बसलेले असत अशा वेळी एकदम दोघांनाही स्फूर्ती आल्याप्रमाणे भर्तृहरीच्या 'वैराग्यशतका'वर तास न तास चर्चा चाले. आणि मध्येच थबकून दोघेही तारस्वरात खणखणीत आवाजाने

> या चिन्तयामि सततं मयि सा विरक्ता
> साप्यन्यमिच्छति जनं स जनोऽन्यसक्तः
> अस्मत्कृते च परितुष्यति काचिदन्या
> धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च ॥

हा भर्तृहरीचा श्लोक म्हणत. श्लोक म्हणताना दोघेही भान हरपून बराच वेळ कुठे तरी अदृष्टात नजर लावून बसत व काही वेळाने सावध होऊन मोठमोठ्याने हसत सुटत! या दोन व्यक्तींच्या जीवनात सातत्याने एक विरक्तीची धार मिसळलेली दिसून येई. देहधर्म म्हणूनच जगल्यासारखे दोघेही वागत. हीच विरक्तीची किनार लताबाईंच्या जीवनात, वर्तनात मला नेहमीच जाणवत आली आहे. ध्वनि-मुद्रणाच्या वेळीं देहभान विसरुन सुराशी एकरूप होणाऱ्या लताबाई काम संपताच मनस्वी कुठेतरी दूरदूर गेलेल्या वाटतात. "माझ्या मनातले संगीत व सूर हे याहीपलिकडे झेप घेणारे आहेत" असेच जणू काही त्यांना सांगायचे असते. दृश्य व श्राव्य चमत्कारांच्याही पलीकडे 'खरा मी' आहे असे सांगणाऱ्या श्री रामकृष्ण परमहंसांसारखे! मला वाटते, माझ्यासारख्याने शब्दांनी हे सगळे सांगण्याचा हा प्रयत्नच व्यर्थ आहे. मला एवढेच म्हणावेसे वाटते की लक्षावधी लोकांना आपल्या संगीताने भारून टाकणाऱ्या लताबाई या त्यांच्या संगीतापेक्षाही मोठ्या आहेत.

हरिप्रसाद चौरासिया

सिनेमाच्या धंद्यात शिरण्याआधी म्हणजे सुमारे चारपाच वर्षांपूर्वी मी कटकला रहात होतो. लताबाईंच्या ध्वनिमुद्रिका ऐकून सारखे मनात वाटत राही की अशा महान गायिकेच्या गाण्याला साथ करण्याचे भाग्य आपल्याला कधी लाभेल काय?

देवाने ही हाक ऐकली असावी. आणि चारपाच वर्षांपूर्वी मी मुंबईस आलो. लताबाईंचा परिचय झाला. त्यांच्याशी अनेकदा संभाषणाचा योगही आला. आणि आज अशी परिस्थिती आली आहे की बहुशः त्यांच्या प्रत्येक गाण्याला बासरीची साथ देण्याचे भाग्य मला प्राप्त झाले आहे.

त्यांच्या संगतीत घालवलेल्या आनंदाच्या क्षणांचा मला कधीही विसर पडणार नाही. त्यांच्या लोकविलक्षण आवाजाइतकाच--किंबहुना थोडा अधिकच--मधुर असलेला त्यांचा स्वभाव माझ्या मनात कायम ठसून राहिला आहे. त्यांच्या गाण्याविषयी माझ्या मनात कायम एक प्रश्नचिन्ह असते की ही गायिका आपल्या कलेत कुठेही कशी रेसभरही कमी पडत नाही!

आमचे वाडवडील सांगायचे की लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र राहत नाहीत परंतु मला विचाराल तर लताबाई ही एकच गायिका अशी आहे की जिच्यामध्ये लक्ष्मीसरस्वतींचा संगम झालेला आपल्याला दिसून येतो.

अशा देवीतुल्य गायिकेकडून मला सदैव आशीर्वाद हवा आहे.

संध्या मुकर्जी

स्वतंत्र भारताची गानकोकिळा आणि माझी प्रिय मैत्रीण कु. लता मंगेशकर हिच्या कलाजीवनाचा रौप्यमहोत्सव साजरा होत आहे. या शुभ प्रसंगी तिचे अभिनंदन करण्याची संधी मला मिळत आहे हे मी माझे मोठे भाग्य समजते. तिच्या सोनेरी स्वराने आमचे संगीतविश्व यापुढेही सतत असेच भरून टाकावे. एकोणीसशे एकावन्न साली सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अनिल विश्वास यांनी दिग्दर्शित केलेल्या एका हिंदी चित्रपटासाठी लताबरोबर द्वंद्वगीत गाण्याची दुर्मिळ संधी मला लाभली होती. सूर्यप्रकाशाने उजळलेली ती सुंदर सकाळ, लताची सुखद संगत आणि तिच्याबरोबर केलेली ती गाण्याची तालीम मी कधीही विसरणार नाही. आम्ही दोघींनी मिळून ते

गाणे म्हटले. गाणे ध्वनिमुद्रित झाले. त्या दिवसापासून आम्हा दोघीमध्ये जो जिव्हाळा निर्माण झाला त्याचे गाढ स्नेहात पर्यवसान झाले. आजतागायत आमची ती मैत्री कायम आहे.

संगीताच्या क्षेत्रातली लता ही एक प्रतिभासंपन्न श्रेष्ठ कलाकार आहे. तिच्या या कलासेवे-बद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जगाच्या सर्व भागांतून आज तिच्यावर गौरवाची फुले उधळली जावीत असे मला मनःपूर्वक वाटते.

शिवकुमार शर्मा

कलेच्या कोणत्याही क्षेत्रात प्रथम येणारे जे होतकरू लोक असतात ते आपल्या पूर्वसूरींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवतात. तथापि खरा प्रतिभाशाली कलावंत केवळ इतरांच्या अनुकरणात कधीच समाधान मानीत नाही. तो नेहमी काहीतरी नवे, अभूतपूर्व आणि अद्भुत शोधण्याच्या मागे लाग-लेला असतो. आणि हा शोध घेताघेताच आपल्या विशिष्ट क्षेत्रात तो खास आपली स्वतःची अशी शैली निर्माण करण्यात यशस्वी होतो.

लताजी या अशा प्रतिभाशाली कलावंत आहेत. चित्रपटसंगीताच्या क्षेत्रात प्रवेश केल्याबरोबर त्यांनी त्या कलेचे त्या वेळचे प्रचलित स्वरूप पार पालटून टाकले. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वराने संगीत-दिग्दर्शकांच्या कल्पकतेला जसे आव्हान दिले तसे त्यांच्या विविध स्वररचनांतही चैतन्य निर्माण केले.

लताजींचा मधुर स्वर हे त्यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य. हा स्वर स्वप्नाळू आहे, ऐंद्रिय संवेदनांना जाग आणणारा आहे, भावनेने भरपूर आहे, आणि त्यांत खास बायकी असा एक ढंग, कोवळीक आणि मृदुता आहे.

भारतातील सामान्य जनतेत संगीताचा प्रसार करण्याच्या कामी चित्रपटसंगीताने फार मोठा हातभार लावला आहे. आणि गेली दोन दशके लताजींच्या अननुकरणीय अशा गोड स्वराने हे चित्रपटसंगीत अक्षरशः घराघरात पोहोचवले आहे. हे लताजींचे फार मोठे कार्य आहे असे मी मानतो. भारतीय चित्रपटव्यवसाय त्याबद्दल त्यांचा सदैव ऋणी राहील.

जितूभाई प्र. मेहता

अभिजात, सुसंस्कृत गायिका असे मी लताबाईंचे वर्णन करीन. आजवर त्यांनी हजारो गीते गाइली, घराघरांतून संगीताला मानाचे स्थान दिले, आणि गायकांना या समाजात मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली. आज सर्वत्र संगीतमय वातावरण निर्माण झाले आहे, याचे श्रेय लताबाईंनाच द्यायला हवे. गेली पंचवीस वर्षे त्यांचा गीतप्रवाह अखंडित वाहतो आहे. पुढेही वाहत राहील. अशी गीते आणि अशी गती यांना संगीताच्या इतिहासात कुठे तोड सापडणार नाही. भाषा जरी भिन्न भिन्न असल्या तरी हृदयाची, भावनांची भाषा एकच असते. लताबाईंनी अनेक भाषांतून गीते गाइली असली तरी त्या गीतांतला अंतः स्रोत भावनांचाच आहे. आणि या भावनांच्या विश्वभाषेने त्यांनी साऱ्या विश्वाशी नाते जोडले आहे.

वामनराव देशपांडे

गेली पंचवीस वर्षे लाखो लोकांना सांगीतिक आनंद आणि सुख देण्याचे कार्य लताबाईंनी अव्याहत केले आहे. ज्या चित्रपटसंगीताच्या समृद्धीला त्यांनी फार मोठा हातभार लावला आहे त्याचा अभिजात संगीतावरही कसा परिणाम झाला आहे याविषयी घरंदाज संगीताचा एक उपासक या नात्याने माझे काही विचार येथे थोडक्यात मांडतो.

अभिजात संगीताचे मी मुख्यतः दोन भाग मानतो. एक 'आकृतिमूलक' (configurative) आणि दुसरा 'भावनाशील' (emotional). चित्रपटसंगीताचा असर झाला आहे तो या दुसऱ्या प्रकारच्या संगीतावर. हे दुसऱ्या प्रकारचे संगीत गेल्या पंचवीस वर्षांत अधिक सुरेल, अधिक नाजुक, अधिक आर्त, लयकारीच्या दृष्टीने अधिक खोचदार, म्हणजे एकंदरीने अधिक कलात्मक आणि विशेष म्हणजे अधिक भावनाशील झाले आहे. इतकी भावनाशीलता अभिजाततेची प्रतिष्ठा सांभाळील किंवा नाही हा प्रश्न विवाद्य असू शकेल. पण इतकी कलात्मकता आणि भावनाशीलता या अभिजात संगीतात आणली गेली याचे बव्हंशी श्रेय मी श्रीमती लता मंगेशकर यांना देईन. गेल्या पंचवीस वर्षांत वाढत्या प्रमाणावर हजारोंच्या संख्येने गाण्यास येणाऱ्या श्रोतृसमाजाचे रंजन करण्यासाठी ही कलात्मक भावनाशीलता खचितच उपकारक ठरलेली आहे. विधात्यानेच हे काम श्रीमती लताबाईंना नेमून दिलेले दिसते. त्यांच्याखेरीज इतर कोणाकडून हे काम सहसा झालेही नसते. म्हणून अतिशय कृतज्ञताबुद्धीने या शुभप्रसंगी मी त्यांना धन्यवाद देतो आणि त्यांना आणि त्यांच्या इतर कुटुंबियांना दीर्घायुरारोग्य चिंतितो.

विजय तेंडुलकर

एक मुलगी गाते

एक मुलगी गाते.
रोज गाते.
एकसारखी ती गातेच आहे.
थांबत नाही.

वेळूचे बन असते ना, त्यात वेडे वारे सुटले म्हणजे कसे भणभणत, गुणगुणत, कुजबुजत आणि कधी नुसतेच वणवणत राहते—थकले, भागले,—तशी ही गात राहिली आहे असे माझ्या मनात नेहमी येते.

मध्यरात्री हळूच जाग यावी आणि हे वारे कसल्याशा ओल्या वेदनेने रडत असल्यासारखे भळभळ वाहतानाही मी एकदा ऐकले आहे.

रात्रभर मला काही केल्या झोप येत नव्हती. वाटत होते की हे वेडे वारे कोणती शहाणी, अनिवार वेदना वागवते आहे?

असाच प्रश्न मला या मुलीच्या गाण्याबद्दल पडतो. जरा कुठेशी दिवसाकाठी स्वस्थचित्त आणि स्वयंतुष्ट असावे तर या तटबंद्या फोडीत शुभ्र वस्त्र ल्यायलेल्या कोणी मोठ्या मोठ्या दुःखी डोळ्यांच्या जोगिणी वाऱ्यावरून तरंगत माझ्यापुढे येऊन माझी स्वयंतुष्टता जाळू लागतात.

ते तिचे स्वर असतात. वेदनेने आणि विरक्तीने भरलेले. मुबारक है तुम्हे खुशिया, मुझे गमसे मुहब्बत है...अरे तुझी खुषी तुला लखलाभ, मी माझ्या वेदनेवरच प्रेम करते आहे...माझी सखी माझी वेदना.

न ऐकण्याचा अट्टाहास लटका पडतो आणि आतड्यांत तुटू लागते, बैचैनी झडपते.

खुषी पार धुवून जाते.

आणि ही पोर कुठे गडप झालेली असते.

ओले डोळे कोरडे करीत रागावून विचारावेसे वाटते, बाई ग, काय साधलेस?

मग आठवण होते एकदा मध्यरात्री रडताना ऐकलेल्या त्या एकाकी, वेड्या, भळभळत्या वाऱ्याची.

विजय तेंडुलकर

ते तरी काय साधते?

ते वाहते, तशी ही गाते.

यानेच माझी समजूत पटते.

एवढ्याने सगळे संपत नाही.

कधी उगीच जरासे बेचैन, विमनस्क असावे—एकटेच. तर ही येऊन विचारील, का रडलात? सांगा ना, का?...तबाही तो हमारे दिल को आयी...आप क्यूं रोये? का तुमचे अश्रू? अहो बरबाद तर माझे काळीज झाले, मग सांगा तुम्ही का रडता?...की हे माझेच अश्रू तुमच्या डोळ्यांवाटे वाहताहेत? सांगा ना तुम्ही का रडता? बघा हां...हे आवरा, नाही तर आम्ही देखील—

खलास! सारा निग्रह खलास! रडवल्याशिवाय ही पोर मुळी स्वस्थ राहणारच नाही!...

सगळ्या उरल्या सुरल्या स्वास्थ्यात शोक कालवून स्वतः आपल्या हळव्या हळव्या स्वरांचे उमासे काढीत कुठे तरी आली तशी बेपत्ता होईल!

अरे पण का? का हे?

रान आपल्या हुंदक्यांनी भारून निघून जाण्याचा वाऱ्याला काय अधिकार, पोरी?

उत्तर नसते. गाणाऱ्या वाऱ्याचे वेडे वाहणे आपले चालूच रहाते.

कधी खूप व्यग्र असावे, कामातून डोके काढण्याला क्षणाचीही उसंत नाही. मेंदूत किडे असतात.

नको असताना मुरडत, लचकत, ठुमकत, समेसमेवर जीव घेत हिच्या छुमछुमत्या स्वरांच्या नाचऱ्या गौळणी आल्याच व्यत्यय आणायला!

सखी री पीका नाम नाम न पूछो...

मैं कैसे बताऊं, तो कहेते न जाऊ...

नको बताऊस, काही सांगूही नकोस. पण हे जीवघेणे, सगळे गद्य व्यवहार विसरून वेडेखुळे करणारे गाणे आधी बंद कर!

ही दुनिया व्यवहारी आहे. व्यवहार गद्यच असतात. तुझ्या गुंगवून टाकणाऱ्या स्वरांनी काही पोटे भरत नसतात! व्यवहारात माणसाने कसे शहाणे असावे लागते; वेड तुझे तुला ठीक आहे.

वाटता वाटताच सगळे वाटण्याच्या मुठीतून हरवते.

ही निघून गेलेली असते तेव्हा आत लाजऱ्याबुजऱ्या नववधूचे लोभसवाणे, मुग्ध विभ्रम हिच्या अवीट स्वरांना बिलगून चौफेर मांडलेले असतात आणि भोवती परका, नकोसा वाटणारा अपरिहार्य, रूक्ष, नीरस, व्यवहारी पसारा!

असा संताप येतो!

नव्हे, हिचा नव्हे, व्यवहाराचा.

तीच तर गंमत आहे. वाऱ्यावर का कुणी संतापत असते? त्यातून, गाणाऱ्या वाऱ्यावर?

आणि संतापले ना, तरी ते वेडे कुठे कुणाचा संताप मानते?

येऊन बिलगतेच, गुदगुल्या करते. कानात कुजबुजते. भोवती गिरक्या घेते. गुणगुणत राहते,

मैंने रंग ली आज चुनरिया...सजना तोरे रंगमें.

कसे विरघळायला होते. स्वरांच्या धुंद रंगांत 'चुनरिया'सारखे चिंब व्हायला होते. थट्टा नव्हे.

तुझ्या रंगात माझ्या राजा, माझी ओढणी मी रंगवून घेतली आहे...ओढणीच नव्हे, मीच कणांकणांत जशी रंगले आहे...कणांकणांत.

ओ हो हो! कसला संताप नि काय!

मध्येच चमकून वाटते, मध्यरात्री एकदा रानातून रडत वाहत होते ते हेच धुंद वारे का?

वाऱ्याचा काही नियम नाही, हेच खरे. ते मुक्त!

येईल तिथून आणि येईल तसे येईल.

कधी उलट सुलट, गिरगिरते.

'ओ सजना बरखा बहार आयी'ची उल्हसित वर्दी देत ते धावत येईल आणि 'लग जा गले फिर ये हसीन रात हो न हो'... ची कातर क्षणभंगुरता, हुरहुर, उदासी गात जाईल.

ही रम्य रात्र... ही अवीट, हवीहवीशी रात्र... कुणास ठाऊक, पुन्हा येईल, न येईल... पुन्हा गाठभेट पुढल्या जन्मी होईल, न होईल... नको ती आश्वासने देणे, घेणे, ते फसणे, फसवणे... नकोच... लग जा गले... जवळ ये... खूप जवळ ये... आताच ये...

—तर असे हे वारे, गाणारे वारे. मुक्त. लहरी. बेभरवशाचे. कोवळे, हळवे, तसेच झोंबरे, दाहक. कधी निर्भर, आनंदी आणि कधी उदास, स्फुंदते, गूढ. अद्‌भुत गंधांनी भारून झपाटून कधी येणारे तर केव्हा बेचैनीने नुसतेच रिते उसासणारे. घुमणारे. क्वचित वादळी, आक्रोशते, कर्कश. कधी हवेहवेसे, तर केव्हा तितकेच नकोसे.

पण वारे येत राहिले आहे आणि रानाला आता त्याची जशी सवय जडली आहे. रानातले वेळू त्याची वाट पाहतात.

आणि जेव्हा ते क्वचित येत नाही ना, तेव्हा आपल्या मुक्या मुखांनी सारे रान दाटून येऊन त्याला आळवीत असते.

हेही मी एकदा अपरात्रीच ऐकले आहे; श्वास आवरून.

तसे या गाणाऱ्या वाऱ्याचे, या अप्रतिहतपणे गात राहिलेल्या मुलीचे आमच्या आयुष्यात झाले आहे.

कधी ती येत नाही. फार गरज असते पण तिचे स्वर उमटत नाहीत.

असे अगदी क्वचित होते. होते बाकी.

पण तेव्हा आमच्या आतले रान तिच्यासाठी दाटून येते आणि तिच्यासाठी तिचेच एखादे गाणे गाऊ लागते.

राजाकी आयेगी बरात... नाहीतर, ओ, सजना बरखा बहार... किंवा ते सपनोंमे अगर मेरे तुम आओ तो सो जाऊं... बीती हुई वो यादे... हसती हुइ आती है... लहरोंके तऱ्हा दिलमे... आती कहीं जाती है... यादोंके तऱ्हा तुमभी... आ जाओ तो सो जाऊं...

सपनोंमें अगर मेरे... तुम आओ तो सो जाऊं...

तुम आ ओ तो सो जाऊं...

विजय तेंडुलकर

सुधीर फडके

दिव्य शक्ती

लताची आणि माझी ओळख नक्की कधी व कुठे झाली ते मला आठवत नाही. प्रथम औपचारिक ओळख, मग काही दिवसांचा परिचय, मग स्नेह आणि त्यानंतर दाट स्नेह अशा पायऱ्या तिच्या संबंधात कधी लागल्या नाहीत. ओळख झाली ती दृढच.

'प्रभात'मधे मी संगीतदिग्दर्शक म्हणून काम करू लागल्यावर 'आपकी सेवामे' या बाहेरच्या एका हिंदी चित्रपटातले एक ठुमरीवजा हिंदी गाणे तिथल्या थिएटरमधे सतत लावले जात असे. जो तो येऊन ते गाणे ऐकून जाई. हा आवाज मी पूर्वी कै. मास्टर विनायकांच्या काही चित्रपटांत ऐकलेला आहे असे वाटत होते. काहीतरी वेगळा, अभूतपूर्व आवाज ऐकल्याची जाणीव होत होती. मग कळले की हा आवाज लता मंगेशकर नावाच्या मुलीचा आहे.

श्रीमती ललिता देऊळकर, शमशाद, खुर्शिद, जोहराबाई यांच्या वैभवाचा तो काळ होता. एकोणीसशे अठ्ठेचाळीस साली प्रभातने संत जनाबाई हा हिंदी व मराठी चित्रपट काढायचे ठरवले. त्याचे संगीत माझ्याकडेच होते. जनाबाईची गाणी ललिता देऊळकर गाणार होत्या. त्याशिवाय जात्यावरच्या काही ओव्या घ्यायच्या होत्या. त्यांतील एका ओवीसाठी लताला बोलवायचे ठरले. लता मुंबईहून पुण्याला प्रभातमधे आली. एक दिवस गाण्याची तालीम व दुसऱ्या दिवशी ध्वनिमुद्रण करायचे अशी आमची कल्पना. माझी संगीतरचना थोडी कठिण असते. त्यामुळे गाणे चांगले बसायला एका दिवसापेक्षा कदाचित जास्त वेळ लागेल अशा तयारीत सर्वजण होतो. कोणाही पार्श्वगायकाने वा गायिकेने माझ्या चाली मी सांगेन तशा, म्हणेन तशाच म्हणाव्यात असा माझा कटाक्ष असतो. तरच त्या उठावदार होतात. त्या कसोटीला लता कितपत उतरते याची काहीच कल्पना नव्हती. लता आली, तिला मी फार तर दोन तीन वेळेलाच चाल म्हणून दाखवली असेल. तिने लगेच मला हवी तशी ती म्हणून दाखविली. अगदी कानामात्रेचा फरक नाही. मी चकित झालो. त्या गाण्याच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी खरोखर अतिशय आनंद होत होता. आपण तयार केलेले व शिकवलेले गाणे आपल्याइतकेच चांगले गाइले गेलेले ऐकण्यातला आनंद ज्याचा तोच जाणू शकेल. शब्दांत त्याचे

वर्णन करता येणार नाही. मी स्वतः प्रसंगानुकूल चाली करतो तशाच त्या प्रसंगानुकूल व अतिशय तन्मयतेने गातोही. त्यामुळे आपल्याइतक्याच तन्मयतेने व सार्थपणे आपले गाणे दुसऱ्याच्या गळ्यातून ऐकण्याचा आनंद मला क्वचितच मिळतो. तो आनंद त्या दिवशी मला मिळाला. त्याबरोबरच एक गोष्ट जाणवली की या मुलीला परमेश्वराने केवळ उत्तम गळाच नव्हे तर आगळी बुद्धिमत्ता दिली आहे. इथे काहीतरी वेगळे, आश्चर्यचकित करणारे, देदीप्यमान प्रकटले आहे. तेव्हापासून माझी दृढ धारणा आहे की लता मंगेशकर हा परमेश्वराने घडवलेला चमत्कार आहे. पुन्हा घडवतो म्हणून त्यालाही तो घडवता येईलच असे नाही.

यानंतर लताने माझी पुष्कळ गाणी म्हटली. आमचा घरोबा झाला आणि त्यातूनच तिच्या स्वभावाची आणखी एक तेजस्वी बाजू अनुभवायला मिळाली.

एकोणीस एप्रिल एकोणीसशे चौपन्न हा दिवस मी कधीही विसरू शकणार नाही. त्या दिवसाला माझ्या एकट्याच्याच नव्हे तर माझ्या अनेक मित्रांच्या आणि त्याचबरोबर आपल्या राष्ट्रीय संग्रामातील एका महान घटनेच्या दृष्टीने फार महत्त्व आहे.

पोर्तुगीजांच्या ताब्यात अनेक शतके असलेला 'दादरा नगरहवेली' हा भाग मुक्त करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील काही राष्ट्रवादी तरुणांनी काही गोमंतकीय देशभक्तांच्या सहकार्याने प्रयत्न सुरू केले. अनेकांनी पायी हिंडून त्या भागाची अंतर्बाह्य माहिती मिळवली. नकाशे तयार केले. हल्ला कुठून करायचा, केव्हा करायचा, बरोबर कोणकोण असायचे, सामुग्री काय काय लागेल, त्या भागांत प्रत्यक्ष साथ कोण कोण देतील याचा विचार व तयारी सुरू झाली. स्वातंत्र्ययुद्धात भाग घेण्याच्या कल्पनेने सारेजण बेभान झाले होते. हल्ल्यासाठी लागणारी सामुग्री मिळण्याची संभाव्य ठिकाणे हेरून तिथे संधाने बांधली गेली. अशा सामुग्रीबरोबरच कशाहीसाठी कोणावरही अवलंबून त्या भागात राहावे लागू नये म्हणून आवश्यक तेवढा पैसा हाताशी असण्याच्या दृष्टीनेही विचार सुरू झाला. मुक्तिसंग्रामाची तयारी करणारे आम्ही सर्वजण सामान्य स्थितीतील असल्यामुळे एवढ्या मोठ्या कार्यास लागणारा पैसा खर्च करण्याची शक्यता कुणालाच नव्हती.

एके दिवशी मुंबईला आम्हा कार्यकर्त्यांची बैठक भरली आणि त्यामध्ये कल्पना निघाली की हा पैसा उभारण्यासाठी एखादा गाण्याचा वा अन्य करमणुकीचा कार्यक्रम करावा. पुढे असेही ठरले की लता मंगेशकरांचाच कार्यक्रम करावा. आमच्यापैकी बहुतेक जण त्या वेळी पुण्यात राहात असल्यामुळे हा कार्यक्रम पुण्यात व्हावा हेही ठरले. या कार्यक्रमाची सर्व जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली. नाना काजरेकर व राजाभाऊ वाकणकर यांना बरोबर घेऊन मी लताकडे गेलो. तिला सर्व कल्पना सांगितली. आमच्यासारखी काही तरुण मंडळी स्वतःच्या प्राणावर बेतण्यासारखे साहस देशस्वातंत्र्यासाठी करायच्या तयारीने उभी राहिलेली पाहून तिचेही मन भरून आले. ज्या तत्परतेने तिने यासाठी विनामूल्य कार्यक्रम द्यायचे मान्य केले त्यातच तिचे देशप्रेम आम्हांला दिसून आले. तिने स्वतः गायचे तर ठरवलेच पण त्याबरोबरच सी. रामचंद्र व महंमद रफी यांनाही घेऊन येते असे सांगितले. कार्यक्रम ठरला, पण तो कशासाठी आहे म्हणून जाहीर करायचे त्यावर विचार सुरू झाला. आमच्यापैकी बहुतेक जण 'संघीय' असल्यामुळे या प्रयत्नाकडे सरकार कोणत्या दृष्टीने पाहील याची कल्पना आम्हाला नव्हती. त्यामुळे प्रत्यक्ष हल्ला चढवीपर्यंत प्रत्येक गोष्ट अतिशय गुप्त ठेवणे अवश्य होते. लता मंगेशकरचा कार्यक्रम त्या वेळेपर्यंत पुण्यात झालेला नव्हता. तिच्याबरोबर महंमद रफी व ललिता देऊळकर (फडके) अशी कीर्तिवंत माणसे गाणार होती. प्रसिद्ध संगीतदिग्दर्शक सी. रामचंद्र यांचा व माझा वाद्यवृंद होता, मीही गाणार होतो. या कार्यक्रमाला प्रसिद्धी भरपूर मिळणार, उत्पन्नही चांगले होणार हे उघड होते. अशा परिस्थितीत लोकांना हा केवळ पैसे लुटण्याचा धंदा वाटू नये व सरकारलाही काही संशय येऊ नये असे काही तरी

सोयिस्कर निमित्त सांगणे भाग होते. ही अडचण ध्यानात आल्याबरोबर लता चटकन म्हणाली की, एवढा विचार कशाला करायला हवा? सुधीरांच्या मुलाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मीच हा कार्यक्रम करणार आहे म्हणून सांगा. तिकिटांच्या ऐवजी आपण निमंत्रणपत्रिका काढू. काही झाले तरी आपण हा कार्यक्रम करायचा व त्याचे सर्व उत्पन्न आपण योजिलेल्या कार्यासाठीच खर्च करायचे. तिचा त्यावेळचा उत्साह अद्याप मला आठवतो. जणू काही आमच्याबरोबर तीही हातात बंदूक घेऊन लढायला येणार आहे असा तिचा आवेश होता.

अत्यंत उत्साहाने आम्ही पुण्याला आलो. दिनांक एकोणीस एप्रिल हा कार्यक्रमाचा दिवस ठरला. पृथ्वीराज कपूर यांच्यासाठी टिळकपथावरील हिराबागेत तात्पुरत्या बांधलेल्या प्रचंड प्रेक्षागृहात हा कार्यक्रम व्हायचा होता; रात्रंदिवस सारे खपत होते. तिकिटविक्री धडाक्यात चालू होती. कार्यक्रमाचा दिवस उजाडला. सी. रामचंद्र पुण्याला आले. महंमद रफीही आले. सी. रामचंद्रांच्या वाद्यवृंदातील वादक मंडळी मुंबईहून खास मोठी बस रिझर्व करून आली. माझ्या वाद्यवृंदाच्या तालमी झाल्याच होत्या. माझे एक मित्र परशुराम आचार्य जादूचे प्रयोग करणार होते. जिवंत बाईचे कापून दोन तुकडे करून तिला ते पुन्हा होती तशी करणार होते. त्यांचीही सर्व साधने आली. साऱ्या पुण्यात ज्याच्या त्याच्या तोंडी कार्यक्रमाचीच भाषा होती. विशेष म्हणजे जिच्यावर साऱ्यांची अतोनात भक्ती ती गानदेवता लता त्या दिवशी त्यांच्यासमोर साक्षात उभी राहणार होती. तिचे स्वर्गीय गाणे त्यांना प्रथमच प्रत्यक्ष ऐकायला मिळणार होते.

लता दुपारी चारपर्यंत पुण्यात यायची होती. चार झाले. साडेचार झाले. पाच झाले. आमची उत्कंठा शिगेला पोचली. साडेपाच झाले. लताबाई आल्या का असे विचारण्यासाठी माझा टेलिफोन सारखा खणखणत होता. कोणतीही मोटार घरासमोर उभी राहिली की वाटे लताच आली. साडेपाच वाजता टेलिफोन ऑपरेटरने सांगितले की कोल्हापूरचा ट्रंककॉल आहे. मला वाटले, या शुभप्रसंगी आशीर्वाद द्यायला भालजी पेंढारकर येणार असावेत आणि ते निघाले आहेत हे कळविण्यासाठी हा फोन असावा. मी फोन घेतला, दुसऱ्या टोकावरचा आवाज भालजींचाच होता. पण त्यांचे पहिले वाक्य कानांवर पडताच हातातील फोन गळून पडला. कानांवर विश्वास बसेना. फोन हातात घेऊन पुन्हा विचारले तेव्हा बाबा म्हणाले, "पुण्याला येत असताना लताला मोटार अपघात झाला आहे. तिला मुंबईला नेले आहे. ती शुद्धीवर आहे. तुझा टेलिफोन क्रमांक तिला माहीत नव्हता म्हणून तुला कळवायला तिने मला सांगितले आहे."

मी फोन ठेवला व लगेच ऑपरेटरला मुंबईला फोन जोडायला सांगितले. दहा मिनिटांत कनेक्शन मिळाले. फोन प्रथम लताच्या बहिणीने घेतला आणि ती म्हणाली, "लता पुण्याला येत असताना ठाणे–पनवेल यामध्ये एका पुलावरून तिची गाडी वीसपंचवीस फूट खाली कोसळली लता, तिची मैत्रीण नलिनी आणि ड्रायव्हर असे तिघेच गाडीत होते. भरपूर मुका मार बसून ते तिघेही बेशुद्ध झाले. मागून एक पोलीस जीप येत होती त्यांनी त्यांना शुद्धीवर आणले आणि ते कसेबसे मुंबईला परत घरी पोचले." बहीण हे सांगते आहे तोच लताने रिसीव्हर हातात घेतला. तिचे पहिलेच वाक्य कानावर पडले, ते ऐकून या माउलीच्या पुढे काय बोलावे तेच समजेना. तिच्या प्रकृतीविषयी मी चौकशी करायच्या आतच तिने सांगून टाकले की सुधीर, तुम्ही काही काळजी करू नका. आपला कार्यक्रम ठरल्याप्रमाणे पार पडलाच पाहिजे. मी दुसरी गाडी घेऊन लगेच निघते. कार्यक्रम रहित केल्याचे मी तिला सांगायचा प्रयत्न केला पण ती ऐकूनच घेईना. कार्यक्रम रहित झाल्यास तुम्हा सर्वांना खूप नुकसान येईल, लोक काय वाटेल ते बोलतील, तुमचे पुढचे सगळे बेत ढासळतील, त्यापेक्षा माझे काही झाले तरी चालेल पण मी येणारच असा हट्ट तिने धरला. मी तिला परोपरीने सांगितले की आजच्या कार्यक्रमापेक्षा तुझ्या जिवाची किंमत आम्हा सर्वांना जास्त आहे,

आम्हाला कोणी दोष देणार नाही. इकडची बाजू आम्ही व्यवस्थित सांभाळू. तू काळजी करू नकोस. तिने हे सर्व ऐकून घेतले आणि पुन्हा पहिलेच वाक्य उच्चारले "मी निघते आहे. कार्यक्रम ठरल्याप्रमाणे झालाच पाहिजे." पुन्हा एकदा कळवळून, तिच्या आईवडलांची शपथ घालून मी तिला न येण्याविषयी विनवले पण तेवढ्यात फोन बंद झाला.

लताबाईंना मोटार अपघात झाल्यामुळे आजचा कार्यक्रम रहित केल्याचे व तो पुन्हा लौकरच होणार असल्याचे आम्ही जाहीर करून टाकले. तिकिटांचे पैसे परत देण्याची व्यवस्था केली. सी. रामचंद्र, महंमद रफी, तसेच सर्व वादक मुंबईला परत गेले. प्रेक्षकांपैकी कुणी काही गडबड केली नाही. पैसे परत घेण्यासाठी शांतपणे रांगा लागल्या. आश्चर्याची गोष्ट म्हणजे बहुसंख्य प्रेक्षकांनी पैसे परत न घेता पुढच्या वेळी होणाऱ्या कार्यक्रमाला यायचे ठरवले. एकंदर निरवानिरव होईपर्यंत रात्रीचे दहा सव्वादहा झाले. आम्ही सगळे कार्यकर्ते एकंदर आढावा घेण्यासाठी माझ्या घरी जमलो. कार्यक्रमाच्या या अशा अनपेक्षित शेवटामुळे झालेल्या निराशेपेक्षा आपल्या कार्यक्रमामुळे लताबाईंना अपघात झाला याचेच दुःख सगळ्यांच्या मनात जास्त होते. तशाच वातावरणात देण्यांचा हिशेब चालू होता. बाहेर सगळे सामसूम होते. साधारणपणे रात्री अकराचा सुमार असावा. बाहेर एक मोटार थांबल्याचा आवाज आला. असेल कोणीतरी म्हणून तिकडे फारसे कुणी लक्ष दिले नाही. कुणा बाहेरच्याशी काही बोलण्याच्या मनःस्थितीत कोणी नव्हते. पुढच्या पायऱ्यांवर हलकासा पावलांचा आवाज झाला म्हणून दाराकडे पाहिले. तो प्रत्यक्ष लता उभी. डोळ्यांवर विश्वास बसेना. तिने आमच्याकडे पाहिले. आम्ही सारे दिङ्मूढ झालो. लता, तू कशाला बरे आलीस म्हणत मी उठून तिच्याकडे जातो तोच ती एकदम खाली कोसळली आणि बेशुद्ध झाली. तिला उचलून आत नेले. डॉक्टरांना बोलावले. त्यांनी उपचार सुरू केले. साधारणपणे एका तासाने ती शुद्धीवर आली. आमच्या जिवांत जीव आला.

माझ्या घरी येताना तिची गाडी हिराबागेवरून आली. तिची कल्पना होती की तिथे दिव्यांचा झगझगाट असेल; कार्यक्रम चालू असेल. पण तिला दिसला तो गडद अंधार, शुकशुकाट. हे पाहताच तिच्या मनात एकदम एकच कल्पना आली की, लोकांनी बहुधा मंडप जाळून टाकला असावा. नागपूरकरांनी मागे एकदा असाच घोर पराक्रम तिची बाजू समजावून न घेता केला होता; त्याचीच पुनरावृत्ती झाली या कल्पनेने जो असह्य ताण तिच्या मनावर पडला तेच तिच्या बेशुद्धीचे कारण होते.

आम्ही सारेजण अबोल झालो. जिचा शब्द झेलण्यासाठी देशातील थोरामोठ्यांत चढाओढ लागते, जिचा स्वर एकदा तरी प्रत्यक्ष कानांवर पडावा म्हणून अलोट लक्ष्मी तिच्या पायांवर वाहण्यात अनेकजण आपला बहुमान समजतात आणि तरीही हे भाग्य सहसा कुणाला लाभत नाही अशी परमेश्वराने तन्मयतेने तयार केलेली प्रतिभाशाली गानदेवता मोटार अपघातात सपाटून मार लागल्यावरही पुन्हा लगेच दुसरी गाडी करून येते आणि कार्यक्रम आपल्यामुळेच रहित झाला, उध्वस्त झाला या प्रामाणिक टोचणीने बेशुद्ध होते हे प्रत्यक्ष पाहिल्यावर तिच्याविषयीची कृतज्ञता कोणत्या शब्दांत व्यक्त करवी तेच कळेना.

माझ्या मनात एक कल्पना आली. मी लताची संमती घेतली. रात्री एकच्या सुमारास पुण्यातील सर्व वर्तमानपत्रांच्या कार्यालयांत टेलिफोन करून त्यांचे प्रतिनिधी माझ्या घरी पाठविण्याची विनंती केली. रात्री दीडला सगळे पत्रकार माझ्या घरी जमले. लताने घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला व त्याचबरोबर आजचा रहित झालेला कार्यक्रम पुन्हा दिनांक दोन मे या दिवशी होईल हेही सांगून टाकले. लताची शारीरिक दुर्दशा साऱ्यांनी प्रत्यक्षच पाहिली. बोलताना तिला सारखा दम लागत होता. अशाही अवस्थेत ती कार्यक्रमासाठी पुण्याला आली याचे त्यांनी सादर कौतुक केले. दुसऱ्या दिवशी पुण्यातील सर्व वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानांवर ठळकपणे हे सर्व छापले गेले.

लता सकाळी मुंबईला परत गेली. आम्हा साऱ्यांच्या अंतःकरणावर आपला चैतन्यमय ठसा उमटवून गेली. आदल्या दिवशी कार्यक्रम रहित झाल्यामुळे निरुत्साह झालेल्यांना स्वतःच्या कर्तव्य-तत्परतेने अमाप उत्साह देऊन गेली. तिच्याविषयीच्या कृतज्ञतेने आम्हा साऱ्यांच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. पुन्हा दुप्पट उत्साहाने आम्ही कामाला लागलो.

दिनांक दोन मे या दिवशी ठरल्याप्रमाणे कार्यक्रम उत्तम तऱ्हेने झाला. महंमद रफीच काय ते येऊ शकले नाहीत. बाकीचे सारे पुन्हा आले. प्रेक्षकही तुडुंब होते. कार्यक्रम छान झाला. उत्पन्नही व्यवस्थित आले. त्या पैशांचा विनियोग व्हायचा त्यासाठी झाला.

जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यांत आम्ही नगरहवेलीवर चढाई सुरू केली. दिनांक दोन ऑगस्ट एकोणीसशे चौपन्न या दिवशी दादरा नगरहवेलीच्या राजधानीवर, 'सेल्वासा'वर आम्ही स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज फडकावला आणि त्यानंतर मी जर कोणती गोष्ट प्रथम केली असेल तर ती म्हणजे लताला तार केली, "सेल्वासालिबरेटेड."

या मुक्तिसंग्रामात भाग घेणाऱ्या प्रत्येकाच्या मनात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपण केलेल्या धडपडीबरोबरच दिनांक एकोणीस एप्रिल एकोणीसशे चौपन्नला लताने जे दिव्य याचसाठी केले त्याचीही आठवण सतत राहील.

अशी ही लता मंगेशकर. एक सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिका एवढीच तिची ओळख असणाऱ्या जगाला तिच्या स्वभावातले असे तेजस्वी पैलू माहीत नाहीत. लोकोत्तर व्यक्तींच्या जीवनाची घडण ज्या अनेक प्रकारच्या गुणावगुणांनी घडत असते त्यांतल्या बऱ्या न वाटणाऱ्या भागाची लगेच जाहिरात होते, परंतु त्यांच्यातला कितीतरी चांगला भाग लोकांच्यापर्यंत पोचतच नाही.

लताच्या संबंधात येणारे सारेच जण तिच्याबरोबर नेहमी सरळपणेच वागतात असे नाही. अनेकांना या ना त्या प्रकारे आपला स्वार्थ साधून घ्यायचा असतो. अनेक लोक तिच्या चांगुलपणाचा अंत पाहतात. पुष्कळदा येणाऱ्या या अशा अनुभवांमुळे तीही काही वेळा अकारणच कुणाविषयी तरी अपसमज करून घेते. त्याला जाणवेल अशा तुटकपणाने वागते. कधी कधी असहकारही पुकारते. काही काळाने पुन्हा ती एकदम सगळे काही विसरून प्रसन्नपणे वागायला लागते. पण तेही कायम टिकते असे नाही. असा हा ऊनपावसाचा खेळ चालू असतो.

मलाही याचा अनुभव आलेला आहे. तरीही माझ्या मनात तिच्याविषयी एकच भावना आहे. आदरयुक्त प्रेमाची. तिचे मी कधी वाईट चिंतले नाही. ते पाप माझ्या हातून चुकूनही घडायचे नाही. ती जेव्हा माझ्याशी असहकार पुकारते तेव्हा तिने माझ्यासाठी केलेल्या अनेक गोष्टी मी आठवतो. तिचा लोकोत्तर गुण आठवतो. तिची जाज्वल्य देशभक्ती आठवतो. आणि मनाशी निर्णय घेतो की तिच्यासारख्या अलौकिक व्यक्तीला हे सारे क्षम्य आहे.

चित्रपटव्यवसायात व इतरत्रही स्वतःच्या कर्तृत्वावर अगणित पैसा आणि अलोट कीर्ती मिळवलेली अनेक माणसे मी पाहिली आहेत. सर्व प्रकारच्या चैनींत आणि विलासांत आयुष्य संपवण्यापलीकडे इतर कोणताही विचार त्यांच्या मनात कधी नसतो. त्यांच्याकडे पाहिले की लताचा वेगळेपणा एकदम उठून दिसतो.

या देशात कुणाला कधी लाभली नाही अशी शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे सतत वाढत जाणारी अपरंपार जागतिक कीर्ती आणि त्याबरोबरच अमाप पैसा केवळ स्वतःच्या गुणाने मिळवून सुद्धा ती आपल्या देशाला, धर्माला, समाजाला कधी विसरत नाही, इतकेच नव्हे तर त्यासाठी यथोचित त्याग करायलाही मागेपुढे पहात नाही.

लता मंगेशकर ही केवळ एक व्यक्ती नसून अशी एक दिव्य शक्ती आहे की जिने आपले स्वतःचेच नव्हे तर साऱ्या देशाचे नाव जगाच्या इतिहासात अमर करून ठेवले आहे.

कुमार गंधर्व

अभिजात कलावती

कितीतरी वर्षांपूर्वीची गोष्ट. मी तेव्हा आजारी होतो. त्या आजारात एके दिवशी सहज मी रेडिओ लावला आणि अचानक एक विलक्षण सूर माझ्या कानी पडला. तो सूर ऐकल्याबरोबर हे काहीतरी विशेष आहे, नेहमीचे नव्हे असे तत्काळ मला जाणवले. तो सूर माझ्या काळजालाच भिडला. मी हैराण होऊन गेलो. हा कुणाचा सूर मला काही कळेचना. मी अगदी तन्मयतेने ऐकत राहिलो. गाणे संपल्यावर गायिकेचे नाव रेडिओवरून सांगितले गेले, 'लता मंगेशकर'. नाव ऐकून मी चकित झालो. पण त्याबरोबरच मनातल्या मनात एक संगती लागल्यासारखे वाटले. सुप्रसिद्ध गायक दीनानाथ मंगेशकर यांची अजब गायकी त्यांच्याच कन्येच्या कोमल कंठातून एका वेगळ्या रूपात मी ऐकत होतो.

मला वाटते, 'बरसात' चित्रपटाच्याही आधीच्या कोणत्या तरी चित्रपटातले ते लताचे गाणे होते. तेव्हापासून लता सारखी गातेच आहे आणि मी तिचे गाणे ऐकतो आहे. लताच्या आधी नूरजहाँ या प्रसिद्ध गायिकेने चित्रपटसंगीताचा एक जमाना गाजवला होता. पण त्याच क्षेत्रात तिच्यानंतर आलेली लता तिच्यापेक्षा कितीतरी पुढे गेली आहे. कलेच्या क्षेत्रात कधी कधी असा चमत्कार घडून येतो. आजचे नामवंत सतारिये विलायतखाँ हे आपल्या सतारवादक पित्यापेक्षा कितीतरी मोठे झाले आहेत. त्यातलाच हा प्रकार म्हणावयाचा.

भारतीय गायिकांत लताच्या तोडीची गायिका दुसरी झालीच नाही असे माझे स्पष्ट मत आहे. लतामुळे चित्रपटसंगीताला विलक्षण लोकप्रियता लाभली आहे, इतकेच नव्हे तर शास्त्रीय संगीताकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोनही पार बदलून गेला आहे. साधीच गोष्ट, पूर्वीदेखील घरोघर लहान मुलेमुली गात असत. पण त्या गाण्यात आणि हल्ली घरोघरी ऐकू येणाऱ्या छोट्या छोट्या मुलामुलींच्या गाण्यात केवढा तरी फरक पडलेला आढळून येतो. आजकालची चिमुरडी पोरेदेखील सुरेल गुणगुणतात. ही किमया लताचीच नव्हे काय? कोकिळेचे सूर सतत कानी पडत राहिले तर ऐकणाराला तिचेच अनुकरण करावेसे वाटणे स्वाभाविक आहे. चित्रपटसंगीतामुळे चांगल्या स्वरावली लोक प्रत्यही ऐकत आहेत. संगीताच्या निरनिराळ्या प्रकारांशी त्यांचा परिचय होत आहे. त्यामुळे त्यांचे

स्वरज्ञान वाढले आहे. तशीच सुरेलपणाची चांगली समजही त्यांना आली आहे. लयींचेही निरनिराळे प्रकार त्यांना समजू लागले आहेत आणि आकारयुक्त लयीची त्यांना जाणीव झाली आहे. सर्व-सामान्य लोकांनाही त्यातील सूक्ष्मता कळू लागली आहे. हे सारे कर्तृत्व लताचेच आहे. अशा रीतीने नव्या पिढीचे गाणे तिने संस्कारित केले आहे आणि सामान्य माणसाची संगीतविषयक अभिरुची घडविण्यात तिने फार मोठा हातभार लावला आहे. एकंदरीतच संगीताच्या लोकप्रियतेचे, त्याच्या वाढत्या प्रसाराचे आणि तद्विषयक अभिरुचीच्या विकासाचे श्रेय लतालाच द्यावयास हवे.

आज सर्वसामान्य माणसाला लताची एखादी ध्वनिमुद्रिका आणि शास्त्रीय गायकाची एखादी ध्वनिमुद्रिका ऐकवली तर तो लताचीच ध्वनिमुद्रिका पसंत करून घेऊन जाईल. या माणसाला राग कोणता, ताल कुठला हा शास्त्रीय तपशील सहसा माहीत नसतो. राग मालकंस आहे की ताल त्रिताल आहे याच्याशी त्याला कर्तव्यही नसते. त्याला हवा असतो, जाणवतो आणि धुंद करतो तो गाण्याचा गोडवा. स्वरांचे माधुर्य. आणि हे स्वाभाविकच आहे. कारण माणसात जशी माणुसकी तसे गाण्यात 'गाणेपण' हवे. आणि लताचे कुठलेही गाणे घेतले तरी त्यात हे गाणेपण अगदी शंभर टक्के सापडते.

हे प्रभावी गाणेपण हेच लताच्या लोकप्रियतेचे मुख्य मर्म आहे. लताच्या गाण्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्या स्वरांचा निर्मळपणा आणि निरागसपणा. तिच्या आधीची पार्श्वगायिका नूरजहाँ ही देखील एक चांगली गायिका आहे यात शंका नाही. तथापि तिच्या स्वरात मादक उत्तना-पणा असे. उलट लताच्या स्वरात कोवळीक आणि मुग्धपणा आहे. लताचा जीवनाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे तोच तिच्या गाण्यातल्या या निर्मळपणात प्रतिबिंबित झाला आहे असे जाणवते. संगीतदिग्दर्शकांनी मात्र तिच्या स्वरातील या निरागसतेचा घ्यावा तितका उपयोग करून घेतलेला दिसत नाही. मी स्वतः संगीतदिग्दर्शक असतो तर लताला मुष्किल करून सोडले असते असे नमूद केल्यावाचून राहावत नाही.

लताच्या गाण्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचे नादमय उच्चार. तिच्या गीतांमधे दोन शब्दांतले अंतर स्वराची आस ठेवून फार सुंदर रीतीने भरून काढलेले असते. जणू ते दोन्ही शब्द निमुळते होऊन एकमेकात मिसळतात. सलग एकजीव होतात. ही गोष्ट फार अवघड आहे. पण लताच्या बाबतीत ती अत्यंत सहज आणि स्वाभाविक होऊन बसली आहे.

लताच्या गाण्यात शोकभावना विशेष प्रभावी रीतीने व्यक्त होते असे मानले जाते. पण मला स्वतःला ते पटत नाही. शोकरसाला लताने तितकासा न्याय दिलेला नाही असे माझे स्वतःचे मत आहे. उलट मध्य किंवा द्रुत लयीतली मुग्ध शृंगाराची अभिव्यक्ती करणारी उल्लसित गाणी लताने फार उत्कटपणे गायिली आहेत. माझ्या दृष्टीने तिच्या गाण्यात आणखी एक उणीव आहे. तथापि त्यात लताचा दोष किती आणि संगीतदिग्दर्शकांचा दोष किती हे सांगणे अवघड आहे. लताचे गाणे सामान्यतः उंच पट्टीत असते. त्यात संगीतदिग्दर्शक तिला अधिकाधिक उंच पट्टीत गायला सांगतात आणि तिला निष्कारण चिल्लावायला लावतात. मग त्या गाण्यात अकारणच थोडा कर्कश-पणा येतो. त्यामुळे हल्ली लताच्या स्वरातली मूळची गोलाई जाऊन त्यात थोडा चिडचिडेपणा आला आहे असे मला वाटते. ती गाणी ऐकताना आपल्यालाही अस्वस्थ व्हायला होते. कपड्यात नकळत कुसे गेली म्हणजे व्हावे तसे. एक उदाहरण देऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करतो. शमशाद बेगमची 'किस्मत' चित्रपटातली प्रारंभीची गाणी आणि अधिकाधिक उंच पट्टीत गाण्याच्या हव्यासाने तिने गायिलेली नंतरची गाणी यांची तुलना करून पाहिली म्हणजे मला काय म्हणावयाचे आहे त्याचा प्रत्यय येईल.

शास्त्रीय संगीतात लताचे स्थान कोणते असा एक प्रश्न उपस्थित केला जातो. माझ्या मते हा प्रश्नच आधी अप्रयोजक आहे. त्याचे कारण असे की शास्त्रीय संगीत आणि चित्रपटसंगीत या

दोहोंमधे तुलनाच होऊ शकत नाही. गांभीर्य, संथपणा हा शास्त्रीय संगीताचा स्थायीभाव आहे तर जलद लय, चापल्य हा चित्रपटसंगीताचा प्रमुख गुणधर्म आहे. चित्रपटसंगीतातला ताल हा प्राथमिक अवस्थेतला ताल असतो तर शास्त्रीय संगीतात ताल परिष्कृत स्वरूपात आढळतो. चित्रपट-संगीतात अर्धतालांचा उपयोग केला जातो. त्याची लयकारी फार वेगळी असते. सोपी असते. तेथे गतीला आणि आघाताला महत्त्व आहे आणि सुलभता, लवचिकपणा या गोष्टींना तर तेथे अग्रस्थान दिले जाते.

तथापि चित्रपटसंगीत गाणाराला शास्त्रीय संगीताची उत्तम जाणकारी असणे आवश्यक आहे. ती लताजवळ निःसंशय आहे. तीन साडेतीन मिनिटांच्या अवधींत गायिलेले चित्रपटातले तिचे एखादे गीत आणि एखाद्या खानदानी शास्त्रीय गायकाची तीन साडेतीन तासांची मैफल या दोहोंचे कलात्मक आणि आनंदात्मक मूल्य सारखेच आहे असे मी मानतो. एखादा विस्तृत लेख जीवनातील रहस्य विशद करीत असतो. पण तेच रहस्य एखाद्या छोट्या सुभाषितात किंवा एखाद्या चिमुकल्या म्हणीतही सुंदरपणे आणि परिपूर्णतेने प्रकट झालेले दिसते. त्याचप्रमाणे तीन तासांच्या रंगलेल्या मैफिलीतला गाण्याचा सारा रस लताच्या तीन मिनिटांच्या तबकडीवरील गाण्यातूनही पुरेपूर रीतीने आस्वादता येतो. तिचे एकेक गाणे ही एक संपूर्ण कलाकृती असते. स्वरलयशब्दार्थाचा तेथे एक मनोज्ञ मेळ झालेला असतो. आणि मैफलीची बेहोषीही त्यात सामावलेली असते. तसे पाहिले तर शास्त्रीय गाणे काय किंवा चित्रपटातले गाणे काय, शेवटी रसिकाला आनंद देण्याचे सामर्थ्य त्यात किती आहे यावरच त्याचे महत्त्व ठरवणे अवश्य आहे. मी तर असे म्हणेन की शास्त्रीय गाणे देखील, रंजकता त्यात नसेल तर अगदी नीरस ठरेल. अनाकर्षक वाटेल. आणि त्यात मोठीच उणीव उत्पन्न होईल. गाण्याला गाणेपण येते ते केवळ शास्त्रीय बैठकीच्या पक्केपणामुळे नव्हे की तालासुराच्या निर्दोष ज्ञाना-नेही नव्हे. गाण्याचा सारा गोडवा, सारे सामर्थ्य त्याच्या रंजकतेवर मुख्यतः अवलंबून आहे. आणि रंजकतेचे मर्म रसिकापुढे गाणे कसे सादर केले जाते, कशा रीतीने त्याची मांडणी केली जाते आणि श्रोत्यांशी कसा सुसंवाद साधला जातो यात सामावलेले आहे. माणसाचा हाडाचा सांगाडा आणि एखाद्या प्रतिभाशाली कलावंताने त्याच माणसाचे केलेले पेंटिंग या दोहोत जो फरक असतो तोच गाण्याचे शास्त्रीय ज्ञान आणि त्याची स्वरांच्या द्वारा केली जाणारी सुसंगत अभिव्यक्ती यातही असतो. तथापि आमचे अनेक शास्त्रीय गायक केवळ आपल्या शास्त्रीय ज्ञानाचा, तालासुराच्या पक्के-पणाचा अभिमान बाळगतात आणि त्यातच ते धन्यता मानून राहतात. रागाचे स्वर, त्याचे आरोह अवरोह आणि तानांची आवर्तने यांच्या निव्वळ कसरतीतून राग उभा करता येत नाही हे ही मंडळी विसरतात. रंजकता हा एक गाण्याचा महत्त्वाचा घटक आहे इकडे दुर्लक्ष करून आपल्या भारदस्त शास्त्र-शुद्ध वजनदार गायकीचेच कौतुक करणाऱ्या आणि परंपरागत समजुतींना दुराग्रहाने कवटाळून बसणाऱ्या या खानदानी शास्त्रीय गायकांनी लताच्या कलागुणांची कदर केली नाही तर त्यात खेद मानण्याचे कारण नाही. कारण या मंडळींना संगीताचे मर्मच कळले नाही असे मी निस्संकोचपणे म्हणेन. शास्त्रीय गायकी म्हणजेच काय ते संगीत असा आग्रह धरणाऱ्या या लोकांनी गझल, ठुंबऱ्या, भजने यासारख्या इतर गायनप्रकारांची आजवर उपेक्षा केली आहे. आपल्या रसिकतेला शास्त्रीय नियमांच्या चौकटीत बंदिस्त करणारे हे लोक केवळ आरोह अवरोह घोकीत बसतात. शास्त्रचर्चेच्या ठराविक आवर्तात भ्रमतात. आणि गाण्याच्या खऱ्या आनंदाला ते पारखे होतात. अशा लोकांनी चित्रपटसंगीताकडे तुच्छतेने पाहून जर नाक मुरडले तर त्यांचा निषेध ध्यानीही घेण्याचे कारण नाही असे मी म्हणेन. गझल ठुंबऱ्या गाणाऱ्या बेगम अख्तरसारख्या अव्वल दर्जाच्या गायिकेला संगीताच्या क्षेत्रात मानाचे पान द्यावेच लागले. तीच गोष्ट लताच्याही बाबतीत यांना करावी लागणार आहे. संगीताच्या क्षेत्रात लताचे स्थान एखाद्या अव्वल दर्जाच्या खानदानी गायकाइतकेच मानावे लागेल. लता तीन तासांची मैफल

गाजवू शकेल का असा प्रश्न विचारणाऱ्या या संशयात्म्यांना मलाही एक प्रश्न विचारावासा वाटतो. तो असा की एखादा पहिल्या श्रेणीचा गायक लताप्रमाणे तीन मिनिटांच्या अवधीत चित्रपटातले एखादे गाणे तिच्याच कौशल्याने आणि तिच्याच रसोत्कटतेने गाऊ शकेल का? गाऊ शकणार नाही हे त्या प्रश्नाचे उत्तर त्यांना द्यावे लागेल.

खानदानी गायकांचा असाही एक दावा आहे की चित्रपटसंगीतामुळे लोकांची अभिरुची बिघडली आहे. थोडक्यात या संगीतावर त्याने 'कान बिगाड दिये' असा आक्षेप घेतला जातो. पण मी म्हणतो चित्रपटसंगीताने लोकांचे कान बिघडवले नाहीत. ते सुधारले आहेत. हे माझे मत सुरवातीलाच तपशीलवार मांडलेले असल्याने इथे त्याची पुनरुक्ती करीत नाही.

खरी गोष्ट अशी आहे की आपले शास्त्रीय गायक हे फार आत्मसंतुष्ट वृत्तीचे आहेत. संगीताच्या क्षेत्रात यांनी स्वतःची मिरासदारी स्थापन केली आहे. शास्त्रशुद्धतेच्या कर्मकांडाला त्यांनी वाजवीपेक्षा अधिक महत्त्व दिले आहे आणि पूर्वी आपल्याकडे जसे धार्मिक चातुर्वर्ण्य असे त्याप्रमाणे कलेच्या क्षेत्रातही एक कडक चातुर्वर्ण्य त्यांनी प्रस्थापित केले आहे. तथापि आपण काहीही गावे आणि ते गाणे कितीही रुक्ष, नीरस असले तरी त्यातील विद्वत्तेच्या जोरावर सामान्य लोकांना गुरकवावे ही जी त्यांची प्रवृत्ती होती तिला आता चित्रपटसंगीताने जोरदार हादरा दिला आहे. शास्त्रीय संगीताची मिरासदारी आता संपुष्टात आली आहे. यापुढे या मंडळींची संगीतक्षेत्रातली ही पंडेगिरी चालणार नाही. कारण चित्रपटसंगीतामुळे लोकांची अभिजात संगीताशीही तोंडओळख होऊ लागली आहे. त्यांची चौकस वृत्ती आणि चिकित्सकता आता वाढली आहे. केवळ शास्त्रशुद्ध पण नीरस गाणे त्यांना आता नको आहे, तर सुरेल आणि भावपूर्ण गाणे हवे आहे. ही क्रांती चित्रपटसंगीतानेच घडवून आणली आहे. समाजाच्या संगीतविषयक अभिरुचीलाच चित्रपट-संगीताने असे एक प्रभावी वळण लावले आहे की या संगीताची वाढती लोकप्रियता ध्यानी घेऊन शास्त्रीय गायकांनीही आपल्या गायकीत आणि गाण्याच्या एकंदर मांडणीत बदल करण्याची वेळ आली आहे. संगीतातले उच्चनीच भेदभाव व्यक्त करणाऱ्या गायनक्षेत्रातल्या जातिभेदांना यापुढे तेथे वाव उरणार नाही.

चित्रपटसंगीताचा लवचिकपणा हे त्याचे आणखी एक मोठे सामर्थ्य आहे असे मी मानतो. तेथील गृहीतकृत्ये, त्याच्या मर्यादा, सोयीगैरसोयी सारे काही वेगळे आहे. चित्रपटसंगीताचे तंत्रच मुळी निराळे आहे. येथे नवनिर्मितीला खूप वाव आहे. शास्त्रीय रागदारीचा जसा चित्रपटातील संगीतदिग्दर्शकांनी उपयोग करून घेतलेला आढळतो त्याप्रमाणेच राजस्थान, पंजाब, बंगाल इत्यादी ठिकाणी असलेले प्रांतोप्रांतीचे लोकगीतांचे भांडारही या गाण्यासाठी त्यांनी खूप लुटलेले आपल्या ध्यानी येते. उन्हाचे कौतुक करणारी पंजाबी लोकगीते, रुक्ष आणि निर्जल राजस्थानमधली पर्जन्याची आळवणी करणारी गीते, दऱ्याखोऱ्यात घुमणारी पहाडी गीते तशीच ऋतुचक्राचे फेरे नोंदवणारी व शेतीवरील विविध कामांचा आढावा घेणारी ऋतुगीते व कृषिवलगीते, व्रजभूमीत रुजलेले सहज-मधुर संगीत या साऱ्यांचा अतिशय मार्मिक व रसानुकूल उपयोग चित्रपटक्षेत्रातल्या प्रतिभाशाली संगीतदिग्दर्शकांनी करून घेतला आहे. आणि यापुढेही तसा ते करीत राहतील. एकंदरीने संगीताचे क्षेत्रच अफाट आहे. तेथे अजून अलक्षित, असंशोधित आणि अदृष्टपूर्व असा खूप मोठा प्रांत आहे. तथापि याचा उपयोग चित्रपटातील लोक जेवढ्या कसोशीने करून घेत आहेत तेवढेच आमचे कर्मठ शास्त्रीय गायक तिकडे दुर्लक्ष करीत आहेत. यामुळे चित्रपटसंगीत हे दिवसेदिवस अधिकाधिक विकास पावत जाईल. त्याच्या कक्षा रुंदावत जातील आणि त्याची लोकप्रियताही सतत वर्धिष्णू राहील.

अशा या चित्रपटसंगीताच्या क्षेत्रात लता ही आजची अनभिषिक्त सम्राज्ञी आहे. इतरही अनेक पार्श्वगायक, पार्श्वगायिका आहेत पण लताची लोकप्रियता या साऱ्यांहून कितीतरी पटीने

अधिक आहे. लोकप्रियतेच्या शिखरावरचे तिचे स्थान अढळ आहे. गेली पंचवीस वर्षे ती गात आहे आणि तरीही तिची लोकप्रियता अबाधित राहिली आहे. पावशतक जनमनांवर सतत प्रभुत्व गाजविणे ही गोष्ट सोपी नाही. फार काय एक रागही सतत टिकत नाही. दुर्गा, नंद यांसारखे राग पूर्वी वारंवार मैफलीत गाईले जात असत. आज त्यांची लोकप्रियता ओसरली आहे. बालगंधर्वासारखा गायक महाराष्ट्रात लोकप्रियतेची परिसीमा गाठून गेला. पण महाराष्ट्राबाहेरच्या प्रांतांत बालगंधर्वांची जादू जाणवली नाही. असे असता लतासारखी गायिका पंचवीस वर्षे सतत गात राहते, भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत तिचे गाणे जाऊन पोहोचते, भारतातच नव्हे तर भारताबाहेरच्या अनेक देशांत, आफ्रिका, मध्य आशियासारख्या दूरच्या जागी देखील तिची गाणी ऐकून लोक वेडे होतात हा काय चमत्कार आहे? पण हा चमत्कार आपण प्रत्यक्ष बघत आहोत. इतर देशांत अशी गायिका जन्माला आली असती तर तिचा केवढा उदोउदो झाला असता. लोकांनी तिला डोक्यावर घेतले असते. शासनसंस्थेने तिच्यावर मानसन्मानाचा वर्षाव केला असता. पण आपल्याकडचे तथाकथित विद्वान आणि सरकार ह्यांनी तिची कदर करावी तशी केली नाही. न करोत. सामान्य लोक लताच्या गाण्यावर विलक्षण प्रेम करतात!

वडलांकडून लाभलेले स्वरवैभव संगोपून लताने आपल्या बुद्धिमत्तेने आणि परिश्रमाने त्याला अधिक कसदार, संपन्न, समृद्ध केले आहे. वडलांच्या अकाली निधनामुळे अंगावर पडलेली कुटुंबाची जबाबदारी, एकाकीपणाने मार्ग काढताना जगाचे आलेले बरेवाईट अनुभव यांनीही लताच्या गाण्याला एक वेगळे परिमाण दिले आहे. हे परिमाण जीवनविषयक जाणीवेचे, आयुष्याच्या खोल समजाचे आहे. हे गुण जसजसे व्यक्तित्वात बाणत गेले तसे त्यांनी लताचे गाणेही प्रौढ केले.

असा कलाकार शतकशतकांतून एखादाच निर्माण होतो. तो आज आपल्यामध्ये, आपल्या डोळ्यांसमोर वावरताना आपण बघत आहोत हे आपले केवढे भाग्य!

दिनकर द. पाटील

ऋणानुबंध

एकोणीसशे एकेचाळीस साली मास्टर विनायक यांच्या आग्रहाने मी 'नवयुग चित्रपट कंपनी'च्या प्रसिद्धी विभागात दाखल झालो. कंपनीतील नोकरांना कामे विभागून दिलेली असली तरी ते विभाग साचेबंद नसत. एके दिवशी सकाळीच विनायकराव मला म्हणाले, "चल, गाणं ऐकायला."

मी त्यांच्याबरोबर गेलो. 'सरकारी पाहुणे' या चित्रपटासाठी मांडलेल्या महालाच्या सेटवर बैठकीची तयारी दिसली. उच्चासनाच्या मध्यभागी एक चिमुरडी पोर बसली होती. तिच्याभोवती वर्तुळाकार मांडलेल्या खुर्च्यांवर आमचा सगळा संगीत विभाग बसलेला होता. विनायकांनी त्या चिमुरड्या मुलीच्या पाठीवर कौतुकाने हात फिरवून म्हटले, "गाणं ऐकवणार आम्हाला?"

त्या मुलीने सभाधीटपणे सभोवती पाहिले आणि हार्मोनियमच्या सुरात आपले सूर मिसळले, "शूरां मी वंदिले"

तिच्या आरोह-अवरोहांबरोबर स्वरलहरींनी सारा स्टूडिओ भरून गेला. नंदादीपाच्या प्रकाशाने मंदिर उजळून निघावे तसे वाटू लागले. जललहरीतील वलये एकमेकात मिसळत-मिसळत विस्तारत चालली—सारे मंत्रमुग्ध झाले. विनायकांच्या डोळ्यांत तर अश्रूच तरळले. गहिवरलेल्या स्वरात त्या चिमुरड्या पोरीची पाठ थोपटीत ते म्हणाले, "शाबास, शाब्बास!"

मी शेजारी बसलेल्या एकाला विचारले, "कोण ही मुलगी?"

तो म्हणाला, "परवा दीनानाथ वारले ना, त्यांची ही मुलगी. लता!"

दीनानाथांचे गाणे मी ऐकले होते. त्या गाण्याची विनायकांकडून खूप स्तुतीही ऐकली होती. दीड-दोन महिन्यांपूर्वीच झालेल्या त्यांच्या देहावसानाची वार्ता कळताच मीही हळहळलो होतो. आता पाहात होतो, तो संगीतसूर्य अस्ताला जाताच ही संगीत चंद्रिका उदयाला येत होती!

विनायकांनी लताला आपल्या कंपनीत ठेवून घेतली. तिला गुरुदीक्षेची गरज आहे हें ओळखून विनायकांनी तिला भेंडीबझारवाले अमानअलीखाँ यांचा गंडा बांधला. पण स्वातंत्र्यप्राप्तीच्या पूर्वी झालेल्या जातीय दंगलीत त्यांनी मुंबई सोडल्याने ते शिक्षण थांबले. मग देवासच्या अमानतखाँच्या

समोर बसून लता रियाझ करू लागली. तिची प्रगती अजमाविण्यासाठी विनायकांनी तिला चित्रपटांतून गायला लावले. कंपनीचा वाढदिवस, नाट्यमहोत्सव, अशा प्रसंगी लताचे गाणे हमखास होई. अशा प्रसंगी होणाऱ्या लताच्या गाण्याची पुढे पुढे आम्हाला इतकी सवय लागली होती की मी विनायकांना म्हणत असे, "कार्यक्रम दोन तासांचा करा. आमच्याकडे साऊंड भरपूर आहे." लताला ही सिनेमाची परिभाषा फार आवडे. मला आठवते, विनायक जेव्हा लताला एखादे गाणे देत तेव्हा आज तिच्या दारात घुटमळणारे कित्येक निर्माते "काय फाजील कौतुक चाललंय!" असा आरोप करीत असत. आपले कौतुक फाजील नसून वाजवी होते हे आज तिने सिद्ध करून दाखविले आहे. ह्या यशाला तिचे श्रमही कारणीभूत आहेत. लतासंबंधी बोलताना महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक निवृत्तिबुवा सरनाईक म्हणाले होते, "लता मोठी झाली, कारण मोठी होण्यासाठीच ती जन्मली आहे."

मी आणि लता विनायकांच्या घरीही बरोबरच राहिलेले आहोत. मी तेव्हा पाहिले आहे, कोणाचे गाणे होवो, लताने त्याबरहुकूम गाणे म्हटलेच. नवी रेकॉर्ड पसंत पडो, ती पार झिजेपर्यंत तिने लावलीच. घरात रेडिओ चालू असायचाच. इतरांना त्रास होऊ नये म्हणून अगदी बारीक ठेवून. चहा पिताना, वेणीफणी करताना लताचे कान रेडिओला चिकटलेले असायचे.

तिचे रेडिओचे हे व्यसन आजही चालू आहे. मी एकदा तिला म्हटले, "खरंच लता, उद्या तुझ्या आयुष्यावर कोणी चित्रपट काढला तर त्याला रेडिओचेच पार्श्वसंगीत ठेवावे लागेल."

ती म्हणाली, "कदाचित प्लेबॅकसाठी मलाच बोलावतील!"

लताच्या यशाचे रहस्यही यातच असावे. फुलपाखरू जसा फुलाफुलांतून मध गोळा करते त्याप्रमाणे लता संगीताचा मधुगंध कोठे शोधील याचा नेम नाही. अगदी बालवयापासून कंपनीतील संगीतदिग्दर्शक, गायक हे तिचे जानी दोस्त असायचे. मराठी गीतांच्या तालमी सुरू झाल्या की विनायकांचे शब्द ती मोठ्या श्रद्धेने श्रवण करी. विनायक संगीतदिग्दर्शकांना सांगत, "जसा शब्दांना अर्थ असतो, तसा सुरांनाही अर्थ हवा, भावना हवी, नव्हे रंगसुद्धा हवा."

विनायकांच्या या मार्गदर्शनाचा तिच्यावर एवढा परिणाम झाला आहे की पडद्यावरील गाण्यांतून सोडाच, ग्रामोफोनच्या तबकड्यांवरसुद्धा भावनांचे केवढे मनोज्ञ विलास ती प्रकट करू शकते. ती कधी कधी फार भावनावश होते. "कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला" हे पद गाताना तिच्या डोळ्यांतून सारखी धार लागलेली होती. "हे गाणे पुन्हा घेऊ या का?" असे वसंत प्रभूंनी तिला विचारले तेव्हा आपल्या तळहातांत तोंड लपवून ती म्हणाली, "मी गाऊ शकणार नाही. तोंड उघडले तर रडेन मी!"

मराठीप्रमाणेच इतर भाषांतील गीते गाताना आपल्याला सहज रीतीने भावना प्रकट करता याव्यात यासाठी पहिल्यापासूनच ती खूप परिश्रम घेत होती. त्या दृष्टीने नूरजहाँ ही तिची आवडती गायिका होती. 'बडी माँ' चित्रपटाच्या वेळी जेव्हा त्या दोघी एकत्र आल्या तेव्हा दोघींची जुगलबंदी होत असे ती अगदी ऐकण्यासारखी होती. मराठी गाणी नूरजहाँ ज्या उत्सुकतेने ऐकत असे, त्याच उत्सुकतेने लता तिची उर्दू शायरी आत्मसात करायची. ह्या अभ्यासूपणाला उद्देशूनच नूरजहाँ म्हणाली, "लता बडी होशियार लडकी है. एक दिन वह अपना नाम जरूर रोशन करेगी!"

विनायकांच्या मृत्यूनंतर पुन्हा दुर्दैव लताच्या पाठीशी लागले. पण दुर्दैवातूनच सुदैव जन्माला येत असते ही तिची श्रद्धा आहे. तिच्याच नव्हे तर आमच्याही अज्ञातवासाने एक गोष्ट ठीक झाली. ती म्हणजे लता आणि आम्ही खऱ्या अर्थाने जवळ आलो. सुखाच्या वेळी सारेच दोस्त असतात. त्यांची पारख होते अडचणींच्या वेळी. मला कृतज्ञतापूर्वक मान्य केले पाहिजे, माझ्या अनेक आणीबाणीच्या वेळी लताने मला धीर दिला आहे—नुसत्या शब्दाने नव्हे, अर्थाने! विनायकांच्या मृत्यूनंतर बरेच दिवस आमच्या चित्रपटाचे कोठे जमेना तेव्हा तिने एकदा विचारले "काय हो, तुमचं अडलंय कशात?"

दिनकर दि. पाटील

"सगळं तयार आहे पण वितरक म्हणतात गाणी ऐकवा."—मी म्हणालो.

"मग ऐकवा ना" लता सहज बोलून गेली. जणू काय मी गाणार होतो आणि तेव्हाचे माझे भागीदार माधव शिंदे तबला वाजवणार होते! सगळी परिस्थिती लताच्या लक्षात आली. गाणी ऐकवायची म्हणजे संगीत-दिग्दर्शक आला, गायक-गायिका आले, वादक आले आणि मुख्य म्हणजे पैसे आले! ती म्हणाली, "आणा इकडे तुमची गाणी. मी संगीत देते तुम्हाला." देव पावल्याचा आनंद आम्हाला झाला. आपला कामाचा रोजचा व्याप सांभाळून लताने पंधरा दिवसांत चाली लावण्यापासून तो ध्वनिमुद्रण करण्यापर्यंत साऱ्या गोष्टी जातीने पुऱ्या करून टाकल्या. 'रामराम पाव्हणं' या चित्रपटाची संगीतदिग्दर्शिका लता मंगेशकर आहे. आणि ते चित्र महोत्सवी ठरले याचे अर्धेअधिक श्रेयही लताचेच आहे. लताचे सहकार्य नसते तर मी निर्मातादिग्दर्शक झालो असतो की नाही हे सांगणे कठीण आहे. आजपर्यंत इतक्या अकृत्रिम आत्मीयतेने तिचे हे सहकार्य मला लाभले आहे की लता आहे म्हणूनच माझी चित्रपटाची सेवाही आहे अशी माझी भावना आहे. आमची 'वादळ' 'कांचनगंगा' ही चित्रे भागीदारीत निर्माण झाली. त्यानंतर मात्र महाराष्ट्रीय चित्र-व्यवसायाच्या दृष्टीने काही महत्त्वाची कामगिरी तिला पार पाडावी लागली म्हणूनच आमची भागीदारी काही काळ थांबली. पण आजही तिचे सहकार्य मला लाभते. मलाच नव्हे, तिच्या जवळच्या साऱ्याच माणसांना, संस्थांना तिचे सहकार्य अखंडित चालू आहे. माझ्यावर तर तिचे अनंत उपकार आहेत. अव्यवहारीपणाने मी एका फौजदारी खटल्यात गुंतलो असताना ती माझ्याकरिता वीस हजारांना जामीन राहिली होती! प्रत्यक्ष न्यायदेवताच माझ्या निरपराधीपणाची ग्वाही द्यायला अवतरली होती.

अशाच न्यायनिष्ठेने आणि सहानुभूतीने हरेक प्रांतीय आणि राष्ट्रीय कार्याला तिने मदत केलेली आहे. मराठीच्या राजधानीत मराठी चित्रपटांसाठी एकही थिएटर असू नये ह्याची तिच्या मनाला अपार वेदना होते. ती म्हणते, "मिरासदारांची भर करण्यापेक्षा महाराष्ट्र सरकार थिएटर बांधून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करील तर ते मराठीवर खरे उपकार होतील!" असाच विषय चालला असताना एक थिएटर मालक तिला म्हणाले, "तुम्हीच का नाही थिएटर बांधत?" लताने एवढेच उत्तर दिले, "आपले आशीर्वाद खरे ठरतील तर तो मी माझ्या आयुष्यातील सुदिन समजेन."

मराठी आणि महाराष्ट्र याबाबतच्या लताच्या प्रेमाची कल्पना शब्दांतून सांगणे अशक्यच आहे. महाराष्ट्रधर्म हा तिचा देवधर्म आहे. आपल्या अलिशान घरातही तिने प्रथम देवदेवतांची स्थापना केली आहे. हॉलमध्ये शिवाजीमहाराजांचा पुतळा ठेवला आहे. तिच्या दैनंदिन कामाचा प्रारंभच मुळी श्रीज्ञानेश्वरी आणि तुकारामाची गाथा यांना फुले वाहून होतो.

कलाक्षेत्रात जगन्मान्य झालेली ही माझी छोटी दीदी महाराष्ट्राचेच नव्हे तर भारताचेही भूषण आहे. शतकाशतकांतून एकदाच हे असे भूषण परमेश्वरालाही निर्माण करता येत असावे. छोट्या दिदी, तू चिरंजीव हो!

वसंत देसाई

चतुरस्त्र कलाकार

माझ्याकडे पहिले उत्तम गाणे लताबाईंनी म्हटले ते विनायकांच्या 'जीवनयात्रा' या चित्रपटात. 'चिडिया बोले' असे त्या गीताचे प्रारंभीचे शब्द होते. आणि हा लेख मी लिहिण्यापूर्वी नुकतेच जे त्यांचे गाणे मी ध्वनिमुद्रित केले ते या वर्षीच्या जानेवारी महिन्यात. सुप्रसिद्ध दिग्दर्शक विजय भट्ट यांच्या 'रामराज्य' चित्रपटासाठी 'रैन भई सो जा रे पंछी' अशी लोरी त्यांनी माझ्या संगीतदिग्दर्शनाखाली म्हटली आहे. याचा अर्थ, गेली पंचवीस वर्षे या ना त्या चित्रपटाच्या निमित्ताने त्यांची अनेक गाणी मी दिग्दर्शित करतोच आहे. पंचवीस वर्षे एक व्यक्ती सातत्याने, चढत्यावाढत्या लोकप्रियतेने सतत गाते आहे. तिच्या यशाचा आणखी वेगळा पुरावा कशाला द्यायला हवा?

लताबाईंनी चित्रपटव्यवसायात पार्श्वगायिका या नात्याने पंचवीस वर्षांपूर्वी पदार्पण केले. आज त्यांचा गौरव होत आहे. वास्तविक असे गौरव समारंभ हे एखादा कलावंत आपल्या व्यवसायातून निवृत्त होताना करावयाचे असतात. एका परीने तो समारंभ करून आतापर्यंत केलेल्या सेवेची त्या कलावंताला आपण पावती देत असतो. लताबाईंच्या बाबतीत मात्र असे म्हणता येणार नाही. आज पंचवीस वर्षांनंतरही त्यांच्याबद्दलची रसिकांची ओढ यत्किंचितही कमी झालेली नाही. उलट आज त्यांच्या गाण्याला इतकी मागणी आहे की ती त्यांना वेळेच्या अभावी अनेकदा पुरी करता येत नाही. आत्यंतिक कार्यव्यापृतता आणि प्रकृतीचे अस्वास्थ्य यामुळे कित्येकदा त्यांना लोकांचा रोष पत्करावा लागतो. म्हणून आजचा हा त्यांचा गौरवसमारंभ माझ्या दृष्टीने, संगीताच्या भाषेत बोलायचे झाले तर, 'बिलंपित अस्ताई' आहे. अजून त्याची 'बढत' आणि जलद लयीचा तराणा तर पुढेच आहे.

अनेक फुलांचा गुच्छ घेऊन त्यापासून आपण सुवासिक अत्तर काढतो. त्याप्रमाणे ईश्वरी कृपा, आईवडलांचे आशीर्वाद आणि स्वतःची डोळस तपश्चर्या या सर्व गुणांची एकरूप परिणती म्हणजे लताबाईंचे आजचे व्यक्तिमत्त्व होय. कोणताही माणूस जेव्हा कलेच्या प्रांगणात प्रथम पदार्पण करतो त्यावेळी त्याला काही एक आदर्श आपल्यासमोर ठेवावा लागतो. प्रारंभीच्या काळात अशा आदर्शांची आवश्यकताही असते. पण तोच आदर्श सतत समोर बाळगून माणूस त्याचेच अनुकरण करीत

राहिला तर स्वतःचे व्यक्तिमत्त्व त्याला कधीच सापडत नाही. लताबाईंचे मोठेपण जाणवते ते इथे. ज्यावेळी पार्श्वगायनाच्या क्षेत्रात त्यांनी प्रथम पाऊल टाकले त्यावेळी नूरजहाँ या गायिकेचा आदर्श त्यांनी आपल्यासमोर ठेवला होता. स्वतःच्या घराण्याची लकब कायम होतीच. पण त्याला नूरजहाँच्या गाण्याच्या पद्धतीची लताबाईंनी जोड दिली होती. पण पुढे जसजसा या क्षेत्रातला त्यांचा अनुभव वाढू लागला तसतसे त्यांनी 'स्वत्व' ओळखले. 'लता मंगेशकर' म्हणून काही एक स्वतंत्र शक्ती आहे हे त्यांनी जाणले आणि त्या दृष्टीने आपल्या कलेची जोपासना करण्यास, त्यासाठी परिश्रम घेण्यास त्यांनी सुरुवात केली. आज तर त्यांनी गाण्याची एक खास आपली अशी वैशिष्ट्यपूर्ण पद्धती प्रस्थापित केली आहे. तरुण गायकगायिकांनी लताबाईंच्या पंचवीस वर्षांच्या यशस्वी कारकीर्दीपासून जर काही शिकायला हवे असेल तर ते हेच होय. स्वतःचे व्यक्तिमत्त्व सगळ्यांनाच समजते. पण ते लोकांना पटविण्यासाठी व सतत टिकविण्यासाठी काय श्रम करावे लागतात ते लताबाईंच्या उदाहरणावरून समजावून घेण्याजोगे आहे.


लताबाईंच्या गळ्यातून शोकात्म करुणरसाची गाणी जास्त फुलतात असा समज आहे. पण माझ्या अनुभवाप्रमाणे लताबाईंची समजूतदार कलावंत दृष्टी ही सर्व रसांत सारख्याच रीतीने कामगिरी बजावते. आणि कोणत्याही भावनेचा वा रसाचा आविष्कार करणाऱ्या गीतांतून आपला गळा त्या सारख्याच परिणामकारकतेने फिरवू शकतात. याचे उदाहरण सांगावयाचे झाल्यास एकाच चित्रपटात लताबाईंनी गाइलेल्या दोन गाण्यांचा मी निर्देश करीन. 'अमर भूपाळी' या चित्रपटात लताबाईंनी गाइलेले 'नको दूर देशि जाऊ सजणा' हे शोकगीत लोकांच्या डोळ्यात जेवढ्या प्रभावीपणें अश्रू उभे करू शकते तेवढीच त्याच चित्रपटांतली 'लटपट लटपट तुझं चालणं ग मोठ्या नखऱ्याचं' ही लावणी ऐकताना म्हाताऱ्या पावलांत सुद्धा तारुण्याची लय फिरायला लागते. असेच एक आणखी उदाहरण 'कांचनगंगा' या लताबाईंनीच निर्मिलेल्या चित्रपटातल्या गीतांचे देता येईल. या चित्रपटातले 'जोग' रागामधले 'वीणे बोल बोल' हे करुणरसप्रधान गाणे लताबाईंनी जेवढ्या रसाळपणे गाइले आहे तेवढीच त्यातली 'नको बोलू रे' ही लावणी त्यांनी अस्सल शृंगारिक ढंगात गाइली आहे. भक्तिगीते गातानाही त्यांचे हेच कसब प्रत्ययाला येते. 'दो आँखे बारह हाथ' या चित्रपटातले 'ए मालिक तेरे बंदे हम' हे त्यांचे गीत उत्कट भक्तिगीताचा उत्कृष्ट नमुना आहे. त्याच चित्रपटात त्यांनी गाइलेले 'सैंया झूठोंका बडा सरदार निकला' हे खेळणेवालीच्या तोंडचे गाणे उडत्या मिष्किल आणि खेडवळ तारुण्याच्या मस्तीने भरलेल्या भावनेचा सुंदर रीतीने आविष्कार घडवते. देहाती गाणे कशा ढंगाने गावे याचा ते गीत एक आदर्श आहे.

वर निर्देशिलेली गाणी लताबाईंनी ज्या कौशल्याने म्हटली आहेत तीच सफाई व निर्दोषता अस्सल रागदारीची गाणी निरनिराळ्या पद्धतीने गाताना त्यांनी प्रकट केली आहे. 'साखरपुडा' या मराठी चित्रात 'पिया बिन मैका' ही 'नटनारायण' रागाची चीज लताबाईंनी गाइली आहे. आजही 'हिज मास्टर्स व्हॉइस' कंपनीची त्या गीताची ध्वनिमुद्रिका कोणी ऐकली तर अस्सल गवयी घराण्यात असणारे ते गाणे आहे याची त्याला खात्री पटल्यावाचून राहणार नाही. कारण ती मुळी अस्सल खानदानी चीजच त्या चित्रपटात लताबाईंनी गाइली आहे! तसे पाहिले तर आतापर्यंत मी स्वतःच अनेक तऱ्हेच्या रागरागिण्यांत त्यांचा सूर गुंफलेला आहे! पण प्रत्येक वेळी त्यांनी आपल्यावर सोपवलेली ती जबाबदारी तालबद्ध रीतीने नि सुरेलपणाने पार पाडली आहे. चित्रपटातल्या संगीताच्या आढावा घेताना सर्व तऱ्हेच्या संगीताचा बाजूंत त्यांनी जे चौफेर भरदार यश संपादन केले आहे ते खरोखरीच अभिमानास्पद आहे. आणि म्हणूनच लताबाई आज भारताच्या सर्वश्रेष्ठ गायिका ठरलेल्या आहेत. मग माझ्यासारख्याने जर आज त्यांच्यासंबंधी तेच उद्गार काढले तर कोणीहि परप्रांतीय मजवर प्रांताभिनिवेशाचा आरोप खचितच करणार नाही.

लताबाईंच्या कलेचे मला घडलेले हे दर्शन होय. ते जेवढे हृद्य आहे तेवढाच त्यांच्या उत्कट कलाप्रेमाची आणि थोर मनाची साक्ष पटविणारा दुसर एक अनुभवही मला सांगावासा वाटतो. मुंबई येथे अपोलो बंदरला छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ होणार होता त्या वेळची गोष्ट आहे. लाखो लोकांचा जमाव जमलेला होता. मी तेव्हा सुमारे हजार मुलांचे 'शिवमंगल स्तोत्र' बसविले होते आणि त्यांच्याकडून मी ते म्हणवून घेणार होतो. ती हजार मुले तेथे शिस्तीत उभी होती. लताबाई त्यावेळी आमच्यापासून बऱ्याच दूर अंतरावर बसल्या होत्या. नामदार यशवंतराव चव्हाण, आचार्य अत्रे, गृहमंत्री बाळासाहेब देसाई ही थोर मंडळी त्यांच्या समवेत होती. पण हजार मुलांच्या प्रचंड समुदायाचे रोमांचकारी दृश्य लताबाईंनी अवलोकन केले मात्र. त्यांच्या कलासागरात स्वरांच्या ऊर्मी उठू लागल्या. शिवछत्रपतींवरील निस्सीम भक्तीने त्यात वादळ निर्माण केले. आणि त्या वादळाच्याच जणू आवेगाने लताबाई ज्या आपल्या जागेवरून उठल्या त्या तडक त्या गर्दीतून वाट काढीत माझ्यासमोर येऊन उभ्या राहिल्या आणि अचानक म्हणाल्या, "वसंतराव, मला आज गाणे म्हणायचे आहे!"

मी स्तिमित होऊन त्यांच्याकडे टकमक बघतच राहिलो. आणि, आपणास नवल वाटेल पण गोष्ट खरी आहे की त्यावेळी अल्पावधीत तेथल्या तेथे एक गाणे लताबाईंना बसवून, साथीदारांना लगेच तयार करून तत्काळ त्या प्रचंड जनसमुदायाला ते आम्ही सादरही केले!

लताबाईंनी गाईलेल्या सहस्रावधि गीतांतून त्यांच्या कलावंत हृदयाची साक्ष पटतेच. पण ऐतिहासिक थोर कलाकारांच्या परंपरेत शोभण्यासारखी ही वरील कृती त्या दिवशी ज्या उत्स्फूर्तपणे त्यांच्याकडून घडली त्यातून त्यांच्या उत्कट कलाप्रेमाचा आणि थोर व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार किती हृदयंगम रीतीने होत आहे.



वसंत देसाई

मिनू कात्रक

'माइक'समोर लता

वीसबावीस वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. मी तेव्हा कारदार स्टुडिओमध्ये कामाला होतो. ध्वनिमुद्रणासाठी नव्यात नवे असे आर. सी. ए. रेकॉर्डिंग मशीन आमच्याकडे बसवून घेतलेले होते. याच सुमारास चित्रपटदिग्दर्शक मा. विनायक यांचा आणि माझा परिचय झाला. ते त्यावेळी 'मंदिर' हा चित्रपट हिंदीमध्ये काढणार होते. या चित्रपटाचे संगीत वसंत देसाई देणार होते. विनायक मला म्हणाले,

"आमच्या चित्रपटाची गीते मी तुमच्याकडे ध्वनिमुद्रित करून घेणार आहे. मात्र आमच्याकडे एक छोटी मुलगी गाणी म्हणणार आहे. ती नवीन ट्रॅक आर्टिस्ट आहे. तेव्हा तिला जरा सांभाळून घ्या म्हणजे झाले!"

विनायकांच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रणाचा दिवस आणि वेळ ठरली. स्टूडिओपासून ध्वनिमुद्रणाची जागा दूर अंतरावर होती. स्टूडिओच्या हॉलमध्ये गाण्याच्या तालमी सुरू झाल्या होत्या. मी त्या हॉलमध्ये गेलो. पाहतो तो पंधरावीस वादकांचा वाद्यमेळ साथीला आहे आणि परकरपोलके घातलेली एक लहानशी मुलगी मोठ्या धिटाईने आणि आत्मविश्वासाने गात आहे. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. अचंबित होऊन मी बघतच राहिलो. ही चिमुरडी गाणार वाटते! मी लक्षपूर्वक तिचे गाणे ऐकू लागलो. सुराला आणि तालाला तर ती अगदी पक्की दिसत होती. मात्र बालवयाला साजेशी एक कोवळी तीव्रता तिच्या आवाजात होती. तिचे गाणे ऐकता ऐकता मी स्वतःलाच प्रश्न विचारीत होतो, शमशाद बेगम, जोहराजान, नूरजहाँ, पोखराज बेगम अशा एकापेक्षा एक नामांकित पार्श्वगायिका आज आघाडीवर आहेत, त्यांच्यासमोर ही छोटी मुलगी आपला कितपत प्रभाव पाडू शकेल कोण जाणे! पण त्या तालमीच्या वेळीही तिचे गाणे मला आवडले हे मात्र खरे.

पुढे 'मंदिर' मधली तिची गाणी आम्ही ध्वनिमुद्रित केली. सुरुवातीच्या ध्वनिमुद्रणाला तिचा आवाज कर्कश वाटला, पण नंतर तो तिचा दोष नसून नव्या ध्वनिमुद्रणयंत्राचा तो परिणाम होता असे ध्यानी आले. त्यावेळी ध्वनिमुद्रणाची पद्धत आजच्याइतकी प्रगत, परिपूर्ण आणि निर्दोष नव्हती. नंतर यंत्रात अवश्य त्या सुधारणा करून घेऊन त्या मुलीचे गाणे आम्हाला

हवे होते तसे आम्ही ध्वनिमुद्रित करून घेतले. गाणे सुरेख झाले आणि सर्वांना ते आवडलेही.

मध्यंतरी काही काळ गेला आणि पुन्हा अचानक तोच आवाज मा. गुलाम हैदर यांनी संगीत दिलेल्या गाण्यांतून माझ्या कानी पडला. माझा कान ध्वनिमुद्रकाचा. मला तात्बडतोब जाणवले की आता हा आवाज ध्वनिमुद्रणाला अगदी हवा तसा तयार झाला आहे. उच्चारांत जे थोडे मराठीपण पूर्वी जाणवे तेही आता नाहीसे झाले होते. यानंतर ती मुलगी वरचेवर आमच्याकडे ध्वनिमुद्रणासाठी येऊ लागली. तिला भराभर कामे मिळू लागली. आज अनिल विश्वास, तर उद्या सी. रामचंद्र, तर परवा डी. पी. कोरगांवकर अशा एकापेक्षा एक तरबेज संगीतदिग्दर्शकांच्या दिग्दर्शनाखाली ती गाणी गाऊ लागली. सारेजण 'लता' 'लता' म्हणून तिला हाक मारीत. तिच्याशी ममतेने वागत. तिचे कौतुक करीत.

एकोणीसशे अठ्ठेचाळिस साली ताडदेव येथे फेमस सिने लॅबोरेटरीत लताची गाणी ध्वनिमुद्रित झाली. 'बरसात' चित्रपटातली गाणी ती गात होती. त्यावेळी तिने जे पहिले गाणे गाईले ते 'जिया बेकरार है' हे होते. नवा हॉल, नवे रेकॉर्डिंग मशीन आणि आता अत्यंत सराईत, तल्लख झालेला लताचा आवाज. हिंदी गीतांतले तिचे साफ आणि निर्दोष उच्चार. आणि 'जिया बेकरार है' सारखे वेधक गीत. त्या साऱ्यांचा मेळ असा काही अभूतपूर्व जमला की त्या गाण्याचे ध्वनिमुद्रण करताना एका विलक्षण आनंदाने मी थरारून गेलो. त्याच क्षणी मी मनाशी खूणगाठ बांधली की हे पाणी काही निराळेच आहे. आतापर्यंतच्या सगळ्या फ्रॅबॅक आर्टिस्टसना मागे टाकून ही मुलगी लौकरच पुढे जाणार आणि या क्षेत्रातले सर्वोच्च मानाचे स्थान ती पटकावून बसणार. तेव्हापासून तिची प्रगती मी मोठ्या आनंदाने आणि कुतूहलाने बघत राहिलो.

नंतरच्या काळात लताच्या कामाचे प्रमाण एकदम इतके वाढले की तिला अक्षरशः फुरसद मिळणे अशक्य होऊन बसले. एकोणीसशे अठ्ठेचाळीस ते अठ्ठावन्न या दहा वर्षांच्या काळात एक आठवडा असा गेला नाही की ज्यात आमच्याकडे लताचे गाणे ध्वनिमुद्रित झाले नाही. माझ्याकडे तिने किती गाणी गाइली असतील याची मोजदाद तिला स्वतःला तरी असेल की नाही कोण जाणे. ती आमच्या फेमस सिने लॅबोरेटरीची जणू एक कुटुंबीय-फॅमिली मेंबर—बनली. इतके तिला येथे काम करणे अंगवळणी पडून गेले. लौकरच मराठी व हिंदी गीतांच्या जोडीला बंगाली, तमीळ, गुजराती, कानडी या भाषेतली गाणीही लता गाऊ लागली. तमीळ कानडीचे अवघड शब्दोच्चार जसे तिने सहजगत्या आत्मसात केले तसा बंगाली उच्चारांतला गोल गोडवाही तिने सफाईने कंठगत केला. तिने गाइलेली परभाषेतली गाणीदेखील परभाषिक व्यक्तीने गाइली आहेत असे कधी वाटत नाही. विशेषतः बंगाली भाषेतली तिची गाणी ही कोणत्याही बंगाली कलावंताला देखील तिच्याहून निर्दोष रीतीने गाता येतील असे म्हणता येणार नाही.

लताने आजपर्यंत माझ्याकडे किती गाणी गाइली असतील त्याला गणतीच नाही हे मी वर सांगितलेच. असा एकही नामांकित संगीत दिग्दर्शक नसेल की ज्याच्या दिग्दर्शनाखाली कधी ना कधी लता आमच्याकडे गाइली नाही. शंकर जयकिशन, बर्मन, मदनमोहन, हेमंतकुमार, रोशन, लक्ष्मीकान्त-प्यारेलाल—संगीतदिग्दर्शक जुना असो की नवा असो, पंधरापंधरा वीसवीस चित्रपट ज्याच्या नावावर रुजू आहेत असा अनुभवी असो की पहिलेच संगीतदिग्दर्शन ज्याला मिळाले आहे असा अगदी नवखा अननुभवी असो, लता त्या सर्वांकडे सारख्याच हौसेने, कष्टाळूपणाने आणि प्रामाणिकपणाने गाइली आहे. या क्षेत्रात लता जसजशी मोठी होत गेली तसतशी दुसऱ्यांना सहकार्य देण्याची तिची प्रवृत्ती अधिकाधिक वाढत गेली. आणि नव्या कलावंतांना तिने सतत प्रोत्साहन दिले. मग तो नवा गायक असो की नवा संगीतदिग्दर्शक असो. हा लहान तो मोठा असा भेदभाव तिच्याजवळ कधीच नसे.

मिनू कात्रक

मला ते दिवस अजूनही आठवतात. लता पार्श्वगायनाच्या क्षेत्रात जसजशी लोकप्रिय होत चालली तसतसा तिच्यावरचा कामाचा बोजा वाढत चालला. निर्माते, संगीतदिग्दर्शक आपली गाणी लतानेच गावीत म्हणून आग्रह धरू लागले. तिच्या घरी जाऊन धरणे धरून बसू लागले. पुष्कळदा हे लोक तिला अगदी नकोसे करून सोडीत. आणि काहीसा स्वभावातला भिडस्तपणा तर काहीशी कुणालाही शक्य तो न दुखवण्याची वृत्ती यामुळे लताही त्या साऱ्यांना होकार देई. साऱ्यांची गाणी गाई. त्या काळी स्टंट चित्रपटांतली गाणीदेखील लताने गाइल्याची उदाहरणे हवी तेवढी सापडतील. कोणाला दुखवणे तिच्या स्वभावातच नाही. कोणाला 'नाही' म्हणणे जिवावर यावयाचे. यामुळे त्या दहाबारा वर्षांत लताने जिवापाड कामे केली आहेत. पण त्या श्रमांचा तिच्या प्रकृतीवर दूरगामी परिणाम झाला आहे असे मला वाटते. आजच्या तिच्या प्रकृतीच्या नाजुकपणाला व अस्वास्थ्याला तिने त्यावेळी केलेले अतिश्रम बऱ्याच अंशी कारण आहेत.

लताच्या मी ध्वनिमुद्रित केलेल्या किती तरी सुंदर सुंदर गाण्यांच्या गोड आठवणी माझ्या मनात यावेळी जाग्या होत आहेत. राजकपूरच्या 'संगम' पर्यंतच्या सर्व चित्रपटांची लताची गाणी आमच्याकडेच ध्वनिमुद्रित झाली. 'अनपढ' या चित्रपटातले 'आपकी नजरोंने समझा' हा पुढे अतिशय गाजलेला गझल जेव्हा तिने गाइला तेव्हा आम्ही सारेजण आनंदाने जसे काही थरारून गेलो होतो. 'अदालत' चित्रपटातले 'यूं हसरतोंके दाग' हा मदनमोहन यांनी संगीत दिलेला सुंदर गझल लताने जेव्हा गाइला होता तेव्हाही त्या गीतातल्या विलक्षण आर्ततेने आमच्या काळजांना असाच स्पर्श केला होता. 'फिल्मफेअर ॲवॉर्डस्' ज्या गाण्यानी लताला मिळवून दिली ती तिची गाणीही येथेच ध्वनिमुद्रित झालेली आहेत. लता अमुक एक प्रकारचे गाणे आमच्याकडे गाइली नाही असे झालेच नाही. शास्त्रीय पद्धतीच्या गाण्यापासून तो गझलठुंबरीपर्यंत आणि कोठीच्या गाण्यापासून तो रंबासंबा गाण्यापर्यंत सर्व तऱ्हा ती आमच्याकडे सारख्याच सफाईने गाऊन गेली आहे. तिने गाइलेल्या गाण्यांत उदास, आर्त, उल्हसित, खेळकर, शृंगारिक, भक्तिपर, असे सर्व 'मूडस' येऊन गेले आहेत. आणि प्रत्येक गाणे गाताना त्या त्या गाण्याचा 'मूड' लताने अचूक पकडलेला आहे.

आमच्या स्टुडिओत तर लताची गाणी मी वर्षानुवर्षे ऐकत आलो आहे. पण स्टुडिओ-बाहेरच्या जाहीर कार्यक्रमांतूनही तिची गाणी मला अनेकदा ऐकायला मिळाली आहेत. एकोणीसशे बासष्ट साली संरक्षण निधीसाठी कवि प्रदीप यांनी रचलेले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेलें 'ऐ मेरे वतनके लोगो' हे अप्रतिम गीत लाखो लोकांसमोर लताने गाइले आणि साऱ्यांची हृदये तिने गहिवरून टाकली. त्या अपूर्व प्रसंगी मी तेथे हजर होतो. तो माझ्या आयुष्यातला एक अत्यंत संस्मरणीय क्षण आहे.

इतकी वर्षे लता आमच्याकडे गाते आहे. या प्रदीर्घ काळात ती कसकशी बदलत गेली हे पाहणे मोठे मनोरंजक आहे. कलावंत म्हणून ती आज फार प्रगल्भ झाली आहे. पार्श्वगायनाचे तंत्र, त्यातल्या बारीकसारीक खुब्या तिला पूर्णपणे अवगत झाल्या आहेत. आवाजावर पूर्ण ताबा ठेवणे, त्याला योग्य ते वळण देणे, त्याची व्याप्ती कमी किंवा जास्त करणे येथपासून तो 'माइक'समोर किती अंतरावर उभे राहावे, तेथून हवे तेव्हा जवळ वा दूर असल्याचा आभास कसा निर्माण करावा इथपर्यंत या कलेतले सारे बारकावे लताने आता आत्मसात करून घेतले आहेत. या मुलीचा आवाज ध्वनिमुद्रणाच्या दृष्टीने कसा व किती उपयोगी पडेल कोण जाणे असा तिच्या बाबतीत प्रारंभी मला प्रश्न पडला होता. तोच तिचा आवाज आज ध्वनिमुद्रणाला सर्वांत सोपा आणि सर्वाधिक सहकार्य देणारा असे मान्य करण्यापर्यंत आमची मजल येऊन ठेपली आहे. यावरूनच लताची या क्षेत्रातली प्रगती ध्यानात येईल. आज तर, गाणे कसेही, कोणत्याही धाटणीचे असो, नुसता नजरेचा इशारा लताला पुरे असतो. ती या कलेत किती पारंगत झाली आहे याचे एक लहानसे उदाहरण

सांगतो. अनेकदा एखाद्या गाण्याच्या बऱ्याच तालमी होतात. पण लता अशी हुषार आहे की त्या तालमीत ती आपला दम, आपली शक्ती बेतावेताने खर्च करते आणि प्रत्यक्ष 'टेक' मध्ये मात्र शक्तिसर्वस्व वेचून गाते. त्यामुळे ध्वनिमुद्रित गाणे हे उत्कृष्ट झाल्यावाचून राहतच नाही! आज तिच्या स्वराला इतका तोल आणि वजन आले आहे की तिचे गाणे ध्वनिमुद्रित करणे हा एक अत्यंत सुखद अनुभव होऊन बसला आहे.

कलावंत म्हणून लता जशी वाढत गेली तशी हाडामांसाची एक जिवंत व्यक्ती म्हणूनही ती गेल्या वीसबावीस वर्षांत बदलत गेली आहे. तेव्हाची ती परकरी अल्लड पोर आता प्रौढ झाली आहे. पूर्वीची कृशता जाऊन ती अंगाने जरा भरली आहे. पूर्वीच्या बुजरेपणाची जागा आता आत्मविश्वास-युक्त हालचालींनी घेतली आहे. बोलण्याचालण्यांत आता अधिक मोकळेपणा आला आहे. बदलल्या नाहीत अशा दोनच गोष्टी सांगता येतील. एक लताच्या स्वभावातला साधा निगर्वीपणा आणि दुसरी तिचे मिष्किल हसू. विनोदाची दुर्मिळ देणगी लताला लाभलेली आहे. तिच्याइतकी हजरजबाबी व्यक्ती मी दुसरी क्वचितच पाहिली असेल. स्टूडिओत ती आली की वातावरण एकदम उल्हसित होऊन जाते. लताशी गप्पा मारणे हाही एक आनंददायक अनुभव आहे. या गप्पांत कधी ती कोणाच्या नकला करून पोटभर हसवील. कधी नुकत्याच पाहिलेल्या क्रिकेटच्या मॅचमधल्या गंमती सांगेल. कधी 'कुलसुम' या नुकत्याच ऐकलेल्या इजिप्शियन गायिकेची तारीफ करील तर कधी आदल्या दिवशी पाहिलेल्या नव्या चित्रपटावर चुरचुरीत विनोदी भाष्य करील. लता विनोदी आहे. पण तिचा विनोद सभ्यतेच्या मर्यादा कधी ओलांडीत नाही. आणि दुसऱ्या कलावंताबद्दल, गायकाबद्दल किंवा गायिके-बद्दल उपहासाचे वा टीकेचे उद्गार कधीही तिच्या तोंडून निघाल्याचे मला स्मरत नाही.

आज लता पार्श्वगायनाच्या क्षेत्रात अशा एका जागी उभी आहे की इथून पुढे ती किती मोठी होईल याचा अंदाजही करवत नाही. ती सतत वर वर जात राहणार हे मात्र निर्विवाद. तिच्याबद्दल माझ्या काय भावना आहेत हे एक लहानसे उदाहरण देऊन स्पष्ट करतो. एकदा एका निर्मात्याला लताचे गाणे आपल्या चित्रपटासाठी हवे होते. त्याने लताकडून दिवस निश्चित करून घेतला. पण त्या दिवशी काही तरी अडचण निघाली आणि 'टेक' रद्द झाला. असेच आणखी दोनतीन वेळा झाले. तो निर्माता काकुळतीला येऊन मला विचारू लागला, "मी आता काय करू?"

मी त्याला सल्ला दिला, "आणखी थांबावे लागले तरी थांब. पण गाणे लताचेच घे."

पुढे त्या निर्मात्याला लताकडून पुन्हा दिवस मिळाला. ती आली. गाणे ध्वनिमुद्रित झाले. ते उत्तम झाले. निर्माता खूष होऊन गेला. इतके दिवस त्याने वाट पाहिली त्याचे सार्थक झाले होते.

गाणे ध्वनिमुद्रित झाल्यावर मी त्या निर्मात्याला एकीकडे घेऊन त्याला म्हटले, "Don't you think she was worth waiting for ?"

त्याने समाधानपूर्वक मान डोलविली.

हेच मी शेवटी लताबद्दल सांगेन.

"She has been worth waiting for !"

शतकानुशतके जिची नुसती प्रतीक्षा करावी अशी ती थोर कलावंत गायिका आहे!

मिनू कात्रक

मीना खडीकर

कवडसे

अगदी लहानपणापासूनच दिदीची स्मरणशक्ती चांगली आहे. दिदी त्यावेळी असेल सहासात वर्षांची. सांगलीत प्रभातचा 'संत तुकाराम' लागला होता. आम्ही सर्वांनी तो चित्रपट बघितला. दुसऱ्या दिवसापासून आमच्या घरातच 'संत तुकाराम' सुरू झाला. दिदीला तुकारामाचे सर्व अभंग, संवाद तोंडपाठ झाले होते. त्यामुळे ती तुकाराम, मी जिजाई आणि आशा मंगळाई अशी पात्रयोजना झाली. घरातल्या सर्व गाद्या एकावर एक ठेवून दिदी त्यावर बसायची आणि आम्ही बाकीची भावंडे 'रोपां' सारखी जमिनीवर आडवी झोपायची. नंतर दिदी 'आधी बीज एकले' हा तुकारामाचा अभंग सुरू करायची. अभंगाच्या एकेका ओळीबरोबर आम्ही हळूहळू डोके उचलून, माना उंचावून, उठून रोपासारखे डोलू लागायचे. आम्हला रोपे बनवण्याची ही युक्ती दिदीचीच. 'आमचा संत तुकाराम' बघायला बाबा व माई हे फार मोठे प्रेक्षक असायचे.

दिदी पहिल्यापासून फार चपळ. उत्साही. कुठलेही बाहेरचे काम असो, ती त्यासाठी लगेच तयार असायची. एकदा आमच्या माईला कुठूनतरी खोटे दोन आणे मिळाले. दिदीने ते पाहिल्याबरोबर तिने ते पैसे चालवण्याची हमी घेतली. ती आमच्या वाण्याकडे गेली. खोटे दोन आणे तिने पटकन वाण्यापुढच्या पैशाच्या पेटीत टाकून दिले. आणि दोन आण्यांचा साबण घेऊन घरी आली. दीनानाथरावांची मुलगी म्हणून वाण्याने पैसे पारखून घेण्याची काळजी घेतली नाही. दिदी घरी आली आणि आपला 'पराक्रम' ऐटीत सांगू लागली. बाबांनी ते ऐकले तेव्हा त्यांनी तिला वाण्याची माफी मागून दुसरे खरे दोन आणे त्याला देऊन यायला तिला सांगितले. दिदीने हट्ट केला पण बाबांपुढे तिचे काही चालेना. शेवटी ती रडतरडत वाण्याकडे गेली. आणि त्याची क्षमा मागून खरे पैसे त्याला देऊन परत आली!

दिदीला पूर्वीपासून राग फार यायचा. पूर्वीच्या मानाने आता ती फारच थंड झाली आहे. लहानपणी तिला कुणी रागावले किंवा तिच्या मनाविरुद्ध एकादी गोष्ट घडली की ती लगेच उठायची आणि जीव द्यायला जायची. जाताना ती आपले सर्व दागिने काढून ठेवायची आणि मगच ती जीव द्यायल-

नदीकडे जायची. मात्र जाताना ती मागे वळून, आपल्याला कोणी बोलवायला येते का हे बघत बघत जायची. आमची माई फार भित्री. ती लगेच दिदीच्या पाठोपाठ जाऊन तिला मनवून परत आणायची. पण एक दिवस काय झाले, दिदी रागावून जाताच बाबांनी दार लावून घेतले. माईलाही त्यांनी तिच्या पाठोपाठ जाऊ दिले नाही. दिदीने रस्त्यावर थोडा वेळ वाट बघितली. कुणीच तिला बोलवायला येईना, तेव्हा ती फार बावरली आणि निमूट घरी परत आली. दारांतून तिने बाबांची, माईची क्षमा मागितली. पुन्हा जीव देण्याची भीती घालणार नाही असे कबूल केले तेव्हाच बाबांनी तिला आत घेतले. तेव्हापासून नंतर दिदी कितीही वेळा रागावली असली तरी जीव देण्याची भीती मात्र आजतागायत तिने पुन्हा कधी आम्हाला घातली नाही!

नाटकांमधून मी आणि दिदी जोडीने काम करीत असू. आम्ही नाटकात काम केलेले बाबांना मुळीच आवडत नसे. पण आम्ही 'नमना'त का होईना, पण स्टेजवर जातच होतो. पुढे पुढे दिदी नाटकांतून लहान लहान कामेही करू लागली.

एकदा आमचा मुक्काम नाशिक जिल्ह्यात नांदगाव येथे होता. बाबांची प्रकृती त्या दिवशी बरी नव्हती. त्याच दिवशी 'त्राटिका' नाटक लावले होते. दिदी त्या नाटकात तान्याचे काम करीत होती. दिदी तेव्हा फारच लहान दिसायची. पण त्या दिवशीचे नाटक तिने निव्वळ आपल्या गाण्यावर ओढून नेले. 'बघीतलं ग्वाड पाखरू' ही लावणी तिने फारच छान म्हटली. तिच्या आवाजामुळे तिच्या छोट्या वयाकडे किंवा त्याच्याशी विसंगत अशा लावणीच्या शब्दांकडे लोकांचे लक्षच गेले नाही.

'सौभद्र' नाटकात दिदी नारद आणि बाबा अर्जुन व्हायचे. बाबांपुढे ती फारच लहान दिसायची. इतका लहान नारद मराठी रंगभूमीवर कधीच आला नसेल. 'सौभद्र' नाटकात पहिल्याच अंकात दिदीला बाबांसमोर जवळजवळ चारपाच गाणी म्हणावी लागायची. पण 'भीती' हा शब्द लहानपणापासूनच दिदीच्या कोशात नाही. त्यामुळे ती खुशाल बाबांसमोर गायची. इतकेच नव्हे, तर त्यांच्या बरोबरीने 'वन्स मोअर' मिळवायची. ती गाऊन स्टेजवरून आत आली की बाबांच्या डोळ्यात पाणी उभे राहायचे. ते नेहमी म्हणायचे, "माझी 'ततावावा' माझ्या पाठीमागे माझ्यासारखीच सर्वांना सांभाळील." 'ततावावा' हा दिदीसाठी बाबांचा खास प्रेमाचा शब्द. बाबांनी त्यावेळी तिच्याविषयी काढलेले ते उद्गार दिदीने खरे करून दाखवले आहेत. बाबांच्या आपल्यावरच्या विश्वासाला तिने धोका दिला नाही.

माझ्या बाबांच्या मृत्यूनंतर दिदीने आम्हा साऱ्यांना कसे सांभाळले हे आता सर्वांनाच माहीत आहे. त्रेचाळीस साली मी आणि दिदी मुंबईत विनायकरावांकडे राहायला आलो. आयुष्यात प्रथमच आम्ही माईला आणि भावंडांना सोडून इतक्या दूर, परक्यांच्या घरी आलो होतो. त्रेचाळीस ते पंचेचाळीस सालापर्यंत दिदीने सर्व प्रकारचा त्रास सहन केला. पण त्याची झळ तिने मला कधीही लागू दिली नाही. ती मला नेहमी सांगायची, "मी काम करते आहे. करीत राहीन. पण मीना, तुला जेवढे शिकायला मिळेल तेवढे तू शिकून घे. एकदा आपल्या घरातून कुणी एक तरी डॉक्टर, बॅरिस्टर झालेले मला बघायचे आहे." दिदीची ही इच्छा आम्ही भावंडांनी काही पुरी केली नाही. आम्ही पण हळूहळू चित्रपटाकडेच वळलो. यामुळे दिदीला अजूनही कधी कधी आमचा खूप राग येतो. आणि मग ती माझ्या आणि आशाच्या मुलांना खूप खूप शिकवायचे ठरवते!

सत्तेचाळीस साली विनायकराव गेले. प्रफुल्ल कंपनी बंद झाली. आणि परत एकदा दिदीला कामासाठी बाहेर पडावे लागले. बेचाळीस ते सदुसष्ट सालापर्यंत म्हणजे आज पंचवीस वर्षे ती सतत कामच करते आहे. आमच्यासाठी. घरासाठी. लोकांनी स्तुती केली, निंदा केली, पण तिच्यावर कसलाच परिणाम नाही. स्तुतीने ती चढत नाही, निंदेने पडत नाही. माझी दिदी हिमालयासारखी उंच आहे. तिचे मन सागरासारखे विशाल आहे.

मीना खडीकर

माझे लग्न ठरल्याचे माईने तिला सांगितले, त्यावेळी तिने माईला बजावून ठेवले होते, "मीनाच्या पसंतीनेच तिचे लग्न व्हायला हवे. तिच्या मनाविरुद्ध काही होता कामा नये. इतकी वर्षे मी तिला सांभाळले आहे. या पुढेही माझी बहीण मला जड होणार नाही." माझे लग्न दिदीने मोठ्या थाटाने केले. घरातले पहिले कार्य म्हणून तिने ते अभिमानाने, दणक्यात पार पाडले.

दिदीच्या स्वभावातला एक अत्यंत लोभस गुण म्हणजे तिला लहान मुलांची असलेली आवड. आशाच्या व माझ्या मुलांवर तिचे विलक्षण प्रेम आहे. शॉपिंगला गेली तर प्रत्येक मुलासाठी काही ना काही वस्तु आवडीने घेऊन यायला ती विसरणार नाही. नाताळच्या व दिवाळीच्या वेळी मुलांना गाडीत घालून ती बाजारात नेते व त्यांच्यासाठी केवढी तरी खेळणी खरेदी करून घरी घेऊन येते ! लहान मुलांचा निष्कपटपणा आणि त्यांची निरागसता यामुळेच तिला मुलांबद्दल अतोनात माया वाटते. घरात कोणी मूल रडत असेल तर दिदी ताबडतोब त्याला जवळ घेईल. त्याची समजूत घालील व त्याचे रडे बंद करून त्याला हसवील ! रेकॉर्डिंग करून घरी आल्यावर कितीदा ती अत्यंत थकलेली असते. पण अशा वेळी माझी, आशाची मुले घरात केवढाही धुडगूस घालीत असली, दंगा करीत असली तरी दिदी चुकूनही त्रासल्यासारखे दाखवणार नाही, किंवा त्यांच्या अंगावर ओरडून त्यांना गप्प बसवणार नाही. मुलांची सर्व कामे ती हौसेने करते. माझ्या मुलाचे, योगेशचे, तर तिने एकदा केस कापले होते. आणि तेही अगदी सराईतपणे ! एखादे मूल छानशा 'पोज' मध्ये बसलेले दिसले की दिदी लगेच आपला कॅमेरा घेऊन येते आणि पटकन् त्याचा फोटो घेऊन टाकते. माझ्या व आशाच्या मुलांचे असे कितीतरी छान छान फोटो तिने काढून ठेवले आहेत.

दिदीच्या गाण्यासंबंधी मी काय लिहिणार ? तिची बहीण म्हणून लिहीत नही. पण तिच्या आवाजाची, गाण्याची मी फार मोठी भक्त आहे. आमचे एक स्नेही दिदीचे गाणे ऐकून नेहमी म्हणतात, "दिदी म्हणजे संगीत क्षेत्रांतील 'ब्रॅडमन' आहे."

मीही तेच म्हणते.



सचिनदेव बर्मन

महाराष्ट्रीय? नव्हे भारतीय

माझ्या पुष्कळशा स्वररचना गाण्याकरता लताबाईसारखी गायिका लाभली ही माझ्या दृष्टीने फार अभिमानाची गोष्ट आहे. आणि हीच भावना माझे सहकारी असलेले इतर संगीतकारही व्यक्त करतील याबद्दल मला यत्किंचितही शंका वाटत नाही.

बॉंबे टॉकीजच्या 'मजबूर' या चित्रपटामध्ये पार्श्वगायिका म्हणून या साध्यासुध्या मुलीला स्वर्गवासी गुलाम हैदर यांनी जेव्हा प्रथम संधी दिली तो दिवस भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात केवढा भाग्यशाली ठरणार होता याची त्यावेळी कोणाला कल्पना तरी असेल काय? मी तेव्हा 'फिल्मिस्तान' मध्ये काम करीत होतो. त्यावेळी आपल्याला एका नव्या गायिकेचा शोध लागला असल्याचे गुलाम हैदर यांनी मला सांगितले होते. आणि कोणत्याही कलावंताविषयीचे त्यांचे मत वा अंदाज अचूक खरा ठरतो हे मला अनुभवाने ठाऊक झाले होते. तेव्हापासून मी लता मंगेशकर यांना पाहत आलो आहे आणि या श्रेष्ठ गायिकेची कसकशी प्रगती होत गेली ते मी कौतुकाने न्याहाळले आहे. थोड्याच अवधीत चित्रपटसृष्टीच्या क्षितिजावर लता एखाद्या तेजस्वी ताऱ्यासारखी झळकू लागली. आज इतकी वर्षे झाली, हा तारा तसाच झळकत आहे आणि कोट्यवधी लोकांना अपूर्व आनंद देत आहे.


मी संगीतमय वातावरणात वाढलो आहे. असंख्य गायकांशी परिचय करून घेण्याचे, त्यांची गाणी ऐकण्याचे भाग्य मला लाभले आहे. कितीतरी असाधारण सुंदर स्वर माझ्या कानांत घुमत आहेत. पण लताच्या आवाजाचा गोडवा, त्याचा लवचिकपणा केवळ अतुलनीय आहे. स्वतःची अशी खास शैली असलेल्या श्रेष्ठ दिग्दर्शकांच्या आणि गीतकारांच्या रचनांना लताइतका योग्य न्याय क्वचितच कोणी दिला असेल.

संगीताविषयी बोलणे आणि या श्रेष्ठ कलेचे गुणानुवाद गाणे हा कोणत्याही संगीतप्रेमी व्यक्तीचा हक्कच आहे. एखादे मधुर गीत मनाला किती शांती आणि तृप्तता देऊ शकते, आणि एखादे स्फूर्तिदायक गीत निराशेच्या गाण्यातून माणसाला कसे वर ओढून काढू शकते हा थरारून टाकणारा

अनुभव मी कितीदा तरी घेतला आहे. लताला असा जादूचा स्वर लाभलेला आहे की तो माणसाला एकदम अंतराळात भराऱ्या घ्यायला लावू शकतो आणि त्याबरोबरच शोकग्रस्त मनाचे दुःखही तो हलके करतो.

आज आपला देश विलक्षण संघर्षमय परिस्थितीतून जात आहे. भाषिक प्रश्नावर काही प्रांत आपापसात कडाडून भांडत आहेत. हे प्रांतीय मनोवृत्तीचे लोक इतके उर्मट आणि मगरूर झाले आहेत की जर एखादा जबाबदार नेता त्यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगायला गेला तर त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याऐवजी त्याच्यावर दगडफेक करायलाही ते कमी करणार नाहीत, पण तेच जन्माने महाराष्ट्रीय असलेल्या लताला तमीळनाडमध्ये जाऊन एखादे तमीळ गीत म्हणू द्या, हे अतिसंवेदनशील तमीळ लोक अहमहमिकेने तिला 'आपली' म्हणू लागतील! कारण तमीळ गीते निर्दोष उच्चारांसह आणि खास तमीळ वैशिष्ट्यांनिशी बिनचूक कशी गावीत याचे कसब लताला पूर्ण अवगत आहे. याच पद्धतीने बंगाली, भोजपुरी आणि पंजाबी लोकही तिला आपली म्हणतील. तिचे अत्यंत प्रेमाने स्वागत करतील. कारण तिला या सर्व प्रांतांच्या भाषा माहीत आहेत. इतकेच नव्हे तर त्या त्या प्रांतांची प्रादेशिक गीते खुद्द तेथील लोकांइतक्याच सहजतेने, विनासायास लता गाऊ शकते. तेव्हा एवढ्यातेवढ्या कारणानेही प्रक्षुब्ध होणाऱ्या, अत्यंत तीव्र प्रांतीय मनोवृत्तीच्या लोकांना आपल्या भाषणांनी शांत करण्याचे जे अवघड कार्य प्रत्यक्ष नेत्यांनाही जमणार नाही ते ही साधी निगर्वी मुलगी केवळ त्या लोकांची गाणी गाऊन सहजपणे साधू शकेल. आणि त्यांचे शांतताप्रिय लोकांत ती परिवर्तन घडवून आणील!

भपका, झगझगाट, जाहिरातबाजी यांच्या या युगातही लता मंगेशकर अत्यंत साधी, प्रसिद्धिपराङ्मुख राहिली आहे. असाधारण कीर्ती, मोठा नावलौकिक आणि विपुल वैभव प्राप्त झालेले असूनही लता ही कोणत्याही सर्वसामान्य माणसासारखी साधीसुधी राहाते, बोलते, वागते हा तिचा केवढा मोठेपणा आहे!



गोपाल नीलकंठ दांडेकर

समर्पिता

साल असावे पंचेचाळीस किंवा शेहेचाळीस. सुधीर फडके त्यावेळी पुण्यास स. प. महाविद्यालयाच्या शेजारच्या पर्वतीरस्त्यावर रहात असत. दिदीला सर्वप्रथम पाहिले ते त्या घरात. चित्रपट कुठला ते स्मरत नाही, पण फडके त्याचे संगीत रचीत होते. पदे गावबून घ्यायची होती दिदीकडून. गप्पा मारीत बसलो असता कुणी सांगितले, की लता मंगेशकर आल्या आहेत.

एकदम जुने अनुबंध जागे झाले. लहानपणी वडिलांचे बोट धरून कै. दीनानाथांचा रंगमंचावरला अभिनय पाहिला होता. 'रणदुंदुभी 'नाटकात तेजस्विनीचा वेष लेऊन ते जेव्हा रंगभूमीवर पाऊल घालीत, तेव्हा हर्षाने थरारून टाळी पिटलेली स्मरली. काय ते रूप! कसा तो अभिनय! कशी वाक्यांची फेक! श्रोत्यांची अंगे रोमांचित करून टाकणारे कसे ते गाणे!

त्या स्वरगंधर्वाची ही कन्या कशी असेल? कशी दिसेल?

मोठ्या कुतूहलाने बैठकीत पाऊल घातले. एक लहानगे रूपडे दिसले. मुद्रा कै. दीनानाथांशी जवळीक सांगणारी. वर्ण सावळा. आपल्याच आकृतीत ते रूपडे हरवून गेलेले. मस्तकावर असलेल्या भरपूर केशभाराच्या दोन वेण्या घातलेल्या.

पण जे जाणवले ते इथेच संपले नाही. रिकाम्या वेळी मनाशी चाळा करीत बसे, की मीरा कशी असेल? जनी कशी? दोघीही वर्णाने सावळ्यागोवळ्या असतील. कारण? सावळ्या सकंकणाच्या त्या उपासिका. शरीरे कृश असतील. अशीच आपापल्या अस्मितांमध्ये हरवून गेलेली.

जन्मभर झुंजल्या असतील. प्रपंचातले उणे दुणे त्यांनी पाहिले असेल. साहिलेही असेल. क्वचित् स्वतःच्याच वर्तनाचे घात त्यांच्या अंगावर वाजले असतील.

आणि मग तो दिव्य क्षण उगवला असेल. त्यांच्यासाठी तांबडफुटी झाली असेल. त्यांच्या जीवनात उजाडले असेल. ज्याच्यासाठी इतक्या बहुबहु जन्मांची पायपिटी केली, ते निधान त्यांच्या हाती लागले असेल. या झुंजांतल्या खुणा त्यांच्या अंगावर उमटल्या असतील, हे तर खरेच. पण पाहाणारांचे लक्ष त्यांच्या मुद्रांभोवतीच वेधून राहात असेल.

गोपाल नीलकंठ दांडेकर

त्या मुद्रांवर थक्क करून टाकणारा समर्पित भाव असेल. तिथे असेल थोडके कारुण्य. काही असेल हरिचरणी मिठी घालण्याचा निश्चय. आता होओ हवे ते! येथून बाजूस सरणे नाही. हा जो बहुता काळीचा नवनीतचोर हाती लागला आहे; त्याच्या चरणी घातलेली मिठी आता सोडणे नाही, असा उत्कट समर्पणाचा निर्धार त्या मुद्रांवर मांडला असेल.

मीरा—जनीची व्यक्तिचित्रे मला जाणवली होती, ती ही अशी. सुधीरबाबूजींच्या बैठकीत पाऊल घालताक्षणी ध्यानी आले, ही इथे जी कोण बसली आहे, ती देखील त्याच जातीची अग्निशिखा आहे. त्याच समर्पितांशी नातेगोते जुळलेली.

त्या जशा तेजस्विनी, तशीच ही ज्योतिष्मती–भस्माने झाकलेली. पहिल्या क्षणी मुद्रेवर काहीच वेगळेपण प्रत्ययास येऊ न देणारी. साधी, काहीशी अगतिक वाटणारी. पण हे भस्म बाजूस सारले तर? तर मात्र ही चौघा भावंडांची आई आहे. त्या पिलांना धक्का लावायला जा, फाडून खाईल. आपले सर्वस्व हिने त्या चौघांसाठी समर्पित केले आहे. चौघांनाही हातीं धरून नीट वाटेला लावून द्यायला धडपडत्ये आहे. त्यांच्या कुशलामध्ये आपले कुशल पाहत्ये आहे.

आणि ही चौघे आपापल्या वाटांनी निघाली की मग ही काय करील?

त्यावेळी उपयोगी येईल, म्हणून तर जनी-मीरेच्या समर्पणभावाची शिदोरी सवे घेऊन ही आली आहे. त्या क्षणी इच्यासाठी गिरिधराच्या घराचे द्वार उघडलेले असेल!

या चौघी बहिणी आणि एकटा भाऊ. एकदा बाळाविषयी बोलत असता दिदीला म्हणालो,

"हा बाळ नामदेव तुकारामांच्या कुळातला आहे. भलत्या वेळी जन्माला आला. त्या काळी असता, तर साधुसंतांच्या नामावळीत याचेही नाव गुंफले गेले असते!"

दिदीचे हृदय भरून आले. म्हणाली,

"तुम्हाआम्हात राहूनही बाळ तुम्हा आम्हा वेगळा आहे. तो एक पवित्रात्मा आहे!"

या बाळासाठी दिदीने किती शिणावे?

ठाकूर, मी आणि बाळ कोल्हापुराहून परतत होतो. गाडीचे तेलपाणी पाहून सकाळी निघालो, तेव्हाच मुंबईला घरी ट्रंक केला होता, की सायंकाळच्या सुमारास पोचू. वाटेत गप्पांना नुसता बहर आला होता. बाळ माझ्या स्वराला नावाजीत मजकडून अभंग म्हणवून घेत होता. अशी संधी क्वचितच येते, हे ओळखून मीही गळा सैलच सोडला होता. श्रोत्यांचे काय होते आहे, हे पाहाणे माझ्या दृष्टीने गैरसोयीचे होते. कारण मग तोंड काही उघडता आले नसते.

गाडी कराडापाशी आली, आणि निरनिराळे आवाज काढून बंद पडली. तिथे अदमासे तासभर मोडला. तिथून निघाली, ती साताऱ्यापाशी आल्यावर पुनः तिने असहकार पुकारला. ठाकुरांनी हरप्रयत्न करून तिला समजावली, आणि साताऱ्यास एका कारखान्यात नेऊन उभी केली. आता दोन अडीच तासांची निश्चिती. या अडथळ्यामुळे गाडी सायंकाळी साडेपाच सहापर्यंत मुंबईस पोचायची, ते तळेगावीच मुळी रात्रीचे आठ वाजले. त्या दिवशी श्रावणी सोमवार. मंगेशकर मंडळींचे कडक व्रत. आम्ही काय हाती लागेल ते भक्षीत होतो. एकटा बाळ स्थितप्रज्ञ मुद्रेने आमच्या आग्रहाला नकार देत होता.

गाडीने तळेगाव सोडले, आणि लगेच मी पेडररोडला ट्रंक केला. चिंता करायचे कारण नाही, आता गाडी तळेगावाहून निघाली आहे, रात्री अकरासाडेअकरा पर्यंत मुंबईस पोचेल, असा दिलासा दिला, आणि निश्चिंत झालो. मुंबईस घडलेली चित्तरकथा दोचौ दिशी तिथे गेलो तेव्हा कळली.

माई आणि दिदी सायंकाळी साडेसहासातपर्यंत गाडीची वाट पाहत होत्या. आठ वाजून गेले आणि गाडीचा पत्ता नाही, तेव्हा मंडळी जरा धास्तावली. तो माझा फोन धडकला. मग सगळे

घर साडेअकरापर्यंत जागत बसले. घड्याळात बारा टोले पडले तरी गाडी नाही, तेव्हा मात्र मने हादरली. गच्चीत गाडीची वाट पाहात सगळ्या उग्या मुग्या उभ्या राहिल्या. नाना कुकल्पनांची झळमटे भवताली गोळा होऊ लागली. देवाला नवस सुरू झाले. शेवटी एक वाजला, तेव्हा दिदीने थरथरत्या स्वरात हाक मारली, "जयसिंग, गाडी काढ!"

माईंनी स्वर सांभाळीत विचारले, "कुठे निघालीस?"

"त्याला शोधायला. घाबरू नकोस, एकटी नाही जात."

"मग?"

"उषाला घेऊन जात्ये—"

आणि उषाताईंचे पोलादी संरक्षण घेऊन दिदी रात्री एकच्या पुढे मुंबईहून निघाली!

बाळाला शोधायचे होते कुठे? तर मुंबई ते तळेगाव या रानावनांतून धावत चाललेल्या शंभर मैल लांबीच्या रस्त्यावर. वेळ रात्रीची. त्या अवेळी राष्ट्रीय हमरस्त्यावर ट्रक बेफामपणे धावत असलेले. ड्रायव्हर शुद्धीवरही नसायचे. रस्त्यावरील टावरानांचा ताबा प्रहर रात्र उलटल्यावर ग्रामोद्योगी मंडळीकडे असायचा. सुरे, बाटल्या, कोण्या गोष्टीची उणीव नाही. अशा त्या रस्त्यावरून या दोघी हुरहुरत्या मनांनी भावाच्या गाडीचा शोध घेत चालल्या!

ठाणे गेले, मुंब्रा गेले, दारुड्यांनी गजबजलेली टावराने गेली, आणि रात्री अडीच वाजता पनवेल आले. बाळच्या गाडीचा पत्ता नाही. प्रत्येक गाडी निरखताहेत. पण एकीसारख्या हजार गाड्या. ओळख पटावी कशी?

रडवेली दिदी पनवेलच्या पेट्रोलपंपावर थांबली. तिथे फोन होता. मुंबईला ट्रंक लावून वाट पाहात बसली. शेवटीं एकदाचा फोन खणाणला.

"मी लता बोलत्येय—"

"मी—माई—"

"बाळ?"

"पोचला घरी! त्याची तुमची चुकामूक झाली. तू कुठून बोलत्येस?"

"पनवेलहून—"

गाडी फिरवून दिदी पहाटे चारच्या सुमारास मुंबईस पोचली. सोमवारचे व्रत उरकून बाळ वाट पाहता पाहता पेंगला होता. त्याच्या डोक्यावर हात ठेवला, आणि मग दिदीने अंथरुणावर अंग टाकले.

असे तीव्रतेने वाटत असे, की या दिदीला कुठेतरी एखादे दृढ आलंबन सापडले असले पाहिजे. एरवी प्रसिद्धीचे अन् लोकप्रियतेचे हे लोटच्या लोट अंगावरून जात असता एखादा माणूस केवळ खुळावून गेला असता.

एके दिवशी अचानकपणे पत्ता लागला. हे लोकप्रियतेचे चपेटे ज्या महापुरुषाच्या आश्रयाने दिदी सोसत्ये आहे, त्याचे नाव कळले.

बाळाकडून समर्थभक्त देवांचे समर्थावतार घेऊन आलो—अभ्यासासाठी. पुस्तकाची पहिली पृष्ठे उलटायचे कारण पडले नाही. मधले संदर्भ हवे असत, तेवढ्यापुरता तो तो भाग उघडला की माझे काम भागत असे. पण एकदा पुस्तकावर नाव कुणाचे आहे हे पाहण्याचा फुकाचा चाळा करू गेलो. वाटले होते, की बाळाने हिरव्या शाईने झोकेदार अक्षरांत आपले नाव घातले असले पाहिजे. बाळाचे थोडे तिरके, अतिशय देखणे हस्ताक्षर नुसते पाहत बसणे, हेही एक सुखच आहे. मुखपृष्ठ उलटले, तो आत अक्षरे दिसली—

"श्रीजगदंबेच्या कृपेने—ज्ञानेश्वरांच्या लेखणीने—समर्थांच्या वैराग्याने—शिवाजीमहा-

गोपाल नीलकंठ दांडेकर

राजांच्या तरवारीने---पवित्र झालेल्या या मंगल महाराष्ट्राचा तुला कधीही विसर न पडो हा आशीर्वाद"

आणि खाली सही होती—

"शिवदासी

१९–१०–५५

चि. हृदय,

१९ व्या वाढदिवसानिमित्त"

शिवदासी !

शिवदास्याबद्दल मनी केवढा गौरव! छंदच जडायचा असेल तर तो हा असा जडावा. तो श्रीमंत योगी अशा अलौकिक योग्यतेचा पुरुषोत्तम होता, की भल्याभल्यानी त्याचे दास म्हणून मिरवण्यात धन्यता मानावी! ते एक भावनिक समाधान असते. बऱ्यावाइटाच्या लाटा भवताली आंदोळत असता मनाला आधार वाटत राहतो, की चिंतेचे काय कारण? ज्याचे दास म्हणवितो, त्याने तर याहून अधिक विराटरूप अंगावर झेलून त्याचा भार सहज वाहिला होता!

दिदींचे हे शिवदास्य केवळ कौतुकापुरते नव्हे, याचा प्रत्यय येण्याजोगी एक दोन बरी निमित्ये घडली. शिवराय मंडळाने दादरच्या हेटकरी महाजन वाडीमध्ये शिवछत्रपतिविषयक प्रदर्शन भरवले होते. काही दुर्गांच्या प्रतिमा, छायाचित्रे, शिवजीवनातले चित्ररूप केलेले काही प्रसंग, शिवकालीन शस्त्रे, अशा नाना परी यत्नपूर्वक मिळवून मांडल्या होत्या. अनेक जवानांनी रात्रंदिवस कष्ट केले होते. मात्र त्यांच्या त्या श्रमांचा परिहार करता येईल, असे मंडळाजवळ काही नव्हते. पाचसातशे रुपये खर्चावेत, तेव्हा शिवछत्रपतींच्या नावाला साजेसे कवतिक करता आले असते.

एकदम विचार आला, की दिदीजवळ हात पसरावा. शब्द टाकताक्षणी दिदी मूठभर नोटा घेऊन बाहेर आली. आणि कार्यकर्त्यांच्या मुद्रा उजळून निघाल्या. पावती नेऊन देऊ जाता ती म्हणाली,

"करायची काय पावती? घरच्या कामासाठी कुणी पावत्या का फाडीत बसते?"

दुसरा प्रसंग—

सिंधुदुर्गावरून शिवछत्रपतींच्या पदमुद्रेचा ठसा घेऊन मुंबईस आलो. मनी गौरव दाटलेला होता, की या क्षणी आपल्याजवळ एक अलौकिक वस्तु आहे. ज्याला तिचे मोल कळते, तो पाहताक्षणी मोहरून उठेल. स्वतः शिवछत्रपतींच्या पावलांचा ठसा!

दिदीकडे जाऊन तो कसा मिळवला, इत्यादी सर्व फुशारक्या मारल्या. शेवटी म्हणालो,

"आणि या क्षणी तो ठसा माझ्याजवळ आहे!"

अतिशय उतावीळ होऊन दिदी म्हणाली,

"खरे? कुठाय? दाखवा ना!"

ठशावरची आवरणे सोडेतोवरही तिला धीर निघेना. ठसा अनावृत होताच तिने अत्यंत श्रद्धापूर्वक करस्पर्श करून हात भाळी टेकला, अन् एखाद्या लहान मुलीप्रमाणे धावत ठसा घेऊन आपल्या शयनगृहात गेली. तिथे तो उशाशी ठेऊन दिला. किती वेळ त्याच्याकडे बघत राहिली. मग भराभरा ज्याला त्याला फोन करून सांगू लागली,

"हाँ जी सुनिये, महाराज शिवछत्रपतिका चरणचिन्ह—हाँ, उन्हींका---अभी मेरे पास है—वही तो बता रही हूँ—"

मात्र आता सूक्ष्मपणे पाहता वाटू लागले आहे, ही स्वरदेवता अलिकडे अधिक गंभीरपणे जीवनाचा विचार करू लागली आहे.

ज्या वेडाने जनी-मीरा झपाटल्या होत्या, त्या दिशेने हे पाखरू भरारू लागले आहे! तिथवर झेप घ्यावी, जिथवर त्या दोघी पोचल्या होत्या. त्याही तर प्रापंचिक कर्दमातून वर उठल्या होत्या. तर मग आपल्यालाही ऐहिक व्यापांची खंत मानायचे कारण नाहीं. तुकारामाने भरंवसा देऊन ठेवला आहे—

मागे झाले नका पाहो । पुढे जमान आम्ही आहो ॥

जामीनकी त्या महावैष्णवाने स्वीकारली आहे, तेव्हा आता द्यावे स्वतःला झोकून त्या महा-समुद्रामध्ये!

दिदीचे देवघर दृष्ट लागेल इतके साजरे आहे. श्रीमंगेशाच्या प्रतिमेचे दर्शन घेतल्याविना ही माणसे घराबाहेर पाऊलही घालीत नाहीत. दैनिकी पूजेसाठी एका सत्त्वशील ब्राह्मणाची नेमणूक केलेली आहे.

निमित्य काय होते, ते स्मरत नाही. मात्र एकदा देवाची आरती करायचा प्रसंग मजवर आला. ही भावंडे झांजा वाजवू लागली. आरती म्हणत असता सहज मागे वळून पाहिले–दिदी डोळे झाकून उभी आहे. तिच्या मुद्रेवर त्या क्षणी जो भाव होता, त्या अनुभवासाठी साधकांना वर्षांनुवर्षं श्रमावे लागते. त्या भावसमाधीत दिदी बुडून गेली होती.

पुन्हा एक प्रसंग. एका सायंकाळी सहज देवघराचे दार लोटले. दिसले, की देवासमोर दिदी बसली आहे. नुकते स्नान केले आहे. बनारसी पांढरी साडी नेसली आहे. लांबसडक केस पाठीवर मोकळे सोडले आहेत. भाळी बहुधा चंदन माखले असावे. समोर गीताग्रंथ आहे. ती गीतापाठ करत्ये आहे. पाठाशी अशी समरस होऊन गेली आहे, की मी दार उघडून आत पाऊल घातले, याचेही भान नाही!

देवासमोर दीप पेटतो आहे. उदबत्ती जळत्ये आहे. तिच्या धुराची वलये दिदीभवती घोटाळ-ताहेत. त्यांच्या गूढ आवरणात ती हरपू पाहत्ये आहे–जशी गीतापाठात हरपली आहे तशी!

हे कशाचे चिन्ह?

पण याहूनही नेटका प्रत्यय आला तो दिदीच्या एका नव्या ध्वनिमुद्रित गीतामध्ये.

जोगी मत जा हे मीरेचे दर्दभरे गीत. बाळाने त्याला नवी चाल लावली, आणि दिदीने ध्वनिमुद्रित केले. मोठी सुबक चाल. हृदयास स्पर्श करणारी. बाळ म्हणाला,

"एक नवे गीत ऐकवतो."

त्याने रेकॉर्डप्लेअरवर टेप लावली, आणि दिदीचा आर्त स्वर कानी पडला—

"अरे जोगी, नको रे जाऊस! शरीर जाळून त्याची चिमुटभर राख उरली; हवी तर ती आपल्या अंगास फास, पण जाऊ नकोस!"

अंगातून जणू वादळ धावून गेले. हाच तर तो स्वर! थेट त्या सावळयापर्यंत पोचणारा. जो कसलाही अडथळा मानीत नाही. गीत सुरूच होते. अचानक थांबून दिदीने अति करुण स्वरात घातलेली साद ऐकली—

"जोगी ऽऽ!"

ज्या मधुर भक्तीसाठी साधक देव पाण्यात घालून बसतात, तिचा ईषत् स्पर्श या हाकेला झाला आहे. या एकाच समर्पित स्वरासाठी योगी जन्मजन्मांचे गर्भवास सहन करीत असतात.

गोपाल नीलकंठ दांडेकर

तलत महमूद

दिलदार सहकारी

एकोणीसशे सत्तेचाळीसअठ्ठेचाळीस साल असेल. मी कलकत्त्याला होतो तेव्हाची गोष्ट. 'हिज मास्टर्स व्हॉइस' या ग्रामोफोन कंपनीद्वारा माझ्या पुष्कळ ध्वनिमुद्रिका प्रकाशित होत होत्या. त्यापैकी 'तस्वीर तेरी दिल मेरा—' या गझलाने तर मला विशेषच नावलौकिक मिळवून दिला होता. या सुमारास एक अत्यंत सुरेल, मुलायम आणि दर्दभरा असा नवाच आवाज अधूनमधून माझ्या कानावर पडू लागला होता. हा आवाज आणि त्यातला गोडवा काही वेगळाच होता. विशेषतः या आवाजातल्या 'आयेगा, आयेगा, आयेगा आनेवाला'...या गीताने तर मी अगदी भारावून गेलो होतो. त्यामुळे या आवाजातले प्रत्येक गीत मी मोठ्या आवडीने आणि उत्सुकतेने ऐकत होतो. त्या सुमधुर आवाजाचा मी विलक्षण चाहता बनलो. श्रीमती लता मंगेशकर यांची व माझी पहिली ओळख ही अशी झाली. त्यावेळी मी त्यांना प्रत्यक्षात पाहिलेही नव्हते. परंतु त्यांची गीते ऐकून ही एक अत्यंत गुणी आणि असामान्य गायिका आहे असे मी तेव्हाच अनुमान काढले होते.

लताजींचा आणि माझा प्रथम परिचय झाला तो दिवसही मला चांगलाच आठवतो. नशीब काढण्यासाठी मी कलकत्त्याहून मुंबईला आलो होतो. मला एकोणीसशे एकुणपन्नास साली पहिलीच संधी लाभली ती अनिल विश्वास यांच्या संगीत निर्देशनाखाली 'आरज़ू' या चित्रपटासाठी पार्श्वगायन करण्याची. अनिल विश्वास यांच्या घरीच लताजींच्या प्रत्यक्ष परिचयाचा योग आला. पांढऱ्या शुभ्र पोषाखातील त्या अत्यंत साध्या, सडपातळ बांध्याच्या गायिकेकडे मी काही क्षण पाहतच राहिलो होतो. जिच्या आवाजाने मी कलकत्त्याला असताना अनेकदा भारावून गेलो होतो ती साक्षात माझ्यापुढे उभी होती. लताबाईंचे मोजकेच बोलणे, विनम्र वागणे आणि दुसऱ्या कलावंताच्या कलेची कदर करणारी गुणग्राहक वृत्ती यामुळे त्यांच्याविषयीचा माझा आदर द्विगुणित झाला. "यांचा प्रत्यक्ष परिचय आज झाला असला तरी यांचा आवाज माझ्या कानी अनेकदा पडला आहे. खरेच, हे फार सुरेल गातात!" या त्यांच्या उद्गारांनी तर माझ्या अंगावर मूठभर मास चढले. कारण त्यावेळी मी नवीन होतो. चाचपडतच मार्ग काढीत होतो. तर लताजींनी अल्पावधीतच विलक्षण जम

बसवला होता. त्यांच्या नावाचा बराच बोलबाला झाला होता. अशा परिस्थितीत त्यांचे उत्तेजनपर शब्द मला फार मोलाचे वाटले यात नवल ते काय?

त्यानंतर अनिलदांच्या घरी वारंवार आमच्या भेटी होऊ लागल्या. लताजी अनेकदा आपल्या गाडीतून मला कधी बस स्टॉपपर्यंत तर कधी रेल्वे स्टेशनपर्यंत पोचवू लागल्या. त्यावेळी स्वतःची गाडी ठेवण्याची माझी परिस्थिती नव्हती. अशा वेळी त्यांच्या तोंडून अनेक गायकांची प्रशंसा ऐकायला मिळे. स्वतःबद्दल मात्र त्या चुकूनही कधी एक शब्दही काढत नसत. वास्तविक हा वेळ-पावेतो त्यांनी बरेच कर्तृत्व गाजवले होते. म्हणूनच लताजी गायिका म्हणून मला जितक्या थोर वाटतात त्यापेक्षाही माणूस म्हणून त्या मला आभाळाएवढ्या श्रेष्ठ वाटलेल्या आहेत.

त्या वेळेपासून गेले दीड तप आमचा सतत एकत्र काम करण्याचा आणि एकत्र गाण्याचा योग येत आहे. या अवधीत आम्ही गाइलेली अनेक द्वंद्वगीते लोकप्रिय झाली आहेत. विशेषतः त्यांतील करुणरसप्रधान अशा द्वंद्वगीतांनी तर जनमनाची चांगलीच पकड घेतली आहे. 'दिलमें समा गये सजन, फूल खिले चमन चमन' (संगदिल), 'तेरी चमकती आंखोके आगे ये सितारे कुछ भी नही' (छोटे बाबू), 'गया अंधेरा हुवा उजाला' (सुबह का तारा), 'दिल दिल से कह रहा है' (परछाई), 'तूमी तो मेरी पूजा हो' (सोहागन) यांसारखी आमची कितीतरी द्वंद्वगीते चांगलीच गाजली. अगदी अलीकडे आम्ही 'जहाँ आरा' या चित्रपटासाठी मदनमोहन यांच्या संगीत निर्देशनाखाली एकत्र गाइले आहोत. 'दाग' या चित्रपटातील एकच गीत मी दिलीपकुमारासाठी तर लताजी निम्मीसाठी गाइल्या. गीताचे शब्द आहेत 'ऐ मेरे दिल कहीं और चल'. हे गीत लोकप्रियतेचा नवाच उच्चांक प्रस्थापित करून गेले. आपण म्हटलेलेच गीत लताजींच्या तोंडून ऐकणे हा एक नवाच अनुभव होता.

लताजींच्या आवाजाबद्दल आणि गायकीबद्दल वेगळे काय बोलावे? अत्यंत कठीण ताना आणि अवघड हरकतीही त्यांच्या गळ्यातून लीलया निघतात. प्रत्येक सूर अगदी सच्चा आणि सुरेल असल्याने ऐकण्यास अतिशय आनंददायक होतो. शास्त्रीय संगीताची त्यांची जाणकारी इतकी की कोणतीही चीज आपल्या गळ्यात त्या सहजपणाने खेळवू शकतात—पेलू शकतात. त्यामुळे चित्रपट-क्षेत्रातील या पार्श्वगायिकेने शास्त्रीय संगीताच्या गाढ्या व्यासंगी पंडितांनाही अनेकदा विस्मयचकित करून सोडले आहे. लताजींची ग्रहणशक्ती आणि निरीक्षणशक्तीही वाखाणण्याजोगी आहे. तशा गोड गळ्याच्या गायिका अनेक. पण भावपूर्णतेने गाऊन रसपरिपोष करण्याचे सामर्थ्य गळ्यात असणाऱ्या त्यांपैकी फारच थोड्या. त्यामुळेच लताजींचे महत्त्व विशेष. अवघ्या तीन मिनिटांचे त्यांचे गीतही रसिकाच्या हृदयावर विलक्षण परिणाम करून जाते.


मी लखनौचा, माझी मातृभाषा उर्दू. गीत गझलाच्या आवडीमुळे उर्दू साहित्याचा आणि विशेषतः काव्याचाही मी थोडाफार अभ्यास केलेला. पण लताजींचे उर्दू शब्दांचे उच्चार ऐकून मीच काय, उर्दूचे गाढे पंडितदेखील थक्क होतात. उर्दू भाषेचा ढंग त्यांच्या गळ्याने बरोबर आत्मसात केला आहे. हे केवळ उर्दूपुरते नाही, तर ज्या ज्या भाषेतली गीते त्या गाइल्या आहेत त्या साऱ्याच भाषांच्या बाबतीत असे म्हणता येईल. प्रत्येक भाषा अवगत करून घेण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला आहे.

एकंदरीने कलावंतांबद्दल आणि त्यातही विशेषतः आपल्या सहकाऱ्यांबद्दल त्यांना आदर आणि अभिमान वाटतो. कलाकारांचा अपमान झालेला त्यांना कधीही सहन होत नाही. या संदर्भात मला एक प्रसंग आठवतो आहे. 'मेहरबानी' या चित्रपटाच्या गीतांचे ध्वनिमुद्रण चालले होते. मी तेव्हा या क्षेत्रात नवाच होतो. त्या दिवशी प्रथम माझ्या स्वतंत्र गीताचे ध्वनिमुद्रण झाल्यावर मग माझे आणि लताजींचे द्वंद्वगीत ध्वनिमुद्रित व्हावयाचे होते. पण तीन चार वेळा तालीम होऊनही

तलत महमूद

माझे गीत संगीतदिग्दर्शकाच्या मनासारखे जमत नव्हते. काय चुकत होते हे मलाही नीटसे कळत नव्हते. मी काहीसा नाराज आणि निराश झालो होतो. इतक्यात लताजी तेथे आल्या. त्यांना पाहताच संगीत दिग्दर्शक महाशय चटकन मला म्हणाले, "तुमचं गीत राहू द्या आता बाजूला. मागाहून ध्वनिमुद्रित करू ते. अगोदर द्वंद्वगीत आटोपून घेऊ." लताजींना त्या संगीतकाराच्या बोलण्यातला कुत्सित भाव चटकन समजला. त्यांनी अगोदर माझेच गीत झाले पाहिजे असा आग्रह धरला. आपल्या एका सहकाऱ्याचा असा अपमान झालेला त्यांना सहन होईना. शेवटी मीच त्यांना आग्रहपूर्वक सांगितले की आपल्याबरोबर गाइल्यावर मला आपोआपच स्फूर्ती येईल आणि त्या स्फूर्तीमुळे माझे गाणेही नंतर जमून जाईल. तेव्हा कुठे त्या गायला तयार झाल्या. माझ्यासारख्या नवख्या कलाकाराच्या भावनांचीही त्यांनी ही जी कदर केली त्याचे मला विशेष मोल वाटले!

पार्श्वगायकांच्या रॉयल्टीप्रकरणातही त्यांच्या स्वभावाच्या या तेजस्वी पैलूचे दर्शन झाले. मी तेव्हा पार्श्वगायकांच्या संघटनेचा चिटणीस होतो. लताजींना रॉयल्टी मिळत होती पण सर्वच गायक कलाकारांना तिचा फायदा मिळावा या शुद्ध निःस्वार्थी हेतूने त्यांनीही कंबर कसली होती. आणखी काही बड्या व्यक्तींनी योग्य ती साथ दिली असती तर ते प्रकरण निश्चितच धसाला लागले असते. पण शेवटी दुहीमुळे घोटाळा झालाच. या प्रकरणात लताजींना बराच मनस्ताप सहन करावा लागला, पण सहकाऱ्यांसाठी त्यांनी हे सारे शांतपणे सहन केले. लताजी आज आपल्या कलाजीवनाचा रौप्यमहोत्सव साजरा करीत आहेत. याच जीवनाचा हीरकमहोत्सवही अशाच वैभवाने साजरा होवो!



गोपाळकृष्ण भोबे

हा जादूगार गळा

जेव्हा लता मंगेशकर हे नाव ठराविक मर्यादेपलीकडे अन्य कुणाच्या माहितीत नव्हते तेव्हा मी त्यांना पाहिलेले आहे आणि आज त्या कीर्तिशिखरावर असतानाहि मी त्यांना पाहतो आहे. त्यांना मी नाटकात पाहिले आहे. गाण्याच्या बैठकीत गाताना पाहिलेले आहे. त्यांच्या चित्रपटातील भूमिका पाहिलेल्या आहेत. त्यांचे ध्वनिमुद्रण होताना पाहिलेले आहे; पण त्यांचा माझा परिचय मात्र अल्प आहे. तथापि संगीताच्या दुनियेत वावरण्याचा मला वारंवार योग येत असल्याने जे काही लताबाईबद्दल मी ऐकले, त्यावर आधारित अशी त्यांची एक काल्पनिक व्यक्तिरेखा मात्र माझ्या दृष्टीसमोर कित्येक दिवस वावरत आहे.

"लताबाई, अगर आज आप नहीं गायेंगी तो मेरे भविष्य का क्या हाल होगा? मेरा भविष्य आपके हाथमें है! मेरा नाम होना आपके हाथमें है!" असे एक संगीत दिग्दर्शक कळवळून सांगतो, तर एक निर्माता म्हणतो, "लताबाई, अगर अपने 'ना' कह दिया तो मेरी जिंदगी ही खतम हो जायेगी!" एका चित्रपटातील भूमिकेसाठी लाखो रुपये मोबदला घेणारी अभिनेत्री आपल्या अटी सांगताना निर्मात्याला म्हणते, "पार्श्वगायिका म्हणून लताबाईंचीच निवड केलीत तरच मी काम करीन; ही माझी पहिली अट!" आणि भांडवलदार म्हणतात, "अमुक कलाकार, अमक्याचं कथानक, आणि लताबाईंची इतकी गाणी असतील तरच आम्ही भांडवल देऊ."

असे शेकडो उद्‌गार काढलेले, त्या क्षेत्रात वावरणारे लोक सांगतात. दोन्ही कानांची पाळी पकडून लताबाईंचे आभार मानतात.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट. गेली बावीस वर्षे 'फिल्म लायनी'त असलेला एक वादनकार मित्र भेटला. नेहमीच पाठीशी वाघ लागल्यासारखा तो घाईत असायचा. आज तो बराच वेळ माझ्याशी बोलत उभा राहिलेला पाहून मी म्हटलें,

"मित्रा, आज तुला इतकं बोलायला वेळ कसा काय मिळाला रे?" त्यावर तो म्हणाला, "गेले पंधरा दिवस बसून आहे गड्या!" मी चेष्टेने म्हटले, "असं कधी झालंय? शक्यच

नाही !" त्यावर त्याने सांगितलेले कारण ऐकून मात्र मी थक्क झालो. तो म्हणाला होता, "लताबाईंचं स्वास्थ्य ठीक नाही म्हणून सगळी ध्वनिमुद्रणे बंद पडलेली आहेत!" "इतर पार्श्वगायिका नाहींत का?" असे मी म्हणताच तो हसला आणि म्हणाला, "आहेत, डझनांनी आहेत, पण कहां राजा भोज और कहां—लताबाई ती लताबाई! आमच्या व्यवसायातली सम्राज्ञी ती!" आणि माझा तो मित्र लताबाईसंबंधी बोलत राहिला. सारखा बोलत राहिला.

"असा नोकदार, सुरीला आवाज...अहाहा. दुनियेत शोधून सापडायचा नाही असा आवाज. तिच्या सुरावर आम्ही आपली वाद्यें लावून घ्यावीत. संगीतदिग्दर्शक पाव टक्का चाल सांगतो, पण लताबाई त्यात स्वतःचा पाऊण टक्का घालून त्या चालीचं असं शंभर नंबरी सोनं करतात, की तो संगीतदिग्दर्शक अगदी प्राथमिक असला तरी त्याचं नांव होतं. आज एका चित्रपटाचं संगीत निर्देशन करायला दीड लाख रुपये मागणारा तो आपला हा—तसा स्वभावानं अत्यंत गरीब—ज्यावेळी पहिल्यानंच संगीत दिग्दर्शक म्हणून तो उभा राहिला, त्या वेळची गोष्ट. त्यानं दिलेली पहिलीच चाल जेव्हा आम्हा वृंदवादकाना दाखवली त्यावेळी ती पोरकट चाल ऐकून आम्ही पोट धरून हंसलो. लताबाई आल्या. त्यांनी ती चाल एकवेळ ऐकली. त्यांना काय कणव आली कोण जाणे. पण आपल्या दर्दभरी आवाजांत त्यांनी ती चाल अशी म्हटली, कीं तिचं झालेलं ध्वनिमुद्रण ऐकून आम्ही देखील थक्क झालो. मागाहून त्याच एका गाण्यावर तो चित्रपट तगला. तीच चाल सर्वतोमुखी झाली."

"कित्येक वेळां असं होतं कीं, लताबाईंना वेळ नसतो. आणि एखाद्या नवीन संगीत दिग्दर्शकाच्या कळवळीच्या विनंतीला त्यांनी शब्द दिलेला असतो. सारे म्यूझिशियन लोक डोळ्यांत तेल घालून वाट बघत बसलेले असतात. त्यांनाही दुसरीकडे कामं असतात. ही वेळ साधून दुसऱ्या ध्वनिमुद्रणाचं काम करायचं असतं. आणि मग लताबाई घाईघाईने येतात. तो नवा दिग्दर्शक भिडस्तपणामुळे त्यांना चाल सांगायला कचरतो. मग लताबाई काय करतात की तो गीत लिहिलेला कागद त्या हातात घेतात. वाद्यवृंदाला एक दोन वेळा चाल वाजवायला सांगतात आणि निर्देशकानं लावलेल्या मूळ चालीपेक्षा सुरेख असे कांहीतरी म्हणून टाकतात. तो पोरसवदा निर्देशक थक्क होतो!"

मी माझ्या मित्राला फूटपाथच्या कोपऱ्यावर बोलत उभा न करता इराण्याकडे घेऊन गेलो. स्थानापन्न झाल्यावर हळूच मी पुढचा प्रश्न केला—"काय रे, इतर बाबतींत बाई कशी आहे? की आपलं काम भलं आपण भलं अशा वृत्तीची?"

"मी सांगतो तुला, ही बाई स्वभावाने अतिशय हळूवार आहे; तितकीच ती अतिशय मानीही आहे. अपमान तिला जरा देखील सहन होत नाही. केवळ आपल्या व्यवसायातील सहकाऱ्यांचा देखील. एकदा काय झालं, की एका सज्जन संगीत दिग्दर्शकाचा एका निर्मात्यानं म्युझिशियनांच्या समोर जबरदस्त अपमान केला. कारण अगदी क्षुल्लक होतं. त्या निर्मात्याचं तें उद्धट वागणं आम्हा कुणालाही आवडलं नाही. पण आम्ही काही करूं शकत नव्हतो. लताबाई अजून आल्या नव्हत्या. दुसरीकडचं काम आटपून त्या रात्री दहाला येणार होत्या. अपमान असह्य होऊन तो संगीत दिग्दर्शक बिचारा एका कोपऱ्यात कपाळाला हात लावून बसला होता. आम्हाला तोंड दाखवणं त्याला जड होत असावं.

इतक्यात घाईघाईनं लताबाई आल्या. त्यांनी संगीतदिग्दर्शकाची चौकशी केली. मी त्यांना एका बाजूला नेऊन घडलेली सारी हकीगत सांगितली. त्यांना काय वाटलं कोण जाणे. त्या एकदम मागे फिरल्या आणि स्वतःच्या गाडीत बसून तडक घरी गेल्या. निर्मात्यांना ही गोष्ट कळली तेव्हां त्यांनी धावाधाव केली. घरी फोन केले. पण दाद लागेना. शेवटी तो निर्माता स्वतः लताबाईंच्या घरी गेला. लताबाईंनी त्याला चक्क सांगितलें, "म्युझिशियनांच्या समोर मी असताना त्या संगीतदिग्दर्शकाची माफी मागा, तरच मी येईन. नाहीतर तुम्ही परत जाऊं शकता. तुमचं माझं पटणं शक्य नाहीं."

त्या दिग्दर्शकाने सर्वांसमक्ष त्या संगीत दिग्दर्शकाची माफी मागितली आणि हा सगळा प्रकार आटोपून रात्री दोन वाजता ध्वनिमुद्रणाला सुरवात झाली. असा आहे बाईंचा इंगा!"

आम्ही चहाचा घोट घेतला आणि बोलणे पुढे चालू झाले.

"बाईंच्या हळुवार मनाची गोष्ट सांगतो. एका गाण्याचें ध्वनिमुद्रण चालू होतं. गाणं गझल पद्धतीचं होतं. साथीला असलेल्या तबलजीनं अशी अप्रतिम साथ केली की आम्ही सगळेच खूष झालो. निर्मात्यासकट सगळ्यांनी एकमुखाने त्यांची तारीफ केली. पण नुसती तारीफ! झालेलं ध्वनिमुद्रण ऐकून आम्ही बाहेर आलो आणि आपापल्या रस्त्याला लागायची तयारी करू लागलो. पण लताबाई त्या तबलावादकाची चौकशी करत होत्या. तो त्यांच्याजवळ आल्यानंतर त्या म्हणाल्या... "वाहवा! बहोत सुंदर बजाया आपने. ये लीजिये!" असं म्हणून त्यांनी त्याच्या हातावर काहीतरी ठेवलेलें आम्ही पाहिलें. त्या गेल्यावर आम्ही चौकशी केली. त्या तबलजीच्या हातावर त्यांनी शंभर रुपयांची नोट बक्षीस म्हणून ठेवलेली होती."

मी म्हटले, "काही वर्षांपूर्वी कुणीशी त्यांच्या वडिलांची पुण्यतिथी साजरी करायचा संकल्प केला. आणि ती माणसं त्यांच्याकडे वर्गणी मागायला गेली. त्यांनी त्यांना रिक्तहस्ते तर परत पाठवलेच, पण पुण्यतिथीच्या कार्यक्रमालाहि त्या हजर राहिल्या नाहीत! मी आपलं असं ऐकलं हो, खरं खोटं देव जाणे!"

"त्यांच्या वडलांची पुण्यतिथी साजरी करणारी ही माणसं कोण होती, त्यांचा अधिकार काय होता, याचा तूं विचार केला आहेस का? मध्यंतरी पुण्यतिथ्या साजऱ्या करणं हा एक व्यवसाय होऊ पहात होता. कलावंत बिचारे आमंत्रण केलं, की भिडस्तपणानं आणि समाजाचा रोष होऊं नये म्हणून मुकाट्यानं येतात, फुकट कार्यक्रम देतात, आणि पुण्यतिथ्या साजऱ्या करणारे ठेकेदार आपले खिसे गरम करतात. लता मंगेशकरांच्या वडलांची पुण्यतिथी साजरी करण्याचा या सोमाजी गोमाजींना काय अधिकार होता? ते दीनानाथांचे शिष्य होते, की अनुयायी होते, की सहकारी होते...होते कोण? त्यांनी आधी चौकशी केली असावी. पुण्यतिथी साजरी करणाऱ्यांची मनीषा अजमावली असावी आणि नंतरच नकार दिला असावा. आणि कुणीही बोलावलं कीं उठसूट जा असं वागायला ती काय मामुली बाई आहे?"

"काय रे, लताबाईंच्या शास्त्रीय संगीताच्या ज्ञानाबद्दल तुझं काय मत आहे?"

"गेल्याच वर्षाची गोष्ट. एका चित्रपटात नायिकेला शास्त्रीय संगीत शिकवण्याचा प्रसंग होता. पार्श्वगायिका अर्थातच लताबाई होत्या. उस्तादांच्या आवाजासाठी दिल्लीहून मुद्दाम एका घरंदाज गवय्यांना बोलावून आणलेले होते."

"तालीम सुरू झाली. त्या गवय्यांनी 'मियाच्या मल्हारा'तील आलापी सुरू केली व आरोहाअवरोहाची एक अवघड अशी पेचदार तान घेऊन ते पुन्हा षड्जाला थांबले. त्यांनी लताबाईंना इषारा केला. लताबाईंनी ताबडतोब त्या बिलंपतीच आणि तानेचं अनुकरण केलं अन् तारसप्तकाच्या मध्यमावरून आंदोलन घेऊन त्या षड्जाला अशा रीतीनं भिडल्या की आम्हा सर्वांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. तो गवय्या सद्‌गदित होऊन म्हणाला, वहावा! क्या बात है! कैसी मुलायम बिजली जैसी तान और कैसी सुरीली मीठी आवाज! इस षड्ज ने तो मेरे उम्रभर के रियाज को पानी में मिला दिया! वाहवा!"

माझ्या सुज्ञ मित्रानं लताबाईंचं गुणगान करून माझ्या त्यांच्याबद्दलच्या विचारांना अधिक गती दिली. एक असामान्य व्यक्तिरेखा मनात साकार होऊ लागली. जागृतीतले अठरा तास दाही दिशांत गुंगून राहिलेला तो आवाज; समाजाच्या सर्व थरांतील लोकांना मोहून टाकणारा तो आवाज कैफ चढवू लागला. मी त्यांची गाणी आठवू लागलो. शेकडो गाण्यांनी गर्दी केली. कुठले चांगले, कुठले वाईट हा

निर्णय लागेना. एकात हा सूर गोड आहे तर एकात ही मींड चांगली आहे. एकात ही हरकत चांगली आहे तर एकात अत्यंत कठीण अशी गिरकीची तान आहे. एकात उत्तम बेहलावा आहे तर एकात सणसणीत पलटा आहे. काही ठिकाणी उत्कृष्ट शब्दोच्चार, काही ठिकाणी ठसका, रसपरिपोषासाठी काही ठिकाणी अस्खलितपणा, लाघवीपणा इत्यादी गुणविशेषांनी नटलेली, बेताल माणसांनाहि तालात मान हलवायला लावणारी ती श्रुतिमधुर गाणी...त्यांचं वर्गीकरण करणे मला कठीण जाते.

कुठे कोमल 'ऋषभ' काळजाचे पाणी करतो, तर कुठे 'गांधार' विस्मित करतो. कुठे कोमल निषाद इतक्या योग्य प्रमाणात लागतो की वाटते इतके गाणे ऐकले पण असा प्रमाणबद्ध कोमल निषाद क्वचित ऐकायला मिळाला. रागदारी मूर्तिमंत होऊन डोळ्यांसमोर उभी राहाते. दरबारी, सोहा, अडाणा, जीवनपुरी, मल्हार, सारंग, शुद्धसारंग, जयजयवंती, बागेश्री, ललत, तोडी, भैरव, मालकंस, भैरवी, आणि सगळे थाट इथे गोळा झालेले आहेत.

या गळ्यातील आवाज नुसताच गोड आणि स्वरेल नाही तर त्याला नैसर्गिक वजनही आहे. सर्व स्वरालंकारांत रसयुक्त भावना आहेत, व त्यांचा उपयोग कसा करायचा हे योजनाचातुर्यही लताबाईजवळ पूर्णांशाने आहे. मात्र करुण आणि शांत रसांत त्या विशेष तन्मय होतात. तो त्यांचा पिंडच असावा. पूरब, पंजाब, महाराष्ट्र, दक्षिण इत्यादि प्रांतांतल्या गायकींतील पद्धतीची सर्व वैशिष्ट्ये, गेय संगीतातील नखरा वगैरे गुणांचा आविष्कार त्यांच्या गळ्यातून सहजरीत्या होतो. किंबहुना पाश्चात्य संगीत आणि लोकसंगीत यांत देखील त्यांच्या गळ्याने उच्च प्रतीची किमया करून दाखविलेली आहे.

'तीन्ही सांजा सखे मिळाल्या' ही कविवर्य तांबे यांची कविता म्हणताना 'देई वचन तुला' हे कडवे संपवताना मुरड घालून घेतलेली ती भावमधुर तान! किंवा त्यातल्या 'कर करी धरिला' म्हणताना तारसप्तकातील ऋषभाची आस दाखवून घेतलेली तान...त्यात जी विलक्षण आवेगाची, भावनेची जाणीव प्रतीत होते तशी दुसऱ्या कुणाच्या गळ्याने कितीहि चांगले अनुकारले तरी होणे शक्य नाही!

नित्य नवी उपज उत्पन्न करणारा, थक्क करणारा असा हा अद्भुत जादुगार गळा.



न र्गि स

सुरांची राणी

संगीतकार शंकर-जयकिशन माझ्याजवळ लताची स्तुती अनेक वेळा करीत असत. शंकर तर म्हणत असे की अशा मधुर आणि सुरेल आवाजाची गायिका आपल्या तरी पाहण्यात दुसरी नाही. त्यामुळे लताचे गाणे ऐकण्याची आणि तिला भेटण्याची उत्सुकता कितीतरी दिवस मी मनात बाळगून होते. 'बरसात'चे चित्रण चालू असताना बरसातची ध्वनिमुद्रित झालेली गीते त्याने मला ऐकवली आणि परमेश्वराने ह्या गायिकेच्या गळ्यावरून मधाची बोटेच फिरवलेली आहेत असे मला वाटले. ती लताची गाणी अंतःकरणापासून निघत होती म्हणूनच काळजाला जाऊन भिडत होती. ही पोरगी लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर जाऊन बसणार असे भविष्य माझ्या मनाने तेव्हाच वर्तवले होते.

आजचे लताजींचे धवल यश, अमाप वैभव आणि त्यांना लाभलेली अमाप जागतिक कीर्ती पाहताना एक आवाज केवढे आधिपत्य गाजवू शकतो याची प्रतीती येते. त्यांचे हे स्थान हिरावून घेण्याचे सामर्थ्य असलेली गायिका जन्माला यावयास कित्येक युगे लागतील. ही अतिशयोक्ती नाही. 'प्रतिलता', 'सवाई लता' बनवण्याच्या घोषणा मी ऐकते तेव्हा मला हसू येते. पार्श्वगायिका अनेक असतील, नवनवीन उदयालाही येतील, आणि तरीही लता मंगेशकर या लता मंगेशकरच राहतील. हा आवाजच वेगळा, त्याची जातच आगळी. 'प्रतिलता' बनण्याची स्वप्ने ज्यांना रंगवायची असतील त्यांनी ती अवश्य रंगवावीत, पण ती स्वप्ने साकार होणार नाहीत ही मात्र काळ्या दगडावरची रेघ आहे !

लताजी 'बरसात'मध्ये प्रथमच माझ्यासाठी गाइल्या. तेव्हापासून रजतपटावर आलेल्या माझ्या शेवटच्या चित्रापर्यंत त्या सदैव माझ्यासाठी गात होत्या. 'कुछ दिन पहिले...एक हंसका जोडा' हे माझ्या अभिनयातून साकार झालेले त्यांचे गीत खूपच गाजले होते. त्यावेळी मला त्यांच्या गीतांचा होणारा आनंद काही वेगळाच असायचा. आता मी संसार, पती, मुले यांच्यामध्ये रमून गेले आहे. त्यांची गाणी रेडिओवर ऐकण्यावरच समाधान मानावे लागते आहे आणि तरीही नुकताच एक गमतीदार अनुभव मी घेतला तो सांगण्यासारखा आहे.

राज खोसला यांच्याकडे आम्ही दोघे जेवायला गेलो होतो. नव्या दमाचे संगीतकार लक्ष्मीकांत

नर्गिस

प्यारेलाल हेही तेथे आले होते. या जोडीने एका नव्या चित्रपटासाठी लताजींचे एक वेगळेच गीत ध्वनिमुद्रित केले होते. लताजी आपल्या आवडत्या नूरजहाँच्या ढंगाने ते गीत गाइल्या आहेत. त्या दोघांनी ते गीत मला ऐकवले. मी डोळे मिटून अगदी तन्मयतेने ते गीत ऐकले आणि ते संपताच माझ्या छोट्या मुलांसारखे नाचावे—बागडावे असे मला वाटू लागले. समारंभ संपून घरी पोहोचावयास रात्रीचे बारा वाजले, पण तरीही त्या गीताची मनावरील धुंदी काही उतरेना. घरात पाऊल टाकताच अगदी न राहवून मी फोनकडे धावले. बापडी निवांतपणे झोपली होती. मी माझे नाव सांगून 'लताजींना उठवा' असे काकुळतीने म्हटल्यावर कोणीतरी त्यांना उठवले असावे. लताजींनी फोन कानाला लावला आणि मी एकटी अखंड पंधरा वीस मिनिटे देहभान हरपून त्या गीतावर त्यांच्याशी बोलत राहिले. उचंबळून आलेल्या भावनांना शब्दांची नेमकी वाट दिसत नव्हती. मी कशी बेहोष झाले आहे हेच बहुधा मी पुन्हा पुन्हा ऐकवले असावे. अजून ही धुंदी मी अनुभवते आहे.

बरसातची गीते पडद्यावर साकार करताना मला कधी सायासच पडले नाहीत. गीतांचे सूर कानी आले की आपोआपच त्या प्रसंगातील भावना मनात उमटायला लागत आणि अभिनयातून दाखवता येत. त्यांचा आवाजही माझ्या आवाजाशी जुळतो आहे असे वाटायचे. देह वेगळे असतील पण अन्तःकरणाचे नाते आहे असे वाटायचे.

लताजींच्या पहिल्या भेटीचा प्रसंग मला आठवतो आहे. 'आवारा' चित्रपटातील एका गीताचे ध्वनिमुद्रण ताडदेवच्या फेमस सिने लॅबोरेटरींत चालले होते. मी प्रत्यक्ष ध्वनिमुद्रण चालू असताना ते गीत ऐकावे अशी शंकर-जयकिशन यांची इच्छा होती. मी गेले तेव्हा वादकांसह गाण्याची तालीम चालू होती. मी रेकॉर्डिस्ट मिनू कात्रक यांच्या शेजारी जाऊन बसले. तेथून मला लताजींची फक्त पाठमोरी आकृती दिसत होती. पांढऱ्या शुभ्र वस्त्रातील ती कृश मूर्ती पाहून मनात आले, "एवढासा जीव पण आवाजाचा जोष काही वेगळाच आहे!" गीत मुद्रित झाले आणि आम्ही एकमेकींना भेटलो. पण वर्षानुवर्षे ज्यांच्या आवाजावर बेहोष होऊन मी प्रेम केले होते त्या लताजींशी प्रत्यक्षात मात्र काहीच बोलता आले नाही. मी त्यांचा प्रेमभराने हात दाबला फक्त. खरे म्हणजे मला त्यांना कितीतरी सांगायचे होते. त्यांची गीते पडद्यावर साकार करताना मी अनुभवलेल्या अनंतविध भावना त्यांना ऐकवायच्या होत्या. परंतु त्यांपैकी काहीच मी सांगू शकले नाही—अशी ही पहिली भेट. आज त्या औपचारिक परिचयाचे गाढ मैत्रीत रूपांतर झाले आहे. त्या माझ्या कुटुंबियांपैकी एक बनल्या आहेत. माझे पती सुनील दत्त लताजींना आपली बहीण मानतात. बहीणभावंडांच्या प्रेमामुळे दरवर्षी येणाऱ्या रक्षाबंधनाच्या सणाला माझ्या घरात एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

लताजी जशा माझ्यासाठी तशाच इतर नायिकांसाठीही गायल्या आहेत. प्रत्येक वेळी असे वाटते की हा आवाज, ही म्हणण्याची पद्धती या गायिकेशी अगदी जुळते आहे. हेच त्यांच्या यशाचे एक रहस्य असावे. चतुर आणि सर्वांगीण तयारी असलेली गायिकाच अशा विविध ढंगांनी गाऊ शकेल. आपल्या गीतातून गीत गाणाऱ्या स्त्रीचे व्यक्तित्व, व भावना, प्रसंग, वातावरण त्या उभे करतात. प्रसन्न करण्याची, आतुर करण्याची, व्याकुळ करण्याची अशी वेगवेगळी शक्ती ह्या सुरात आहे. त्यामुळे त्यांची करुण गीते पडद्यावर आणताना डोळ्यांतून आसवे यावीत म्हणून मला कधी ग्लिसरीन वापरावे लागले नाही. 'आग' चित्रपटाच्या वेळी 'राजा की आयेगी बरात' हे त्यातील माझे आवडते गीत चित्रणाच्या वेळी मी ऐकले आणि दुःखाने भारावलेल्या अंतःकरणानेच कॅमेऱ्यापुढे जाऊन उभी राहिले. साऱ्या प्रसंगाच्या कल्पनेने आणि त्या आर्त सुरांनी मला कितीतरी वेळ हुंदकेच येत होते. ते चित्रण संपले तरीही माझ्या मनावरचा तो परिणाम पुसला गेला नव्हता. आणि आज इतकी वर्षे उलटली तरीही मी तशीच आसवे गाळीत ते गीत ऐकते.

असाच लताजींच्या आवाजाचा प्रभाव 'मदरइंडिया'च्या चित्रणाच्या वेळी मी आणखी एकदा अनुभवला आहे. 'मेरे लाल आजा' हे गीत एक वृद्ध माता म्हणते आहे असे चित्रपटात दाखवायचे होते. मला, वृद्ध माता गीत म्हणते ही कल्पनाच कशीशी वाटली आणि मी तसे मेहबूबसाहेबांना बोलूनही दाखवले. गीत चांगले होते. 'नौशाद'ची स्वररचना श्रुतिमधुर होती परंतु गीताला अनुरूप जागा नसल्याने ते फुकट जाईल असे वाटत होते. गीत वगळायला मेहेबूबसाहेब फारसे राजी नव्हते. शेवटी चित्रण संपले आणि संपूर्ण चित्रपट पाहताना कळले की ते गीत हास्यास्पद न होता थिएटरमध्ये अनेक हुंदके मात्र निर्माण करीत आहे. लताजींच्या आवाजाचा हा प्रभाव आहे!

आपल्या देशातील आबालवृद्ध लताजींच्या रसपूर्ण गायकीवर जसे संतुष्ट आहेत तसेच अनेक परदेशी लोकही त्यांच्यासंबंधी कमालीचे कुतूहल बाळगून आहेत. भारतात जेव्हा परदेशी शिष्टमंडळे येतात तेव्हा त्यांचा आग्रह असतो, "लताच्या गाण्याचे कोठे ध्वनिमुद्रण असेल तर सांगा, आम्हाला त्यांना प्रत्यक्ष गाताना ऐकायचे आहे!"

लताजींची ही लोकप्रियता इतरांच्या लोकप्रियतेसारखी क्षणिक न ठरता वयोमानाबरोबर वाढतच गेली आहे. आणि ह्या लौकिकातील यशाबरोबर एक व्यक्ती म्हणूनही त्या उंचावतच गेल्या आहेत. कित्येकांसाठी त्यांनी काय काय केले आहे ते त्यांचे त्यानाच माहीत— किंवा त्यांनाही माहीत नसावे! दुसऱ्याच्या दुःखाने त्यांच्या डोळ्यांतून आसवे गळलेली आहेत, त्याप्रमाणे दुसऱ्याच्या सही सही नकला करून त्यांनी आम्हाला पोटभर हसवलेही आहे. त्यांची मैत्री माझा आधार आहे आणि त्यांचे गाणे हा माझा विसावा आहे.

तुम जिओ हजारो साल, सालके दिन हो पचास हजार!



नर्गिस

वसंत जोगळेकर

दीनानाथरावांची मुलगी

पंचवीस वर्षे एखादा व्यवसाय प्रामाणिकपणे करणे आणि त्या व्यवसायात अत्युच्च मान आणि कीर्ती मिळविणे ही साधारण गोष्ट नव्हे. हे भाग्य फार थोड्या व्यक्तींच्या नशीबात असते. कलेच्या क्षेत्रात तर ही गोष्ट दुर्मिळच असते. कारण कालानुसार ज्ञान वाढते, अनुभव मिळतो पण शरीर थकत असते. त्यामुळे ज्ञान आणि अनुभव असूनही माणूस हळूहळू आपले स्थान गमावीत असतो. सृष्टीचा हा नियम आहे. पण काही व्यक्ती अशा असतात की काल जातो तसतशा त्या अधिकच तेजाने तळपत राहतात आणि आपले उच्च स्थान त्या सतत टिकवतात. या अशा अलौकिक व्यक्तींमधे आज प्रामुख्याने अग्रेसर असलेली व्यक्ती म्हणजे लता मंगेशकर. ही लता मंगेशकर व्यक्ती म्हणून कशी आहे ते मी सांगणार आहे. तिच्या संगीताबद्दल तर आपणा सर्वांचेच एकमत आहे.

लताची माझी ओळख झाल्याला आज पंचवीस वर्षे झाली आहेत. या पंचवीस वर्षांचा सहवास सुखाचा आहे. कारण या दीर्घ कालावधीत आम्हा दोघांचे एकदा देखील भांडण झालेले नाही. चित्रपट-व्यवसायात गैरसमज आणि भांडण व्हायला कारणच हवे असते असे नाही. आजूबाजूचे लोक ते काम इमानेइतबारे करतात. पण एकमेकांबद्दल विश्वास आणि आदर असला तर मात्र त्यांची कामगिरी सफल होत नाही. आजपर्यंत तरी झाली नाही. पुढचे कोणी सांगावे ?

एकोणिसशे बेचाळीस हा सन. नक्की तारीख आठवत नाही, पण महिना आठवतो, तो मार्च असावा. स्थळ : पुण्याच्या सरस्वती स्टुडिओतील माझे ऑफिस. मी त्यावेळी 'किती हंसाल' हा मराठी चित्रपट दिग्दर्शित करत होतो. हा माझा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट होता. एके दिवशी दुपारी मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध नट अविनाश माझ्या ऑफिसमध्ये आले. त्यांच्याबरोबर सुमारे बारा वर्षांची फ्रॉक घातलेली एक मुलगी आली होती. त्या चित्रपटात एका लहान मुलीची भूमिका होती आणि त्यासाठी मी मुलीच्या शोधात आहे असे मी त्यांना सांगितले होते. ते मला म्हणाले, "वसंतराव, हिचे नाव लता. हिच्याबद्दल मी तुम्हाला सांगितले होते. गाते अतिशय उत्तम..." ते बोलत होते आणि मी त्या छोट्या मुलीकडे पहात होतो. तिचा रंग सावळा होता. केसाला खूप तेल

लावल्यामुळे ते चप्प बसले होते. ती ठेंगणी होती. रोड होती. एक गोष्ट मात्र माझ्या नजरेत भरली. ती म्हणजे तिचे स्मित. फार लाघवी हसली ती पोरगी. तिचे डोळेही विलक्षण सुंदर होते. त्यात आत्मविश्वास होता. अविनाश बोलत होते..." आणि ही कोण आहे, माहीत आहे? दीनानाथरावांची ही मोठी मुलगी."

दीनानाथरावांचे नाव ऐकल्याबरोबर मला शाळेतले दिवस आठवले. बलवंत संगीत मंडळी आमच्या गावी आली होती आणि मी त्यांची बरीच नाटके पाहिली होती. त्यांची लतिका, तेजस्विनी, कालिंदी ही कामे मला अजूनही आठवतात. त्यावेळी गाण्यातले मला फारसे कांही कळत नव्हते. पण लोक त्यांना आठ आठ वन्समोअर द्यायचे यावरून ते फार मोठे गाणारे होते एवढे मला कळले होते. लताकडे मी आता आपुलकीच्या नजरेने पाहू लागलो. तेवढ्यात तिने एक गाणे म्हटले आणि मग तर मला ती सुंदरच दिसू लागली. तिचे खरे रूप मी पाहिले. आणि त्या दिवसापासून ती मला सुंदरच दिसते. ती मला खूप आवडली आणि तिचे पहिले गाणे दोन दिवसांनी आम्ही ध्वनिमुद्रित केले. मी तिच्याजवळ उभा होतो. गाण्याच्या ओळी होत्या. "नाचू या गडे सारी मनी हौस भारी" चित्रपटासाठी गाइलेले हे तिचे पहिले गाणे होते. दुर्दैवाने लता त्या चित्रपटात काम करू शकली नाही. कारण थोड्याच दिवसांत दीनानाथरावांचे देहावसान झाले आणि तिच्या डोक्यावरील पित्याचे प्रेमळ छत्र नाहीसे झाले.

फार लहान वयात लताला कुटुंबाची जबाबदारी उचलावी लागली. ती स्वतः लहान होती तरी तिच्या इतर भावंडांत ती वडील होती. विनायकराव त्यावेळी पुण्याला होते. तेही दीनानाथरावांचे भक्त होते. त्यांनी लताला आपल्या छत्राखाली घेतले. आणि थोड्याच दिवसांत ती आणि तिची आई व भावंडे तिच्याबरोबर कोल्हापूरला विनायकरावांच्या नवीन सुरू केलेल्या प्रफुल्ल पिक्चर्समध्ये दाखल झाली. थोड्याच दिवसांत मीही प्रफुल्लमध्ये दिग्दर्शक म्हणून सामील झालो. आणि 'चिमुकला संसार' या चित्रपटाची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. या चित्रपटात लताला एक भूमिका होती. पुन्हा आमचा दोघांचा एकत्र काम करण्याचा योग आला. परकरपोलक्यात वावरणारी ही मुलगी सर्वांची आवडती झाली. ती प्रेमळ होती. वडील मंडळींचा मान ठेवणारी होती. लाघवी होती. तिच्या गाण्याबद्दल तर प्रश्नच नव्हता. आणि अभिनयात सुद्धा तिचा समज वाखाणण्यासारखा होता. लताने एकदाही री टेक केलेला मला आठवत नाही. 'प्रफुल्ल'ने दीनानाथरावांची पुण्यतिथी साजरी केली त्यावेळी कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरमध्ये आम्ही एक कार्यक्रम केला होता. लताने 'मैं क्या जानू क्या जादू है' हे सैगलचे गाणे आणि 'शूरा मी वंदिले' ही गाणी म्हटली आणि प्रेक्षकांकडून टाळ्या मिळवल्या. आर्थिकदृष्ट्या लता त्यावेळी काळजीत असायची पण तिच्या तोंडून त्याबद्दल एक शब्दही कधी निघाला नाही किंवा तिने कोणाजवळही कधीच काही मागितले नाही. इतकी ती त्या वयातही स्वाभिमानी मुलगी होती. लहान वयांत तिचे पितृछत्र नाहीसे झाले होते. तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. पण या लहान मुलीने आपले दुःख आपल्या हृदयात लपवून ठेवले. आणि चेहऱ्यावर हसू आणले. आजपर्यंत तेच हसणे तिच्या चेहऱ्यावर तसेच आहे.

त्यानंतर 'प्रफुल्ल' सोडून मी मुंबईला आलो आणि शेचाळीस साली 'आपकी सेवामें' या चित्रपटासाठी पुन्हा लताने पार्श्वगायिका म्हणून माझ्याबरोबर दोन गाणी ध्वनिमुद्रित केली. पार्श्वगायिका म्हणून ही तिची सुरुवात होती. लताच्या आयुष्याला स्थैर्य येण्याची चिन्हे दिसत होती. पण त्या स्थैर्याची चाहूल लागते न लागते तोच पुन्हा एक अघटित घटना घडली. विनायकरावांचे देहावसान झाले. पुन्हा लताची वणवण सुरू झाली. कुटुंबाची जबाबदारी, जवळ संचय नाही, अशा परिस्थितीत वडलांच्याकडून चालत आलेला गाण्याचा वारसा तिच्या मदतीला धावला. लताच्या अंगी हिंमत होती, प्रामाणिकपणा होता, दुःख पचवण्याची शक्ती होती. विलक्षण आत्मविश्वासाने

वसंत जोगळेकर

ती पुढे निघाली, ती मागे न पहाण्याचा निश्चय करूनच. आणि त्यानंतर तिने मागे पाहिलेच नाही. तिचे पाऊल पुढेच पडत राहिले. तिने पार्श्वगायनात प्राविण्य मिळवण्याचा निर्धार केला. सुरवातीला अवहेलना वाट्याला आली. पण ती ध्येयापासून जरा देखील ढळली नाही. आणि थोड्याच दिवसात चित्रपटातील नायक आणि नायिकांपेक्षाही ती जास्त लोकप्रिय झाली. पैसा तिच्या पायावर लोळण घेऊ लागला. तिची कीर्ती भारताच्या बाहेर देखील दरवळू लागली. लता मंगेशकर हे नाव प्रत्येक घरात आदराने आणि आपुलकीने उच्चारले जाऊ लागले.

पण लता मात्र दुर्दैवाच्या तडाख्यामुळे अंतर्मुख बनली होती ती तशीच राहिली. तिचे व्यक्तिमत्व बहरले पण ती जास्तच अंतर्मुख बनली. तिच्या या स्वभावामुळे तिच्याबद्दल क्वचित गैरसमज निर्माण झाले तरी देखील ती गप्पच राहिली. माणसाच्या चांगुलपणावरील तिचा विश्वास ढळला नाही. कुटुंबाची जबाबदारी तिने पार पाडली. भावंडांचे संगोपन केले. आईला सुख दिले. कन्या म्हणून असलेली आपली जबाबदारी तिने यशस्वीपणे पार पाडली आहे. तिची सर्व भावंडे आज समर्थ झाली आहेत. लताच्या कष्टांचे आणि मेहनतीचे सार्थक झाले आहे.

लता अतिशय हुषार मुलगी आहे. तिला शिक्षण घेता आले असते तर त्या क्षेत्रात देखील तिने असाधारण यश मिळवले असते याबद्दल मला खात्री आहे. कामाच्या रगाड्यात सापडली असूनही वृत्तीने ती विद्यार्थिनीच राहिली आहे. निरनिराळ्या भाषा तिला अवगत आहेत. संतवाङ्मयाचा तिचा व्यासंग दांडगा आहे तसाच उर्दू शायरीचाही. जे कार्य ती हाती घेते त्याच्याशी ती पूर्ण समरस होते आणि ते कार्य यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनतही करते. संभाषणात लता चतुर आहे आणि तिची विनोदबुद्धीही तल्लख आहे.

तिच्या अंतर्मुख स्वभावामुळे आणि कोणालाही शक्य तोवर न दुखवण्याच्या वृत्तीमुळे तिच्या-बद्दल गैरसमजही भरपूर आहेत. तिच्याबद्दल विशेष आस्था आणि आपुलकी नसलेले काही लोक आज तिचे चाहते आहेत. काही लोक आज तिचे शत्रू झाले आहेत. ती वरकरणी हसतमुख असली तरी तिच्याबद्दल उठणाऱ्या अफवा आणि गैरसमज तिला मनांतून अतिशय कष्टी करतात. मग ती स्वतःलाच त्रास करून घेते आणि त्यामुळे तिच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम होतो.

लता एक निकोप आणि स्वच्छ मनोवृत्तीची व्यक्ती आहे. तिला समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि स्वार्थ नसला तर ती एक अत्यंत विश्वासू मित्र आहे. या मंगेशकर कुटुंबातले सर्वच लोक कलाकार आहेत. प्रेमळ आहेत. तसेच लहरीदेखील आहेत. आशा भोसले हे नाव देखील लताच्या बरोबरीने लोकप्रिय आहे. ही मुलगी लतापेक्षा वेगळी आहे. लता अंतर्मुख (introvert) आहे तर ही बहिर्मुख(extrovert) आहे. राग आला तर आशा स्वतःला त्रास करून घेत नाही. ती लगेच बोलून मोकळी होते. उषा देखील गाते. गाण्याबरोबर तिला चित्रकला देखील अवगत आहे. मीनाही गात असे, पण आता ती गृहिणी झाली आहे. धाकटा बाळ अतिशय सज्जन मुलगा आहे. तो उत्तम गातो आणि शिवाय तो उत्कृष्ट संगीतदिग्दर्शक आहे. माई आपल्या कर्तबगार मुलांचे कर्तृत्व प्रेमळ-पणाने पाहात आहेत, त्यांना प्रोत्साहन देत आहेत, त्यांची दृष्ट काढीत आहेत. सर्वत्र आबादीआबाद आहे, सुख आहे, समाधान आहे.

सर्वजण आयुष्याची वाटचाल करीत आहेत आणि सर्वांच्या पुढे आहे ती मुलगी. जिच्या डोळ्यांत विलक्षण आत्मविश्वास आहे, चेहऱ्यावर लाघवी स्मित आहे, हृदयात प्रेम आहे आणि गळ्यात दिव्य गोडवा आहे,—जिची माझी पंचवीस वर्षांपूर्वी ओळख झाली आणि अजूनही ती ओळख कायम आहे, ती दीनानाथरावांची मुलगी लता.

जयश्री गडकर

माझा आदर्श

गेल्या सव्वीस जानेवारीला भालजी पेंढारकर यांच्या 'तांबडी माती' या चित्रपटाचा मुहूर्त कोल्हापूरच्या 'जयप्रभा' स्टुडिओत झाला. लताबाई त्या समारंभाला उपस्थित होत्या. प्रत्यक्ष कॅमेऱ्यापुढे जाण्यापूर्वी मी भालजींच्या—बाबांच्या पायाला स्पर्श केला आणि त्यांच्या पलिकडेच उभ्या असलेल्या लताबाईंना नमस्कार करण्यासाठी खाली वाकले. लताबाई मागे सरकत म्हणाल्या, "अहो, माझ्या कसलं पाया पडता? आपल्या आई आज इथं आल्या आहेत. त्यांचा आशीर्वाद घ्या म्हणजे झालं. आईच्या आशीर्वादात सर्वांचे आशीर्वाद असतात."

मी त्यांना नमस्कार करून म्हणाले, "आईचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेतच, पण मला आपलेही हवे आहेत. आज माझ्या चित्राच्या मुहूर्ताला आपण उपस्थित राहिलात—केवढं माझं भाग्य!"

नमस्कार करताना माझे लक्ष लताबाईंच्या पायांतील सोन्याच्या साखळ्यांकडे गेले होते आणि मनात विचार येऊन गेला होता, बाई मोठ्या भाग्यवान आहेत. गळ्यात सरस्वती आहे, पायाशी लक्ष्मी लोळण घेते आहे!

लताबाईंच्या आणि माझ्या गाठीभेटी तशा पुष्कळ वेळा झाल्या असतील परंतु त्यांच्या आणि माझ्या खूप गप्पा झाल्या आहेत असे मात्र कधीच घडले नाही. त्यांची भेट व्हावी आणि एरवीच्या माझ्या बडबडण्याला खीळ बसावी असेच घडत आले आहे. लहानपणापासून मी त्यांच्या गाण्याची चाहती. त्या सुरांनी अनेकदा मला हसविलेले–रडविलेले. परंतु प्रत्यक्षातील लताबाईंची भेट नेहमीच आदरयुक्त भीतीने भांबावलेली!

रजतपटावर त्यांची गीते म्हणताना त्या गाण्यांनी निर्माण केलेल्या भाववृत्ती साकार करण्याची धडपड मी माझ्याकडून करते. ही धडपड लताबाईंनाही मान्य झाल्याचे अलिकडच्या त्यांच्या एका लेखावरून मला कळले आणि मला फार आनंद झाला. माझ्या श्रमांचे चीज झाले असे वाटले. पण खरे म्हणजे हे श्रेयही माझे नाही, त्यांचेच आहे. त्यांची गाणी ऐकली की तशी स्फूर्ती येते, योग्य

हावभाव होऊ लागतात, ओठांची हालचाल, अंतःकरणाला जाऊन भिडलेल्या भावनेने अगदी योग्य तशीच होऊ लागते. हा केवळ माझाच अनुभव नाही तर त्या ज्यांच्या ज्यांच्यासाठी गातात त्या साऱ्यांचा आहे.

लताबाईंच्या लहानपणातील गोष्टी सांगताना माझी आई अद्यापही रंगून जाते. माझ्या वडलांनी दीनानाथांच्या गाण्याच्या मैफलीत अनेक वेळा तबल्याची साथ केलेली. त्यांनीही लताबाईंना लहानपणापासून पाहिलेले आहे. ते अनेकदा लताबाईंच्या स्मरणशक्तीच्या आणि सूक्ष्म निरीक्षण शक्तीच्या आठवणी सांगतात. हे ऐकताना मी मनोमन एखाद्या देवतेप्रमाणे त्यांची पूजाच बांधीत असते. अनेकदा मला वाटते की, लताबाई कळत नकळत अगदी लहानपणापासून माझ्या समोरचा एक आदर्शच होत्या. त्या माझे मोठे श्रद्धास्थान आहेत. म्हणूनच त्यांच्या माझ्यामध्ये एक भीतियुक्त अंतर नेहमीच राहात आलेले आहे.

थोड्याच दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्याकडून 'उत्कृष्ट अभिनेत्री' म्हणून मला पारितोषिक मिळाले. लताबाईंनी अभिनंदनासाठीं मला फोन केला. खूप कौतुक करून 'अशाच नेहमी यशस्वी व्हा' असा आशीर्वाद दिला. मी मात्र आभाराच्या दोन शब्दांखेरीज काहीच बोलू शकले नाही. फोन बंद केल्यावर शेजारीच उभी असलेली माझी आई म्हणाली "वेंधळीच आहेस, अग, त्यांचं पण नाही का अभिनंदन करायचं? त्यांनाही खूप बक्षिसं मिळाली आहेत." बावरलेल्या माझ्या मनाला माझी चूक कळली पण ती दुरुस्त करण्याचे धाडस मला अजून झालेले नाही! हे असेच आमचे नाते आहे!

चित्रपटांतील अनेक आठवणी माझ्या मनात जाग्या आहेत. 'मोहित्यांची मंजुळा' मध्ये संगीतकार 'आनंदघन' यांचे 'बाई बाई मन मोराचा कसा पिसारा फुलला' हे गीत लताबाईंनी गाइलेले आहे. मला ते रजतपटावर माझ्या कुवतीप्रमाणे साकार करावयाचे होते. प्रत्यक्ष चित्रणाच्या दिवशी माझी प्रकृती अगदीच नरम होती. पण त्या दिवशी ते चित्रण व्हायलाच हवे होते. मी थोड्याशा नाखुषीतच ते गीत ऐकायला लागले आणि काही क्षणांतच माझ्यातील निरुत्साह पार नाहीसा झाला. एका वेगळ्या धुंदीतच मी कॅमेऱ्यापुढे उभी राहिले. ह्या उलट त्याच चित्रपटातील 'निळ्या आभाळी, कातरवेळी' ह्या गीताने खरोखरच मला व्याकुळता आली आणि चित्रणाचीही उर्मी उरली नाही. 'अदालत' ह्या चित्रपटात माझ्या आवडत्या अभिनेत्रीचे—नरगीसचे काम आणि लताबाईंचा आवाज एकत्र आलेला आहे. 'उनको यह शिकायत है की हम कुछ नही कहते। अपनी तो यह आदत है की हम कुछ नही कहते' हे गीत नर्गिसच्या तन्मयतापूर्ण अभिनयाने आणि लताबाईंच्या आर्तस्वराने असे म्हटले गेले आहे की हृदयाच्या तारा पिळवटून जातात. 'अनारकली,' 'हम लोग' या चित्रपटांतून त्यांनी गाइलेली गीते अशीच अविस्मरणीय आहेत. ती मला इतकी आवडलेली आहेत की अभावितपणाने सहज गुणगुणायला लागावे आणि मग जाणवावे की अरेच्या, ही तर लताबाईंची पद्धती, लकब! खरोखरच कलावंत व्हावे तर लताबाईंच्यासारखे!

'शाहीर परशुराम' ह्या चित्रपटात एक असा प्रसंग आहे की शाहीर परशुराम खूप आजारी असताना त्यांच्यावर मनोमन प्रेम करणारी बकुळा परमेश्वराला विनवणी करते, "देवा, माझं उरलेलं आयुष्य घे पण शाहिरांना बरं कर." मध्यंतरी लताबाईंना अन्नातून विषबाधा झाल्याचे कळले तेव्हा मी माझ्या कुलदैवतासमोर असाच पदर पसरला होता. "अनेक श्रांत जीवांना आणि अवघ्या विश्वाला मोहिनी घालणारा हा आवाज आसमंतात असाच दुमदुमत राहू दे" अशी प्रार्थना केली होती. तीच आज ह्या मंगलप्रसंगी फिरून करते.

हृदयनाथ मंगेशकर

दिदी

एकोणीसशे एकेचाळीस किंवा बेचाळीसचे ते वर्ष असावे. दिदीला 'खजांची' स्पर्धेमध्ये पहिले बक्षीस मिळाले होते. राजेवाडीकरांच्या चाळीत राहत असू आम्ही त्या वेळी. 'पूना गेस्ट हाउस' समोरची ही चाळ अजूनही बऱ्याच स्मृती उराशी बाळगून उभी आहे.

एकदा दिदीचे अभिनंदन करायला आपटे नावाचे एक गृहस्थ आले होते. बराच वेळ ते दिदीचे कौतुक करीत होते. जाताना "लता आता, पेढे हवेत हां!" असे वारंवार म्हणत जिना उतरत असताना एकदमच ते घसरले. धाडदिशी आपटले बिचारे. ज्या दिदीचे ते अभिनंदन करायला आले होते तीच ओरडली, "आपटे आपटले. आपटे आपटले!"

त्यानंतर हे गृहस्थ त्या रस्त्यावरुन कधीही जाताना दिसले की आम्ही पाचहीजण एकदम ओरडत असू, "आपटे, पेढे मिळाले का? आणखीन पेढे हवेत का? आपटे आपटले"

भारताचेच नव्हे तर साऱ्या जगाचे मन जिंकणारी ही गायिका नेहमीच अशी निरागस आहे. अशी खोडकरही आहे.

कोणा एका व्यक्तीने तिला फार छळले की ती त्याच्यावर कसा राग काढते? ती व्यक्ती घरातून परत जाऊ लागली की ही तिच्या पाठीमागून तोंड वेडेवाकडे करीत चालते. त्या व्यक्तीने मागे वळून पाहिले की ही एकदम पुन्हा गंभीर चेहरा करते. त्याची पाठ वळली की हिच्या खोड्या परत सुरू होतात.

एखाद्या व्यक्तीला एकच शब्द वारंवार उच्चारण्याची सवय असेल तर त्या व्यक्तीशी बोलताना तो शब्द ती इतक्या वेळा, इतक्या वेगवेगळ्या पद्धतीने उच्चारते की आजूबाजूच्या माणसांची हसता हसता पुरेवाट होते, पण हिच्या चेहऱ्यावरची एक रेषाही हलत नाही.

एकोणीसशे त्रेचाळीस किंवा चव्वेचाळीसचे वर्ष असावे ते. आम्ही सारेजण कोल्हापुरला पेंटरांच्या घरात राहत होतो. दिदीला 'प्रफुल्ल' मध्ये नोकरी लागली होती. वय वर्षे चौदा फक्त. घरात आठदहा तोंडे खाणारी. कमावणारी ती एकटीच. त्यातच मला बोन टी. बी. झालेला. दारिद्र्याचे यथार्थ दर्शन आमच्या घरात होत असे. मी आणि उषाताई सगळ्यात लहान म्हणून दिदीचे आम्ही

अधिक लाडके होतो. पण दारिद्र्यामुळे आमचे कौतुक तिला करता येत नसे. आणि तिला तर खूप वाटे की बाळाला नवीन कपडे शिवावे, उषाला फ्रॉक शिवावा, माईसाठी एखादी चांगली साडी घ्यावी, पण परिस्थितीमुळे काहीएक शक्य होत नसे. उलट बाबांचे नाटकातले जुने शालू फाडून दिदीला परकर, पोल्का शिवावा लागत असे.

पण एके दिवशी तिने कमाल केली. आपली इच्छा तिने वेगळ्या पद्धतीने पुरी केली. कै. विनायकरावांच्या चित्रपटात लहान मुलांसाठी खलाशी कपडे शिवले होते, निळ्या आणि पांढऱ्या रंगाचे. त्यांतून दोन जोड्या दिदीने विनायकरावांच्याकडून मागून आणल्या. आम्ही ते अंगाला न येणारे कपडे घालून किती आनंदित झालो होतो, याची कल्पना त्या परिस्थितीत गेल्याशिवाय येणार नाही. दिदीचे तोंड आनंदाने नुसते फुलून गेले होते. दिदीचा तो चेहरा माझ्या नजरेपुढून कधी हलणार नाही.

'माझं बाळ' या चित्रपटात एक प्रसंग होता. अनाथाश्रमाची मुले मदत मागत आहेत. त्यांच्या तोंडी एक समूहगीत होते. आम्ही पाचहीजण त्या गीतामध्ये आहोत. शालिनी पॅलेस-समोर ते चित्रण होते. दुपारच्या कडक उन्हामध्ये आम्ही पाच भावंडे चित्रणासाठी उभी होतो खरंच, आम्ही त्या दृश्यातल्याइतकेच अनाथ होतो. सारे जग आमच्यावर उलटल्याचा भास होत असे. पण दिदीचे हात फार मजबूत ठरले. आमचे सारे विश्व तिने इकडून तिकडे केले. साऱ्या चित्राचे रंग बदलले. एकोणिसशे शेहेचाळीसची लता आणि एकोणीसशे अठ्ठेचाळीसची लता मंगेशकर. किती प्रचंड फरक होता. सगळेच काही बदलले होते. पाठीशी होता नुसता अंधकार, हुंदके, उसासे; तर पुढे नुसता आनंद, उत्साह आणि उमेद.

दिदीच्या आमच्या बाबतीतील उत्साहालाही मर्यादा नव्हती. आम्हांला कुठे ठेवू आणि कुठे नको असे तिला झाले होते. परिस्थितीने दाबलेल्या तिच्या साऱ्या इच्छा वर उफाळून आल्या होत्या. आज बाळासाठी सूट, तर उषासाठी फ्रॉक, तर माईसाठी हार. काय घेऊ आणि काय नको असे तिला झाले होते. दोन दिवसांत तिने कपड्या–दागिन्यांनी आम्हाला नुसते मढवून टाकले. आमचे लाड करण्याची स्वतःची सारी हौस तिने भागवून घेतली. पण स्वतःसाठी मात्र तिने एकही वस्तू हौसेने घेतली नाही. ती कधी हुरळून गेली नाही की मातली नाही. स्थितप्रज्ञासारखी स्वतःकडे आणि बदलत्या परिस्थितीकडे पाहात राहिली ती. एकच परकर पोल्का सहा महिने कसा वापरावा लागतो हे तिला माहीत होते. मला वाटते ती हे कधीच विसरू शकणार नाही. म्हणूनच इतके अफाट नाव कमावूनही तिला गर्व नावाची गोष्ट माहीतच नाही.

दिदीचे उर्दू शिक्षक मला नेहमी सांगतात, "बाल, तुम्हे पता है, बाई आज पचीस साल एक जगा क्यु कायम है ? वो अपनी जगाह जानती है, जो जर्रा जिस जगा है, वही आफताब है !"

उर्दूवरून आठवले, आमच्या दिदीची एक गंमत आहे. जर कोणी बंगाली माणूस तिला भेटायला आला तर "की खोबोर दादा" म्हणून पहिली पंधरा वीस मिनिटे ती इतके छान बंगाली बोलते, की तो माणूस आश्चर्यचकित होतो. कोणी पंजाबी आला तर "सासरी गल महाराज" म्हणून सरळ पंजाबीत ती संभाषण सुरू करते, आणि उर्दूबद्दल तर प्रश्नच नाही. दिदी उर्दू बोलू लागली की चांगल्या 'काबीलानी' आश्चर्यात पडावे इतके तिचे उच्चार शुद्ध असतात. उर्दूचे प्रसिद्ध शायर मजरुह सुलतानपुरी तर "हमारी गजलमे सिर्फ लताजीही कुछ फर्क कर सकती है" असे सांगून मोकळे होतात. दिल्ली लखनौचे मुसलमान तर "ये मुसलमान लडकी अपने आपको क्यू मराठी कहलाती है ? कुछ समझमे नही आता ये तलफुज सिवा मुसलमानकी हो ही नही सकती" असे म्हणताना मी प्रत्यक्ष ऐकले आहे. इतके तिचे उर्दूवर प्रभुत्व आहे.

आणि हे असे चारपाच भाषा सहज बोलता येणे, एका रिहर्सलमध्ये सबंध गाणे पाठ होणे,

कुठल्याही भाषेत गाणे म्हणणे, सहजगत्या नोटेशन करणे, चाल बांधणे, ताना, मुरक्या, खटके सहज तालात बसविणे, हे सारे त्या विधात्याकडून तिला जी अति नाजूक अशी प्रतिभा लाभली आहे त्यामुळे होते. संगीतदिग्दर्शकाचे सूर आणि कवीचे शब्द घेऊन दिदी ज्यावेळी गाते त्यावेळी संगीतदिग्दर्शकाचे सूर व कवीचे शब्द ज्या एका सुप्त रसाला-सुखाला, दुःखाला, प्रीतीला, भक्तीला स्पर्श करू शकत नाहीत, त्या रसाला हिचा स्वर सहज स्पर्श करून येतो.

पण तिच्या स्वरामध्ये जी अतीव आर्तता भरून राहिली आहे ती तिला समाजाकडून मिळाली आहे. दिदीचे मन अगदी पारिजातकाच्या फुलासारखे आहे. एकदा दिल्लीहून येत असताना तिने मोटारीत रेडिओ लावला. बडे गुलामअलींचे गाणे होते. वय आणि आजारामुळे खासाहेब आता गाऊ शकत नाहीत. दिदीने त्यांचे उत्तम गाणे पूर्वी ऐकलेले. आता ते सरळ सहज गाऊ शकत नाहीत हे पाहून ती अगदी हमथाहमशी बेशुद्ध पडेपर्यंत रडली. वारंवार एकच पुटपुटायची, "अरेरे, एवढा मोठा कलाकार आता गाऊ शकत नाही. जागा डोक्यात आहे पण गळयातून निघू शकत नाही. देवा, असा प्रसंग का आणतोस रे?" तिच्या स्वरातील आर्तता तिच्या याच संवेदनाशील मनामुळे अधिक आर्त झालेली आहे. कलाकार या शब्दाची अस्सल ओतीव मूर्ती आहे ती.

दिदीचे बालपण प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्यात गेले. गुलामगिरी आणि महायुद्ध यांच्या कात्रीत सापडलेले ते दिवस होते. कलावंताच्या भोवतालची परिस्थिती त्याला इतके चांगले घडवीत असते की स्वतः प्रयत्न करूनही तो तसा घडू शकणार नाही. जीवनातील बदलणाऱ्या मूल्यांचा कलाकाराच्या व्यक्तित्वावर असा परिणाम होतो की एखाद्या शिल्पकाराने हातांत हत्यार घेऊन साध्या दगडाचा देव केला आहे असे वाटते. कलावंताचे नाजूक, परागाप्रमाणे कोमल असलेले मन सामाजिक जीवनात उठणाऱ्या वादळापासून स्वतःचा बचाव करू शकत नाही. ते एकीकडे कोमेजून जाते आणि त्याच वेळी नवीन कलाकार मन जन्म घेऊ लागते. रात्री फुलांनी बहरलेला प्राजक्त सकाळी पार रिता होतो. पण वातावरण गंधाने भरून गेलेले असते. कलावंताच्या हृदयात फुललेली फुलेही अशीच भोवतालच्या वादळात गळून पडतात, पण त्यांचा सुगंध कोणीही हिरावून नेऊ शकत नाही. सकाळचा रिता प्राजक्त रात्री परत फुलतो, कलावंताचे रिते मनही असेच फुलते. पण या घडामोडीत त्याच्या कलासक्त आत्म्यावर अनेक आघात झालेले असतात, त्याच्या जीवनाची मूल्ये बदलून गेलेली असतात. आणि तरीही कलासक्त आत्मा मात्र तितकाच मुग्ध, तितकाच निष्पाप असतो. त्याला हे सारे सहन होत नाही. तो आक्रंदून उठतो. तीच त्या कलावंताची कला. हीच दिदीच्या स्वरातली आर्तता.

एकदा मैफलीत भैरवी रंगात आली होती. बडे गुलामअली ठुमरी म्हणत होते. तो शेजारी कुणीतरी रेडिओ लावला आणि "कदर जानेना हो कदर जानेना" हे दिदीचे गाणे लागले. खांसाहेबांनी स्वरमंडल खाली ठेवले. म्हणाले, "माशाल्ला इसे कहते है सही सूर! अब मै और नही गाऊंगा."...रंगलेली मैफल समाप्त झाली.

हिच्या स्वरातली आर्तता इतकी विलक्षण आहे की म्हाताऱ्या माणसांनी-अगदी वृंदावनातल्या साधूंनी तिच्या पायाखालची माती डोक्याला लावताना मी प्रत्यक्ष पाहिले आहे.

एकदा मी अमीर खांसाहेबांना विचारले, "खांसाहेब, दिदीके गानेके बारेमे आपकी क्या राय है?" बराच वेळ ते गप्प बसले, नंतर अगदी भावनावश होऊन म्हणाले, "हमने बरसो रियाझ किया, खाक किया! जो बात हम तीन घंटोमे पैदा करते है, वो सिर्फ तीन मिनटमें पैदा करती है!...खाल, क्या दीवाने गालीब फिर लिखा जायेगा? तो फिर लता जैसी आवाज खुदा भी फिरसे कैसी पैदा करेगा?"

मोठमोठ्या गायकांनी जिचे श्रेष्ठत्व मान्य केले आहे अशी आमची दिदी कधी कधी अगदी गंमतीदारपणे वागते. एकदा महाराष्ट्रातील सर्व तीर्थक्षेत्रे पाहण्यासाठी तिने एक सफर काढली आणि

पंधरा दिवसांत सर्व महाराष्ट्र पाहिला. सफरीला निघण्यापूर्वी कुणीतरी तिच्या डोक्यात भरवून दिले होते की अशा प्रवासात उपाशी राहावे लागते. कधी कधी झाडाखाली झोपावे लागते...आणि एके दिवशी सोलापूरला दिदीने खरोखरच आम्हा सर्वांना एका झाडाखाली झोपण्यास सांगितले. हॉटेल मिळत असूनही हिने आग्रह धरला की आजची रात्र झाडाखालीच काढायची. पण अंधार पडल्यावर ती स्वतः मात्र घाबरली. तिने मोटारीत बसून रात्र जागवली. पण यावरून ती भित्री आहे असा कोणीही गैरसमज करून घेऊ नये. चंबळ खोऱ्यात रात्रभर प्रवास केला तिने. आमच्या सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले त्या रात्री. पण ही शांत बसून होती. "डाकू मला काय करणार?" म्हणून मलाच उलट प्रश्न केला.

कधी कधी ती साड्या विकत घेण्यासाठी जाईल. शंभर साड्यांतून एकदोन साड्या विकत घेईल मग घरी आल्यावर "इतक्या महाग साड्या मी कशाला घेतल्या?" म्हणून डोक्याला हात लावून बसेल! पण 'जयप्रभा स्टूडिओ'साठी महिना पाच हजारांची झीज सोसावी लागते, याकडे मात्र तिचे लक्षही जाणार नाही. "स्टुडिओ विकून टाक. तू कशासाठी हा तोटा सोसतेस?" असा प्रश्न तिला कुणी केला की ती एकच उत्तर देते. "तो स्टूडिओ मराठी माणसांचा आहे." आणि मग तिचे ते प्रसिद्ध मिष्किल हास्य. त्या हास्यातून सारे भाव प्रकट होतात.

अशा या निष्पाप दिदीवर एकदा कठीण प्रसंग आला होता. चारपाच वर्षांपूर्वी दिदी सायनसने आजारी होती. वर्षभर तिचे रेकॉर्डिंग बंद होते. "लताचा आवाज गेला" म्हणून वर्तमानपत्रांत बातम्या यायच्या. दिदी एकटीच घरी पडून असायची. अशातच दिदीने एके दिवशी रेकॉर्डिंग ठेवले. मी दिदीबरोबर गेलो. रेकॉर्डिंग सुरू झाले. पण पहिल्या तासाभरात मनासारखा आवाज लागेना. मी अतिशय निराश झालो. मनात सारखे विचार येत, "दिदीचे गाणे संपले का?" मग थोड्या वेळाने ती ठीक गाऊ लागली. मला हायसे वाटले. प्रत्येक टेकनंतर ती माझ्याकडे बघायची. तिचे ते विलक्षण बोलके डोळे मला सारे काही सांगायचे. मी मान डोलावून "सारं काही ठीक आहे. तू गा" म्हणून सांगत होतो. एकदाचे रेकॉर्डिंग संपले. तोच कोणीतरी मुद्दाम खुसपट काढले. "आणखी एक टेक घ्या. हा टेक बरा नाही." दिदी पार दमली होती. परत आवाज लागणे शक्य नव्हते. बावरून ती इकडेतिकडे पाहातच राहिली. वास्तविक ती अशा जागेवर आहे की ती सहज सांगू शकत होती, हा "टेक उत्तम आहे. मी आता गाणार नाही." पण ती तसे सांगणार नाही याची मला पूर्ण कल्पना होती. संगीतदिग्दर्शकाचे पूर्ण समाधान होईपर्यंत ती गात राहणार हे मला माहीत होते. हे ओळखूनच खुसपट काढण्यात आले होते हेही मला ठाऊक होते. मी पटकन पुढे झालो आणि म्हणालो, "अब और टेक लेनेकी जरूरत नही. चलो दिदी."

आमच्या दिदीला असंख्य मित्रमैत्रिणी आहेत. पण तिच्या विशाल हृदयाची कल्पना फारच थोड्यांना आहे. तिच्या विश्वव्यापी कलेचे रहस्य तिच्या इवल्याशा प्रेमळ निःस्वार्थी हृदयात सामावलेले आहे. अत्यंत पवित्र असा तिचा आत्मा या संसारात अडकला आहे.

वृंदावनधामी श्रीकृष्णमंदिरात श्रीकृष्णाची मूर्ती बघून दिदी खूप रडली. इतकी की मी घाबरून गेलो. आजूबाजूच्या लोकांनी टिंगल केली. पण त्यांना काय माहीत की कृष्णाची मूर्ती बघताच ती कुठल्या विश्वात हरपली होती?

दिदी पवित्रात्मा आहे. खरे म्हणजे तिला प्रार्थनेची सुद्धा आवश्यकता नाही.

"जा मै सर बसजदा हुआ कभी तो जमीं से आने लगी सदा
तेर दिल तो है सनम आइना तुझे क्या मिलेगा नमाज़मे"

(तुझे हृदयच एक मंदिर आहे. प्रेमविश्व आहे, तुला प्रार्थनेने काय मिळणार?)

माझी दिदी ही अशी आहे.

राजाराम हुमणे

स्वरांचे लेणे

गोमंतकाच्या निसर्गरम्य भूमीवर पाऊल टाकल्याबरोबर प्रथम योग आला तो मंगेशीच्या दर्शनाचा. पंचपंच उषःकालची वेळ. मंदिराकडे जात असतानाच कुणीतरी प्रवेशद्वाराजवळ असलेले एक घरकुल दाखविले आणि सांगितले, "हे लता मंगेशकरचे घर." मंगेशीच्या मंदिरांतील पवित्र वातावरण, अरुणोदयाची घटिका, ते इवलेसे घर आणि स्वरकिन्नरीची स्मृती! त्या चंद्रमौळी घरातून, त्या धूसर वातावरणात एक स्वरांची लकेर उठल्याचा आभास झाला—"घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला." होनाजी बाळाच्या त्या 'अक्षर' भूपाळीला अमर करणाऱ्या स्वरांची लकेर!

ती लकेर विरते न विरते तोच दुसरी लकेर उठली. सूर्य उगवण्यापूर्वीच सूर्यास्त झाला आणि मध्यान्हरात्रीच्या कृष्णच्छायेत मन गुरफटून गेले. उजाड-ओसाड, भयाण-भेसूर, निर्जन-नीरव 'महला'तून 'आयेगा कोई आयेगा' असे आर्त स्वर काळजाला येऊन भिडले. आणि मग एकामागून एक अनंत स्वरलहरी, सहस्रावधी लकेरी वनात आणि कानांत गुंजू लागल्या. लयीच्या लक्षावधी लाटा एकामागून एक मनावर येऊन आदळू लागल्या. आणि सुरांच्या 'बरसाती'ने माझे मन भिजून चिंब झाले.

स्वरांच्या सामर्थ्याने कोट्यवधी मने जिंकणाऱ्या लताचे कुलग्राम मंगेशी असावे हा केवढा योगायोग. याच गोमंत पर्वताच्या पायथ्याशी पार्वतीने कर्पूरगौर नीलकंठाला आपल्या कंठसामर्थ्याने आणि पदलालित्याने जिंकले होते. त्याच मातीला जणू पुन्हा कंठ फुटला आणि निराश मनांनच नव्हे तर वैतागलेल्या विरागयांना सुद्धा आपल्या रंजक रागिणींनी दिलासा देणारी लता जन्मास आली.

लताबाईंची शेकडो गाणी माझ्या मनात रुंजी घालतात. परंतु माझे मन अधिक भारावून जाते ते भास्करराव तांब्यांच्या कविता त्यांच्या मुखातून ऐकताना. 'जन पळभर म्हणतिल हाय हाय' किंवा 'मावळत्या दिनकरा' या सारख्या कवितांतील तांब्यांच्या साऱ्या भावना जणू स्वरांची लेणी चढवून समूर्त होतात. लताबाईंचे सूर तर समर्थ आहेतच. परंतु स्वरांत कुठलीही कविता सजीव होते त्याचे कारण वेगळेच आहे. आणि ते म्हणजे लताबाईंची काव्यात्म वृत्ती. लताबाईंच्या कवितागायनाला

इतका रसरशीतपणा कसा येतो हे कोडे लताबाईंची आणि माझी घनिष्ठ ओळख झाली तेव्हाच उलगडले. लताबाईंनी केवळ ध्वनिमुद्रिका द्यावयाच्या म्हणून काही या कविता कुठूनतरी पैदा केलेल्या नव्हत्या. तांब्यांची समग्र कविता वाचल्यावर त्यांच्या अंतःकरणाला भेदून गेलेल्याच कविताच त्यांनी गायनासाठी निवडल्या. लताबाईसारखी अहोरात्र कामात व्यग्र असलेली बाई कवितावाचनांत मग्न होऊन जाते हे कुणाला सांगूनही खरे वाटायचे नाही. कविता वाचण्याचे लताबाईंना मनस्वी वेड. तांबे, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर आदींच्या अनेक कविता त्यांना मुखोद्गत आहेत. कवीच्या भावनांशी समरस होण्याइतकी काव्यात्म वृत्ती लताबाईंजवळ आहे म्हणूनच त्यांच्या स्वरांत कविता सजीव होते, भावना साकार होतात आणि कविकल्पना मूर्तस्वरूप धारण करतात.

पार्श्वगायनाच्या क्षेत्रात 'स्वरांच्या राण्या' अनेक. पत्त्यांत जशा चार चार राण्या असतात या क्षेत्रांत दुसऱ्यातिसऱ्या सुद्धा 'राणी' चा भाव आणतात. परंतु लताबाई 'स्वरसम्राज्ञी' ठरल्या ते त्या 'हुकुमाची राणी' आहेत म्हणून नव्हे—निसर्गाने त्यांना अलौकिक स्वरमाधुर्य दिले म्हणूनहि नव्हे—तर गीतांतील किंवा कवितांतील भावना आकलन करण्याइतकी असामान्य काव्यात्म वृत्ति त्यांच्याजवळ आहे म्हणून. त्यांतील भावना-सौंदर्य टिपण्याइतकी सौंदर्यदृष्टि त्यांच्याजवळ आहे म्हणून. लताबाईंच्या स्वरांतच सौंदर्य आहे असे नव्हे तर त्यांच्या जीवनांतच सौंदर्य आहे. तसे नसते तर आचरेकरांसारख्या श्रेष्ठतम चित्रकाराच्या चित्रकृती त्यांच्या घरात दिसल्याच ना.

लताबाईंना मी प्रथम पाहिले ते रुपेरी पडद्यावर. 'पहिली मंगळागौर' मध्ये एक 'परकरी पोर' म्हणून. ही पोर एक थोर पार्श्वगायिका होईल असे त्यावेळी कुणाच्या स्वप्नात सुद्धा आले नसेल. परंतु पडद्यावर नाचणारी ही पोर पडद्यामागे जाऊन गाऊ लागली आणि भारतीय चित्रपटसृष्टीत अभूतपूर्व पराक्रम करणारे 'आठवे आश्चर्य' जन्माला आले. देवकीच्या आठव्या कन्येप्रमाणे ! त्यानंतर लताबाई देवदुर्लभ झाल्या. त्यांचा आवाज ऐकावा आणि भावपूर्ण नेत्रांची हसरी गंधर्वकन्या मनश्चक्षूंपुढे उभी करावी; या खेळात अनेकांप्रमाणे मीहि समाधान मानू लागलो. परंतु योगायोग असा की लाबताईंशी माझा प्रत्यक्ष परिचय झाला. त्यांच्या घरी मी येऊजाऊ लागलो. त्यांच्याशी मनमुराद गप्पागोष्टी करू लागलो. एक मोकळ्या गळ्याची नि मोकळ्या मनाची, खुल्या दिलाची आणि खुल्या आवाजाची गायिका मी अगदी जवळून पाहिली. जागतिक कीर्ति लाभूनहि निगर्वी, निरभिमानी राहिलेली. लताबाईंना पाहिल्यावर मी मग म्हटले, "तर लता लता म्हणतात ती ही." पण अंतर्मन मात्र म्हणाले, "लता नव्हे, कल्पलता"



मजरूह सुलतानपुरी

या शतकाचा स्वर

"ह्या लता मंगेशकर. एक नव्या, अत्यंत सुरेल, कलदार आवाजाच्या गायिका" या शब्दांत सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक नौशाद यांनी अठ्ठेचाळीस साली लताची आणि माझी ओळख करून दिली. आता या घटनेला वीस वर्षे उलटून गेली आहेत. आज आपल्या या खंडप्राय देशात लताचे नाव आबालवृद्धांना इतके परिचयाचे झाले आहे की तिची ओळख अशी करून देण्याचे कारणच पडत नाही.

पुष्कळ काळपर्यंत लोकांचा असा समज होता की कवी गीतरचना करतो, संगीत दिग्दर्शक आपल्याजवळील आकर्षक सुरावटीतून त्या गीताला अधिक सुंदर बनवतो आणि मग पार्श्वगायकाचे काम एवढेच उरते की त्या ओळी त्याने जरा मनाशी घोळवायच्या आणि कवीचे शब्द व दिग्दर्शकाचे सूर त्याने आपल्या गळ्यातून लोकांना ऐकवायचे. ह्या साऱ्या व्यवहारात स्वतंत्र प्रतिभेचा असा काही भागच नसतो. हे कदाचित पूर्वीच्या जमान्यात खरे असेल परंतु लता मंगेशकरच्या उदयानंतर मात्र मुळीच खरे नाही.

लताबाईंचा उदय होण्यापूर्वी सैगल आणि नूरजहा यांचा आवाज साऱ्या चित्रपटसृष्टीत घुमत होता. ते दोघेही थोर कलावंत होते. आजही त्यांच्या आवाजाचा खूप मोठा चाहता वर्ग आपल्यामध्ये आहे. परंतु त्यांच्याही काळत पार्श्वगायन ही एक नवनिर्मिती आहे असे वाटले नव्हते. चित्रपटात एखाद्या व्यक्तिरेखेचे स्थान कोणतेही असले आणि तिचा स्वभाव कोणत्याही प्रकारचा असला तरी सैगल आणि नूरजहा आपापल्या विशिष्ट धाटणीनेच सर्व गाणी गात आणि त्या त्या व्यक्तींतील, प्रसंगांतील भाववृत्तींची विविधता झाकळून टाकीत. लता मंगेशकरच्या नवनिर्माणक्षम प्रज्ञेनेच प्रत्येक भूमिकेतील कमीअधिक सखोलता आणि वेगळेपणा प्रथमतः व्यक्त केला. तिने आपल्या आवाजातील जादूच्या साह्याने असे दाखवून दिले की चित्रपटातील एखादी भूमिका ही केवळ कवी लेखकांच्या शब्दांतून साकार होत नसते तर तिच्या मुलायम स्वरांच्या एखाद्याच आरोहअवरोहातूनही ती मूर्त होते. निरनिराळ्या भूमिकांची बदलती भावस्थिती ही केवळ मुद्राभिनयातून किंवा आंगिक अभिनयातूनच कळते असे नाही तर लताच्या स्वरांतील अप्रतिम कंपनेही ती व्यक्त करू शकतात. सुरांचा आणि

शब्दोचारांचा विविधतापूर्ण आविष्कार हा लताचा अगदी खास विशेष आहे. लता मंगेशकरने पार्श्व-गायनाला एका स्वतंत्र कलेचा, नवनिर्मितीचा दर्जा प्राप्त करून दिला आहे. ही तिची चित्रपटसृष्टीला लाभलेली सर्वांत मोठी देणगी आहे हे आज सर्वांनीच मान्य केलेले आहे.

लताचा आणखी एक विशेष आहे: कवीने निर्माण केलेल्या शाब्दिक प्रतिमांचा आशय, संगीतदिग्दर्शकाने सांगितलेल्या सुरावटीच्या आणि त्याने कल्पिलेल्या रचना-बंधाच्या बाहेर न जाताही ती अधिक समर्थपणे प्रकट करीत असते. हे ती कसे करू शकते याचे मला नेहमी गूढ वाटते आहे. कधी ती एखाद्या शब्दाला अशी बिलगून बसते—जसा काही त्या शब्दाचा वियोग तिला सहनच होत नाही. कधी ती एखादा शब्द असा सोडून देते की वाटते एखादे नुकतेच हातातून सुटलेले कबूतर डौलदार भराऱ्या घेते आहे. कधी ती संवादाच्या खटक्यांतच एखादी ओळ म्हणते तर कधी ती एखादी ओळ अशी कुजबुजते की प्रणयातील गूढरम्यता सूचित व्हावी. कधी-कधी तर ती अशा अबोध पिळवटलेल्या आवाजाने गाते की वाटते, ही हरवलेले आत्मतत्त्व ह्या ओसाडी-ओसाडींतून शोधते आहे.

आमच्या चित्रपटसृष्टीत स्वरांची इतकी विविधता असलेला, इतका चपळ आणि इतका जादूने भरलेला आवाज यापूर्वी कधीच प्रकटला नसेल. हा मधाळ आणि सोनसुरी स्वर, हा निळ्या नभाशी नाते सांगणारा आणि गुलाबी छटा घेऊन आलेला स्वर, हा आत्म्याची व्यथा आणि जीवनाची मुक्त निर्भरता प्रकटवणारा स्वर, हा या शतकाचा स्वर आहे.

आमचे जीवन आनंदी आणि उत्साही असावे यासाठी लताला दीर्घायुष्य लाभावे !



माई, आशा, लता, दीनानाथ, मीना

लता-छायापट ....




छोटी लता



पहिला जलसा



'खजांची'
पारितोषिक-विजेती



'पहिली मंगळागौर'-
मधली भूमिका



'गुरुकुल'मध्ये
श्रीकृष्ण-लता, सुदामा-मीना




उदयोन्मुख पार्श्वगायिका



भविष्याची चाहूल

पंढरीनाथ कोल्हापुरे, लता, उषा






'चिमुकला संसार'मध्ये
लता, मा. विनायक

आशा आणि लता





जयसिंग, दिदी







उषा, आशा, हृदयनाथ, माई, लता, मीना.
नंदू, वर्षा, हेमंत (आशाबाईंची मुले)









दीनानाथ पुण्यतिथी, १९६६
मीना, लता, उषा, रविशंकर, भीमसेन जोशी, शिवकुमार शर्मा, वसंत देसाई, हृदयनाथ.


←पंडितजींसमवेत.



स्वातंत्र्यवीरांसमवेत.




लता, शिवाजी गणेशन.



सेनापती बापटांसह




स्वरमुद्रा



करदार, जयश्री, व्ही. शांताराम, लता, दिवाण शरार

'साधी माणसे' चित्रपट बघताना : लता, बाळासाहेब देसाई, भालजी पेंढारकर.





क्रिकेटपटूंचे स्वागत
नाडकर्णी, गुप्ते, वाडेकर, मांजरेकर, देसाई, उम्रीगर, आशा, कॉन्ट्रॅक्टर, वर्षा, लता.



देव आनंद, राज कपूर, लता, दिलीपकुमार







गुलाम हैदर


खेमचंद प्रकाश

सज्जाद हुसेन





काही संगीत दिग्दर्शक




लता, नौशाद



रायचंद बोराल, लता

लता, सचिनदेव बर्मन





लता, मदनमोहन




लता, सलिल चौधरी



लता, जयकिशन





लता, राहुलदेव वर्मन




आनंदजी, लता, कल्याणजी

लक्ष्मीकांत, लता, प्यारेलाल






खांसाहेब बडे गुलामअली खाँ



अब्दुल वहाब



खांसाहेब अमीर खाँ




कुंदनलाल सैगल

ाही आवडत्या गायक—गायिका

नूरजहाँ






द 'किंग' कोल





सुब्बलक्ष्मी




मा. दीनानाथ

खांसाहेब अमान अली खाँ (भेंडीबाजारवाले)



खांसाहेब अमानत खाँ



गायनकलेतील गुरू





गायिका

Lata Mangeshkar

श्रीकृष्ण.

मेरे हमदम मेरे दोस्त
लक्ष्मी, प्यारे.

PRABHU KUNJ PEDDAR ROAD BOMBAY 26

१४ - २ - ६७

चलो सजना जहाँतक घटा चले
लगाकर मुझे गले ॥ध्रु०॥

सुंदर सपनोंकी है मंज़िल कदमके नीचे
फुरसत किसको इतनी देखे जो मुड़के पीछे
तुम चलो हम चलें — सावनकी हवा चले ॥२॥

गाणे

मुखड़ा उभरे दिलकी उलझी तुम्हारी लटमें
उभरे तनकी छाया आजाद बनी पलकमें
टाल दूँ तो बादल — आँचलके तले तले ॥२॥

पथरीली राहोंमें तुमसंग मैं झूम लूंगी
खामोश जब होकर होठोंसे चूम लूंगी
प्यारका आजसे — तुमसे सिलसिला चले ॥३॥

चलो सजना जहां तक घटा चले
लगाकर मुझे गले ऽ ऽ

मजरूह सुलतानपुरी

चित्रलेखा

आणखी एक गाणे

ताडदेव येथील फेमस सिने लॅबोरेटरी. रस्त्यापासून काहीशी आत असलेली, बाहेरून अगदी साधी, अनाकर्षक वाटणारी ही इमारत चित्रपटव्यवसायाचा एक महत्त्वाचा घटक आहे. चित्रपटांतल्या गाण्यांचे ध्वनिमुद्रण येथे होत असते. तशा मुंबईमध्ये ध्वनिमुद्रणाच्या सोयी इतर ठिकाणीही आहेत, मेहबूब स्टूडिओ, राजकमल कलामंदिर, बॉम्बे लॅबोरेटरी येथेही चित्रपटांतली गाणी ध्वनिमुद्रित होतात. पण फेमस सिने लॅबोरेटरीतली कामाची वर्दळ काही वेगळीच. एक रविवारचा दिवस वगळला तर येथे रोज दोन दोन तीन तीन गाणी ध्वनि-मुद्रित होतात. बाहेरच्या मोठ्या रस्त्यावर रहदारी वाहत असते. गाड्या जात येत असतात. लोकांचे नित्याचे व्यवहार चालू असतात. आणि येथे या इमारतीत हर्ष, शोक, प्रणय, वात्सल्य, आनंदाची उत्फुल्लता, क्रीडेचा निर्भर उन्माद—नाना भावनांचा आविष्कार करणाऱ्या, नाना भाषांतल्या गाण्यांचे फिल्मच्या अरुंद पट्टीवर स्वरमुद्रण होत असते. नियमितपणे, निवांतपणे, वर्षानुवर्षे हे काम येथे होत आहे.

चौदा फेब्रुवारी एकोणीसशे सदुसष्ट. सकाळचा नऊसाडेनऊचा सुमार. 'मेरे हमदम मेरे दोस्त' या चित्रपटातल्या एका गाण्याचे आज फेमस सिने लॅबोरेटरीत ध्वनिमुद्रण होत आहे. संगीत दिग्दर्शन करणार आहे चित्रपटसृष्टीत सध्या आघाडीवर असलेली लक्ष्मीकांत प्यारेलाल ही तरुण कलावंतांची जोडी. आणि गाणार आहे लता मंगेशकर.

फेमस सिने लॅबोरेटरीची इमारत तशी सोयिस्कर नाही. पायऱ्या चढून वर जाताच समोर एक छोटी खोली लागते. तिच्या शेजारी तेवढ्याच आकाराची दुसरी खोली आहे. येथील प्रमुख ध्वनिमुद्रक मिनू कात्रक व त्यांचे सहकारी येथूनच गाणे ध्वनिमुद्रित करतात. या खोलीला लागून दुसरे मोठे दालन आहे. येथून गायक गायिका मायक्रोफोनसमोर उभे राहून आपली गाणी गातात. या दालनामागे एक खूप मोठा हॉल आहे. येथे वादक बसतात. गाण्याला जशी साथ हवी असेल त्याप्रमाणे वाद्यांची आणि वादकांची संख्या कमी जास्त होत असते.

ध्वनिमुद्रण जेथे केले जाते ती खोली अगदी छोटी आहे. कोपऱ्यात ध्वनिमुद्रणयंत्र आहे.

तेथे कात्रक बसले आहेत. त्यांच्या शेजारी त्यांचे सहकारी ध्वनिमुद्रक भन्साळी आहेत. तेथेच जवळ दाटीवाटीने तीन खुर्च्या ठेवल्या आहेत. त्यातल्या एका खुर्चीवर अमरकुमार बसले आहेत ते 'मेरे हमदम मेरे दोस्त' चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. त्यांच्याशेजारी बसले आहेत ते मजरूह सुलतानपुरी, प्रसिद्ध कवी. आज ध्वनिमुद्रित व्हायचे आहे ते गाणे त्यांच्या लेखणीतून उतरले आहे. खोलीच्या उरलेल्या अर्ध्या भागात एक प्रचंड यंत्र उभे आहे. त्यावर असंख्य अगम्य स्क्रू. बटणे आहेत. या यंत्राशेजारी कात्रक यांचे दुसरे सहकारी कुमार परुळेकर उभे आहेत. सलीम हे त्यांचे आणखी एक सहकारी जवळपास आहेत.

खोलीत आणखी कितीतरी माणसे आहेत. कात्रक यांच्यासमोरच ही खोली आणि गायक-गायिका जेथून गातात ती खोली यांना विभागणारी भिंत आहे. या भिंतीत मध्यभागी एक खिडकी-वजा चौकट आहे. तीत एक अखंड काच बसवली आहे. या काचेतून ध्वनिमुद्रक आणि गायक-गायिका एकमेकांना पाहू शकतात. ध्वनिमुद्रणाच्या यंत्रासमोर, या कांचेखाली भिंतीशी एक कोच आहे. त्यावरही माणसे अगदी ठेचून बसली आहेत. ही सारी मंडळी आली आहेत लताचे गाणे ऐकण्यासाठी. लता आज वर्षानुवर्षे गात आहे. जवळजवळ रोज तिची गाणी ध्वनिमुद्रित होत असतात. आणि तरीही 'लताचे रेकॉर्डिंग' ही चित्रपटसृष्टीतली एक महत्त्वाची घटना असते. तो एक Event असतो. त्यामुळे तिचे रेकॉर्डिंग असले की ते ऐकण्यासाठी धंद्यातल्या उत्तमोत्तम तंत्रज्ञांपासून तो परदेशी पाहुण्यांपर्यंत आणि चित्रपटनिर्मात्याच्या नातेवाईकांपासून तो रेकॉर्डिंग-आणि लताही-कुतूहलाने बघायला येणाऱ्या सर्वसामान्य माणसापर्यंत अनेकजण येत असतात. आज ही मंडळी तशीच येथे गोळा झाली आहेत.

कलाक्षेत्रांत ज्यांचे नाव वर्षानुवर्षे गाजत आहे असे अनेक प्रतिभाशाली वादक कधीकधी लताच्या रेकॉर्डिंगच्या वेळी साथीला हजर असतात. सुप्रसिद्ध सारंगीवादक रामनारायण, संतूरवादक शिवकुमार, बासरीवादक हरिप्रसाद चौरासिया, व्हायोलीनवादक गजानन कर्नाड यांच्यासारखी बडी कलाकार मंडळी येथे साथ करताना अचानक बघावयास मिळतात. आजच्या गाण्याला भरगच्च साथ असली पाहिजे. कारण वादकांची संख्या खूप मोठी आहे. आज कितीतरी देशीविदेशी वाद्यांचा येथे मेळावा भरलेला आहे. मँडोलीन, व्हायोलीन, व्हीयोला, चेलो, डबलबेस अशी अनेक वाद्ये त्यांत आहेत. ढोलकपासून तो तबल्यापर्यंत कित्येक तालवाद्ये येथे दिसत आहेत. नुसती व्हायोलिन्स पंचवीस ते तीस तरी असावीत. व्हायोलिनवर गजानन कर्नाड आहेत. शिवकुमार संतूर वाजवीत आहेत. सतार, स्पॅनिश गिटार ही वाद्येही साथीला आहेत. हॅमण्ड ऑर्गनची योजना केलेली दिसत आहे. फोनवर मनोहरी आहेत. संगीत दिग्दर्शकांचे मदतनीस श्याम कांबळी व्हायब्रोफोन वाजवीत आहेत. सुप्रसिद्ध तबला व ढोलकीवादक अबदुल करीम हे आज येथे उपस्थित आहेत. चंदू बर्वे बासरी वाजवीत आहेत. त्यांच्या जोडीला हरिप्रसाद चौरासियाही आहेतच.

ज्या दिवशी आपल्या गाण्याचे रेकॉर्डिंग असेल त्या दिवशी लता रेकॉर्डिंगच्या जागी अगदी वेळेवर हजर असते. आजही सकाळी नऊ वाजताच ती येथे आली आहे. आणि यावेळी ती आतल्या दालनात भिंतीलगत असलेल्या कोचावर बसली आहे. शेजारी तिची पर्स पडली आहे. निळ्यागुलाबी फुलांचे भरतकाम केलेली पांढरीशुभ्र रेशमी साडी, तसाच ब्लाऊज, गळ्यात सोन्याची बारीक एकेरी साखळी, पाठीवर दोन लांबच लांब वेण्या, सावळी प्रसन्न मुद्रा. लताला पाहताक्षणी प्रथम जाणवतो, नजरेत भरतो, तो तिचा साधेपणा, मनमिळाऊपणा, स्वभावगत सौजन्य. तिने स्टूडिओत पाऊल टाकल्याबरोबर अल्पावकाशात सारे वातावरण तिच्या व्यक्तित्वाने जणू भारले जाते. सारा परिसर प्रसन्न होतो. स्टूडिओत आल्याबरोबर ती कोणाला हसून अभिवादन करील. कोणाची आपुलकीने विचारपूस करील. कोणाची थट्टामस्करी करील. तर कोणाशी मनमोकळेपणाने

गप्पा मारील. आज तिच्याबरोबर तिच्या दोन मैत्रिणी आल्या आहेत. त्यांच्याशी ती आता हसत-हसत काही बोलते आहे.

गेली वीस वर्षे लता येथे येते आहे. रोजच्यारोज गाणी ध्वनिमुद्रित करते आहे. अगदी छोट्या मुलीपासून तो या वयापर्यंतची तिची झालेली वाढ या स्टूडिओने पाहिली आहे. नव्या अनोख्या गायिकेपासून तो चित्रपट सृष्टीतल्या आजच्या सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिकेपर्यंत तिची होत गेलेली उत्क्रांती, तिच्यामध्ये झालेली अनेक परिवर्तनें येथील भिंतीभिंतींना ज्ञात आहेत. इथे असलेला प्रत्येक वादक, या स्टूडिओतला अगदी सामान्य मदतनीस, इथला हरकाम्या नोकर देखील लताच्या चांगला परिचयाचा आहे; तिला इथे घरच्यासारखेच मोकळे, अनौपचारिक वाटते.

आजचे गाणे कवी मजरूह सुलतानपुरी यांनी लिहिले आहे. लता स्वतःच्या नोटपेपरवर ते गाणे लिहून घेते. प्रत्येक गाण्याच्या शिरोभागी 'श्रीकृष्ण' असे लिहायला ती कधी चुकत नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक गाण्याचे स्वतःच्या हस्ताक्षरांत लेखन करून घेतल्याशिवायही ती राहत नाही. गाण्यांतील विशिष्ट शब्दांवर, विशिष्ट जागांवर खास स्वतःच्या अशा तिच्या खुणा केलेल्या असतात. स्वरांचे आघात, ' हेलकावे सूचित करणाऱ्या. लताखेरीज इतरांना त्यांचा अर्थही कळणे अशक्य. त्या केवळ तिच्यासाठीच असतात. गाण्याचे शब्द आणि या खुणा एवढे गाताना तिला पुरेसे असते.

आजच्या गाण्याचे संगीत देत आहेत लक्ष्मीकांत प्यारेलाल. आजची एक अत्यंत लोकप्रिय जोडी. 'दोस्ती' चित्रपटाला यांनी दिलेले संगीत लोकांना फार आवडले. आणि तेव्हापासून हे सतत आघाडीवरच राहिले. यावेळी ते दोघे लताजवळ उभे आहेत. दोन्ही मुले तिशीच्या आतली आहेत. यांतला तपकिरी पँट, पांढरा शर्ट घातलेला सावळासा, अबोल, गंभीर मुद्रेचा तरुण आहे तो प्यारे. हा उत्तर प्रदेशातला आहे. दुसरा काळी पँट आणि मरून रंगाचा मॅनिला घातलेला गोरागोमटा, देखणा, हसतमुख तरुण आहे तो लक्ष्मी. हा महाराष्ट्रीय आहे. हे दोघेहीजण अगदी छोट्या वया-पासून वादकांच्या ताफ्यात काम करीत होते. त्यावेळी प्यारे व्हायोलीन वाजवत असे आणि लक्ष्मी मॅंडोलीन वाजवत असे. लता त्या वेळेपासून त्यांना ओळखते आहे-नव्हे, त्यांना प्रथम चित्रपटसृष्टीत प्रवेश आणि कामे तिनेच मिळवून दिली आहेत. आणि आता हे दोघे संगीत दिग्दर्शक झाल्यापासून त्यांची कितीतरी गाणी तिने गाइली आहेत.

प्यारे एक खुर्ची ओढून घेऊन लताच्या पुढ्यात बसतो आणि समोरच्या हार्मोनियमवर तिला गाण्याची चाल वाजवून दाखवतो. लता डोळे मिटून स्वर समजावून घेते. मनातल्या मनात ते घोळवते. लक्ष्मी बाजूला बसून ऐकतो आहे.

> **लाऽला ला ल ला**
> **चलोऽऽ सजना जहांतक घटा चले**
> **लगाकर मुझे गले**

'मुझे'वर सुंदर मींड आहे. 'चलोऽऽ' लता लक्षपूर्वक ऐकत आहे. प्यारे सांगतो. लता गाऊ लागते,

> **चलोऽऽ सजना जहांतक घटा चले**

बाहेर वाद्ये तिला साथ करू लागतात.

प्यारे सबंध गाणे गाऊन दाखवतो. त्याचा आवाज ढाला आहे. प्रारंभ खर्जात असलेले हे गीत त्याच्या स्वरात गंमतशीर वाटते. त्याचे गाणे गाऊन होताच लता पुन्हा एकदा दोनदा खालच्या

स्वरात स्वतःशीच गुणगुणल्यासारखे करते. आणि मग ती चाल ती हुबेहूब आपल्या गळ्यातून उमटवते. मध्येच मान वाकडी करून ती एक सुरेख आलाप घेते. लक्ष्मी पुढे झुकून स्वतःला सुचलेल्या एक दोन ताना तिला सांगतो. बाहेरच्या दालनात कोणीतरी ओरडते, "Quiet Please". वाद्ये पुन्हा सुरात मिळवली जात आहेत. त्यांचा गोंगाट चालू आहे. माणसे आपसांत बोलत आहेत. पण या तिघांना त्याचा उपद्रव होत नाही. त्यांना त्याची चांगली सवय झाली आहे.

मध्येच फोटोग्राफर येऊन फोटो घेऊन जातो. आणखी कोणी तरी येऊन लताला अभिवादन करून जातो. पँट, बुशशर्ट, हातात भारी घड्याळ, सिगरेटचे टिन, काडेपेटी. डोळयाला काळा गॉगल. हा कोण असेल ? प्रोड्यूसर ? दिग्दर्शक ? स्नेही ? एक सामान्य पाहुणा ? काही कळत नाही.

लता त्याच्याशी दोन शब्द बोलते. हसते. पुन्हा ती हातातल्या गाण्याकडे वळते.

अद्याप गाण्याची चाल तिला समाधानकारक वाटत नाही. ती काहीतरी सूचना करते. चालीत थोडा बदल सुचवते. तशी तान घेऊन दाखवते. प्यारे खूष होऊन म्हणतो,

"वाहवा ! बहोत अच्छा !"

लक्ष्मी लगेच त्याची सरगम बसवतो.

लता काहीतरी विनोद करते. लक्ष्मी आणि प्यारे हसतात. मध्येच उठून लता बाहेर जाऊन आपल्या ड्रायव्हरला सांगून येते. तिला कॉफी हवी आहे. सकाळी नऊलाच आलेली असल्यामुळे ती जेवून आलेली नाही. कॉफी येते. लता कॉफी घेते. कॉफी घेतल्यावर तिला जरा तरतरी येते. मध्येच प्यारे उठतो आणि दोन्ही दालनांना विभागणाऱ्या दारात उभा राहून वादकांना सूचना देतो. पार्श्व-संगीत सारखे घुमत राहाते. दरम्यान व्हायोलीनवादक गजानन कर्नाड आत येतात. लता त्यांच्याशी बोलते. गाण्याच्या 'नोटेशन'मध्ये ती काही दुरुस्त्या सुचवते. तालात बसविण्यास अवघड अशा एक दोन जागांसंबंधी काही सूचना देते. त्या सूचनांबरहुकुम वाद्यांच्या स्वरांत बदल केला जातो.

गाण्यातल्या एका आलापाबद्दल लता अद्याप साशंक आहे. तिला तो आलाप पसंत नाही. ती लक्ष्मीला म्हणते,

"तो आलाप बरा वाटत नाही. लक्ष्मी, हा ऐक तू."

आणि ती आपल्या मनासारखा आलाप घेते. पुन्हा चर्चा. पुन्हा विचारविनिमय. पुन्हा बदल. अगदी बारीक बारीक सूचना देखील मोठ्या आस्थेने विचारात घेतल्या जात आहेत. गाण्याचे सौंदर्य तसूतसूने पालटत, वाढत आहे. आता वाद्यांची लय वाढते. वाद्यांचीच नव्हे, साऱ्या वातावरणाची जणू लय वाढली आहे. गायिका, संगीत दिग्दर्शक, वादक, साऱ्यांनाच एका अनिवार बेहोषीने झपाटून टाकले आहे. नवनिर्मितीची बेहोषी. सारीजणे गाण्याशी समरस, एकतान झाली आहेत. गाणे उत्कृष्ट व्हावे याखेरीज दुसरे काहीही कोणाला सुचत नाही.

मध्येच बाहेर कोणीतरी काहीतरी बोलते. हसते. प्यारेला हा व्यत्यय सहन होत नाही. तो चिडतो. आणि म्हणतो,

"आप लोग दो मिनिट शांत रहेंगे तो मेहरबानी होगी." नंतर वादकांकडे वळून तो म्हणतो,

"पहले म्युझिक रिहर्सल करेंगे. वर्ड्स् सेपरेट. हां ?"

एक 'स्टूडिओ हँड' येऊन 'माईक'ला फुलांचा हार घालून जातो. ही स्टूडिओची परंपरा. अत्याधुनिक यांत्रिकतेला होणारा भावुकतेचा स्पर्श.

आता रिहर्सल आटोपली आहे. बाहेर बराच वेळ तबला नुसता धीमा ठेका धरून राहतो. प्यारे वादकांना इशारा देतो, 'वन टू थ्री फोर'. इतर वाद्ये सुरात मिळवली जातात. स्वरमेळ समृद्ध, भरगच्च होत जातो. आता लता शेवटची म्हणून वाद्यांच्या साथीने एकदा रिहर्सल करते.

सुंदर सपनो की है   मंझिल कदम के नीचे
फुर्सद किसको इतनी   देखे जो मुडके पीछे
तुम चलो हम चले   सावनकी हवा चले
चलो ऽ ऽ सजना

स्टूडिओचा माणूस येऊन 'माइक' नीट लावून जातो. माइकजवळ एक लाकडी स्टँड आहे. हा गायकाला गाताना हात टेकण्यासाठी. खाली सर्वभर हिरवी सतरंजी. माइकखाली एक लाल सतरंजी. दोन्ही भिंतींना लागून दोन लाल कोच. भिंतीवर सरस्वतीची छोटी तसबीर. तिला फुलांचा हार. दुसऱ्या भिंतीवर कॅलेंडर. बाहेरच्या खोलीतून मधल्या काचेवाटे हे दृश्य पाहिले तर चित्रपटातल्यासारखे दिसते. काचेआडच्या खोलीतली ही माणसे ॲकेरियममधल्या माशांसारखी फिरताहेतसे वाटते.

लता माइकसमोर येऊन उभी राहते. स्टँडवर दोन्ही कोपरे टेकून हातातल्या गाण्याच्या कागदावरून एकदा अखेरची नजर फिरवते. मिनू कात्रक तिला इषारा देतात.

गाणे ध्वनिमुद्रित करण्यासाठी बहुधा रेकॉर्डिंग मशिनमध्ये तीन ट्रॅक्स् असतात. एका ट्रॅकवर गायिकेचा आवाज मुद्रित होतो. एकावर तंतुवाद्यांचा स्वर मुद्रित होतो. आणि एकावर तालवाद्यांचा स्वर मुद्रित होतो. प्रथम सारे आवाज भरगच्च घेऊन ठेवतात. त्यासाठी वेगळ्या मशिनवर वेगळी टेप लावलेली असते. आणि मग ज्या प्रमाणात जे वाद्य, जे स्वर हवे असतात ते या वेगळ्या टेपवर मिसळून घेतले जातात. हे 'मिक्सिंग' यथाप्रमाण करण्यावरच ध्वनिमुद्रकाचे सारे कौशल्य अवलंबून असते. मिनू कात्रक हे गेली अनेक वर्षे रेकॉर्डिस्टची जबाबदारी सांभाळीत असल्यामुळे या बाबतीतले त्यांचे कसब वेगळे सांगायला नको.

बाहेरच्या खोलीतले रेकॉर्डिंग मशिन सुरू होते. आंत लाल दिवा लागतो. गाण्याची 'अनाउन्समेंट' केली जाते.

"मेरे हमदम मेरे दोस्त, साँग नंबर फोर. टेक वन"

मशिन सुरू झाले आहे. टेप गुंडाळली जात आहे. आतल्या खोलीतली माणसे आता बाहेरच्या खोलीत, जेथे गाणे ध्वनिमुद्रित होते तेथे येऊन बसली आहेत. वादकांना इषारा दिला जातो. वाद्यमेळ सुरू होतो. आणि अचूक त्यात मिसळलेला आवाज ऐकू येतो. लताचा आवाज. वर्षानुवर्षे न चुकता, न थकता मनपसंत काम देणाऱ्या यंत्राइतकाच तो आजही विश्वासार्ह, प्रामाणिक आहे. पहिले ध्रुपद लताने गाइल्याबरोबर माणसे थरारतात. निःस्तब्ध होतात. वर्षानुवर्षे लताची अक्षरशः शेकडो गाणी ध्वनिमुद्रित केलेले मिनू कात्रक देखील गाण्याला दाद दिल्यावाचून राहात नाहीत.

सुंदर सपनोकी है   मंझिल कदमके नीचे
फुर्सद किसको इतनी   देखे जो मुडके पीछे
तुम चलो हम चले   सावनकी हवा चले
चलोऽऽ सजना जहांतक घटा चले

शब्द न शब्द सुटा. स्वच्छ. भावपूर्ण. पाण्याच्या धारेइतका प्रवाही. वाद्यमेळाच्या साथीतूनही वेगळा जाणवणारा. विलक्षण सुरेल. टोकदार.

लक्ष्मी धुंद डोळे मिटून उभा आहे. तो गाण्याची गंमत घेत आहे. समेवर तो खटक्याने मान हलवतो.

धडकन तुम्हारे दिलकी   उलझी हमारे लटमे
तुम्हरे तनकी छाया   काजल बनी पलकमे
एक है दो बदन   आंचलके तले तले

दुसरे कडवे संपते. प्यारेचा चेहरा समाधानाने उजळून निघाला आहे. आपल्याला हवे होते तसे गाणे झाल्याचा आनंद त्याच्या सभोवती सुरांबरोबर मिसळून दरवळत आहे.

पथरीली राहोंमे   तुमसंग मैं झूम लूंगी
खावोगी जब ठोकर   होटोसे चूम लूंगी
प्यार का आजसे   हमसे सिलसिला चले

गाणे कडव्याकडव्यांतून पुढे सरकत जाते. संपते. पहिल्याच 'टेक'ला गाणे हवे तसे ध्वनिमुद्रित झाले आहे. पण केवळ योगायोगाने. कित्येकदा कोठेतरी काहीतरी चुकते. बिनसते. आणि एकेका गाण्याचे दहा दहा, पंधरा पंधरा टेक सुद्धा होत राहातात. सकाळी नऊला सुरू झालेले रेकॉर्डिंग रात्री दहा वाजता किंवा दुसऱ्या दिवशी पहाटे संपल्याचीही उदाहरणे आहेत. अशा वेळी गायकांची, वादकांची, ध्वनिमुद्रकांची, साऱ्यांचीच कसोटी लागते. सहनशीलता प्रमाणाबाहेर ताणली जाते. पण ही माणसे तितकीच जिद्दीची असतात. न चुकता पुन्हा पुन्हा, तासन तास तेच काम ती तितक्याच हौसेने, उमेदीने, ताजेपणाने करीत राहतात. पडद्यावर तीन मिनिटांत संपणारे गाणे ध्वनिमुद्रित होताना कित्येकदा असे छळते.

गाणे संपल्याबरोबर सगळीकडून समाधानाचे, कौतुकाचे उद्‌गार उसळतात. 'बहोत अच्छा!' 'गाई फर्स्ट क्लास' 'वाहवा' 'क्या बात है' एकच गर्दी उडते.

आतला वाद्यमेळ आता थांबला आहे. इतका वेळ ताणून राहिलेले वादक आता अंग मोकळे, सैल करतात. सुटकेचा निःश्वास टाकतात. आणि मग नुकतेच ध्वनिमुद्रित झालेले गाणे लगेच मोठ्या दालनात वाजवले जाते. ताजे गरमागरम गाणे. प्रत्येक वादक उत्सुकतेने ऐकत राहतो. आपापल्या वाद्याने कसा सूर दिला आहे त्याचा अंदाज घेतो. येथे फक्त दृश्य नाही. बाकी गाणे थिएटरमध्ये जसे ऐकू येईल तसेच ते येथे ऐकायला मिळते. ऐकणारांची अगदी गर्दी झाली आहे. आणि लता—ती कोठे तरी एका बाजूला उभी आहे. तिची लहानशी सडसडीत मूर्ती आणि सबंध दालन भरून राहिलेला खणखणीत आवाज यांची संगती लावणे कठीण वाटते. हिने हे गाणे म्हटले असेल यावर क्षणभर विश्वासही बसत नाही.

गाणे ऐकून झाल्यावर काही वेळ हाकांचा, हसण्याचा, बोलण्याचा एकच कल्लोळ उसळतो. सारा संच आता विस्कटला आहे. इतका वेळ गाण्यात हरवून गेलेले आपापले अस्तित्व आता जो तो वेगळे करतो आहे, शोधतो आहे.

पण लता कुठे आहे? गाणे संपताच ती त्यातून अलिप्त झाली आहे. घटकेपूर्वी गाइलेल्या गाण्याचे शब्द आता तिला विचाराल तर ते तिला सांगता येतीलच असे नाही.

ती गर्दीतून वाट काढीत तेथून बाहेर पडते. रस्त्यावर उभ्या असलेल्या आपल्या गाडीत जाऊन बसते. माणसांच्या घोळक्यातून गाडी भुर्रकन निघून जाते. लताच्या दृष्टीने या सर्व घटनेचा अर्थ इतकाच आहे. आजचे तिचे काम संपले आहे.

—आणि अशा रीतीने आणखी एक गाणे ध्वनिमुद्रित होते. लताचे गाणे. एका सोनेरी कलाग्रंथातले आणखी एक पान लिहिले जाते.

कानन मेहरू

ती

आज किती आठवण्याचा प्रयत्न केला तरी, तिच्या विश्वव्यापी मोहक स्वराशी पहिल्यांदा माझी केव्हा ओळख झाली ते काही केल्या आठवतच नाही मला. आमच्या वडलांचे संगीतप्रेम आम्हा सर्वच भावंडांत उतरले आहे. पण माझ्या छोट्या भैय्याला हे संगीताचे वेड जरा जास्तच आहे. भैय्याचा आम्हाला सक्त हुकुम असे की सकाळी डोळे उघडताक्षणी रेडिओवरून पहिला स्वर कानी पडला पाहिजे तो हिचाच. तो स्वर ऐकला तरच सारा दिवस 'सुरेल' जातो अशी त्याची श्रद्धा. त्याच्या हुकुमाप्रमाणे रोज सकाळी मी आपली रेडिओला कान लावून बसायची आणि तिचे गाणे सुरू होण्यापूर्वी तिच्या नावाचा पुकार झाला की रेडिओ मोठा करून भैय्याला ते गाणे ऐकवायची. एके दिवशी माझ्या दुर्दैवाने मी चुकून भलत्याच गाण्याला रेडिओ मोठा केला. तो बेसूर आवाज ऐकल्याबरोबर भैय्या असा भडकलाय म्हणता. त्यावेळी त्याच्या हातून मी जी थप्पड खाल्ली तिचे अद्यापही मला चांगले स्मरण आहे.

काही वर्षे लोटली आणि भैय्याचा तिच्याशी परिचय होण्याचा योग आला. त्यावेळी त्याच्यापेक्षाही आनंदाने अधिक फुलून गेले होते ती मी! नंतर काही दिवस मी तिचे नुसचे नावच ऐकत होते. पण एके दिवशी तिची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची सुवर्णसंधीही लाभली मला. स्थळ : दिल्लीचा पालम विमानतळ. काळः जानेवारी महिन्यातली कुडकुडती रात्र. अशी वेळी विमानातून एखादी छोटीशी बाहुली उतरावी तशी ती उतरली. धक धक धक—माझ्या छातीचे ठोके मलाच ऐकू येत होते. कॉलेजात पहिले लेक्चर देतानाही इतकी घाबरले नसेन मी. माझे सर्वांग थरथर कापत होते. काहीसे थंडीने नि काहीसे भीतीने. तेवढ्यात अचानक ती माझ्यासमोर येऊन उभी राहिली. मी पुढे पाऊल टाकण्या आधीच बासरीचे कोमल सूर उमटले, "तुम्हीच कानन ना?" आणि एकदम तिने माझा हात हाती घेऊन जोराने दाबला. त्या प्रेमळ स्पर्शाच्या उबेमुळे माझ्या मनातल्या अनिश्चिततेचा उरलासुरला अंशही पार विरघळून गेला. त्यानंतर 'अशोक' हॉटेलमध्ये आम्ही पोहोचेतोपर्यंत तिने मला सावलीसारखे आपल्याजवळ राखले होते. त्या काही घटकांच्या सहवासात तिच्या व्यक्तित्वाच्या ज्या एका विशेषाने मला विलक्षण मोहून टाकले तो विशेष म्हणजे तिचे अत्यंत

निर्मळ मुक्त हसे. ते खळखळते रुणझुणते हसू कानी पडले की तिच्या सांन्निध्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिच्यापासून आपले परकेपण फार काळ राखताच येत नाही मुळी!

दुसरा दिवस उजाडला. 'अशोक' हॉटेलमधल्या एका भव्य राजेशाही दिवाणखान्यात तिचे एक वेगळेच रूप माझ्या निदर्शनाला आले. तेथे चित्रपटाच्या दुनियेमधले अनेक चांदतारे गोळा झाले होते. त्यांच्या झगमगाटात ही किती वेगळी दिसत होती. त्या मंडळींचा सारखा आग्रह चालला होता, "तुम्ही बाहेर जायचे नाही हं, इथेच आमच्याबरोबर राहायचे. मग आपण बरोबर हिंडू, एकत्र खाऊपिऊ, मजा करू." आणि ही मात्र पुन्हा पुन्हा माझा हात पकडीत म्हणत होती, "मी हिच्या घरीच जेवायला जाणार आज!" या गोष्टीची तर मी स्वप्नातही अपेक्षा केली नव्हती. तिचा तो हट्ट पाहून मला मोठा प्रश्न पडला, आता काय करावे बाई? आमचे एवढेसे साधे गरिबाऊ घर. त्या घरात हिचे कसे स्वागत करू? हिला कुठे बसवू? कुठे जेवण देऊ? काय पक्वान्न बनवू हिच्यासाठी? मन विलक्षण गोंधळून गेले होते. वरवर मात्र, मी खोटे हसत होते. तोंडातून उलट सुलट उत्तरे बाहेर पडत होती. अखेर तो प्रसंग तर मोठ्या शिताफीने टाळला मी, आणि तिला 'गेलार्ड' मध्ये जेवू घातले. ती तेथे जेवली खरी. पण तिथून निघताना माझ्याकडे बघून अशा मिष्किलपणाने हसली म्हणता. कोवळ्या उन्हासारख्या त्या प्रसन्न हास्यात अशी तक्रार होती, "मला माहीत आहे, या खेपेला आपलं घर मला दाखवायचं मोठ्या शिताफीनं टाळलं आहेस तूं. नाही का? पण पुढल्या खेपेला मात्र हे चालायचं नाही हं. तेव्हा इथं येईन ती सरळ तुझ्या घरीच येऊन उतरेन मी!"

नंतर ती दिल्लीहून मुंबईला परत गेली. पण त्या पहिल्या भेटीतच तिने माझे मन असे जिंकून टाकले की दुसऱ्या दिवशी वर्गात मैथिलीशरण गुप्तांचे 'पंचवटी' काव्य शिकवीत असता मला एक-सारखे भय वाटत होते: 'लक्ष्मणा' ऐवजी मी चुकून 'लता' तर नाही ना म्हणून जाणार?

दुसऱ्या खेपेला आमची भेट झाली तोवर मनाने आम्ही अधिक निकट आलो होतो. दर-म्यानच्या काळात झालेल्या पत्रव्यवहाराने आमच्यातले स्नेहबंधन दृढतर केले होते. यावेळी ती दिल्लीला आली तेव्हा मी तिला माझ्या घरीच जेवायला घेऊन गेले. तिच्यासाठी बाहेरची खोली आम्ही सजवून ठेवली होती आणि तिथला सारा पसारा आतल्या खोलीत लपवला होता. पण हिला बाहेरच्या खोलीत कुठून चैन पडायला? ती जी आली ती थेट आमच्या स्वैपाकघरातच येऊन थडकली. आणि तिथे माझ्या आईशी मोकळेपणाने गप्पा मारीत बसली. झाले. आम्ही केलेली सारी वरवरची सफाई, सर्व दिखाऊ सजावट कुठच्याकुठेच गेली. मी तिच्यावर फार फार रागावले. पण ती गोड हसून मला म्हणाली, "त्यात काय येवढे बिघडले? तुला ठाऊक नाही कानन, तुमच्या जागेपेक्षाही छोट्या जागेत दिवस काढले आहेत मी. आणि असे बघ, मी भेटायला आले ती फर्निचरला नव्हे की बड्या अलीशान मकाणाला नव्हे. मी भेटायला आले आहे तुला, तुझ्या घरच्या माणसांना. तुम्ही जिथे असाल ती जागा माझ्या दृष्टीने सुंदरच नाही का?" माझे हृदय भरून आले. केवढे थोर व्यक्तित्व आहे हे. किती सरळ अन् अकृत्रिम स्वभाव!

उन्हाळ्यामध्ये मला आपल्याबरोबर कश्मीरला घेऊन जावे अशी तिची फार इच्छा. तिने मला त्याप्रमाणे खूप आग्रहही केला. तथापि, कामाच्या अडचणीमुळे मला काही तिच्याबरोबर जाता आले नाही. फार वाईट वाटले. पण मनात विचार करीत होते, ही तरी तेथे फार मजेत, आनंदात दिवस काढीत असेल. त्यातच मला समाधान होते. पण कश्मीरहून तिचे पत्र मला आले ते काही वेगळेच सांगत होते. त्यावेळी मला जाणीव झाली की, वरवर अत्यंत उत्फुल्ल, चंचल आणि लहरी वाटणाऱ्या या व्यक्तित्वाच्या अंतर्यामी गहन सहानुभूती आणि गंभीर विवेक यांचा अनुपम संगम झालेला आहे! काश्मीरच्या विलक्षण सुंदर निसर्गापेक्षाही कश्मीरवासी जनतेच्या विपन्न निर्धन अवस्थेचा तिच्या मनावर अधिक ठसा उमटला होता. आपल्या पत्रात तिने मला लिहिले होते,

"इथे जागोजागी वाहणारे खळखळते निर्झर पाहिले की त्यांच्या जागी मला इथल्या गरीब लोकांचे अश्रु वाहताना दिसतात कानन; आणि इथे उमलणारी सुदर रंगीबेरंगी फुले पाहिली की इथल्या दरिद्री जनतेकडे पाहून निसर्गदेवता निष्ठुर उपहासाने खदखदा हसत आहे असा मला भास होतो ! इथे कश्मीरमध्ये भारी भारी कपडे घालून हिंडायची शरम वाटते मला. आपल्या सुखविलासांसाठी गरिबांच्या तोंडावर चार चांदीचे तुकडे फेकून त्यांना कष्ट करायला लावणं निदान मला तरी सर्वस्वी अशक्य आहे. कधी कधी मनात येते, इथे येणाऱ्या अनेक प्रवाशांप्रमाणे माझेही हृदय पाषाणाचे असते तर फार बरे झाले असते. मग मी त्यांच्याप्रमाणेच येथे चैनीत आणि मजेत दिवस काढत राहिले असते !" असे किती लोक असतील बरे की जे, सुखाची सर्व साधने आपल्यासमोर हात जोडून उभी असताना इतरांच्या दुःखाने दुःखी होण्याइतके मनाचे हळवे असतील ? पण तो हळवेपणा, ती संवदेनाशील वृत्ती इतक्या ऐश्वर्यातही हिने जपलेली आहे. मला आठवते, बडे गुलाम अली खांसाहेबांच्या दीर्घकालीन आजारानंतर त्यांचा दुबळा झालेला स्वर जेव्हा हिने रेडिओवरून ऐकला होता तेव्हा ही अशीच कासावीस होऊन खूप रडली होती. किती प्रयास पडले होते तेव्हा तिला पूर्ववत शांत करायला !

उत्तर भारताचा प्रवास करता करता ती पुन्हा एकदा दिल्लीला आली होती. यावेळी मात्र मोठ्या प्रयासाने रजा मिळवून मीही तिच्याबरोबर भटकायला बाहेर पडले होते. हृषिकेश, हरिद्वार येथील रम्य निसर्गशोभा बघताना तिला झालेला आनंद पाहणे हा देखील एक अविस्मरणीय अनुभव होता ! मी तोच अनुभव घेण्यात साठवण्यात मग्न होते. त्या प्रवासातच तिच्या अभिरुचीची आणि विपुल वाचनाची मला साक्ष पटली. मराठी साहित्याचे तर तिने वाचन केले असलेच पाहिजे. पण हिंदी, बंगाली आणि उर्दू साहित्यांतले जे संदर्भ तिला झटाझट आठवत होते ते पाहून मला खरोखरच विस्मय वाटत होता. आणि तरीही मधूनमधून तक्रारीच्या सुरात ती मला म्हणत होती, "कानन, माझ्या पाठीमागे सतत असलेल्या कामाच्या तगाद्यामुळे व्हावं तेवढं वाचन होत नाही ग माझ्या हातून."

वृंदावन आणि मथुरा येथे भगवान् श्रीकृष्णाचे दर्शन घ्यावे हीही तिची मनीषा होती. बिहारीजींची परमसुंदर मूर्ती बघून ती अशी गहिवरली की तिच्या त्या भावावेशाने आम्हीही चकित होऊन गेलो. आजच्या बुद्धिवादी आणि अश्रद्ध युगात असे एखादे श्रद्धाशील हृदय दिसून आले की मनात खोल कुठे तरी खूप बरे वाटते.

मुंबईला जाऊन तिची गाणी कशी ध्वनिमुद्रित होतात ते एकदा बघावे अशी फार दिवसांची इच्छा होती. शेवटी तोही योग आला. मी मुंबईला आल्यानंतर मला दुहेरी आनंदाचा लाभ झाला. एक म्हणजे तिच्या अकृत्रिम आतिथ्यशीलतेचा प्रत्यय आणि दुसरे म्हणजे तिच्या गाण्याच्या अपूर्व गोडव्याचा अनुभव. मी त्या आनंदात जशी काही संपूर्ण बुडून गेले. ध्वनिमुद्रणाच्या वेळी तिचे गाणे ऐकताना वाटे, हिच्या मुखातून सूर उमटताना ही त्या शब्दांना गीताचा आत्मा पुरेपूर गवसला आहे. ध्वनिमुद्रणाचे कार्य म्हणजे खरोखरी एक यांत्रिक करामत. पण ही गाऊ लागली की त्या यंत्रालाही चैतन्याचा स्पर्श होतो आणि म्हणूनच मग ते गाणे ऐकताना रसिकांची हृदये रसमग्न होतात !

तिच्या स्वरांची अनुपम जादू एकदा ताजमहलाच्या सांन्निध्यातच माझ्या प्रत्ययाला आली होती. तो मार्च महिना होता. आम्ही सर्वजण आग्र्याला गेलो होतो. चांदणी रात्र होती. संगमरवरी ताजमहाल चांदण्यात न्हात स्थिर उभा होता. सर्वत्र विलक्षण शांतता पसरली होती. झाडाचे पान देखील हलत नव्हते. आणि एकाएकी उत्स्फूर्तपणे ही गाऊ लागली. सारे वातावरण स्वरांनी भरून गेले. आम्ही सारेजण स्वरसागरात बुडून आमची तंद्रा लागली. ताजची देखभाल करण्यासाठी ठेव-

लेला सेवकगणही भोवती गोळा झाला. समोर मृत्यूचे विश्रांतिस्थान. आणि इकडे हिचे विलक्षण चैतन्यमय संगीत. विरोधाने ते दृश्य मनावर अधिकच ठसत होते. सारेजण तिच्या गाण्याच्या प्रभावाने मंत्रमुग्ध होऊन गेले होते. गाणे संपले आणि सेवकांपैकी एकजण पुढे येऊन अदबीने तिला म्हणाला, "बाईसाहेब, इथं गाणं म्हणायला सक्त मनाई आहे." पण त्याच्या त्या वाक्यात देखील हिच्या स्वरमाधुर्याचे कौतुकच ओतप्रोत भरून राहिले होते.

तिच्याबरोबर मुंबईला गेले तेव्हा आपल्या कुटुंबियांबद्दलचे तिचे प्रेम आणि स्नेह्यांबद्दलचा जिव्हाळा यांचे दर्शन घेण्याची मला संधी मिळाली. आपल्या कुटुंबाची तर ती प्रमुखच आहे. साऱ्या संसाराचा भार ती स्वतः वाहते आहे. घरच्या लोकांची आशा-निराशा, त्यांची सुखदुःखे–सारे हिने आपले मानले आहे. घरातल्या एखाद्या व्यक्तीच्या मुखावरून चिंतेची किंवा दुःखाची इवलीशी रेषा जरी उमटलेली दिसली तरी हिने आकाशपाताळ एक केलेच म्हणून समजावे. त्यांच्या अंगावर उमटलेला एक लहानसा ओरखडा पाहिला तर स्वतःवरच्या जबरदस्त घावाचाही हिला विसर पडतो.

गेल्या डिसेंबरातली गोष्ट. रेकॉर्डिंगच्या वेळी भूक लागल्यामुळे तिने सँडविचेस मागवली. काय होते त्या सँडविचेसमध्ये देव जाणे, पण साऱ्यांना सोडून त्यांनी आपली हिलाच अन्नविषबाधा केली. तिच्याबरोबर मीहि ती सँडविचेस खाल्ली होती. माझ्यावर त्यांचा इतका परिणाम झाला नाही. ती मात्र भयंकर आजारी झाली. तीन दिवस ती पुरी बेहोष होती. मग ती शुद्धीवर आली. मी तिला भेटायला गेले. मला पाहताच पहिला प्रश्न तिने विचारला तो हा, "कशी आहे तुझी प्रकृती कानन ?"

पुढे ती बरी झाली. आई, भाऊ, बहिणी, परिवार साऱ्यांचे प्राणच परत आले !


तिच्याइतकी कार्यमग्न, उद्योगात गढलेली व्यक्ती दुसरी दाखवणे कठिण जाईल. पण आपल्या या साऱ्या कामांतून देखील दुसऱ्याच्या आवडीनावडींवर तिचे बारीक लक्ष असते. तिला अनेक सुंदर सुंदर वस्तू जमवण्याचा षोक आहे. त्यांतल्या एखाद्या गोष्टीकडे आपण चुकून कौतुकाच्या नजरेने पाहिले किंवा प्रशंसेचे दोन शब्द उच्चारले की झालेच. दुसरे दिवशी ती वस्तू ती आपल्यासमोर आणून हजर करील. ती घ्यायचा आग्रह करील. आणि आपण संकोचाने नकार दिला तर प्रेमळपणाने धमकावून म्हणेल, "नाही ना घेत तू ? ठीक आहे. फेकून देते मी आता ती रस्त्यावर !" यामुळे होते काय, तिच्याजवळ असलेल्या एखाद्या वस्तूची निखळ रसिकपणे प्रशंसा करणेही अवघड होऊन बसते. कशाला सहज चांगले म्हणायचेही भय वाटते. कधी कधी मनात येते, हिला म्हणावे, "तूच मला फार आवडतेस बघ." पण माझी खात्री आहे की असे उद्‌गार मी काढले की आपल्या प्रेमळ दृष्टीतून स्नेहाचा वर्षाव करीत हसून ती म्हणेल, "मी आवडते ना तुला ? मग चल ना मलाच घेऊन आपल्याबरोबर !"

एकीकडे स्नेहासक्तीची ही पराकाष्ठा, तर दुसरीकडे या संसारी जीवनातही कटाक्षाने जोपासलेली एक विलक्षण निःस्पृहता, निर्लिप्तता, अनासक्ती. तिच्या या विरक्त वृत्तीचे प्रत्यंतर अनेक बारीकसारीक गोष्टींतून सारखे येत असते. मोठ्या मोठ्या प्रदर्शनांबद्दल भीती, शब्दबंबाळ अभिनंदनाबद्दल अनावड, स्तुतिपाठकांपासून स्वतःला दूर ठेवण्याचा कटाक्ष, आणि एकंदरच गर्दीबद्दल आणि गजबजाटाबद्दल अरुची. तिच्या या असल्या स्वभावामुळे कित्येकदा तिच्याबद्दलचे गैरसमजही फैलावत जातात. लोक तिला अहंकारी समजतात. तिच्यावर गर्विष्ठपणाचा आरोप करतात. नाना वदंता पसरतात. असले काही कानी पडले की मग मात्र एरव्ही शांत असणारी ही एकदम रागाने भडकून उठते. 'आशुतोषिनी' आहे ती 'आशुरोषिनी' बनते. तिला जवळून बघण्यापूर्वी मी देखील तिच्या संतापी स्वभावाच्या अशा काही गोष्टी ऐकलेल्या होत्या आणि त्यामुळे मनातून मी थोडीशी भिऊनच होते. वाटे, काय सांगावे, हिचा संताप कशाने भडकून उठेल ते ? पण जेव्हा मी तिच्या संगतीत काही काळ घालवला तेव्हा तिच्या वर्तनात असा काहीच विक्षिप्तपणा वा विसंगती मला आढळून

आली नाही. एक मात्र मला जाणवले, ती अत्यंत स्वाभिमानी आहे. मर्मी झालेली जखम सांभाळावी तसा ती आपला स्वाभिमान जपते. आणि त्यावर झालेला आघात मात्र ती कधीही सहन करीत नाही.

त्यामुळेच फिल्मी दुनियेतल्या अतिरथीमहारथींना, इथल्या महान दिग्गजांना तिच्यापुढे मूग गिळून बसावे लागते. जे तिच्या तोंडावर तोंडापुरती तिची स्तुती करतात, आणि तिची पाठ वळताच तिच्याबद्दल वाईटसाईट बोलतात, अशा तोंडपुज्या लोकांचा तिला संताप येत असल्यास त्यात न समजण्याजोगे, आश्चर्य वाटण्याजोगे काय आहे बरे ? अशा खोट्या लोकांची तिला विलक्षण घृणा आहे. आणि ती स्वतः निखळ प्रामाणिकपणे वागणारी असल्यामुळे आपला क्रोध स्नेहाच्या, अभिनयाच्या कृत्रिम आवरणाखाली लपवून ठेवणे तिला कधीच जमले नाही. जमणारही नाही. यामुळेच मुंबईसारख्या महानगरात इतकी वर्षे आयुष्य घालवूनही येथील कृत्रिम सभ्यतेचे भडक फसवे रंग तिच्या व्यक्तित्वावर अजूनही चढले नाहीत. यामुळेच इथल्या धंद्याच्या चिखलातून जीवनरस ग्रहण करतानाही तिने आपले व्यक्तित्व कमळासारखे अलिप्त, स्वच्छ आणि सत्त्वशील ठेवले आहे. फिल्मी जग हे अविश्वासाचे जग आहे. इथे जीवनाची मूल्ये प्रत्यही बदलतात. सामाजिकता, आत्मीयता, गार्हस्थ्य या सुंदर भावनांची येथे क्वचितच कदर केली जाते. इथले एकदा रस्ते फुटले, अलग झाले की कोणी कोणाचा नव्हे. हे असे निर्घृण विश्व आहे की खाली पडलेल्याला तुडवून त्याच्या अंगावरूनच मागल्याला पुढे जावे लागते. आणि त्यालाच इथे प्रगती, उन्नती असे म्हणतात. मनामध्ये घृणा, ईर्ष्या, द्वेष, यांचे विष खदखदत असताना इथे चेहऱ्यावर कृत्रिम हास्याचा खोटा मुखवटा चढवला जातो आणि फसवणूक हा इथला नित्याचा परवलीचा शब्द होऊन बसला आहे.

अशा या दुनियेत हिच्यासारखी निखळ पारदर्शी मनाची माणसे, आधुनिक सभ्यतेचे दडपण मनावर घेऊन जगण्याचा इन्कार करणारी माणसे किती असतील बरे ? म्हणूनच हिला वागता बोलताना पाहिले म्हणजे क्षणभर थांबून मनाला विसावा घ्यावासा वाटतो. आणि या दुनियेला गेलेले अविश्वासाचे, खोटेपणाचे, दंभाचे तडेही आज ना उद्या भरून निघतील अशी आशा मनात निर्माण होते.



हे मं त कु मा र

सफल जन्म हा

लता मंगेशकर हे आता एका व्यक्तीचे नाव राहिलेले नाही. चित्रपटसंगीताच्या इतिहासातील एका कालखंडाचेच ते नाव होऊन बसले आहे. सम्राज्ञीप्रमाणे राज्य भोगलेल्या सुरांचे ते नाव आहे. या वैभवाच्या मुळाशी यशासाठी करावी लागणारी कष्टमय साधना आहे. तसेच निर्भर आनंदाचे, सुखासमाधानाचे क्षणही आहेत.

पंधरा वर्षांपूर्वी हिंदी चित्रपटांच्या जगात माझे बस्तान बसवण्यासाठी मी जेव्हा धडपडत होतो तेव्हा 'फिल्मिस्तान' च्या एका ऐतिहासिक चित्रपटासाठी संगीत देण्याची संधी मला मिळाली. त्याच चित्रपटांत 'वंदे मातरम्' हे सुप्रसिद्ध गीत ध्वनिमुद्रित करावयाचे होते. माझी इच्छा लतानेच ते गीत गावे अशी होती. फिल्मिस्तानच्या व्यवस्थापकांनी मात्र त्यांच्या व लताच्या संबंधामध्ये निर्माण झालेल्या दुराव्याची आधीच मला स्पष्ट कल्पना दिली. ते काही तिला गाण्यासाठी बोलावू शकत नव्हते. मग मी स्वतःवरच सर्व जबाबदारी घेऊन तिला भेटलो. तिने ताबडतोब मला होकार दिला. ध्वनिमुद्रणाच्या वेळी तिची प्रकृती ठीक नव्हती. पण ती स्टूडिओत आली आणि मला म्हणाली, "तुमच्या-सारख्या खऱ्या कलावंताबरोबर काम करायचे नसते तर आजचे ध्वनिमुद्रण मी रद्द केले असते."

तिने ते गाणे म्हटले. त्यावेळी मला माझा जो गौरव झाल्यासारखा वाटत होता त्याचे शब्दांतून वर्णन करणे खरोखर कठीण आहे. मला मुखोद्गत असलेले 'वंदेमातरम्' हे गीत. पण त्या गीताच्या परिचित चरणांचाही मला त्या दिवशी जणू प्रथमच अर्थ कळत होता.

त्या चित्रपटाशी संबंधित असलेल्या एका 'ग्रुप' ने त्या गीताचे पस्तीस प्रदीर्घ 'टेक्स' घ्यायला लावले. त्यांच्या त्या कृतीमागे असलेले गैरसमज मला माहीत होते. त्यावेळी माझी मनःस्थिती मोठी विलक्षण झाली होती. क्षणाक्षणाला मी पराभूत होतो आहे असे मला वाटत होते. परंतु लता क्षणभरही डगमगली नाही. ती माझ्याशेजारी हसतमुखाने, समजूतदारपणाने आणि धीटपणाने उभी राहिली होती. न दमता गात होती.

दुसऱ्याचा प्रथम विचार करण्याचा हा तिचा स्वभाव या सर्व वर्षांतून मी सतत पाहत आलो आहे. चालू घडीचे चलनी नाणे असलेल्या एखाद्या लोकप्रिय संगीतदिग्दर्शकापेक्षा एखाद्या अस्सल

कलावंताची, नवनवीन उमेदी बाळगून असलेल्या एखाद्या होतकरू गीतकाराची लता प्रथम निवड करते त्याला आवर्जून संधी देते.

कलाकार म्हणून लता जशी अतुलनीय आहे तशी एक व्यक्ती म्हणूनही ती अजोडच आहे. केवळ हाडामांसाने युक्त असलेल्या माणसांच्या या जगात क्वचितच आढळणारे संवदेनाशील अंतः-करण आणि उत्कट चैतन्य तिच्या ठिकाणी आहे. एखाद्या चांगल्या बातमीने, गाण्यातल्या एखाद्या सुंदर सुरावटीने वीणेच्या तारेसारखी झंकारताना ती मला दिसली आहे. तशीच एखाद्या तात्त्विक प्रश्नासाठी पर्वतासारखी ताठ, अचल उभी राहिलेलीही मी तिला पाहिली आहे.

तिच्यासारखी कलावती शतकाशतकांतून एकदाच जन्माला येत असते.

मी रूक्ष, वैराण शतकात जन्मलो नाही याचा मला मोठा आनंद वाटत आहे



माधव शिंदे

आधार देणारे घर

लताबाईंबद्दल काही लिहिताना मला कल्पनेचा आधार घ्यायलाच नको आहे. माझे शब्द लताबाईंच्या संदर्भात असल्याने कितीही 'वेडेवाकुडे' लिहिले गेले तरीही ते तालबद्ध वाटतील.

माणसांचे ऋणानुबंध विधात्याने किती दिवस आधीच योजून ठेवलेले असतात कोणास ठाऊक! शाळेत असताना मला 'रणदुंदुभी' नाटकाच्या जाहिराती जमवायचे फार वेड लागले होते. कारण या नाटकात एक स्त्रीपार्टी नट, वाघाच्या डोक्यावर पाय ठेवून व एक हात तलवारीवर ठेवून उभा असे. त्याच्या मस्तकावर एक मोठा तुराही असे. गणपतीउत्सवात या कापलेल्या जाहिराती मी आरास करण्यासाठी वापरीत असे. एक दिवस आणखीच गंमत घडली. छत्रपती राजाराममहाराजांनी कोल्हापुरात ज्या काही मुलांना शिक्षण देण्याची सोय केलेली होती त्यापैकी मी एक होतो. आम्ही त्यावेळी जुन्या राजवाड्यातच राहात असू. एक दिवस शाळेतून परत आल्यावर आम्हाला सर्वांना वाड्यावर 'सरकारी नाटक' बघायला नेण्यात आले. नाटक निघाले 'रणदुंदुभी' ज्या जाहिरातींनी मला साक्षात वेड लावले होते ती 'पोझ' मी माझ्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहात होतो. मला आनंदाने क्षणभर काही सुचलेच नाही. मग कळले की ती स्त्रीभूमिका करणारे नट आहेत मास्टर दीनानाथ मंगेशकर.

कालांतराने मी चित्रपटसृष्टीच्या वेडाने चित्रपटविश्वात शिरलो. नवयुग चित्रपट संस्थेच्या फिल्मस् घेऊन मला वरचेवर मुंबईला जावे लागे. असाच एकदा जात होतो तेव्हा मा. दीनानाथरावांच्या मृत्यूची वार्ता आगगाडीतच कळली. त्यांचा माझा वैयक्तिक परिचय नव्हता परंतु माझ्या स्वप्नविश्वातील एक माझी फार आवडती व्यक्ती अंतर्धान पावली असे मला वाटले. मन खिन्न झाले.

नवयुगमध्ये 'तुझाच' चित्रपटानंतर 'मंगळागौर'ची तयारी चालू झाली होती आणि त्यामध्ये दीनानाथरावांच्या कन्येला नायिका म्हणून संधी दिली जाणार आहे असे बोलले जात होते. ह्या नव्या नायिकेला पाहावयास मी मनाने अधीर झालो होतो. मुहूर्ताच्या दिवशी मेक-अप रूममध्ये स्नेहप्रभा प्रधान दिसल्या आणि मी पुन्हा 'दीनानाथरावांची कन्या' शोधू लागलो. दोन दिवसांनी

श्रीपाद जोशींबरोबर लहानगी लता स्टुडिओत आली. मला वाटले होते नायिका चांगली मोठी असेल. त्या एवढ्याशा मूर्तीची आणि माझी ओळख मात्र झाली नाही. चित्रित झालेली फिल्म घेऊन मुंबईला मी जातच होतो. एक दिवस फिल्म डेव्हलप झाली आणि सर्वांच्या आधी पहिल्या प्रथम मी लताला पडद्यावर पाहिले. माझ्या आयुष्यातील तो एक भाग्याचा योग होता असे आज मला वाटते.

विनायकरावांनी 'नवयुग' सोडून 'प्रफुल्ल' कंपनी काढली तेव्हा मीही पुण्याहून कोल्हापूरला त्यांच्याकडे आलो. 'प्रफुल्ल'च्या प्रत्येक चित्रात लताबाईंना भूमिका आणि गाणी असायचीच. संस्थेच्या वाढदिवसादिवशी मोठा समारंभ व्हायचा. त्यात लताबाई आणि मीनाक्षी यांची गाणी, वसंत एरिक यांच्या नकला असा मोठा भरगच्च कार्यक्रम असे. कधीकधी लतालाही नकला करायची लहर यायची. लोकांचे मनोरंजन ती सहजपणे करायची. एकोणीसशे पंचेचाळीसच्या सुमारास विनायकरावांनी कोल्हापूरही सोडले आणि आम्हा सर्वांसह ते मुंबईला आले. प्रफुल्लचे सर्व 'युनिट' 'विष्णुबाग गिरगाव' इथे ठेवण्यात आले. मीही तेथे राहू लागलो.

मा. विनायक इंपिरियल सिनेमासमोर राहात असत. तिथेच लताचीही व्यवस्था केली होती. त्यावेळी लताला एक खांसाहेब गाणेही शिकवू लागले होते. ती. माई, मीना, आशा, लता, हृदयनाथ हे सर्व नानाचौकात राहत असत. त्यांच्याच घरातल्या एका खोलीत एडिटिंग रूम करण्यात आली होती. त्यामुळे मी नाना चौकात नेहमीच जाऊ लागलो. संध्याकाळी लताबाई आपल्या आई-भावंडांना भेटण्यासाठी त्या घरी यावयाच्या. परंतु इतक्या सर्व घडामोडी चालू असूनही आमचा परिचय मात्र वाढला नव्हता. आम्ही एकमेकांना फक्त ओळखत होतो. एके दिवशी ही सर्व भावंडे 'दिवाळी' नावाचा चित्रपट पाहायला निघाली—पण सगळीच इतकी लहान होती की त्यांच्याबरोबर सोबतीला कोणीतरी जावयास हवे होते. ती. माईंनी मला त्यांच्याबरोबर पाठवले आणि त्या दिवसापासून आमची ओळख वाढत गेली. काही काळातच मी त्यांच्या घरातीलच एक झालो. ती. माईंच्या मायेचे पांघरूण त्यांच्या पाच मुलांच्या बरोबरीने माझ्याही अंगावर घातले गेले. मी पुढे पत्नीसह मुंबईत स्थायिक व्हायचे ठरविले. पण राहायला जागा नव्हती तेव्हा ती. माईंनीच आपल्या घरातील एक खोली मला रिकामी करून दिली. आमचा जिव्हाळा दिवसेंदिवस दृढ झाला. आता सगळ्यांचे सगळे ठीक चालू झाले आहे असे वाटायला लागले. एवढ्यात ज्यांच्या जिवावर आम्ही मुंबईत आलो होतो त्या विनायकरावांचेच देहावसान झाले. सर्वांचीच स्थिती बिकट झाली. मी लताला विचारले "लता, आता तुमचे कसे होणार?" मला वाटत होते, मी पुरुषमाणूस. माझे कसेही निभावेल. या छोट्या मुलीचे कसे होईल? पण लताने नशीब उघडण्यासाठी आपल्या प्रयत्नांची शिकस्त सुरू केली. कोणीही सांगितले की अमुक तमुक दिग्दर्शकाला जाऊन भेट की लता तेथे गेलीच. कित्येक वेळा मीही तिच्याबरोबर जाई आणि तिच्याइतकीच निराशा पदरी घेऊन परत येई. ही सर्व पायपीट चालू असताना ती. माईंनी गोव्यातील त्यांच्या मालकीचा डोंगर कोणाला न सांगताच विकला. त्याच्यावर गुजराण चालू झाली. अखेर श्रीमंगेशावरील माईंची भक्ती एक दिवस फळाला आली. बॉंबे टॉकीजच्या 'मजबूर' चित्रपटासाठी गुलाम हैदर यांनी लताला प्लेबॅकसाठी बोलावले. लता ग्रँटरोडहून मालाडपर्यंत लोकलने जायची आणि त्यापुढे भर उन्हात चालत बॉंबे टॉकीजच्या स्टूडिओत जायची. केव्हा केव्हा मी तिला या प्रवासात सोबतही करीत असे. या कष्टांतूनच लताच्या आयुष्यात भाग्याचे दिवस उजाडले. 'आये गा आये गा'च्या सुराने आसमंत भारून गेले.

खरे म्हणजे खडतर दिवसांत अगर वैभवाच्या प्रारंभीही लता इतकी लहान होती की कसे बोलावे, कसे वागावे हे तिला कळणे अवघडच होते. पण मी पाहिले आहे की तिच्यावरील जबाबदारीची जाणीव जशी तिला झाली तशी सगळी समज तिला आपोआपच प्राप्त झाली—ती अगदी

उपजत शहाणपणाने योग्य ती पावले टाकीत चालली. 'मजबूर' नंतर लताचे यश दुमदुमले आणि अखिल भारतातील संगीत दिग्दर्शकांची येजा तिच्याकडे सुरू झाली. एकेकदा ज्यांनी 'बोळवण' केली होती तेही येऊ लागले. लता पूर्वीचे अनुभव मनात तळाशी ठेवून सर्वांकडेच गाइली, आणि 'हिलन' गाडीच्या रूपाने एक दिवस ते छोटेसे वैभव दाराशी उभे राहिले. त्या मोटारीची पूजा नारळ फोडून झाली त्यावेळच्या आम्हा सर्वांच्या आनंदाचे वर्णन करणेही अशक्य आहे. पुढील वृत्तांत, अगदी सिनेमाच्या शब्दात सांगायचा म्हणजे, 'हिलमन'कार मिक्स होऊन 'शेवरोलेट कार' आली आणि ती. माईंनी अगदी यथोचित असे 'शुभलक्ष्मी' हे नाव तिला ठेवले. यापुढील काळात लताच्या कामाचा वेग अगदी तुफान होता. यातून सवड होईल तेव्हा स्टेडियमजवळील 'पर्शियन डेरी'त एकत्र जमून आम्ही सर्वजण मनसोक्त मजा करीत असू.

लताची ही वाटचाल चालू असताना आम्ही 'उदयकला चित्र' या संस्थेची जुळणी करीत होतो. तिच्यातर्फे 'राम राम पाव्हणं' चित्र काढायचे ठरले. दिनकर पाटलांनी आणि मी मिळून कथानक तयार केले. कै. डी. ए. पाटील यांच्या साहाय्याने पैशांची जुळवाजुळव चालू होतीच. संगीत देण्याचे काम लताला द्यायचे हेही निश्चित करून तिला मोठ्या आत्मविश्वासाने विचारायला गेलो. त्यावर "एम्. आर. तुम्ही भागीदार आहात तेव्हा मी संगीत जरूर देईन" अशा विश्वासाचा निर्वाळा तिने उत्तरातून दिला. आमचे चित्रपटाच्या यशाच्या दृष्टीने पंचाहत्तर टक्के काम झाले. या काळात लता इतकी तिच्या उद्योगात बुडालेली होती की मोटारीतून जाता येताच तिने 'राम राम पाव्हणं'च्या गीतांना चाली लावल्या. या चित्राचे संगीत खूप गाजले. पण लताने आमच्याकडून मुळीच मोबदला घेतला नाही. कालांतराने 'उदय कला' बंद झाली. मी पुन्हा काय करावे ह्या विवंचनेत पडलो. एक दिवस लताबाईंना हे समजले तेव्हा त्या म्हणाल्या "एम्. आर. तुम्ही एखादी चित्रसंस्था का सुरू करीत नाही? मी भागीदार होईन तुमच्या संस्थेची." मग क्षणाचाही वेळ न दवडता लताबाई, दिनकरराव पाटील आणि मी अशा तिघांनी 'सुरेल' चित्र काढले. या संस्थेच्या पहिल्या 'वादळ' या चित्रपटाला 'मॅजेस्टिक'मध्ये पहिल्या शोला इतकी तुफान गर्दी झाली की पोलीस बोलावून रस्त्यावरील वाहतूक सुरू करून द्यावी लागली. कोणत्याही मराठी चित्रपटाला एवढ्या गर्दीला कधीं तोंड द्यावे लागले नसेल. या गर्दीचे कारण एकच होते. या चित्रपटाच्या निर्मात्या लता मंगेशकर होत्या!

'वादळ' नंतर त्याच जोषात आम्ही 'कांचनगंगा' काढले. त्या चित्राचे चांगले स्वागत झाले. पण नंतरचे 'भैरवी' हे हिंदी चित्र मात्र मुहूर्तातच थांबून राहिले. लताबाईंना कामाच्या व्यापातून 'सुरेल चित्र'कडे लक्ष देणेही जमेना. तेव्हा त्यांनी आपली भागीदारी काढून घेण्याचे ठरविले. पण त्या वेळीही सर्व व्यावहारिक बाजू मोकळी करून देऊन मोठ्या मनाने 'सुरेल चित्र' त्यांनी माझ्या नावावर करून दिले. निर्माता होण्याचे भाग्य केवळ त्यांच्यामुळेच मला मिळू शकले. आजपर्यंतच्या माझ्या चित्रपटांची गाणी सर्वच मंगेशकर भावंडांनी विनामूल्य गायलेली आहेत. पण त्यांचे औदार्य आणि प्रेम एवढ्यावरच थांबलेले नाही. 'गृहदेवता' या आमच्या चित्रपटाला राष्ट्रपती-पदक मिळून त्याचा सन्मान झाला आणि आशियाच्या फिल्म-फेस्टिवलसाठी त्या चित्राची निवड झाली. त्या निमित्ताने, निर्माता आणि दिग्दर्शक या नात्याने मला ताष्कंदला जाण्याची संधी चालून आली. परंतु धंद्यात आलेली आर्थिक खोट इतकी की जबरदस्त होती की मी ताष्कंदला जाऊ शकत नव्हतो. हे लताबाईंना कळताच "माणसाला अशी संधी क्वचितच लाभते तेव्हा जाण्याची तयारी करा" असा त्यांचा निरोप आला आणि पैशाची सोयही त्यांनी स्वतःच केली. अशा रीतीने केवळ त्यांच्यामुळेच मी परदेशची यात्रा करू शकलो.

ताष्कंदला पोहोचताच मी प्रथम लताला ट्रंक कॉल केला. मी बोलत होतो तेव्हा माझ्या शेजारी सुप्रसिद्ध गायिका नूरजहां बसलेली होती. मी फोन खाली ठेवताच तिने विचारले, "तुम्ही भारतीय


आहात?" मी "होय" म्हणताच तिने लताबद्दल विचारायला सुरुवात केली. आता तिच्याबरोबरच मी बोलतो असे तिला सांगताच "अहो, मला तिच्याबरोबर बोलायचे होते हो" असे म्हणून ती किती तरी वेळ हळहळली. त्या सर्व पर्यटनात जेव्हा जेव्हा वेळ मिळाला तेव्हा नूरजहां लताची गाणी आणि तिचा आवाज याखेरीज दुसऱ्या वेगळ्या विषयावर माझ्याशी बोललीच नाही.

लताबाईंना फोटोग्राफीचा फार नाद आहे. त्यांच्या या छंदात कॅमेरा घेण्यापासून सर्व गोष्टीत मी त्यांना मदत केली आहे. त्यांनी घेतलेले फोटो कलादृष्ट्या इतके चांगल्या दर्जाचे आहेत की एकदा ते पाहिलेली व्यक्ती ते विसरू शकणार नाही.

सिनेमात काम करण्याच्या वेडाने लांबलांबून अनेक तरुणी मुंबईत येतात. त्यांना काम तर मिळत नाहीच पण जवळचे पैसे मात्र संपून जातात. मग आधाराला त्या लताबाईंकडे जातात. लताबाईंनी असे किती लोकांना उपकृत केले आहे ते त्यांचे त्यांनाच ठाऊक! गर्व ही गोष्ट त्यांना माहीतच नाही. रिकामा वेळ अगदी सहज प्रेमाने त्या आपल्या भावंडांत इतक्या चांगल्या रीतीने घालवतात की त्यांच्या परस्परांवरील प्रेमाने माझे मन भरून येते. रेकॉर्डिंगला जाण्यापूर्वीची त्यांची सकाळची देवपूजा आणि ती. माईंना नमस्कार करणे अद्यापही कधी चुकले नाही.

लताबाईंच्या व त्यांच्या भावंडांच्या सहवासात मी जे दिवस घालवले आहेत ते केवळ अमोल असे आहेत. त्यांचा सर्वांचा विश्वास होता आणि त्यांचे प्रेम होते म्हणूनच माझे जीवन उभे राहू शकले आहे. अशा कित्येक गोष्टी आहेत की ज्या केवळ त्यांच्यामुळेच मला लाभल्या आहेत. आत्मविश्वास म्हणजे काय असतो हे लताबाईंपासूनच शिकावे असे त्यांचे जीवन आहे.

अशा मंगेशकर कुटुंबातील मी एक आहे या भावनेने लोक माझ्याकडे पाहतात यामध्ये केवढे अलौकिक भाग्य सामावलेले आहे!



माधव शिंदे

कल्याणजी

लता मंगेशकर-एक अद्‌भुतकथा

तो निर्माता अतिशय अस्वस्थ झाला होता. कारण त्या दिवशी लता मंगेशकर त्याचे एक गाणे ध्वनिमुद्रित करणार होत्या. पण त्यांची प्रकृति बरी नसल्यामुळे त्या गाण्याचे ध्वनिमुद्रण तात्पुरते लांबणीवर पडले होते.

पण निर्मातेमहाशय मोठे वस्ताद होते. आणि पैशाची त्यांना मुळीच फिकीर नव्हती. ते मला म्हणाले,

"लताबाईना काय हवे तेवढे पैसे द्या ना! पण कसेही करुन आज त्यांच्याकडूनच हे माझे गाणे रेकॉर्ड करून घ्या."

मी माझे हसू प्रयत्नपूर्वक आवरले. लताजींची प्रकृती बरी असल्याखेरीज आणि त्यांना मनापासून गाणे गावेसे वाटल्याखेरीज त्या कधीच गाणार नाहीत, जगातल्या केवढ्याही मोठ्या रकमेचे प्रलोभन त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध गाणे गावयास लावू शकणार नाही हे सारे मी त्या निर्मात्याला समजावून सांगितले. आणि शेवटी मी त्याला म्हणालो,

"आता एकच पर्याय आहे. तो म्हणजे तुम्ही दुसरी कोणती तरी पार्श्वगायिका घेऊन तुमच्या गाण्याचे आज ध्वनिमुद्रण करून टाका."

माझ्या स्वरातला निश्चयीपणा त्या निर्मात्याला जाणवला असावा. कारण क्षणभर तो स्तब्ध राहिला. पण मग माझे बंधू आनंदजी यांच्याकडे वळून तो काकुळतीला येऊन म्हणाला,

"छे छे! दुसरी कोणतीही पार्श्वगायिका मला चालणारच नाही. मी म्हणतो, असेना का लताबाईंचा घसा सर्दीमुळे थोडासा बिघडलेला? मला चालेल तो. पण माझे गाणे त्यांनीच म्हटले पाहिजे. माझे रेकॉर्डिंग आज झालेच पाहिजे."

माझ्या आठवणींतला हा एक प्रसंग. लता मंगेशकर यांच्या कलेला आणि त्यांच्या वेळाला आज किती अफाट मागणी आहे याची या एका प्रसंगावरून साक्ष पटेल. लताजींचा एक संगीत दिग्दर्शक आणि त्यांचा एक स्नेही या नात्याने मी असे निश्चित सांगू शकतो की चित्रपटांची जेवढी जास्तीत जास्त गाणी ध्वनिमुद्रित करता येतील तेवढी करण्यासाठी त्या आपल्याकडून प्रयत्नांची

पराकाष्ठा करीत असतात. पण त्या बरोबर मला हेही ठाऊक आहे की निव्वळ पैशासाठी त्या कधीही, कोणासाठीही गाणार नाहीत. कारण त्यांचे प्रेम पैशावर नाही. गाण्यावर आहे. जेव्हा त्या एखादे गाणे गातात तेव्हा त्या गाण्यात आपले कलासर्वस्व ओतावे ही त्यांची मनापासून इच्छा असते. आणि म्हणूनच लताजींनी माझे गाणे आज गायलेच पाहिजे असे कोणी म्हटलेलेही त्यांना आवडत नाही, की अशी कुणाची सक्ती त्या मानणारही नाहीत.

पण याचा अर्थ लताजी अहंकारी आहेत काय ? त्याच्या मुद्रेवरील गंभीरपणाच्या आवरणाखालून कधी कधी इतरांना जो गर्विष्ठपणाचा आभास होतो तो खरा आहे काय ?

निदान मी तरी असे कधीच म्हणणार नाही. कारण मला माहीत असलेल्या लताजी वेगळ्या आहेत. त्या नम्र आहेत आणि भावनोत्कट आहेत.

एकदा त्यांनी माझ्याजवळ म्हटले होते,

"ते फार थोर गायक होते. त्यांच्या मालकीची असलेली एक अंगठी योगायोगाने मला मिळाली आहे. ती माझ्याजवळ असल्याखेरीज मी कधीही नव्या गाण्याचे रेकॉर्डिंग करीत नाही."

हे उद्‌गार त्यांनी कोणाबद्दल काढले होते बरे ? त्या बोलत होत्या स्वर्गवासी के. एल. सैगलबद्दल. लताजींसारख्या स्वरसम्राज्ञीने त्या दिवंगत कलासम्राटाबद्दल व्यक्त केलेली ही भावना लताजींचा सैगलबद्दलचा आदर जसा व्यक्त करते तसाच त्यांचा विनयशील स्वभाव ती व्यक्त करीत नाही काय ?

लताजींचा आवाज म्हणजे परिपूर्णतेने धारण केलेले साकार स्वरूप आहे. या लोकविलक्षण आवाजाने लता मंगेशकर ही एक चालती बोलती दंतकथा बनवली आहे. आमच्या काळांत ही दंतकथा प्रत्यक्ष वावरत आहे हे आपले केवढे भाग्य ! या आवाजाने लताजींच्या भोवती एक वेगळी दुनिया निर्माण केली आहे. या विश्वात किती विविध प्रकारचे लोक आहेत. त्यांत संगीत-दिग्दर्शक आहेत. गायकवादक आहेत. राजकरणी लोक आहेत. कामगार आहेत. संसारी गृहिणी आहेत. आणि आजच्या तरुण मुलामुलींची तर एक सबंध पिढीच्या पिढी आहे. या स्वराने लताजींना अनेक थोर संगीतदिग्दर्शकांची एकमेव लाडकी गायिका बनवले आहे. आणि त्यानेच भारतीय चित्रपटसृष्टीतल्या पार्श्वगायनाच्या क्षेत्रात गेली पंचवीस वर्षे त्यांचे सर्वश्रेष्ठ सम्राज्ञीचे पद सातत्याने टिकवून धरले आहे.

लताजींच्या विलक्षण सुरेल आवाजाइतकेच त्यांचे दुसरे मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची अष्टपैलू प्रतिभा. ही प्रतिभा सर्वगामी आहे. आणि या एका गुणामुळे करमणुकीच्या जगात लताजींना एक अगदी वेगळे, स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे. त्या आतापर्यंत सहस्रावधी गाणी गाइल्या असतील. आणि तरीही त्यांच्या गाण्याची एकच एक अशी ठराविक पद्धती म्हणून सांगता येणार नाही. तो ठोकळेबाज साचेबंदपणा त्यांच्या कलेला कधीही आला नाही. शेकडो संगीतदिग्दर्शकांनी आतापर्यंत लताजींसाठी चाली बांधल्या. पण ती ती चाल लताजी अशा काही जिवंतपणाने गाऊन जातात की ते गाणे त्यांच्या तोंडून ऐकल्यावरच जणू संगीत दिग्दर्शकालाही आपण काय केले ते नव्याने उमगते. आपणच बांधलेल्या चालीच्या सौंदर्याचा त्याला सुखद साक्षात्कार घडतो.

लताजींचा श्रोतृवर्ग अफाट आहे. आणि त्या सर्वांना त्या पहिल्या दर्जाची पार्श्वगायिका म्हणूनच सतत ज्ञात आहेत. त्यांनी गाइलेल्या असंख्य गाण्यांतली कितीतरी गाणी लोकप्रियतेचा उच्चांक गाठून गेली आहेत. भारतातल्या बहुतेक सर्व प्रमुख भाषांतून लताजींनी गाणी गाइली आहेत. आणि त्या साऱ्या गाण्यांना त्यांच्या कलेच्या लोकविलक्षण जादूचा चैतन्यमय स्पर्श झालेला आहे. कोणत्याही संगीतदिग्दर्शकाने चाल दिलेले कोणतेही गाणे वाद्यमेळाच्या साथीने लताजी जेव्हा गातात तेव्हा त्या केवळ आपला गोड स्वर वापरीत असतात असे नव्हे. अर्थाचे सूक्ष्म बारकावे जाणणारे आपले भाषाज्ञान, आपले संवेदनाशील कविमन आणि आपला अभिनयाचा अचूक समज हेही सारे त्या

गाण्यात त्या पुरेपूर ओततात. त्यामुळे त्यांनी गाइलेले कोणतेही गाणे आपली सारी भावसंपन्नता, सर्व अर्थवैभव परिपूर्णतेने प्रकट करीत असते.

चित्रपटसंगीत हे कोणत्याही अर्थाने सोपे किंवा एकजातीय नाही. भावनांचे आणि गेयतेचे विविध आकार घेऊन ते प्रकट होते . चित्रपटांतल्या गीतांची बहुविधता मन थक्क करून सोडणारी आहे. हे चित्रपटसंगीत कथा, लोककथा, दंतकथा आणि विनोदी कथा निवेदन करते. कधी ते उपदेश करते. कधी अंगाईगीत गाऊन डोळ्यावर गोड पेंग आणते. कधी युद्धासाठी आवाहन देते. कधी प्रेमिकाच्या मीलनाचा निर्भर आनंद व्यक्त करते तर कधी प्रेमभंगाच्या पिळवटलेल्या यातनांना सशब्द करते. जन्मसोहळा, बारशाचा समारंभ, विवाहाचा उत्सवी भाव या साऱ्यांची द्वाही ते फिरवते. व्यथितांना, रुग्णांना आणि वृद्ध जीवांना ते दिलासा देते. आणि हे जग कायमचे सोडून गेलेल्यांसाठी ते आक्रंदन करते !

असे हे चित्रपटसंगीत. अनेकसुरी, अनेकपदरी, अनेक भावनांचे सूक्ष्मातिसूक्ष्म पैलू दाखविणारे. या बहुविधतेत चित्रपटसंगीताचे मोठेपण साठवलेले आहे आणि यातच लता मंगेशकर या गायिकेचीही थोरवी सामावलेली आहे, कारण चित्रपटसंगीताची विविध भावपूर्णता जर कोणी पुरेपूर आमच्या प्रत्ययाला आणून दिली असेल तर ती याच एका पार्श्वगायिकेने. लताजी जे गाणे गातात त्यातला विशिष्ट भाव त्या परिपूर्णतेने साकार करतात. ते गाणे जर कष्टाचे गीत असेल तर लताजी ते त्याच खिन्न अवजड संथपणाने गातात. ते गाणे तर विरोधाचा, प्रतिकाराचा सूर उठवणारे असेल तर लताजींच्या गाण्यातून कडव्या प्रतिकाराचा ध्वज जणू फडफडताना जाणवतो. जर ते गाणे निर्भर आनंदाचे असेल तर लताजींच्या गाण्यातून मिष्किल अवखळ हसू निनादत आहे असे वाटू लागते. आणि ते गाणे जर शोकगीत असेल तर लताजी मूर्तिमंत शोकभावना बनतात आणि ते गाणे हुंदक्यांनी दाटून येते. त्यांतून अश्रू ठिबकू लागतात. लताजींच्या गाण्याची जर व्याख्या करायची असेल तर ती याच शब्दांत करता येईल. कोणतेही गाणे लताजी नुसत्या गात नाहीत. त्या त्या वेळेपुरत्या त्या स्वतःच मूर्तिमंत ते गीत बनतात.

चित्रपटसंगीताच्या क्षेत्रात लताजी एक फार मोठे ध्येय समोर ठेवून कार्य करीत आहेत असे मला नेहमीच वाटते. ते ध्येय जनसामान्यांना संगीताभिमुख करण्याचे आहे. आणि गेली अनेक वर्षे याच ध्येयाची लताजी साधना करीत आल्या आहेत. ज्यांनी 'संगीत' या गोष्टीचा कधी जन्मातही विचार केला नसेल असे सहस्रावधी लोक, ज्यांच्या हृदयाला संगीत कधी स्पर्श करीत नाही असे असंख्य रूक्ष, बधिर संवेदनांचे लोक, आणि चित्रपटसंगीतामुळे ज्यांना गेल्या कित्येक वर्षांत संगीताची गोडी हळूहळू पण चांगलीच लागत चालली आहे असे बहुसंख्य लोक—यांतल्या कित्येकांची संगीताशी प्रथम ओळख करून द्यायची आहे. ज्यांचा संगीताबरोबर परिचय झाला आहे त्यांच्या त्या परिचयाचे दृढ स्नेहभावात रूपांतर करायचे आहे आणि जे संगीताचे रसिक जाणकार आहेत त्यांना त्यांत तज्ज्ञ बनवायचे आहे. हे कार्य या देशात जे गायक आज करीत आहेत त्यांत लताजींना अग्रक्रम दिला पाहिजे. कारण त्यांच्याइतके सातत्याने, निरलसपणे आणि सराईतपणे हे कर्तव्य बजावणारी दुसरी कोणतीही कलाकार व्यक्ती आज मला खरोखरी दिसतच नाही.

लताजींना ईश्वराने दीर्घायुष्य द्यावे अशी जी आम्ही प्रार्थना करतो ती यासाठीच. लता मंगेशकर नावाची ही अद्‌भुत सुंदर दंतकथा यापुढेही कित्येक वर्षे अशीच निरामयपणे टिकून राहो आणि लक्षावधी जनतेपर्यंत संगीताची मोहिनी पोहोचविण्याचे तिचे कार्य वर्षानुवर्षे अबाधितपणे चालत राहो.

म द न मो ह न

उंच आभाळ

लताजींना मी प्रथम पाहिले ते 'महल' मधील त्यांच्या खूप गाजलेल्या 'आयेगा आनेवाला' या गाण्याच्या तालमीच्या वेळी. मी तेव्हा चित्रपटाच्या व्यवसायात अगदीच नवीन होतो. त्या सुरावटीने भारावून मी मनात ठरवून टाकले, "आपण जेव्हा पहिला चित्रपट काढू तेव्हा पार्श्वगायिका म्हणून लताजींना गाणी म्हणायला बोलवायचे." आणि त्याप्रमाणे 'आंखे' या माझ्या संगीत दिग्दर्शनाखाली निघणाऱ्या पहिल्या चित्रपटासाठी मी त्यांनाच निमंत्रण केले. पण त्यावेळी माझ्यासंबंधी लताजींना स्वतःला काहीच माहिती नव्हती. आणि दुसऱ्या कोणीतरी माझ्यासंबंधी त्यांचा काही गैरसमजही करून दिला होता. लताजींनी माझ्याकडे गाणी म्हणायला नकार दिला.

मला अत्यंत वाईट वाटले. पण थांबता तर येणे शक्यच नव्हते. इतर पार्श्वगायिकांच्या साह्याने मी गाणी ध्वनिमुद्रित करून टाकली. सुदैवाने माझ्या त्या चित्रपटाचे संगीत चांगलेच लोकप्रिय झाले. नंतर मी माझ्या 'मदहोश' या दुसऱ्या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शन जेव्हा हाती घेतले तेव्हाही चिकाटीने मी पुन्हा लताजींनाच बोलावले. या खेपेला त्यांनी तात्काळ होकार दिला. वेळेवर त्या ध्वनिमुद्रणासाठी उपस्थितही झाल्या. रेकॉर्डिंगच्या वेळी त्यांनी मोकळेपणाने मला सांगून टाकले, "तुमच्याविषयी इतरांनी माझा गैरसमज करून दिल्यामुळे पहिल्या वेळेला मी तुमच्याकडे गाणी म्हणायला नकार दिला, मला आता त्याबद्दल खेद वाटतो. तुमच्याविषयी माझे मन कलुषित करून देणारांवर मी विश्वास ठेवायला नको होता!"

लताजींच्या त्या उमद्या, दिलखुलास बोलण्याने मी चकित झालो. तसाच त्यांचा दिलदारपणा पाहून आनंदलोही. उभयतांच्या मनांतले किल्मिष नाहीसे झाले. माझ्या गाण्यांचे रेकॉर्डिंगही उत्तम झाले. त्यानंतर आजपर्यंत माझ्या पन्नासांहून अधिक चित्रपटांतली दोन अडीचशेंहून अधिक गाणी त्यांनी गाइली आहेत. या निमित्ताने गेल्या सतरा वर्षांचा आमचा दृढ परिचय घडून आला आहे. इतकेच नव्हे तर उभयतांमध्ये जिव्हाळ्याचे नातेही जडले आहे. मी त्यांचा 'मदनभय्या' आहे.

माझी ही बहीण लौकिकात किती मोठी आहे याची मला यथार्थ कल्पना आहे. तिच्या सहकार्यावरच आजचे माझे यश आधारलेले आहे. त्याबद्दल मी विलक्षण कृतज्ञ आहे. आणि तरीही तिचा मला सर्वांत जो मोठा गुण वाटतो, जाणवतो तो म्हणजे तिच्या मनाचा अस्सल निर्मळपणा. या तिच्या गुणाला कशाचीही तोड नाही, असेच मला सतत वाटत आले आहे. त्यामुळे तिचा मोठेपणा विसरून मी तिच्याशी बरोबरीने वागण्याचे साहस करू शकतो. माझ्याकडे घरी कोणी छोटे बडे पाहुणे आले आणि लता दिदीला मी त्यांच्याशी गप्पाटप्पा करायला ऐन वेळी बोलावले तर— वेळ असल्यास— ती अगदी झटपट येईल. गप्पा मारील. गाणी म्हणेल. नकला करून साऱ्यांना हसवील. यांत स्वतःच्या मोठेपणाचे भान तिला आहे असे कुठेही कोणाला जाणवणार नाही. अशा वेळी जमलेली सारी माणसे खूप प्रसन्न होतात आणि "एवढी मोठी पण किती साधी" असे या माझ्या बहिणीला धन्यवाद देत घरी जातात!

खरे म्हणजे माझी लता दिदी खूप भावनाप्रधान आहे, त्यामुळे तिची सुखदुःखेही उत्कट असतात. पण ती तशी खोल आणि अंतर्मुखही आहे. म्हणूनच सहसा, केवळ परिचयातील व्यक्तीला तिच्या मनातील भावनांची आंदोलने फारशी कळणारच नाहीत. एखाद्या दिवशी उदास, थकलेल्या मनःस्थितीतही ती माझ्या घरी येते. अनेक कौटुंबिक सुखदुःखांबद्दल आम्ही बोलतो. तिचे मन तात्पुरते तरी निवते. इतक्या वर्षांच्या जिव्हाळ्याच्या परिचयानंतर आता मी खात्रीने सांगू शकतो की एक व्यक्ती म्हणूनही तिचे व्यक्तिमत्व आता खूप विकसित झालेले आहे. वडलांचा थोर वारसा, लहान वयात अंगावर पडलेल्या जबाबदाऱ्या, काढलेल्या हालअपेष्टा, स्वतःचे असामान्य कर्तृत्व आणि ते घडवीत असताना वाट्याला आलेले बरे-वाईट अनुभव, या सर्व गोष्टींनी तिची जीवनदृष्टी आता अधिक परिपक्व झालेली आहे. मूळचा समजूतदारपणा आता अधिकच वाढलेला आहे. पूर्वीच्या तुलनेने आता ती खूप शांत आणि थोडीशी झटकन अलिप्त होणारी झालेली आहे—आणि या साऱ्या गोष्टींचा तिच्या गाण्यावर फार चांगला परिणाम झाला आहे. मी 'महल'मधे तिचे गाणे ऐकले तेव्हापासून आतापर्यंत तिच्या गाण्यातही विलक्षण प्रगती झालेली आहे. मी असे मानतो की एखाद्या कलावंताची जीवन समजून घेण्याची दृष्टी जसजशी विकसित होत जाते, तसतशी त्याची कलाही बदलत जाते. लता दिदी ही थोर कलावंत आहे. ती नुसती गायिका (singer) नाही. गाणे हा तिच्या जीवनविषयक अनुभवांचा आणि दृष्टिकोणाचाच आविष्कार आहे. तिला दैवजात लाभलेले हे तिचे अभिव्यक्तीचे साधन तिने अशा उंच शिखरावर नेऊन ठेवलेले आहे की आज सर्व चित्रपटसृष्टीत तिची बरोबरी करणारी दुसरी पार्श्वगायिका नाही आणि पुढेही कित्येक वर्षांत निर्माण होणे कठीण आहे. तिचे सारे कर्तृत्व असामान्य, अद्‌भुत वाटावे असेच आहे. खरोखर, ती आपल्या क्षेत्रातील अनभिषिक्त सम्राज्ञीच आहे.

आमच्या चित्रपटाच्या व्यवसायात स्पर्धा, मत्सर इत्यादी गोष्टी खूप मोठ्या प्रमाणात असतात, पण तरीही लता दिदीचे मोठेपण प्रत्येकजण मनोमन ओळखून आहे. कलेच्या क्षेत्रांत उंच आभाळा-सारखी ती साऱ्यांच्या वरच राहिली आहे. तिची आकलनशक्ती जबरदस्त आहे. मी तिला तालमीपूर्वी जे काही सांगेन ते ती मनापासून एकदा ऐकेल आणि त्याहीपेक्षा सुंदर रीतीने अनपेक्षित आनंद देत ते ती आपल्या आवाजातून व्यक्त करील. कोणतीही भाषा आणि विशेषतः त्यातील शब्दोच्चार ती अगदी आपलीच मातृभाषा असावी अशा पद्धतीने उच्चारते. मूळचीच भावनाप्रधान असल्याने ती ते सर्व गाणे, त्या त्या मनोवृत्तीचा सुरेल आविष्कार बनवते. हे सारे तिला सहजच जमते आहे, काही प्रयत्नच करावा लागत नाही असे वाटावे इतक्या सहज चालते. तिच्या आजूबाजूचे वादकगायक यांच्याशी तिच्या बरोबरीने गप्पा चालतात. त्यांच्या गुणांचे ती मुक्तपणे कौतुक करते. त्यामुळे तिच्यासंबंधी इतर अस्सल कलावंतही आदर बाळगून असतात. माझी

खात्री आहे की ती जर अभिजात संगीताच्या क्षेत्रात शिरली तर तेथेही स्वतःचा असा खास, ठसा उमटविल्याखेरीज ती राहणार नाही.

लतादिदीने आजपर्यंत वेगवेगळ्या, 'मूड'ची शेकडो गाणी गाइली आहेत. 'शहीद'मध्ये एका छोट्या मुलाला तिने पार्श्वसंगीत दिले होते. इतका बालिश, कोवळा, गोड स्वर तिने काढला आहे की तिच्या आवाजाचा हा लवचिकपणा चकित करतो. मला स्वतःला मात्र तिची आर्त गीतेच अधिक आवडतात. 'चैन नही आये', 'ओ भूली दास्तां,' 'नयना बरसे रिमझिम', 'मेरा साया' अशी तिची कितीतरी गाणी मला आवडलेली आहेत. गेल्या सतरा वर्षांतील अशी गाणी कोणती आणि किती सांगू? तिच्या व्यक्तित्वातील एकाकीपणाचा आणि ह्या गाण्यातील आर्ततेचा फार निकटचा संबंध आहे. लतादिदीला अभिनयाची फार चांगली समज असल्याने तिच्या गीतांतील नाट्य अगदी संयमित रीतीने आणि अतिशय सूक्ष्मपणाने प्रकट होत असते. एकेक भाववृत्ती तिच्यातल्या स्वाभाविक नाट्यासह पूर्णतया आविष्कृत होते. म्हणून तर तिचे गाणे मनाची तात्काळ पकड घेते.

लतादिदी लोकांच्या लकबी झटकन् टिपते आणि अगदी सहज बोलता बोलता त्यांच्या नकला करीत असते. विनोदाचा तिचा स्वतःचा असा एक स्वतंत्र प्रकार आहे. ती कृत्रिम कोट्या कधी करणार नाही. परवाच एका रेकॉर्डिंगच्या वेळी कावळ्याला उद्देशून 'चल कान न खा' अशी ओळ म्हणायची होती. रेकॉर्डिंग बराच वेळ चालले होते. शेवटी माइकच्या पलीकडून लतादिदी म्हणाली "भय्या, अब तुम मुझे बतायेंगे, चल कान न खा!"



ओमप्रकाश कहोल

न पाहिलेली बहीण

'रेडिओ सिलोन' आणि 'आकाशवाणी' यांची गोष्टच सोडा, पण पाकिस्तान, काबूल, आझाद कश्मीर, इराण, बगदाद, ताष्कंद किंवा व्हॉईस ऑफ अमेरिका यांपैकी कोणतेही स्टेशन लावा, लताचा स्वर तुमच्या कानावर येईल. भाषा कळणारे आणि न कळणारे तिचे देशधर्मातीत असलेले असंख्य चाहते साऱ्या जगभर पसरलेले आहेत. खऱ्या अर्थाने ती 'विश्वमानव' आहे.

आजच्या जगातला 'लता' हा एक अद्‌भुत चमत्कारच आहे. या शतकात तीन जगज्जेते झाले आहेत असे मी मानतो. एक हिटलर, दुसरा आईन्स्टाईन आणि तिसरी लता मंगेशकर!

मी लताला अद्याप भेटलो नाही. तिला पाहिलेलेही नाही. पण माझी तिच्यासंबंधीची ही गौरवाची भावना माझ्या एका आदरणीय मित्राकडून मी तिला कळवली. नेहमीच वाट्याला येणाऱ्या स्तुतीपेक्षा माझी भावना काही वेगळी आहे हे ओळखून तिने सर्व संभाषण ऐकले. मी तिचा करीत असलेला गौरव तिला अतिशयोक्त वाटला आणि ती म्हणाली, माझ्याबद्दल सर्वांत अतिशयोक्तीने बोलण्याचा मान एका पाकिस्तानी मुत्सद्याने ह्यापूर्वीच मिळवलेला असल्याने या गृहस्थांच्या उद्‌गारांना मी दुसरा क्रमांक देईन!" तो पाकिस्तानी मुत्सद्दी म्हणे असे म्हणाला होता, "मला जर माझ्या मताप्रमाणे कृती करण्याची मुभा मिळाली तर कश्मीरच्या सर्वच खोऱ्यावरचा भारताचा हक्क मी एकाच गोष्टीच्या बदल्यात मान्य करीन. लता पाकिस्तानला दिली गेली तर! आणि हा व्यवहार पाकिस्तानच्या दृष्टीने अतिशय फायद्याचाच झाला असे मला वाटेल"

एक कलावंत म्हणून मी लताचे आजपर्यंत गुणगान करीत होतो. पण आता मला कळले आहे की ती त्याहूनही अधिक काही आहे. लता खरी धर्मशील आणि खऱ्या अर्थाने हिंदू आहे हे अनेकांना माहीत नसेल. मी माझे आयुष्य हिंदूंच्या संघटनांची वाढ व्हावी या हेतूने वेचतो आहे. आणि इतका या क्षेत्रातील असूनही मला जे सुचले नव्हते असे कितीतरी हिंदुधर्मविषयक उत्तम विचार लताने मला कळवलेले आहेत. मला हे सांगताना फार अभिमान वाटतो. तिची पत्रे हा माझ्याजवळील एक अमोल ठेवा आहे आणि योग्य वेळी ती जेव्हा प्रकाशित केली जातील तेव्हा

ही कमलदलस्थित लक्ष्मी भोवतालच्या कोणत्या कर्दमात आपले शुचित्व टिकवून महान गौरव मिळवीत गेली आहे हे सर्वांना कळेल. हिंदुत्वाच्या अभिमानाचे लता म्हणजे एक मूर्त चित्र आहे.

माझ्या कुटुंबातील मंडळी लताची अतिशय भक्ती करतात. आमच्या अनेक घरगुती संभाषणात लता हा एक विषय असतो. स्वाक्षरी करून दिलेले तिचे एक छायाचित्र आमच्या रेडिओवर आहे. कामाच्या निमित्ताने खूप मंडळी घरी येतात तेव्हा लताचा विषय निघतो आणि समकालीन कलावंतांमधील तिचे मोठेपण सर्वजण निर्विवाद मान्य करतात.

रक्षाबंधनाचा पवित्र दिवस येतो तेव्हा 'भय्या मेरे राखीके बंधनको निभाना' या शब्दानी सर्व वातावरण दुमदुमले आहे असे मला भासते. आम्ही दरवाजाकडे नजर लावून लताकडून येणाऱ्या राखीची वाट पाहात असतो.

लता ती पाठवायला कधीच विसरत नाही. आजपर्यंत लताने पाठविलेल्या सर्व राख्या मी एका लॉकेटमध्ये ठेवलेल्या आहेत. तिने माझ्यावर जो जिव्हाळयाचा वर्षाव केला आहे त्याला मी निरंतर पात्र ठरावे एवढीच माझी ईश्वरापाशी प्रार्थना असते.

आम्ही लतावर खरोखरच प्रेम करतो.

मन्ना डे

लता-दी

एकोणीसशे चाळीसएकेचाळीस सालची गोष्ट. सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक अनिल बिश्वास यांच्या एका चित्रपटात मी एक गाणे गाणार होतो. त्या गाण्याच्या तालमीसाठी मालाड येथील बॉंबे टॉकीजच्या स्टूडिओमध्ये त्यांनी मला बोलावून घेतले होते. मी ज्यावेळी स्टूडिओत जाऊन पोहोचलो तेव्हा गाण्याच्या तालमींना प्रारंभ झाला होता. मला पाहताच अनिलदांनी मला आपल्या शेजारी बसवून घेतले आणि एका नव्या गायिकेचे गाणे ऐकण्यास त्यांनी मला सुचविले. मी पाहिले तो एक छोटीशी, अत्यंत साध्या आणि अकृत्रिम व्यक्तिमत्त्वाची एक गायिका गाणे गात होती. आतापर्यंत ज्या प्रकारची गाणी मी ऐकत आलो होतो त्यापेक्षा तिचे गाणे इतके वेगळे, स्वतंत्र होते की विस्मयाचा सुखद धक्का बसल्यासारखे मला वाटले आणि मी भान विसरून ऐकत राहिलो. त्या गायिकेच्या गाण्याची तालीम आटोपल्यावर अनिलदांनी प्रश्नार्थक मुद्रेने मजकडे पाहिले. त्यावर मी म्हणालो,

"छे ! हा नवा आवाज अगदी विलक्षण आहे !"

"विलक्षण ?" अनिलदा विलक्षण आवेशाने म्हणाले, "अहो या शब्दानं काय वर्णन व्हायचं आहे या मुलीचं ? अद्‌भुत, अद्‌भुत आहे ती !"

खरोखरीच ती छोटी मुलगी अद्‌भुत होती. त्या दुपारी लतादीचे गाणे मी प्रथम ऐकले, तेव्हा-पासून तो अगदी या क्षणापर्यंत तिच्या गाण्याचा मी एक अनन्य भक्त होऊन बसलो आहे. जाता जाता, हेही एक सांगितले पाहिजे की मी वयाने जरी तिच्याहून मोठा असलो तरी मी तिला लतादी या सन्मानदर्शक नावानेच संबोधतो. कारण कलागुणांच्या दृष्टीने ती माझ्यापेक्षा कितीतरी थोर आहे अशी माझी श्रद्धा आहे. आणि म्हणूनच मला तिच्याविषयी फार आदर वाटतो.


एकोणीसशे बावन्न त्रेपन्न साली केव्हा तरी एकदा मी कलकत्त्याला गेलो होतो. कलकत्ता हे माझे जन्मगाव. तेथे जाताना मी माझ्या काही खास आवडीच्या ग्रामोफोन रेकॉर्डस् बरोबर घेतल्या होत्या. त्यांतल्या जास्तीत जास्त रेकॉर्डस् लतादीच्या गाण्यांच्या होत्या. त्या रेकॉर्डस् मी ग्रामोफोनवर वाजवीत असता माझ्या काकांनी त्या ऐकल्या. माझे काका म्हणजे चित्रसृष्टीच जमाना एके काळी गाजविलेले

सुप्रसिद्ध गायक कै. के. सी. डे हे होत. लतादीची गाणी ते अगदी जवळून अशी पहिल्यांदाच ऐकत होते. गाणे ऐकताच त्यांनी अत्यंत कुतूहलाने गायिकेची चौकशी केली. त्यावेळी तो आवाज लताचा असल्याचे मी त्यांना सांगितले. तो आवाज ऐकताना माझे काका किती प्रभावित होऊन गेले होते हे आजही मला चांगले आठवते. लतादीच्या गाण्याचे माधुर्य, सहजता, आणि प्रवाहित्व यांनी त्यांचे हृदय अगदी उचंबळून आले आणि उत्स्फूर्तपणे ते मला म्हणाले,

"हा आवाज नुसता गोड नाही. त्याला एक ईश्वरी अधिष्ठान लाभलेले आहे. मला तर वाटते, प्रत्यक्ष देवी सरस्वती या मुलीच्या गळ्याने गाते आहे. खरोखर ही गायिका म्हणजे संगीताच्या विश्वाला प्रभूकडून मिळालेली एक अनमोल देणगीच आहे!" लतादीच्या गाण्याचा मी जेव्हा जेव्हा विचार करतो तेव्हा तेव्हा काकांचे हे उद्‌गार मला आठवतात आणि प्रत्येक वेळी त्या उद्‌गारांची सत्यता मला अधिकाधिक पटू लागते. आधुनिक संगीताच्या क्षेत्रांत लतादीने आपली स्वतःची, अगदी अपूर्व अशी, गाण्याची एक पद्धती प्रस्थापित केली आहे. त्या दृष्टीने ती एक व्यक्ती नसून गाण्याची एक अगदी स्वतंत्र परंपरा आहे असे म्हटले तर त्यांत यत्किंचितही अतिशयोक्ती होऊ नये.

आतापर्यंत मी ऐकलेल्या किंवा माझ्या परिचयाच्या अशा सर्व गायकगायिकांत लतादीइतकी गुणसंपन्न, समृद्ध आणि अष्टपैलू असा दुसरा एकही कलावती शोधून देखील सापडणार नाही. मायक्रोफोनवरून कसे गावे ही एक अगदी वेगळी आणि स्वतंत्र अशी कला आहे. आणि त्या कलेवर या अत्यंत बुद्धिमान गायिकेने विलक्षण प्रभुत्व संपादन केले आहे. कलावंताच्या तीव्र बुद्धिमत्तेचा प्रत्यय त्याने गाइलेल्या गाण्याच्या ओळीओळीत येतो. त्यामुळे त्या गाण्याला आगळे सौंदर्य लाभते. लतादीचे प्रत्येक गाणे तिच्या कलासंपन्नतेप्रमाणेच तिच्या बुद्धिवैभवाचीही साक्ष पटवते.

लतादीबरोबर अनेक द्वंद्वगीते गाण्याचे भाग्य मला लाभले आहे. साऱ्या गायकगायिकांत इतकी समजूतदार आणि सर्वतोपरी सहकार्य देणारी सह-कलाकार दुसरी क्वचितच सांपडेल. मला स्वतःला बऱ्याच वेळा गाण्याची तालीम आधी करावी लागते. त्यामुळे प्रत्यक्ष ध्वनिमुद्रणाला मला बराच विलंब लागतो. पण या विलंबामुळे लतादी त्रासली आहे, कंटाळली आहे किंवा नाराज झाली आहे, असे कधीही घडल्याचे मला आठवत नाही. उलट तिच्या सूक्ष्म व मार्मिक विनोदबुद्धीमुळे स्टूडिओतले वातावरण सतत उल्हसित राहते आणि त्यामुळेच तिच्याबरोबर काम करणे हा एक अत्यंत आनंददायक अनुभव आहे असे मी निश्चितपणे म्हणू शकतो.



रायचंद बोराल

मंत्रसिध्दा

सहा जानेवारी एकोणीसशे बावन्न ही तारीख मला अद्यापही चांगली आठवते. त्यादिवशी 'नीतिन बोस प्रॉडक्शन'चे प्रमुख सुलतान मझहरखान यांनी मुंबई येथील सेंट्रल स्टूडिओमध्ये प्रथम लताची आणि माझी भेट घडवून आणली. सकाळी नऊ वाजण्याचा सुमार असेल. तेव्हा ते लताला घेऊन मजकडे आले आणि म्हणाले,

"ही पहा तुमची पार्श्वगायिका. आपल्या 'दर्दे दिल' चित्रपटासाठी ही गाणार आहे."

मी लताकडे पाहिले. एक अगदी साधीसुधी विनयशील मुलगी. तिच्या मुद्रेवर निर्मितिक्षम कलावंताचे काही चिन्ह दिसत नव्हते की डोळ्यांमध्ये जिज्ञासेची तीव्र चमक, ती विलक्षण तहानही कोठे जाणवत नव्हती. आणि तरीही तिच्याबद्दल मी केवढे तरी ऐकले होते. भारतीय चित्रपटसृष्टीतल्या आपल्या कर्तृत्वाने तिने फार मोठे नाव मिळवले होते. कलेच्या क्षेत्रात आपले विलक्षण सामर्थ्य तिने प्रकट केले होते, लक्षावधी रुपये खर्चून निर्माण केले जाणारे प्रचंड चित्रपट आणि तिचे स्वतःचे असंख्य चाहते या उभयतांमध्ये वास्तववादी संबंध प्रस्थापित करण्यासही तिचेच प्रयत्न कारणीभूत झाले होते. या मुलीला चित्रपटाच्या आभासमय सृष्टीत सहजासहजी प्रवेश मिळाला नव्हता. तेथील बंद दारावर तिला अनेकदा धडका घेऊन तेथे स्वतःचा प्रवेश करून घ्यावा लागला होता. पण एकदा तिला तेथे प्रवेश मिळाल्यावर मात्र त्या व्यवसायाला तिची अधिकाधिक गरज भासू लागली होती. आणि आता तर तिच्या चाहत्यांनी 'सुरांची सम्राज्ञी' म्हणून आपल्या हृदयात सर्वोच्च स्थानावर तिची प्रतिष्ठापना केली होती. अशी ही लता. पण तिचे हे कोणतेही गुणवैशिष्ट्य माझ्यासमोर झगझगीतपणे प्रकट झाले नव्हते. तसा काही आवही तिने आणल्याचे मला दिसले नाही. तथापि, एखाद्या व्यक्तीबद्दल प्रथमदर्शनी जी आपली प्रतिक्रिया होते ती पुढे खरी ठरतेच असे नाही. माणसाचे पहिले दर्शन कधी कधी फसवेही असते. मस्तुरीबाई आणि के. एल. सैगल ही कलाकार मंडळीही प्रथम मला इतकीच सामान्य, साधीसुधी भासली होती. माझ्या मनात आले, लता दिसते साधी. पण तिचे गाणे घेणे ही कदाचित अत्यंत अवघड आणि समस्या निर्माण करणारी घटना

असू शकेल—कुणी सांगावे. मी त्या मुलीच्या अंतर्गत कलागुणांचा शोध घेण्याचे ठरवले. मला जणू ते एक आव्हानच वाटले.

आणि गाण्याची तालीम घेताना लताने माझ्यापुढे एक प्रश्नचिन्ह उभे केलेच. मला वाटली होती त्यापेक्षाही ही मुलगी खट्याळ आणि रहस्यमय निघाली! पहिल्याच दिवशी गाण्याची तालीम घ्यावयाचे वेळी मी गाण्याच्या पहिल्या दोन ओळी तिला गाऊन दाखवल्या आणि तिला ते गाणे माझ्याबरोबर गावयास सांगितले. गाण्याच्या प्रारंभीचे शब्द होते 'जादूगर भूल ना जाना'. लताला गावयाला सांगून मी अपेक्षापूर्ण नजरेने तिजकडे बघत राहिलो. तो काय? मला फक्त तिचे ओठ हलताना दिसले. पण गाणे मुळीच ऐकायला आले नाही. मग मी माझे सहकारी अली हुसेन यांना त्या दोन ओळी म्हणायला सांगितल्या आणि स्वतः लताच्या जवळ सरकून कान टवकारून बसलो. तरी पुन्हा तेच. लताचा स्वर काही माझ्या कानावर पडला नाही.

मी काहीसा अस्वस्थ झालो. आणि लताला विचारू लागलो,

"तू मोठ्यानं का गात नाहीस? तुझी प्रकृती बरी नाही काय?"

लता अगदी सावधपणाने म्हणाली,

"मी ठीक आहे दादा. आपण सांगितलं ते सारं मी लक्षपूर्वक ऐकलंय. गाण्याची चाल माझ्या बरोबर ध्यानात आलीय!"

"तर मग गा ना तू?" मी काहीसा चिडून म्हणालो, "मला ऐकू दे तरी कशी गातेस तू ते?"

तरी लता शांतच होती. पुन्हा तितक्याच सावधपणाने, नम्रतापूर्वक ती म्हणाली, "मी गायले आहे दादा. आणि प्रत्यक्ष 'टेक'च्या वेळी सुद्धा मी याच सुरात गाते."

तिच्या या उत्तराने माझा पारा किती वर चढला असेल याची कल्पनाच करावी. पण मी स्वतःचे मन ताब्यात ठेवले. म्हटले, चिडून उपयोग नाही. या मुलीच्या कलानेच घ्यायला हवे. शिवाय, पार्श्वगायनाच्या अनेक तऱ्हा असू शकतात. चित्रपटकलेत शेवटी महत्त्व असते ते दृश्याला. ते एक अत्यंत समर्थ आणि तेवढेच दूरगामी असे माध्यम आहे. आणि त्यात गायक, वादक, अभिनेते यांच्याबरोबर तंत्रज्ञांनाही सहकार्य करावेच लागते. त्या साऱ्यांच्या संघटित प्रयत्नांतूनच सरतेशेवटी या 'जिवंत कले'ची सारी प्रतिमासृष्टी आणि वैभव निर्माण होत असते. या सर्व गोष्टी माझ्या मनात आल्यामुळेच मी स्वतःला आवर घातला आणि लतासारख्या संवेदनाशील कलाकाराशी जपून अन् काळजीपूर्वक वागावयाचे ठरवले. त्या दिवशीची तालीम अखेर संपली. मी मनातून असमाधानीच होतो. पण लताने मला आश्वासन दिले,

"आपण मुळीच चिंता करू नका दादा. मी तुमची चाल अगदी बिनचूक म्हणेन."

ती निघून गेली.

मी मात्र फार दुग्ध्यात पडलो होतो. काय करावे तेच मला कळेना. शेवटी मला साउंड एंजिनियर मुकुल बोस यांची आठवण झाली. त्यांनी आतापर्यंत लताची अनेक गाणी ध्वनिमुद्रित केली होती. मी त्यांना माझी अडचण समजावून सांगितली. पण त्यांनीही मला आश्वासन दिले की प्रत्यक्ष ध्वनिमुद्रण अगदी मला हवे होते तसेच होईल! ते मला म्हणाले,

"लता फार सराईत आर्टिस्ट आहे दादा. आपण 'साउंड ट्रॅक'वरून तिचे गाणे ऐका, म्हणजे आपल्याला कळेल ती किती बिनचूक गाते ते!"

मग मी लताचे गाणे 'साउंड ट्रॅक' वर ऐकले. आणि आश्चर्याचा सुखद धक्का मला बसला. लताने माझी चाल अगदी मला हवी होती तशी, सहीसही उचलली होती. मला तिच्या विलक्षण ग्रहणशक्तीचे फार कौतुक वाटले. मी दिलेल्या साऱ्या सूचना तिने आत्मसात केल्या होत्या. कोणत्याही तपशीलात अगदी रतिभरसुद्धा फरक पडला नव्हता. आणि मग या खट्याळ पोरीचा मला

थांग लागला. मनात आले, एका विशिष्ट पद्धतीनेच हिच्याशी वागले पाहिजे. विशिष्ट पद्धतीनेच हिचे गाणे बसवले पाहिजे. तिच्याकडून तिच्या तंत्राने ते म्हणून घेतले पाहिजे. कारण एकच. ती जन्मजात कलावंत होती. मला जुने दिवस आठवले. मी 'न्यू थिएटर्स'मध्ये काम करीत होतो. त्यावेळी एकदा सैगलचा आवाज बिघडला होता. कामाचा जबरदस्त खोळंबा होण्याचे भय निर्माण झाले होते. त्या वेळीही अशीच कठीण समस्या माझ्यासमोर उभी राहिली होती. आणि मला सैगलला मोठ्या युक्तिप्रयुक्तीने सांभाळून घ्यावे लागले होते. चित्रपटाचे माध्यम हे एक अत्यंत लवचिक माध्यम आहे. तेव्हा आम्ही तंत्रज्ञ काय करतो? अशी एखादी अडचण समोर उभी राहिली की डोक्याला डोकी घासून आम्ही विचारविनिमय करतो आणि आमच्या कलाकृतीत प्राण भरतो. चैतन्य निर्माण करतो. सैगल आम्हाला हवे तसे 'तंत्र' देत नव्हता. मग आम्ही त्याचे 'मंत्रसिद्ध' गाणे घेतले. तो काही बनवलेला कलावंत नव्हता. तो होता जन्मजात कलाकार. स्वयंप्रज्ञ आणि स्वयंसिद्ध. त्याचे गाणे तो गाईल तसेच आम्हाला घेणे भाग होते. आम्ही ते घेतलेही.

आणि मग माझी चाल मी सैगलच्या तोंडून पुन्हा उमटताना ऐकली. माझे गाणे त्याच्या गात्या गळ्यातून प्रकट होत होते. नंतर ते तेथे अमर झालेलेही मी पाहिले. त्याच जन्मजात, स्वयंसिद्ध, स्वतःच्या लहरीनुसार गाणाऱ्या दैवी कलावंताचे मला जणू पुन्हा वेगळ्या रूपात येथे मुंबईत दर्शन घडत होते. ती होती लता. सुरांचे ईश्वरदत्त वैभव घेऊन आलेली, जन्मजात कलाकार. आपल्या क्षेत्रातली अभिषिक्त सम्राज्ञी.



सुधा करमरकर

लताताई

सात आठ वर्षांपूर्वी लता मंगेशकर हे नाव ऐकले की काही सुंदर भावपूर्ण स्वरलहरी माझ्या कानावरून जात आणि त्या स्वरांशी निगडित अशा काही अनुभूतींच्या आठवणी हृदयाला स्पर्शून जात. कोट्यवधी अंतःकरणांना मुग्ध करणारी ही पार्श्वगायिका प्रत्यक्षात कशी असेल असे कुतूहल मनात निर्माण होई. आज हेच नाव एकले की रेडिओवरून कानावर पडणाऱ्या स्वरांच्या विरळ पडद्याआड एक आगळेच व्यक्तिमत्त्व दिसू लागते. माझ्या लताताईंचे. त्यांच्या स्वराइतकेच विलोभनीय!

माझ्या आयुष्यात मला ज्या काही चांगल्या गोष्टी लाभल्या आहेत त्यांपैकी एक विशेष गोष्ट म्हणजे लताताईंचा सहवास. केवळ लता मंगेशकर या स्वरसम्राज्ञीचा नव्हे तर लताताई या व्यक्तीचा. त्यांच्या सहवासातल्या काही प्रसंगात तर ही बाई स्वरसम्राज्ञी म्हणून अधिक श्रेष्ठ की लताताई म्हणून अधिक श्रेष्ठ असा मला संभ्रम पडलेला आहे—पण क्षणभरच. कारण माझ्या लताताई त्या स्वर-सम्राज्ञीवर केव्हाच मात करून जातात.

आमची पहिली ओळख अजून आठवते. बालरंगभूमीला आर्थिक स्थैर्य आणण्याच्या उद्देशाने पुरुषोत्तम दारव्हेकरांचे 'चंद्र नभीचा ढळला' हे नाटक सादर करण्याचे माझ्या मनाने घेतले. संच ठरला. इतरही जुळवाजुळव झाली. पण त्यातले 'चंद्र नभीचा ढळला' हे प्रमुख गीत कोणाकडून म्हणवून घ्यावे हे काही सुचत नव्हते. कारण त्या गाण्याला न्याय देईल अशी एकच गायिका होती. पण तिचा विचार करणे हे त्या नाटकातल्या नायकाच्या चंद्रापर्यंत मनोरा बांधण्याच्या वेडाइतकेच वेडेपणाचे होते. तथापि योगायोग काही वेगळाच होता. माझी एक मैत्रीण नलिनी म्हात्रे तेव्हा अमेरिकेला गेली होती. तिचा पत्ता विचारण्यासाठी मी तिच्या घरी गेले असता नाटकाच्या निर्मितीसंबंधी तिच्या वडिलांशी आणि भावाशी माझ्या गप्पा चालू होत्या. मुख्य गीत कोणी म्हणावे त्याबद्दल निश्चित ठरले नसल्याचे मी नारायणला (नलूच्या भावाला) सांगताच तो म्हणाला,—"दिदीच हे गाणं चांगलं म्हणू शकतील." मी विचारले —"दिदी कोण?" तेव्हा तो म्हणाला, "अहो लता मंगेशकर. त्यांना विचारू की आपण गाण्याबद्दल." नारायणचे हे उद्गार ऐकताच मी जरा

दचकलेच. कारण लतातांईची आणि नलूची खूप मैत्री असल्याचे आणि म्हात्रे कुटुंबाशी त्यांचा घरोबा असल्याचे मला माहीत होते. नलूकडे एकदा लताताईची आणि माझी ओझरती भेट झाली होती. पण म्हणून काय झाले ? लता मंगेशकर म्हणजे जागतिक कीर्तीची पार्श्वगायिका. अगदी मोजक्याच चित्रपट निर्मात्यांकरता गाणारी—तेही ते मोजत असलेल्या मोबदल्याखातर नव्हे तर तिची मर्जी असेल तर. तेव्हा अशा या लता मंगेशकरला माझ्यासारख्या सामान्य बाईने आपल्या नाटकासाठी एक गाणे गाल का असे विचारण्याची कल्पनादेखील माझी मला धाडसाची वाटली. पण नारायणाचा आत्मविश्वास दांडगा. "त्यांना विचारायला काय जातं ? फार तर नाही म्हणतील. आपण जाऊन पाहू." असे म्हणत त्याने लताताईकडून भेटीची वेळ मागून घेतली.

दिनांक तीस जुलै एकोणिसशे एकसष्ठ रोजी लताताईंना भेटायला जायचे ठरले. त्या दिवशी पावसाने अगदी मनावर घेतल्यामुळे भरदुपारी देखील सगळीकडे अंधारले होते. जणू काही लताताई-कडून पुढे मिळणाऱ्या नकारासाठीच निसर्ग वातावरणनिर्मिती करीत होता. अशा त्या वातावरणात नारायण आणि मी दुपारी अडीच वाजता लताताईकडे पोचलो. नोकराने आतल्या खोलीत त्यांना आम्ही आल्याचे कळवताच 'याना, आत या" असा आतून गोड आवाज आला. मी खाली मान घालून घाबरत घाबरत आत प्रवेश केला. हळूच वर पाहाते तो माझ्याकडेच कुतूहलाने बघत हसत उभी असलेली एक साधी पोरसवदा बाई हातातल्या कंगव्याने आपल्या धुतलेल्या लांबसडक केसांचा गुंता सोडवत उभी आहे. त्या सुंदर केशसंभाराकडे पहाता पहाता मी कशासाठी आले आहे याचा क्षणभर मलाच विसर पडला. तेवढ्यात "या सुधा करमरकर—" या नारायणच्या उद्गाराने मी भानावर आले आणि कसाबसा नमस्कार केला. "हो मी ओळखते ना यांना...नलूने तुमच्याकडे झालेल्या सत्यनारायणाच्या पूजेच्या वेळेला यांची ओळख करुन दिली की. मला चांगले आठवते..." मनात जुन्या आठवणींचा पट उलगडला. नलूच्या घरी एकोणीसशे चौपन्न साली झालेल्या पूजेच्या वेळचा तो प्रसंग डोळ्यापुढे उभा राहिला. त्यावेळची ती ओझरती भेट त्यांच्या लक्षात राहिलेली पाहून मी अगदी अवाक होऊन त्यांच्याकडे पहातच राहिले.

त्या भेटीच्या त्यांनी दिलेल्या आठवणीमुळे पुढचे धाडस करायला मला थोडासा धीर आला आणि चाचरत चाचरत मी त्यांना भेटीचा हेतू सांगितला. नकार गृहीत धरलेला होताच. फक्त आपल्या विनंतीला मागाहून त्या कितपत हसतील याचा मनाशी अंदाज बांधत होते. पण तेवढ्यात "हो. गाईन की मी गाणं" हे त्यांच्या तोंडचे शब्द ऐकून माझा कानांवर विश्वासच बसेना. "संगीत कुणी दिलं आहे ?" असं त्यांनी विचारताच म्हटले आपल्याकडे मोठी नावे नाहीत तेव्हा बहुतेक संगीतदिग्दर्शकाचे नाव ऐकून मग नकार येणार असेल. "नागपूरच्याच संचातल्या गोपाळ कौशिकनं चाल दिली आहे..." मी म्हटले. "असं का काही हरकत नाही." लताबाई म्हणाल्या, "रेकॉर्डिंगच्या आधी मला एकदा ते गाणं त्यांना म्हणून दाखवायाला सांगा म्हणजे झालं." या सर्व अनपेक्षित होकारांना माझी बिलकूल तयारी नसल्यामुळे मी लताबाईकडे बावळटासारखी बघतच राहिले. त्या गोंधळलेल्या मनस्थितीतच मी त्यांना त्यांच्या मानधनाबद्दल विचारले. त्यावर, "छे, काही सुद्धा मानधन घेणार नाही मी" हे त्यांचे शब्द ऐकून तर मी थक्कच झाले. वाटले, चमत्कार घडतो म्हणतात तो हाच असावा.

'चंद्र नभीचा ढळला' हे गाणे केवळ एक निमित्त ठरले. ते नाटक तर पस्तिसाव्या प्रयोगानंतर ढासळले. वाटले होते, या गाण्याच्या ध्वनिमुद्रणानंतर लताबाईंशी झालेली माझी ओळखही ढासळेल. पण तसे व्हायचे नव्हते. जणू काही पूर्वीपासून असलेली ओळख दृढ होण्यासाठी नाटकाच्या गाण्याचे निमित्त आम्हा दोघींनाही हवे होते. मात्र ती भेट घडवून आणणारे नारायण म्हात्रे आज हयात नाहीत. याचे फार वाईट वाटते. 'चंद्र नभीचा ढळला' या गाण्याची ध्वनिमुद्रिका निघाली नाही. त्यामुळे

ज्यांना ते गाणे ऐकायला मिळाले नाही ते श्रोते खरोखरच अभागी. ऐकणाऱ्याच्या काळजाला हात घालण्याचे सामर्थ्य लताबाईंच्या त्या गाण्यात आहे. अजूनही रात्रीच्या शांत वेळी कितीदा तरी आम्ही दोघे टेप लावून ते गाणे पुन्हा पुन्हा ऐकतो.

'चंद्र नभीचा ढळला' या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळेस तर त्यांनी मला अगदी लाजवलेच. आम्हा सर्वांच्या आधी स्टूडिओत लताताई हजर असल्याचे पाहून मी अगदी ओशाळले. माझ्याकडे कुणी मोठे वादक आणि संगीतदिग्दर्शक नव्हते. पण कशाबद्दल कुरकूर नाही की तक्रार नाही. नागपूरहून मुद्दाम आलेल्या गोपाळ कौशिकांकडून त्यांनी ते गाणे एकदा लक्षपूर्वक ऐकले आणि तिथे असलेल्या तुटपुंज्या वाद्यसंचाला सांभाळून घेत एक रिहर्सल केली. आणि थोड्याच वेळात ते गाणे ध्वनिमुद्रित केले गेले. चांगली चाल दिल्याबद्दल कौशिकांचे कौतुक करून त्या माझ्याबरोबर निघाल्या. वाटेत घाबरतच मी त्यांना नाटकाच्या पहिल्या प्रयोगाचे निमंत्रण दिले. कारण त्या कुठल्याही नाट्यप्रयोगांना हजर रहात नाहीत असे मी ऐकले होते. पण लताताई या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला उपस्थित राहिल्या. आपल्या भावंडांसह आणि माईंसह आल्या. आणि गंमत म्हणजे तिसऱ्या अंकाला मात्र आत विंगमध्ये येऊन बसल्या. कारण त्यांचे ध्वनिमुद्रित केलेले गाणे तिसऱ्या अंकाच्या शेवटी होते. कुणाला खरे वाटणार नाही पण स्वतःचेच गाणे प्रेक्षकात बसून ऐकण्याचा काही धीर झाला नाही बाईला !

त्या गाण्यानंतर त्यांची माझी केवळ औपचारिक ओळख राहील असे वाटले होते मला. कारण कलाकार जेवढा मोठा तेवढे त्याच्याबद्दलचे गैरसमजही मोठे. ते कानावर असल्यामुळे फोनवर त्यांच्याशी औपचारिक संभाषण करण्यांतच मी धन्यता मानत होते. पण त्यांना एकदा घरी जेवायला बोलवावे अशी इच्छा झाली. त्याप्रमाणे धीर करून मी त्याना जेवणाचे निमंत्रण दिले आणि खरोखरच त्या जेवायला आल्या. त्यांच्या आवडीचे गोव्याचे सारस्वती पद्धतीचे जेवण केले होते. सारे पदार्थ त्यांनी चवीने आवडीने खाल्ले. मनमोकळेपणाने त्या माझ्या म्हाताऱ्या आजीशी बोलल्या आणि आमच्याशीही त्यांनी खूप गप्पा मारल्या. त्या दिवसापासून मी त्यांच्या प्रेमात पडले. खरेच प्रेमात पडले. माझे भाग्य म्हणजे या माझ्या प्रेमाच्या व्यक्तीला अगदी जवळून पाहण्याची, त्यांच्या सहवासात राहण्याची मला अनेकदा संधी मिळाली.

त्यांच्या सहवासात येऊन मला पाचसहा वर्षे झाली पण अजूनही वाटते लताताई म्हणजे एक न सुटणारे कोडे आहे. एवढी मोठी कलाकार पण राहणी अगदी साधी. पांढरे शुभ्र पातळ, कोपरापर्यंत बाह्यांचा पांढरा पोलका, दोन लांबसडक वेण्या, ठसठशीत कुंकू, मोजकाच एखादा दागिना आणि अंगभर पदर—या साधेपणाला साजेसा चेहऱ्यावर सात्विक भाव आणि लोभस हास्य. स्वभाव तर इतका प्रेमळ आणि उदार की दुसऱ्यांना किती देऊ नि किती नको असे त्यांना होते. आणि हे देणेही औपचारिक भावनेने नसते तर त्या त्या माणसाची आवडनिवड जाणून घेऊन प्रत्येक वस्तू मोठ्या चोखंदळपणे आणि अभिरुचीने निवडून घेऊन दिलेली. स्वतःच्या बाबतीत मात्र अगदी विरक्त. एकदा त्यांच्या एका वाढदिवसाला मी त्यांचे अभीष्टचिंतन करायला गेले होते. अनेक उत्तमोत्तम मूल्यवान भेटी आणि सुंदर सुंदर साड्या मोठमोठ्या कलाकारांकडून त्यांना आल्या होत्या. त्या स्वतः मात्र एक नवीन पण साधेसेच पातळ नेसून वावरत होत्या. गंमत म्हणजे त्या दिवशी त्यांनी मलाच दोन सुरेख साड्या आपली भेट म्हणून आग्रह करून घ्यायला लावल्या !


गेल्या पाचसहा वर्षांत लताताईंनी मला खूप कांही दिले आहे. साड्या आणि वस्तूंबद्दल तर बोलायलाच नको, पण माझ्या संस्थेसाठीही मुद्दाम खटपट करून स्टीरिओफोनिक टेपरेकॉर्डरही त्यांनी मला मिळवून दिला. लिटल थिएटरच्या मुलांसाठी होणाऱ्या नाटकांना त्या हौसेने उपस्थित राहिल्या आणि लहान मुलांसारख्याच निरागसपणे त्या त्यांमधे रंगून गेल्या. 'अल्लाउद्दीन'च्या पंचाहत्तराव्या

प्रयोगानंतर माझ्या कलाकारांच्या विनंतीला मान देऊन प्रकृती बरी नसताही चाळीस कलाकारांना आपल्या हस्ते स्मृतिचिन्हे देऊन अवर्णनीय असा आनंद दिला. माझ्या पतींना मानाने, अगदी भावाच्या नात्याने वागवले. आणि या साऱ्यांपेक्षाही मला त्यांनी दिला त्यांच्याजवळ जाण्याचा हक्क —जो फारच थोड्यांना मिळाला आहे.

लताबाईंना मी लहान पोरासारखे खोडकरपणा करताना पाहिले आहे तसेच एखाद्या जबाबदारीच्या प्रसंगी आजीबाईसारखा डोक्यावर काळजीचा भार घेऊन वावरतानाही पाहिले आहे. चिडलेल्या असताना सात्त्विक संतापाने तारस्वरात ताडताड बोलताना ऐकले आहे. पण त्या आवाजातला गोडवा इतका कायम की वाटावे एखादा जलद लयीतला दमदार तराणाच चाललाय. त्यांच्या हळव्या मनाला लागलेल्या एखाद्या गोष्टीसाठी डोके शिणवत बसलेलेही त्यांना पाहिले आहे. त्यांच्या विविध गाण्यांप्रमाणेच ही वेगवेगळी रूपेही त्यांचा ठसा मनावर उमटवून गेली आहेत.

त्यांच्याजवळ गेले असता त्यांची जीवनाबद्दलची विरक्ती, दुसऱ्यांसाठी सतत कष्ट उपसण्याची वृत्ती, स्वतःबद्दलची बेफिकिरी हे सारे पाहून वाटते की त्यांना कुणीतरी जपले पाहिजे. पण त्या हट्टी आहेत. या बाबतीत कुणाचेच त्या ऐकणार नाहीत. गेली पंचवीस वर्षे असेच चाललें आहे आणि आश्चर्य म्हणजे तरीही त्यांचे गाणे दिवसेदिवस अधिकाधिक सुंदर होत चालले आहे. मला तर वाटते त्यांच्या पाठीशी एखादी दैवी शक्ती नक्की असली पाहिजे.

या दैवी शक्तीला प्रार्थना एवढीच की तू अशीच सदैव त्यांच्या पाठीशी राहा. त्यांच्या गळ्याइतकीच त्यांच्या प्रकृतीची जपणूक कर आणि कोट्यवधी लोकांच्या जीवनात आपल्या गाण्याने आनंद फुलवणाऱ्या माझ्या लतातांईना त्यांच्या जीवनात काही क्षण तरी आनंदाचे, मनःशांतीचे आणि सौख्याचे लाभू देत. वाटल्यास माझ्या वाट्याचे काही सुखाचे क्षण त्यांना दे पण त्यांना सुखी झालेले, खूप आनंदात राहिलेले मला पहायला मिळू दे.



जयकिशन

काही क्षण

"जयभय्या, तुम्ही चित्रपटात काम का नाही करीत? हीरो म्हणून चांगले शोभून दिसाल—" लताजी एकदा गमतीने मला म्हणाल्या.

"हं, आता तेवढंच बाकी राहिलेलं आहे. हा संगीत दिग्दर्शनाचा धंदा चालेनासा झाला म्हणजे मग तो नट बनण्याचा धंदा सुरू करतो" मीही तितक्याच मिष्किलपणाने उद्गारलो आणि आम्ही दोघेही मनमोकळेपणाने हसलो. लताजी हसू लागल्या की अगदी खळखळून हसतात.

पण त्यांच्या या उद्गारांनी माझ्या जुन्या स्मृती चाळवल्या गेल्या. त्यांची आणि माझी पहिली भेट झाली तो प्रसंग आठवला. "आठवतं तुम्हाला ते 'राजचे बंधू'प्रकरण?" एवढे म्हणण्याचा अवकाश, आम्ही पुन्हा हसलो. अठ्ठेचाळीस साल असावे ते. भारतीय चित्रपटसृष्टीत तेव्हा कोणीच नसलेले आम्ही महत्त्वाकांक्षा मात्र जबर बाळगून होतो. राज कपूर देखील त्यावेळी नुकतेच नावारूपाला येऊ लागले होते. त्यांचा 'आग' हा चित्रपट प्रकाशित झाला होता, आणि काहीतरी वेगळे, भव्य करण्याची त्यांची झेप होती. रामानंद सागर यांच्या एका प्रणयकथेचे कथानक त्यांनी निश्चित केले होते. मग संगीत देण्यासाठी शंकर आणि मी यांना पाचारण करण्यात आले. राजसारख्या गुणग्राहक, स्वप्नाळू, कल्पक निर्मात्याने आपल्याला बोलवावे आणि काही नवे द्या असे आवाहन करावे यानेच आमचे बाहू स्फुरण पावले! चांगली कंबर कसून, नव्या मिळालेल्या संधीचा चांगला उपयोग करून घ्यावा म्हणून आम्ही कामाला लागलो. चित्रपटसृष्टीत नेहमी ऐकू येणाऱ्या आवाजांपेक्षा क्वचितच ऐकू येणाऱ्या एका आवाजाने त्यावेळी आम्हाला कमालीचे आकृष्ट केले होते. तो आवाज होता अत्यंत मुलायम, नाजूक, अतिशय सुरेल, भरपूर 'रेंज' असलेला, आणि भावनांनी ओथंबलेला. लताजींचा आवाज! 'आयेगा आनेवाला' या गीताने मी स्वतःच भारावून गेलो होतो. आमच्या या पहिल्यावहिल्या संगीतकृतीला हा नवा आणि वेगळ्या धाटणीचा आवाज मिळेल तर आमच्यासारखे भाग्यवान आम्हीच ठरणार होतो! राज कपूर यांची या वेळेपर्यंत लताबाईंशी प्रत्यक्ष ओळख नव्हती. त्यांनी फक्त त्यांचा स्वर ऐकलेला होता आणि त्या गोड आवाजा-

वर तेही बेहद्द खूष होते. त्यांनी तावडतोब महालक्ष्मीच्या 'फेमस' मधील आपल्या ऑफिसात त्यांना तालमीसाठी बोलावण्याचे फर्मान सोडले. लताजी त्यावेळी नाना चौकातील शंकराच्या मंदिराजवळ राहात होत्या. मी दुसऱ्या दिवशी राज कपूर यांच्या नावाची कुबडी ओळखीसाठी घेऊन लताजींच्या घरात शिरलो. त्यांना तालमीसाठी बोलावले आहे असा निरोप कळवला. पहिल्या भेटीत त्या मला विलक्षण तेजस्वी आणि तितक्याच मृदू वाटल्या. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळेला त्या 'आर. के.' च्या कचेरीत आल्या. पुढ्यात पेटी घेऊन मी बसलो होतो. ते पाहून त्यांना जरा आश्चर्यच वाटले. "आपण संगीतदिग्दर्शक आहात तर ? काल मला वाटलं आपण राजकपूर यांचे धाकटे बंधू असाल!" त्यांचे हे मनमोकळे उद्गार ऐकून सगळी मंडळी सातमजली हसली. मग तालमींना उत्साहाने प्रारंभ झाला. मिनू कात्रक यांनी 'बरसात' मधील 'जिया बेकरार है' हे पहिले गाणे ध्वनिमुद्रित केले आणि आम्हाला आमच्या यशाची खात्रीच पटली. जो येईल तो आमचे कौतुक करू लागला. आम्हालाही लताजींशिवाय दुसरा कोणताच आवाज गोड लागेना. म्हणून मग नर्गिस आणि निम्मी या दोघींसाठीही आम्ही त्यांनाच गायला लावले.

'बरसात'च्या ध्वनिमुद्रिका आणि चित्रपट प्रकाशित होताच सर्वत्र लता मंगेशकर हे नाव ऐकू येऊ लागले. शंकर जयकिशन या नावालाही व्यक्तित्व प्राप्त झाले. आणि त्या चित्रपटापासून लताजींची आणि आमची जी जोडी जमली ती गेली वीस वर्षे कायम आहे. मतभेदाचे धुके कधी कधी निर्माण झाले, कधी गैरसमजुतीने काही काळपर्यंत आमच्यामध्ये अंतरायही निर्माण झाला पण लताजींच्या समंजसपणामुळे आणि खेळकर वृत्तीने तो फार काळ टिकू शकला नाही. प्रारंभी त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाचाच आवाज आम्हाला गोड लागत नसल्याने आम्ही आमच्या चित्रपटांतील सर्वच स्त्रीगीते त्यांना म्हणायला लावत असू. अशा वेळी संगीतकाराप्रमाणे गायकाचीही कसोटी लागते. वेगवेगळ्या आवाजांत गाण्याची लताबाईंची कला केवळ असामान्य आहे. तयार गायकी आणि नाना ढंग निर्माण करण्यात वाकबगार असलेला गळा त्यांच्याजवळ असल्याने आम्ही त्यांचा अनेक प्रकारे उपयोग करून घेतला. लताजींच्या असामान्य कुवतीवर मनातून विश्वासूनच आम्ही अनेक प्रयोग करीत गेलो. प्रत्येक चित्रपटात एखादे दुसरे तरी शास्त्रीय ढंगाचे गीत आम्ही त्यांच्याच जिवावर घालत होतो. त्यांच्या आवाजाचे आणि आमच्या सुरावटीचे गणित एवढे अचूक बसून गेले आहे की एखादे गाणे लताजींसाठी तयार केल्यानंतर अनेकदा ते दुसऱ्याकडून गाववून घेणे अशक्य होऊन बसते. बांधलेल्या चालीत दुसरा आवाज बसवताना क्लेशच होतात! हे माहीत होते म्हणूनच आजारात सुद्धा लताजी आमच्यासाठी गात राहिल्या आहेत. गीतकाराचे शब्द आणि संगीतकाराचे सूर यांना न्याय द्यावा लताजींनीच! त्या घेत असलेले श्रम, त्यांची कलापूर्ण मनोवृत्ती आणि सर्वस्व ओतून गाण्याचा त्यांचा स्वभाव हे सारखेच एकत्र येते तेव्हा वाटते की गळ्याने गाणारे गायक अनेक असतील. आत्मा ओतून गाणाऱ्या फक्त लताजीच आहेत!


संगीतकारांच्या श्रमाचे सोने करणे किंवा माती करणे हे सर्वस्वी गायकावर अवलंबून असते. प्रत्येक स्वराला त्याने दिलेले चैतन्य त्याला स्वतःला कळते पण उमटवता येत नाही. आपले 'कॉम्पोझिशन' दुसऱ्याच्या गळ्यातून उमटवून घेणे ही किती अवघड गोष्ट आहे हे लताजींसारख्या गायिका भेटल्या म्हणजे कळतच नाही! त्या आमच्या रचनेचे मोल वाढवतात आणि आश्चर्याचा गोड धक्का आम्ही अनुभवतो.

लताजींच्या आवाजाबद्दल खूप सांगता येण्यासारखे आहे आणि काही सांगता येण्यासारखे नाही. भरपूर फिरत असलेला, 'रेंज' असलेला, इतका लवचिक, मुलायम, मधुर आवाज चित्रपटसृष्टीत पूर्वी क्वचितच झाला असेल. स्वरसम्राट सैगलसारखेच त्यांचे स्थान अढळ आहे. सैगल जसे एकच, तशा लताजीही एकच. दुसरी 'लता' होणे म्हणजे असंभव. त्यांची नुसती मेहनती वृत्ती

पाहिली तरी अजोड वाटते. संगीतकाराचे पूर्ण समाधान होईपर्यंत त्या गात राहतात. कंटाळा, थकवा त्यांना माहीतच नाही. 'आसरा'मध्ये एक भव्य नाविन्यपूर्ण स्वप्नदृश्य टाकण्याचा निर्णय जेव्हा राज कपूर यांनी घेतला तेव्हा आम्ही 'आया मेरा परदेशी' हे गीत त्या दृश्यासाठी तयार करून घेतले. या गीताचे रेकॉर्डिंग सकाळी दहाला सुरू झाले ते पहाटेचे चार वाजले तरी चालूच होते! लताजी इतका सारा वेळ आमच्याबरोबर गात होत्या, धडपडत होत्या. त्यांच्या जबर दमाने त्या दिवशी आम्ही चकित झालो. 'पूनम' चित्रपटातील गीतांच्या वेळी 'हिज मास्टर्स व्हॉईस'मध्ये त्यांची एकदोन गाणी प्रथम ध्वनिमुद्रित झाली आणि तिसरे 'ओ भूले बालमा' हे करुणरसपूर्ण गाणे सुरू झाले. लताजी विलक्षण थकल्या होत्या. त्यात त्यांना त्या कारुण्याचा ताण असह्य होत होता. पण तरीही त्या गात होत्या. गाणे कसेबसे आटोपले मात्र, आणि त्या तेथेच कोसळल्या. बेशुद्ध झाल्या. घाबरून सर्वांची नुसती धावपळ उडाली!

लताजींच्या आवाजाच्या प्रभावाची एक हृद्य आठवण सांगून मी माझा हा लेख संपवतो. मरहूम मेहेबूबसाहेब यांना लताजींचे 'अनाडी' मधील 'रसिक बलमा' हे गीत विलक्षण आवडत असे. औषधोपचारासाठी ते लंडनच्या एका इस्पितळात असताना त्यांना त्या गीताचे स्मरण झाले. ते गाणे ऐकावेसे वाटले. तेव्हा लताजींनी मुंबईहून फोनवरून त्यांना ते गाणे म्हणून दाखविले! मेहेबूबसाहेब त्या गाण्याने आणि ते गाणाऱ्या स्त्रीच्या अलौकिक व्यक्तिमत्वाने केवळ तृप्त झाले.

वीस वर्षांच्या या परिचयातील आणखीही खूप आठवणी मला सांगता येतील. अनेकदा एकमेकांच्या सुखदुःखांत आम्ही सहभागी झालो आहेत. अत्यंत परोपकारी वृत्तीच्या, सहकाऱ्यांवर प्रेम करणाऱ्या, त्यांचा रास्त अभिमान बाळगणाऱ्या, निरागस, कोमल मनाच्या अशा त्या कलावती आहेत. त्या तशा कधी कधी चिडक्या आणि हट्टीही आहेत पण तो चिडकेपणा व हट्टीपणा म्हणजे काही त्यांचा स्थायीभाव नाही. ती लहर येते तशीच लवकर जातेही. त्यांनी दिलेली वेळ पाळली नाही की निर्माते दिग्दर्शक नाराज होऊन तक्रारी करू लागतात. पण लताजीही अखेर एक 'माणूस' आहेत हे लक्षात ठेवायला हवे.



सुनील दत्त

हितगुज करणारे स्वर

मी चित्रपटाच्या जगात प्रवेश केला तेव्हापासून लता मंगेशकर हा माझ्यापुढील एक आदर्श आहे. स्वतःच्या कर्तृत्वाच्या क्षेत्रात अत्युच्च स्थान मिळवण्यासाठी त्यांनी जे अफाट परिश्रम केलेले आहेत ते मला नेहमीच स्फूर्तिदायक वाटत आलेले आहेत. माझ्या मनात येते की सर्वमान्य होईल अशी श्रेष्ठ कला अवगत असताना जर परिस्थितीशी इतका मुकाबला करावा लागला तर यापेक्षा थोडीही कमी कुवत असलेल्या व्यक्तींना किती धडपडावे लागेल?

गेली पंधरा वर्षे लताजींचा आणि माझा अगदी जिव्हाळ्याचा स्नेह आहे. त्यापूर्वीचीही दहा वर्षे मी त्यांना थोडा लांबून ओळखत होतो, म्हणजे गेल्या पंचवीस वर्षांतील लता मंगेशकर हा जो एक अद्‌भुत चमत्कार आहे, तो मी संपूर्णपणे पाहिलेला आहे. त्यांच्या कलेबद्दल आणि गुणशीलतेबद्दल गौरवपूर्ण आदरभावही गेली तितकीच वर्षे मी मनात जोपासून आहे. मित्रत्वाच्या भावनेने प्रेरित झालेली इतकी सहजसंवेदनाशील व्यक्ती माझ्या पाहण्यात दुसरी नाहीच. थोडे लांबून एखाद्या व्यक्तीचे कौतुक करणे वेगळे आणि अगदी निकटच्या परिचयानंतरही ते वाटणे वेगळे. लताजींच्या श्रेष्ठत्वाचा एक महनीय विशेष असा की, त्यांची जसजशी अधिकाधिक ओळख होत जाते तसतशी त्यांना अधिकाधिक मान देण्याकडेच मनाची वृत्ती झुकू लागते.

लताजींचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व त्यांच्या गाण्यांतून कळते. त्या स्वरांतून त्यांचे मनच नव्हे तर त्यांचा आत्माही प्रकटला आहे, एखाद्या गीतातील भाव त्यांच्या विशाल हृदयाच्या गाभ्यातून व्यक्त होतो आहे असे वाटते. त्यामुळेच दुःखाने त्रस्त झालेले अनेक जीव त्या मधुर गाण्याने आंतरिक समाधान मिळवू शकतात. आकाशवाणीवरून ऐकू येणाऱ्या लताजींच्या गीताला युद्धात जखमी होऊन हॉस्पिटलमध्ये आलेले आणि वेदनेने तळमळणारे अनेक सैनिक साथ देताना मी स्वतःच पाहिले आहेत. भारतीय संगीताबद्दल आणि विशेषतः चित्रपटसंगीताबद्दल फारशी आस्था नसलेले लोकसुद्धा लताजींचे गाणे अगदी मन लावून ऐकतात हे मला माहीत आहे.

आघाडीवर लढणारे जवान देशाच्या वेगवेगळ्या भागांतून एकत्र येतात आणि एखाद्या

ध्येयासाठी झगडत राहतात तसेच लताजींच्या आणि माझ्या आयुष्याचेही आहे. चित्रपटविश्वात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान असावे म्हणून सारे आयुष्य आम्ही दोघेही झगडलो आहोत. लताजी आपल्या कर्तृत्वाच्या अत्त्युच्च शिखरावर आहेत तर मी अगदी थोडीशीच कमाई केलेली आहे— पण ही धडपड हाच आम्हा दोघांना जोडणारा दुवा आहे.

आमच्यांमधील जिव्हाळ्यामुळे 'रक्षाबंधना'च्या दिवसाला आमच्या आयुष्यात एक अगदी वेगळेच स्थान आहे. व्यावसायिक नात्यापलिकडचे व्यक्तिजीवनातील स्नेहसंबंधाचे स्वरूप आता दृढ झालेले आहे.

लताजींच्या आवाजातही एक घरगुतीपणाची छटा आहे. त्या आवाजाने मनात अनेक स्मृती जाग्या होतात, आत्मशोध सुरू होतो, जिवलगाची ओढ वाटू लागते. असा ऐकणाऱ्या व्यक्तीच्या अंतरंगाचा त्या अगदी ठाव घेतात. ते गाणे म्हणजे रसिकाशी हितगुजच असते. माझ्या दृष्टीने हेच लताजींच्या गाण्याचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच ही गायिका श्रोत्यांना अगदी जवळची, घरातीलच वाटत आलेली आहे.

एक व्यक्ती म्हणून लताजी स्नेहशील आहेत, माणसांच्या लोभी आहेत, आपल्या रसिकांचीही कदर करणाऱ्या आहेत. त्यांच्या सहवासात अखंड प्रसन्नता आहे. माणसांचे चेहरे आणि नावे त्या फार पटकन ध्यानात ठेवतात. विद्यार्थिनीची नम्रता त्यांच्या ठिकाणी आहे. शांततेच्या त्या नितांत चाहत्या आहेत. एखाद्या कार्याला आपला हातभार लावण्यासाठी त्या नेहमीच तयार असतात.

त्यांच्यासारख्या शुद्ध प्रवृत्तीच्या, कलासंपन्न आणि तरीही अतिशय साध्या व्यक्ती खरोखरच दुर्मिळ आहेत.



रामूभय्या दाते

जिव्हाळा

कलाकार आणि त्याचा रसिक असे दोघे मिळूनच कला सिद्ध होत असते. ते दोन्ही परस्पराचे पूरक आणि अविभाज्य असे घटक आहेत. रसिक जर गायनाने 'वेडा' झाला नाही तर गायकाच्या गायनाला तरी महत्त्व कोठून प्राप्त होणार? एखाद्या थोर कलावंताच्या गाण्याने आम्ही भारावून जाऊन वेडे बनतो हेच त्याच्या जागतिक आकर्षणाचे रहस्य असते. आमचे 'वेड' त्याचा मोठेपणा सिद्ध करते. आपल्या अलौकिक स्वरपंक्तींनी तो जेव्हा आम्हाला रडवतो तेव्हा ते 'अश्रु' मात्र आमचे असतात. हेच रसिकाचे मोठेपण. तेच त्याचे भाग्य.

लताताईंना मी त्यांच्या बाळपणापासून ओळखतो. त्या आमच्या इंदूरच्या. त्यांच्या वडलांपासून इंदूरकरांचा आणि मंगेशकर मंडळींचा हा प्रेमाचा ऋणानुबंध जडलेला आहे. कुमार गंधर्वांचा एक अनन्य भक्त व चाहता म्हणून माझी जी 'शोहरत' झाली त्यामुळेच पुढील काळात आमचा व लताताईंचा अधिक जिव्हाळ्याचा स्नेह जडला. कुमार स्वतः लताताईंचे फार मोठे रसिक चाहते आहेत. हे दोघेही कलाकार एकदा माझ्याकडे जेवायला आले होते. कुमार त्यावेळी आजारीपणामुळे गात नसत. लताताई कुमारांना इतक्या मानतात की त्या दिवशी विनयाने त्याही गाइल्या नाहीत.

लहान मुलांना पंडित नेहरूंचे जसे विलक्षण आकर्षण वाटते तसेच, किंबहुना थोडे अधिकच, प्रेम व जिव्हाळा त्यांना लताताईंविषयी वाटतो. उलट, लताताईंनाही लहान मुलांचे फार वेड आहे. माझा मुलगा रवी (तबला उस्ताद) हा अगदी लहान असताना त्याचे डोळ्याचे एक छोटेसे ऑपरेशन होणार होते. त्यावेळी रवीने आम्हाला शर्त घातली की लताताई चौकशीला येणार असतील तरच मी ऑपरेशन करवून घेईन. आम्ही अट मान्य केली तेव्हा तोही आपल्या शब्दाला जागला. ऑपरेशननंतर शुद्धीवर आल्यावर त्याने पहिला प्रश्न विचारला,

"ताई आली का?"


ताई आली होती. फुले आणि चॉकोलेट घेऊन ती रवीच्या उशाशी हजर होती. मुलांचे असे अगत्य लताताईंना सतत वाटत आले आहे.

लतातार्इंनी एकदा आपल्या घरी मला शास्त्रीय संगीताच्या काही ' टेप्स ' ऐकवल्या. ते संगीत त्यांनी स्वतः गाइलेले होते. त्या 'टेप्स ' ऐकून मी विस्मयचकित झालो. असे असामान्य कसब त्यांत प्रकट झाले होते. माझ्या मनात आले, "लताताई ' शास्त्रीय ' गात नाहीत हे शास्त्रीय गवयांवर त्यांचे खरोखरच उपकारच आहेत. एरव्ही, त्या क्षेत्रातही त्यांनी आपला असा अधिकार प्रस्थापित केला असता की इतरांना त्यांची बरोबरी करणे जडच गेले असते."

लतातार्इंनी आपली पहिली गाडी विकत घेतली त्यावेळी मी मुंबईला होतो. त्या मला म्हणाल्या, "दातेसाहेब, या गाडीचे उद्‌घाटन तुम्हीच करा. तुम्ही इंदूरला गाडी घेऊन जा !"

मी इंदूरला काही गेलो नाही. पण शीवपर्यंत जाऊन परत आलो. गाडी बघताच माझ्या बहिणीची मुले ' लताची गाडी ' ' लताची गाडी ' म्हणून टाळ्या पिटीत ओरडत सुटली. गाडीचे उद्‌घाटनही त्यांनीच केले.

' भारतरत्न ' ही सर्वांत मोठी राष्ट्रीय पदवी. राजकारण, शिक्षण, ज्ञानविज्ञान या क्षेत्रांतल्या थोरांना जर ती पदवी दिली जाते तर सांस्कृतिक क्षेत्रातील संगीताच्या दालनात अमोल कामगिरी बजावणाऱ्या प्रतिभावंतांना ती का दिली जाऊ नये ? लताताई तर खरोखरी ' जगद्‌रत्न ' आहेत. या ' जगद्‌रत्ना 'ला निदान ' भारतरत्न ' देखील न म्हणण्याइतकी कंजूषी आम्ही का दाखवावी बरे ?



सलिल चौधरी

स्वरमनस्क

ठराविक चाकोरीतून फिरणारे दैनंदिन जीवन जगताना एखादा कलावंत जसा दिसतो त्यापेक्षा आपल्या कलेचा प्रत्यक्ष आविष्कार करताना तो वेगळाच दिसतो—नव्हे तो अगदी वेगळा बनतो, त्याच्यामध्ये काही तरी विलक्षण पालट पडतो असे मला सतत जाणवत आले आहे. कलाविष्काराच्या क्षणी हा कलावंत इतका वेगळा बनतो की आपण चकित होऊन स्वतःलाच विचारू लागतो,

"अरे आपण ज्याला रोज पाहतो, ज्याला आपण अगदी जवळून ओळखतो, तो हाच काय?"

माझ्या सुदैवाने मला जागतिक कीर्तीच्या काही फार थोर कलावंतांना जवळून बघण्याची संधी मिळाली आहे. तसेच प्रत्यक्ष कलानिर्मितीच्या वेळीही मी त्यांना पाहिले आहे. 'पुडोवकिन' या दिग्दर्शकाला चित्रपटदिग्दर्शन करताना मी पाहिले आहे. 'चेर्काझॉव्ह' या अभिनेत्याला रंगभूमीवर अभिनय करताना मी पाहिले आहे. 'व्हां कारयान' या संगीतकाराला वाद्यमेळाचे संचलन करताना मी पाहिले आहे. अलि अकबर खां यांना सरोद वाजवताना आणि रविशंकर यांना सतार वाजवतानाही मी पाहिले आहे. मी पाहिलेल्या श्रेष्ठ कलाकारांपैकी हे फक्त काही जण होत. या साऱ्यांशी प्रत्यक्ष परिचय होण्याचे भाग्यही मला लाभले आहे. आणि एरव्हीच्या जीवनातला कलाकार नि कलानिर्मितीच्या वेळचा कलाकार या दोन अगदी वेगळ्या व्यक्ती असतात या माझ्या सिद्धांताला प्रत्येक वेळी बळकटीच येत गेली आहे. तथापि, या देशातल्या लक्षावधी जनतेची लाडकी गायिका आणि भारताची स्वरकोकिळा लता मंगेशकर हिच्या बाबतीत या सिद्धांताचा मला जेवढ्या तीव्रतेने प्रत्यय आला तेवढा एरव्ही तो क्वचितच कधी आला असेल!

दैनंदिन जीवनात अत्यंत साधी, निगर्वी असलेली अशी ही मुलगी. बांधा काहीसा कृश. आणि ओठांवर एक मिष्किल हसू सतत खेळत असलेले. पण हीच मुलगी जेव्हा गाणे म्हणण्यासाठी मायक्रोफोनसमोर उभी राहते तेव्हा तिच्यात केवढे विलक्षण परिवर्तन घडून येते. अशा वेळी तिच्याकडे बघताना भास होतो की तिची उंची अकस्मात खूप वाढली आहे, तिचे मस्तक आकाशालाही भेदून वर गेले आहे. तिच्या चमकदार डोळ्यांचे दोन पक्षी बनले आहेत आणि ते

पक्षी ढगांतून भराऱ्या मारीत चालले आहेत. बघता बघता लता अशी प्रचंड आणि सर्वव्यापी बनते की आपण तिच्यापुढे अगदी उपेक्षणीय, केवळ अंगुष्ठमात्र होतो आणि समोरच्या त्या गाणाऱ्या महान व्यक्तित्वाच्या पायांवर डोके टेकावेसे वाटते. खरोखर सांगतो, गाणाऱ्या लताकडे बघताना कितीदा तरी हा अनुभव मला स्वतःला आला आहे!

लताच्या बाबतीत मला नेहमी असे वाटते की गाणे हे श्वासोच्छ्वासापेक्षाही तिला अधिक सहज आणि स्वाभाविक होऊन बसले आहे. आणि यातच कलाकार म्हणून तिचे मोठेपण सामावले आहे. कोणी म्हणतात, लताचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा सोनेरी स्वर. कोणी म्हणतात तिचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे भावपूर्ण उच्चार. पण मला वाटते हे सत्य असले तरी संपूर्ण सत्य नव्हे. कोणतेही गाणे गाताना लता त्याच्याशी आपला आत्मा मिसळून ते गाते. गाण्याशी तिचे होणारे हे सायुज्य हेच तिच्या श्रेष्ठतेचे मुख्य लक्षण होय. प्रत्येक सुराचे आकलन करणारी तीव्र संवेदनाशीलता, संगीतातील नाट्याचा अचूक समज, स्वरांचे आघात, हेलकावे, स्वर कोठे लांबवावा व कोठे कमी करावा या सर्व गोष्टींचे तारतम्य—यांतले काहीही शिकवून येत नाही. शिकवून समजाविल्या जाणाऱ्या या गोष्टी नव्हेतच. लताला हे सारे जन्मजात लाभले आहे. हे सर्व ज्ञान घेऊनच जणू ती या जगात आली आहे. संगीताच्या क्षेत्रात लता ही खरोखर एक अद्‌भुत घटना आहे. मूर्त चमत्कार आहे. संगीतदिग्दर्शक या नात्याने तिच्याबरोबर काम करताना मला हे पुन्हा पुन्हा जाणवलेले आहे. नवी चाल समजावून देत असता ती ज्या तन्मयतेने ती ऐकते, चालीतला अगदी सूक्ष्म बारकावादेखील ती ज्या अचूकपणे हेरते, आणि कोणत्याही भाषेतले गाणे ती ज्या निर्दोष शब्दोच्चारांसह पुन्हा म्हणून दाखवते त्यामुळेच ती एक अव्वल दर्जाची कलावती झाली आहे. मी तर निःसंशय असे म्हणू शकतो की या जगात जे काही अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे कलावंत झाले आहेत, त्यांपैकी लता ही एक होय. लताच्या वरील गुणांचा निर्देश करताना एक गोष्ट सहज आठवली ती जाता जाता सांगावीशी वाटते. 'दो बिघा जमीन' या चित्रपटाच्या प्रारंभी श्रेयनामावलीच्या जोडीला जे पार्श्वसंगीत मी दिले होते ते केवळ एकदा ऐकून नंतर ते तिने जसेच्या तसे बिनचूक मला म्हणून दाखवले होते!

लताची आणि माझी ओळख चौदा वर्षांपूर्वी झाली. मी त्यावेळी 'दो बिघा जमीन' या चित्रपटाची पटकथा लिहिण्यासाठी आणि त्या चित्राचे संगीत देण्यासाठी प्रथमच मुंबईत आलो होतो. माझा आणि लताचाही एक जिव्हाळ्याचा स्नेही दिवंगत कवि शैलेंद्र याने लताची व माझी ओळख करून दिली. आमच्या त्या पहिल्या भेटीची स्मृती मी आमरण हृदयात जतन करून ठेवीन. त्यापूर्वी लताबद्दल मी खूप ऐकले होते. 'आये गा आनेवाला' हे तिचे गीत मला खूप आवडले होते. वर्षानुवर्षे ते माझ्या कानात गुंजत होते. अशी ती लता त्या दिवशी मी प्रत्यक्षात प्रथमच पाहात होतो. तिला बघताच मला आश्चर्याचा धक्का बसला. तिचा आत्यंतिक साधेपणा मला अगदी अनपेक्षित होता. तिचे सारे व्यक्तित्वच निगर्वी, ऋजू होते. तिच्या भेटीनंतर काही मिनिटांच्या अवधीतच आमची उभयतांची गट्टी जमली. अंधेरी येथे हृषिकेश मुकर्जी यांच्या घरी आमची ती पहिली भेट घडून आली. माझ्या काही बंगाली संगीतरचनांसंबंधी शैलेन्द्रने लताजवळ बरेच स्तुतिपर बोलून ठेवले होते. त्यामुळे ओळख झाल्याबरोबर लताने ती गाणी माझ्या तोंडून ऐकण्याची इच्छा प्रकट केली. आधुनिक बंगाली संगीतरचनेच्या क्षेत्रात त्यावेळी मी काही नवे प्रयोग करू इच्छीत होतो. माझा एक सिद्धांत होता. तो असा की बोलणे आणि गाणे या दोन्ही गोष्टी मूलतः एकमेकांपासून फारशा वेगळ्या नाहीत. बोलण्यातून जे जे काही सांगता येते ते ते सारे, तितक्याच स्पष्टपणे, परिणामकारकपणे संगीतातून प्रकट करता आले पाहिजे. बोलण्यात जो ओबडधोबडपणा असतो, जी ग्राम्यता क्वचित जाणवते, ती संगीतातही असते. असणे अपरिहार्य असते. एखाद्या भावनोत्कट आणि प्रामाणिक भाषणातून जी तीव्रता, आनंद, गांभीर्य

व्यक्त होऊ शकते ते सारे संगीतातून तसेच किंबहुना अधिक परिणामकारकपणे प्रकट होऊ शकेल. माझ्या मनात येई, एखाद्या वृत्तपत्रीय अग्रलेखाला जर व्यवस्थित चाल लावली तर तो गाऊन सुद्धा दाखवता येईल, आला पाहिजे. आणि उत्तम काव्याबद्दल माझे मत असे होते की ते संगीतापासून फारसे दूर नसतेच. काव्य आणि संगीत यांच्या सीमारेषा परस्परांना इतक्या भिडलेल्या असतात की काव्यवाचनाचे कोणत्याही क्षणी काव्यगायनात परिवर्तन होऊ शकते. माझ्या या सिद्धांताला अनुसरून मी काही बंगाली गीतांच्या चाली बसविल्या होत्या. सत्येन दत्त यांची 'पालखीचे भोई', सुकान्त यांची 'अबाक पृथिवी', 'रनर' या कवितांना मी माझ्या कल्पनेनुसार संगीतबद्ध केले होते. ही सर्व गीते हेमन्तदांनी गाइली होती आणि बंगाली जनतेने त्यांना अत्यंत उत्कटतेने प्रतिसाद दिला होता. ती सारीच गीते विलक्षण लोकप्रिय झाली होती. या कवितांना चाली देताना मी सर्व जुन्या परंपरा आणि संकेत मोडून टाकले होते. भारतीय संगीताची श्रुतींची मूळ बैठक मी कायम ठेवली होती. पण स्वरसंयोजन आणि स्वरविस्तार यांच्या बाबतीत मी खूपच स्वातंत्र्य घेतले होते. बंगाली श्रोतृवर्गामध्ये ही गीते अत्यंत लोकप्रिय झाली होती. पण बंगाली लोकांना मूळ काव्ये परिचित होती. त्यामुळे सामान्यतः कोणतीही जरा बरीशी चाल लावली तरी ती गाणी त्यांना आवडणे अगदी स्वाभाविक होते. पण ज्यांना बंगाली भाषा अवगत नाही अशा लोकांना माझ्या स्वररचना कितपत परिणामकारक वाटतील याबद्दल मनातून मी साशंक होतो. आणि म्हणून ती गाणी लताला ऐकवण्याची मला उत्सुकता होती. तिला अपरिचित असलेल्या बंगाली भाषेतली ही गाणी ऐकताना त्यांतले केवळ संगीतच तिला जाणवणार होते. आणि त्या विशुद्ध संगीताचा तिच्यावर कोणत्या रीतीने प्रभाव पडतो हे मला पहावयाचे होते, त्याचप्रमाणे भारतीय कानांना पारंपरिक दृष्ट्या जे संगीत कदाचित स्वीकारार्ह वाटणार नाही ते लताला कसे वाटते हे जाणून घेण्यासही मी आतुर होतो. पण माझ्या गाण्याचा लतावर प्रत्यक्ष जो परिणाम झाला तो इतका विलक्षण, की खुद्द मलाही तो अनपेक्षितच होता!

सुकान्त भट्टाचार्य यांची 'रनर' कविता माझ्या चालीने मी गात होतो. गाणे जवळजवळ संपत आले होते. इतक्यात, मी पाहिले तो लताचा चेहरा एकदम पांढराफटक पडला होता. तिचे ओठ थरथरत होते आणि तिची शुद्ध हरपत चालली होती. तिच्या दोन्ही डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहत होते. माझे गाणे एकदम थांबले. लता कोसळण्याच्या बेतात होती. शैलेंद्रने तिला सावरले आणि जवळच्या कोचावर तिला निजवले. नंतर त्याने तिच्या चेहऱ्यावर थंड पाणी शिंपडले. सुमारे दहा मिनिटांनी लता शुद्धीवर आली. ती उठून बसली आणि हसत हसत पण काहीशा ओशाळलेल्या स्वरात म्हणाली, "मला माफ करा. काय झालं एकाएकी, मलाही समजलं नाही." नंतरच्या काळात, मी त्या गाण्यातले काही भाग विसरून गेलो. पण लता मात्र ते गाणे मला जसेच्या तसे म्हणून दाखवीत असे. केवळ स्मरणातून.

हा सर्व प्रसंग मी काहीशा विस्ताराने येथे सांगितला आहे. तो एवढ्याचसाठी की तिच्याइतकी सूक्ष्म संवेदना असलेली आणि प्रतिसाद देणाऱ्या हृदयाची कलाकार मी त्यावेळी आयुष्यात पहिल्या प्रथम पाहत होतो. मला तर क्षणभर असे वाटले मी एका चुंबकाच्याच सान्निध्यात आहे—गाण्याचे आणि स्वराचे सूक्ष्मातिसूक्ष्म कणदेखील चटकन आकर्षून घेणाऱ्या चुंबकाच्या.

संगीतदिग्दर्शक या नात्याने मी मुंबईमध्ये गेली चौदा वर्षे वावरत आहे. या चौदा वर्षांमध्ये माझ्या बहुधा प्रत्येक चित्रपटात लता गाइली आहे. माझी किती तरी गाणी केवळ तिने गाइल्यामुळे अमर झाली आहेत. त्या गाण्यांचा स्वतंत्रपणे मला विचारच करता येत नाही. जेव्हा जेव्हा ती गाणी मला आठवतात, तेव्हा तेव्हा लताच्या स्वरांसहच ती मला ऐकू येतात. लताची कलावंत म्हणून थोरवी आहे ती ही की कोणतेही गाणे ती नुसते गात नाही. ती स्वतःच ते गाणे बनते. त्या गाण्याचे रक्त, मांस, चैतन्य—सारेच मुळी ती स्वतः झालेली असते.

गायिका म्हणून लताचे मोठेपण शब्दांमधून वर्णन करणे व्यर्थ आहे. टागोरांच्या कवित्वाची चिकित्सा करण्याइतकेच ते वेडेपणाचे होईल. पण गेली अनेक वर्षे लताबरोबर काम करताना तिच्यातल्या कलावंताचे विश्लेषण करण्याचा मात्र मी अनेकदा प्रयत्न केला आहे. तिच्यामध्ये खरोखरच काही असामान्य गुण आहेत. आणि त्यांनीच तिला इतर गायकगायिकांहून कितीतरी वरचे स्थान मिळवून दिले आहे. गायिका म्हणून लताचे जे मोठेपण आहे त्याची व्याख्या करणे फार अवघड आहे. गुलाबाच्या सुगंधाचे विश्लेषण करता येत नाही. कोकिळेच्या स्वरमाधुर्याची चिकित्सा करता येत नाही. तसेच काहीसे हे आहे. लता गाते उत्स्फूर्तपणे. तिच्या बाबतीत ते अत्यंत नैसर्गिकच आहे. असे वाटते की गाणे हे तिच्या व्यक्तित्वातच रुजलेले आहे. असा कलाकार शतकातून एकादाच जन्माला येतो.

लतावर लहरीपणाचा आरोप अनेकदा अनेकांनी केलेला आहे. ती अत्यंत अविश्वसनीय आहे असेही कोणी म्हणतात. मध्यंतरी तर तिच्यावर दोषारोप करण्याची एक पद्धतशीर मोहीमच उघडलेली होती. ध्वनिमुद्रणाला लता कधीच वेळेवर उपस्थित राहात नाही असा या मंडळींचा दावा होता. ध्वनिमुद्रणाच्या जागी लता प्रत्यक्ष आल्याखेरीज ती येईल की नाही याबद्दल कोणत्याही संगीत-दिग्दर्शकाला निश्चयाने हमी देता येत नाही अशी या आरोप करणारांची तक्रार होती व आहे. या आरोपात थोडेसे तथ्य आहे. आणि चित्रपट व्यावसायिकांनी याबद्दल तक्रार केली तर त्यांना दोषही देता येणार नाही. कारण चित्रपट व्यवसाय ही एक कला असली तरी त्याबरोबर तो एक धंदाही आहे. आणि धंदा म्हटला म्हणजे प्रत्येक गोष्ट तिथे अखेर रुपये-आणे-पैतच मोजली जाणार. म्हणून लतावर आरोप करणारांना मी दोष देणार नाही. पण त्याबरोबरच मला हेही माहीत आहे की गेली काही वर्षे लताची प्रकृती बरी नसते. आणि कित्येक वेळा प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे ध्वनि-मुद्रणाला हजर राहणे तिला केवळ अशक्य असते.


पण ही गोष्ट सोडली तरी लता अत्यंत 'मूडी' आहे, लहरी आहे हे मात्र अगदी खरे. तथापि याला लताचाही काही इलाज नाही. तिची आत्यंतिक तीव्र संवेदनाशीलता हेच तिच्या लहरीपणाचे कारण आहे. सतारीची ताणलेली तार असावी तसे तिचे मन ताणलेले असते. आणि लताने असेच असायलाही हवे आहे. ती अशी संवेदनाशील, हळवी नसती तर ती एवढी मोठी कलाकारही झाली नसती!

लताला चित्रपटांसाठी ठरीव पद्धतीची तीच ती गाणी पुन्हा पुन्हा गावी लागतात. याबद्दलची आपली नाराजी तिने कितीतरी वेळा मला बोलून दाखवली आहे. अनेकदा ती मला म्हणाली आहे, "पैशासाठी मला गावे लागते. केवळ गाण्यासाठी गाण्याचे समाधान मला किती क्वचित मिळते. खरोखरच, कधी कधी मला इतका कंटाळा येतो म्हणून सांगू!" लतासारख्या गायिकेचे हे दुःख जाणून घेणे अवघड नाही. कलेतील उदात्तता आणि सौंदर्य यांची तीव्र जाणीव असलेल्या, त्या उच्च पातळीचा सतत शोध घेऊ पाहणाऱ्या तिच्यासारख्या श्रेष्ठ कलावतीला अत्यंत सामान्य, थिल्लर गाणी केवळ व्यावसायिक कारणास्तव गावी लागतात हे दुर्दैवच होय. मला तर वाटते, कधी कधी अकस्मात उद्भवणारा तिचा आजार ही अशा सामान्य गाण्यांबद्दल तिच्या शरीरमनाची नकळत होणारी प्रतिक्रिया असावी! लता जर थोडी अधिक व्यवहारी असती, कमी लहरी असती तर आज मिळवला आहे त्याच्या पाचपट तरी पैसा तिने अगदी सहज मिळवला असता! मला एवढेच वाटते, तिची प्रकृती सुदृढ असावी; मन प्रसन्न, उल्लसित राहावे आणि या भारतीय संगीताच्या सम्राज्ञीची कारकीर्द आणखीही अनेक वर्षे अशीच गाजत राहावी.

एक कलावंत या नात्याने लताचा जो गौरव व्हायला हवा होता, जो मानसन्मान तिला मिळा-यला हवा होता, ते तिच्या बाबतीत घडलेले नाही याचे मला अत्यंत दुःख होते. कोणत्याही सांस्कृतिक प्रतिनिधिमंडळात लताचा आजपर्यंत का समावेश करण्यात आला नाही? तिला परदेशी

का पाठवले गेले नाही ? 'पद्मश्री'सारख्या पदव्या आजकाल इतक्या स्वस्त झालेल्या आपण पाहतो. लताला आजपर्यंत एकही पदवी का दिली गेली नाही ? लता काहीशी मनस्वी आहे, आपले वैचारिक स्वातंत्र्य जपणारी आहे, स्पष्टवक्ती आहे म्हणून तिची अशी उपेक्षा होते आहे काय ? प्रचलित सरकारी राजकारणात 'होयबा' म्हणून मान डोलावणे तिने नाकारले आहे म्हणून तिजवर सरकारचा हा रोष आहे काय ? लतासारख्या थोर कलावतीला आजवर कसलेही सरकारी मानाचे पान मिळू नये ही खरोखर शरमेची गोष्ट आहे—लताच्या दृष्टीने नव्हे, सरकारच्याच दृष्टीने ! एवढ्या मोठ्या कलाकाराचे गुण न ओळखणे ही जगातल्या कोणत्याही शासनाला लाज आणणारी घटना आहे. हा अक्षम्य अपराध आहे ! माझ्या मते भारतातली जास्तीत जास्त मोठ्या मानाची पदवी लताला दिली गेली पाहिजे. 'भारतरत्न' पदवीबद्दल बोलायचे झाले तर भारतातले सर्वाधिक तेजस्वी रत्न आज ती आहे !

मला माहीत आहे, लता या गोष्टीचा कधी विचारही करीत नाही. ती आज ज्या ठिकाणी उभी आहे ते स्थान इतके उंच आहे की तेथून ती मानसन्मानाच्या या टीचभर उंचीच्या जागांकडे खाली नजर टाकून हसून पाहू शकते. त्यांची उपेक्षा करू शकते. पण आपल्या दृष्टीने, शासनाच्या दृष्टीने, आपण तिचे गुण न जाणण्यात, त्यांवर राजमान्यतेचे शिक्कामोर्तब न करण्यात जो अरसिकपणा, जी कृतघ्नता आणि मनाची जी बधिरता दाखवली आहे त्याचे काय ? या अपराधाचे परिमार्जन आपण कसे करणार आहोत ?



जयसिंग आबदार

माझी धनीण

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. दिदी, त्यांची भांवडे असे आम्ही सर्व दिल्लीला गेलो होतो. दिल्लीहून परतताना आम्ही इंदूरला उतरलो. इंदूरला 'पिंपळापाला' नावाचे एक ठिकाण आहे. तेथे मोठी बाग आहे. तलाव आहे. मजेने सहलीसाठी म्हणून लोक इथे येतात. या 'पिंपळापाला' जागी उतरून, तेथे आम्ही सर्व मंडळी जेवण करणार होतो. 'पिंपळापाला' या ठिकाणी आम्ही येऊन पोहचलो. बरोबर दिदींची काही नातलग मंडळीही होती. बागेत म्युनिसिपल बंगला होता. पण तेथे उतरण्याचे 'परमिशन' आम्हाला मिळाले नव्हते. त्याचप्रमाणे कॅमेऱ्याचे रोल्सही आणायचे होते. म्हणून दिदींचे एक नातलग व मी गाडीतून म्युनिसिपल ऑफिसरकडे गेलो. तेथे एक ना दोन, अनेक गोष्टींत आम्ही असे गुंतून पडलो की सर्व कामे आटोपून परत यायला दुपारचा दीड वाजला. येईपर्यंत सैपाकाची काहीच तयारी नव्हती. ऊन कडाक्याचे. दुपार चढलेली. दिदींना आणि मुलांना खूप भुका लागल्या होत्या. मी लौकर आलो नाही या कारणाने दिदी संतापाने भडकल्या होत्या. दीडला मी येऊन गाडीतून उतरतो तोच त्या एकदम माझ्या अंगावर ओरडल्या,

"हरामखोर. नालायक. तू आताच्या आता इथून चालायला लाग!"

मी अवाक्षरही बोललो नाही. खरे म्हणजे माझा काहीच गुन्हा नव्हता. माझ्याबरोबर दिदींचे जे नातलग होते त्यांच्यामुळे आम्हाला यायला उशीर झाला होता. दिदींनाही त्याची कल्पना असावी. पण नातलगावरचा राग त्यांनी माझ्यावर काढला. मी मुकाट्याने सैपाक करवून घेण्याच्या कामाला लागलो. मुलांची, सऱ्यांची जेवणे आटोपताना चार वाजायला आले. त्यानंतर तेथील अंधशाळेची मुले बागेत आली आणि त्यांनी दिदींना गाणे म्हणून दाखवले. त्या बागेतलीच फुले तोडून हार करून त्यांनी दिदींना घातला. त्या मुलांच्या सहवासात दिदींची मनःस्थिती पालटली. त्या प्रसन्न झाल्या. दुपारचा कडक राग कोठच्या कोठे नाहीसा झाला. मग एकाएकी त्यांना माझी आठवण झाली. आणि मला जवळ बोलावून त्यांनी मला विचारले,

"जयसिंग, तू जेवलास की नाही?"

मी जेवलो नव्हतो. माझ्या जेवणाच्या आधीच सारे अन्न संपून गेले होते. मी उपाशी आहे हे पाहून दिदींचे मन कळवळले. त्यांनी मला लगेच वीस रुपये काढून दिले आणि कोठे तरी हॉटेलात जाऊन मला पोटभर जेवून यायला सांगितले.

दिदींकडच्या अखंड सोळा वर्षांच्या नोकरीतला हा एक आठवणीत राहिलेला प्रसंग. त्यांच्या रागाचा आणि त्यांच्या लोभाचा.

आणखी एक असाच प्रसंग आठवतो. त्यावेळी 'मेहबूब' स्टूडिओमध्ये 'गाईड' चित्रपटातल्या गाण्यांचे रेकॉर्डिंग चालू होते. मरहूम मेहबूबखान यांचा सीझर नावाचा भलाथोरला अल्सेशियन कुत्रा त्यावेळी अगदी दीनवाणा होऊन स्टूडिओत हिंडत असे. तो रेकॉर्डिंग थिएटरकडे तोंड वर करून दिदींना बघत होता. दिदींना त्या कुत्र्याबद्दल कुतूहल वाटले आणि रेकॉर्डिस्ट कौशिक यांजकडे त्यांनी चौकशी केली.

"हा प्राणी कोण? कुणाचा?"

तो कुत्रा मेहबूबखान यांचा असून त्यांच्या मृत्यूमुळे तो अगदी पोरका झाला असल्याचे कौशिक यांनी दिदींना सांगितले. दिदींना त्या कुत्र्याची दया आली. आणि त्यांनी मेहबूबखान यांचे चिरंजीव आयूब यांजकडे मला पाठवून सीझरची त्यांच्याजवळ मागणी केली. त्यांनी सीझरला घेऊन जाण्याची आम्हांला परवानगी दिली. मी दिदींना रेकॉर्डिंगनंतर घरी नेऊन सोडले. आणि पुन्हा गाडी घेऊन मेहबूब स्टूडिओत गेलो. नंतर सीझरला गाडीत घालून घरी घेऊन आलो. त्या दिवसापासून सीझरचा दिदींच्या परिवारात समावेश झाला. सीझर हा भला थोरला जंगी कुत्रा. त्याचे खाद्य रोज दोन किलो मटण आणि एक शेर दूध एवढे असे. मेहबूबखान गेल्यानंतर त्याची बिचाऱ्याची आबाळ होत होती. सीझर आमच्या घरी आल्यानंतर दिदींनी त्याची सर्व देखभाल माझ्यावर सोपवली. रोज सकाळी अच्छेर दूध, टोस्ट, दुपारी एक वाजता अर्धा किलो मटण, संध्याकाळी चार वाजता अच्छेर दूध, टोस्ट, रात्री नऊ वाजता पुन्हा अर्धा किलो मटण असा सीझरच्या आहाराचा भरभक्कम कार्यक्रम दिदींनी मला नेमून दिला. एके दिवशी दुपारी आमच्या घरातल्या सखाराम या नोकराने नेहमीप्रमाणे अर्धा किलो मटण सीझरला दिले होते. आणि ते खाऊन तो समोरचे भांडे खडखड खडखड वाजवीत होता. योगायोगाने त्याच वेळी दिदी तेथे आल्या. भांडे वाजवणारा सीझर पाहून त्यांच्या मनात आले, त्याची भूक बहुधा भागलेली नसावी. आणि म्हणूनच भांडे वाजवून तो इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत असावा. झाले. दिदींच्या रागाचा पारा एकदम चढला. तेवढ्यात गॅरेजमधून माझा आवाज त्यांच्या कानी पडला. सखारामनेही मला हाक मारली. मी धावतच वर आलो. मला बघताच दिदींनी एकदम माझ्या अंगावर ओरडून मला विचारले,

"याच्या जेवणाचे प्रमाण काय?"

"वेळी अर्धा किलो." मी म्हणालो.

"एवढे मोठे जनावर. अर्ध्या किलोने त्याला काय होणार?" दिदींचा राग ओसरला नव्हता. त्या पुन्हा ओरडल्या, "मटण माझ्या पैशाने येते. त्यात तुझे काय जाते! दुष्ट कुठला! उद्यापासून सीझरला दररोज दोन किलो मटण आणि दोन शेर दूध मिळाले पाहिजे. यात काही कमी झाले तर याद राखून ठेव."

असा हा सीझर दिदींचा फार आवडता आहे. आणि सीझरचीही पण दिदींवर तशीच भक्ती आहे. मध्यंतरी दिदींचा फार मोठा आजार होऊन गेला त्या वेळी सारा वेळ तो त्यांच्या खोलीत बिछान्याच्या पायथ्याशी बसून असे. दिदी बऱ्या होऊन हिंडू फिरू लागल्या तेव्हाच सीझरने त्यांची खोली सोडली.

याच सीझरमुळे आणखी एक चमत्कारिक प्रसंग एकदा माझ्यावर ओढवला होता. सूर्यग्रहणाचा

दिवस होता. सकाळी सूर्याला ग्रहण लागले होते. 'दे दान सुटे गिराण' ओरडत रस्त्यावरून भिकारी धावत होते. तेवढ्यात सीझर माझी नजर चुकवून बाहेर गेला. वाटेत त्याला रबर रिंग मिळाली. ती दातांत धरून तो बाजूच्या बिल्डिंगमध्ये जाऊन बसला. ते कोणाच्याच ध्यानी आले नाही. पण सीझर एकाएकी दिसेनासा झाला. त्यामुळे रस्त्यावरच्या भिकाऱ्यांनी त्याला चोरून नेला की काय अशी सर्वांना भीती वाटली आणि सीझरच्या शोधासाठी एकच धावाधाव सुरू झाली. माई एकीकडे टॅक्सी करून गेल्या. उषाताई आणखी कोणाला तरी बरोबर घेऊन दुसरीकडे गेल्या. मीही त्याला शोध शोध शोधले. पण कुठेच सीझरचा पत्ता नाही. मी खट्टू होऊन घरी परत आलो. दिदींकडून मला एकदम निरोप आला, "गाडीच्या किल्ल्या वरती आणून दे." मी भीत भीत दिदींसमोर जाऊन दाखल झालो.

"सीझर कुठे आहे?" त्यांनी मला शांतपणे विचारले. त्या शांतपणामागे केवढा संताप भरलेला होता हे अनुभवाने मला चांगले ठाऊक होते. मी काहीच बोललो नाही.

"गाडीच्या किल्ल्या आणून दे अन् तू कुठेही चालता हो." त्याच स्वरात दिदी म्हणाल्या आणि त्या बाजूला वळल्या.

मला ब्रह्मांड आठवले. थोडा वेळ जातो न जातो तो आमच्या सखारामने सीझरला शोधून आणला. त्याला पाहून साऱ्यांचा जीव भांड्यात पडला. त्या दिवशी घरातली सर्व मंडळी 'खैबर'मध्ये जेवायला जाणार होती. पण सीझर हरवल्यामुळे जेवण लांबणीवर पडले होते. सीझर सापडला त्या आनंदात सारी माणसे जेवायला निघाली. दिदींनी मला गाडी काढायला सांगितली. आम्ही 'खैबर'-जवळ येऊन पोहोचलो. 'खैबर'च्या अलिकडेच 'न्हिदम हाऊस' आहे. तेथून गाडी जात असता दिदींना एकदम मी मागे केव्हा तरी त्यांच्याजवळ रेडिओ मागितला होता त्या गोष्टीचे स्मरण झाले. त्यांनी ताबडतोब मला प्रेमाने फर्मावले,

"जयसिंग, तू दुकानात जा आणि तुला आवडेल ते रेडिओचे मॉडेल तू आपल्यासाठी घेऊन ये."

सीझर हरवल्यामुळे घटकेपूर्वी दिदी माझ्यावर केवढ्या तरी संतापल्या होत्या. पण त्या प्रकरणाचे पर्यवसान शेवटी मला एक उत्तम रेडिओ मिळण्यात झाले.

आज कित्येक वर्षे या मंगेशकर कुटुंबात मी वावरतो आहे. आता तर मी या कुटुंबातलाच एक बनलो आहे. दिदींची मी प्रत्यक्ष चाकरीच बजावतो आहे. पण घरातल्या इतर मंडळींशीही तेवढेच ऋणानुबंध, तेवढेच जवळचे नाते जडले आहे. हे कलावंतांचे घर आहे. प्रत्येकाची तऱ्हा वेगळी. प्रत्येकाची लहर निराळी. प्रत्येकाची रागलोभाची रीत निराळी. पण सारी माणसे मनाने प्रेमळ आहेत. हे घर उदार आहे. आल्यागेल्यांची चौकशी करणारे आहे. माणसांचे यांना अगत्य आहे. नोकराचाकरांना बोलणी बसतील. पण त्यांच्या खाण्यापिण्यांत, कपड्यालत्त्यांत औषधपाण्यांत कधी कसूर होणार नाही. सणासुदीला बक्षिसे भरपूर वाटली जातील. आणि अडीअडचणीला आपुलकीने बसघरीत मदत केली जाईल. त्यामुळे जो एकदा कामाच्या निमित्ताने इथे आला त्याला सतत याच घराची, याच माणसांची सेवा करावीशी वाटते. माझा अनुभव हाच आहे.

घरातले वडीलधारे माणूस म्हणजे आमच्या माई. त्या आमचे अनेक अपराध सहन करतात. दिदींपर्यंत त्या गोष्टी सहसा जाऊ देत नाहीत. कारण केस एकदा 'त्या' कोर्टात गेली की तिचा कायमचाच निकाल लागतो. तेथे अपील नाही. आमच्या आशाताई या फार प्रेमळ. केवळ दयेचा सागर. पण या सागराची भरतीओहोटी सतत चालू असते. आणि त्यात कधी तुफान किंवा चक्री वादळ झाले तर मग बचावयलाच नको. मोठमोठी जहाजेही त्यात गडप होतात आणि भलेथोरले वृक्षही कोसळून पडतात. उषाताई ही या घरातली अत्यंत कडक व शिस्तशीर मुलगी आहे. त्यांचा

चढलेला आवाज कानी आला की आम्ही नोकर लोक जागच्या जागी बर्फासारखे थंड होतो. त्य' आसपास दिसल्या की काम करीत नसलो तरी कामात गढून गेल्याचे 'ॲक्टिंग' आम्ही त्यांना करून दाखवतो. कामात एवढेसे काही बिघडले तर उषाताई सारे घर डोक्यावर घेतात. अशा वेळी त्यांचा आवाज सातव्या मजल्यापर्यंत पोहोचतो. पण एक गोष्ट मात्र अगदी खरी आहे. ही एक मुलगी घरात आहे म्हणून ठीक आहे. नाहीतर आम्ही बदमाषांनी मंगेशकरांचे घर कदाचित केव्हाच लुटून नेले असते.

मीनाताई आणि बाळासाहेब ही या घरांतली शांत व सोशिक माणसे आहेत. मीनाताईंना तर मी बहीणच मानले आहे. आणि त्यांनीही पण मनाच्या मोठेपणाने माझे गरीबाचे भावाचे नाते गोड करून घेतले आहे. त्यांच्या मुलांचा मला खूप लळा आहे. बाळासाहेबांचे थोडक्यात वर्णन करणे मला जमणारच नाही. मी तर त्यांना संत गाडगेमहाराजांचीच उपमा देत असतो. हिंदुधर्म, देव, देश यांचे ते खरे भक्त आहेत. वाचनाची आवड इतकी की सारा वेळ ते ग्रंथांच्या संगतीत घालवतात. त्या खालोखाल वेड गाण्याचे. या मुलाची राहणी अत्यंत साधी आहे. हा आपला एकुलता एक मुलगा म्हणून माई त्यांचे खूप लाड करतात. त्यांनी बाळासाहेबांना भारी किंमतीचे अनेक सूट शिवले आहेत. पण त्यांनी कधी ते अंगालाही लावले नाहीत. एक साधी विजार कुडता असला की बाळासाहेब खूष.

दिदींचा स्वभाव अत्यंत प्रेमळ आहे. पण पुष्कळदा घरात त्यांचे काही बिनसले असले किंवा प्रकृती बरी नसली किंवा रेकॉर्डिंगला जाताना न्याहारी मिळालेली नसली की झाले. मग सारा राग, संताप बिचाऱ्या ड्रायव्हरवर म्हणजे माझ्यावर निघतो. पण तो राग जातोही तेवढ्याच झटकन. दिदींना फोटोग्राफीचा मोठा छंद आहे. त्यासाठी कॅमेऱ्याचे रोल्स खरेदी करणे, निगेटिव्हज डेव्हल-पिंगला व प्रिंटिंगला देणे, फोटोंचा 'साइझ' सांगणे व तसे फोटो करवून आणणे ही सर्व कामे मला करावी लागतात. तो तपशील नेमका कधी माझ्या ध्यानात राहत नाही. मी त्यात अनेक चुका व गोंधळ करतो. की दिदी चिडल्याच. मग एक रोल कोपऱ्यात फेकला जातो. दुसरे प्रिंट सरळ खिडकीतून रस्त्यावर भिरकावले जाते. मी जीव मुठीत धरून थरथरत बाजूला उभा असतो.


पण याच रागीट दिदी कधी कधी एकदम भावनावश होऊन मला म्हणतात, "जयसिंग, मी जोवर लता मंगेशकर आहे, तोवरच तुला काय हवे ते माझ्याकडून मागून घे. अरे, माझ्यातून 'लता' निघून गेली तर तुला काही मिळणार नाही. तू माझ्याकडे फार कष्ट केले आहेस. मी तुला दहा हजार रुपये देते. ते घे. कोल्हापूरला घर बांध. मुलाबाळांना आसरा निर्माण करून ठेव. पुढे त्यांना सुख लाभेल."

पण मी असा आळशी की हे काहीही मी अजून केलेले नाही. मनात येते, अशी दिलदार धनीण आहे हेच मोठे भाग्य. आणखी मला काय हवे?

दिदींबरोबर मी हजारो मैलांचा प्रवास आजवर केला आहे. जी त्यांची गाणी पुढे खूप गाजतात ती अगदी पहिल्याप्रथम रेकॉर्डिंगच्या वेळी ऐकण्याची दुर्मिळ संधी मला मिळाली आहे. त्यांच्या-बरोबर मी जेथे जेथे जातो तेथे तेथे त्यांच्यामुळे मलाही मोठेपणा मिळतो. मेजवान्या मिळतात. पण पंचपक्वान्नांच्या मेजवान्यांप्रमाणे इतर 'मेजवान्या' ही कधीकधी खाव्या लागतात. एकदा रॅमनार्ड थिएटरसमोर दिदींची गाडी मी थांबवली होती. त्यावेळी एकदम काही गुंडांनी गाडी घेरली आणि ते ओरडू लागले, "ए लता, गाणा गावो. नागिण का गाणा सुनावो." ते शब्द ऐकले आणि माझे संतापाने डोकेच भडकले. मी गाडीतून खाली उतरलो आणि त्या गुंडांना भरपूर चोप दिला. पण मी एकटा. ते अनेक. त्यामुळे मला अर्थातच जास्त मार खावा लागला. आजही तो प्रसंग आठवला की मोठी मौज वाटते.

अशा आमच्या दिदी. त्यांच्या गाण्यांचा, त्यांच्या अफाट प्रसिद्धीचा, जनतेच्या त्यांच्यावरील प्रेमाचा मला फार अभिमान वाटतो. परवा त्यांना मोठा आजार होऊन गेला. त्यावेळी देशाच्या सर्व कोनाकोपऱ्यांतून, तशाच परदेशांतूनही असंख्य तारा व पत्रे केवळ त्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी व त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येत होती. कोणी त्यांच्यासाठी नवस केले होते. कोणी देव पाण्यात ठेवले होते. इतका साऱ्यांचा त्यांच्यावर जीव आहे.

दिदी एवढ्या मोठ्या कलावंत पण आमच्या सरकारला काही अद्याप त्यांना पदवी द्यायचे सुचत नाही. न सुचो. मला तर असे वाटते की दिदींचे नाव हीच त्यांची मोठी पदवी आहे. 'लता मंगेशकर' या नावापेक्षा मोठे नाव, मोठा किताब काय असू शकेल? माझी खात्री आहे की पुढल्या पिढीत उत्तम गायिकांना 'लता मंगेशकर' हीच पदवी दिली जाईल.



जयसिंग आबदार

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

मुली, औक्षवंत हो

"राज्य सुखी या साधुमुळे—शूरा मी वंदिले—" 'राज्य सुखी या साधुमुळे' नंतरच्या 'शूरा' मधल्या 'रा' ह्या अक्षरावर सभागृहातून विजेच्या वेगाने आणि विजेच्या लखलखाटाने एखादा तीर सूं सूं करीत जावा तशी त्या चिमुकल्या गळ्यातून तान गेली आणि सभेचा लक्ष्यवेध झाला. त्या सात-आठ वर्षांच्या चिमण्या जीवाला आपण काय केले याची कल्पना तरी होती की नाही देव जाणे. सगळ्या पॅलेस थिएटरचे भान त्या सुराबरोबर हरपले. एक एवढीशी हडकुळी, पण अंतर्बाह्य आत्मविश्वासाने फुललेली मुलगी रंगभूमीवर येते काय आणि फार फार तर 'घेउनि ये पंखा' म्हणायच्या वयात एकदम 'शूरा मी वंदिले' सुरू करते काय. बाबालाल तबलजी एखाद्या अनुभवी गायकाबरोबर धरावा तसला जबऱ्या दिमाखाचा ठेका काय धरतात आणि पदांची अस्ताई संपवून पहिल्या समेला येताना ही पोरगी पुरे सप्तक भेदून लयीचा तो बिकट बोजा सांभाळून समेवर येते काय! कोल्हापूरच्या त्या पॅलेस थिएटरात, संगीतातल्या दिग्गजांनी ज्या रंगमंचावरून सुरांच्या बरसातीचे साक्षात्कार घडवले आहेत त्याच स्थानावरून एका परकऱ्या पोरीने हे नवल वर्तवले होते. आश्चर्य, आनंद आणि त्या पोरीच्या कर्तबगार पित्याची आठवण असल्या नानाविध भावनांनी त्या मंदिरातल्या श्रोत्यांच्या अंगावर रोमांच फुलले. कडकडून टाळी झाली नुसती पहिल्या समेला! मी मी म्हणणारांनी स्वतःला चिमटा घेऊन पाहिले असेल की आपण हे ऐकतो आहो ते खरेच आहे की हे स्वप्न आहे. त्या तानेचा दाणान् दाणा स्वच्छ होता, सुरात भिजलेला होता, लयीच्या कणकणाचा अंदाज बिनचूक होता, समेवरची झडप तर कशी घारीसारखी होती. समोरचे ते एवढेसे परकरपोलक्यातले दर्शन नसते तर एखाद्याला वाटले असते की कुणी तपातपाची मेहनत झालेली बुजुर्ग बाई केवळ चूष म्हणून बाल आवाजीत पलटा घेऊन गेली. यापूर्वी फक्त कुमार गंधर्वांनी वयाच्या नवव्या वर्षी मुंबईच्या जिना हॉलमध्ये असला धक्का दिला होता. बालगंधर्वांनी आणखी काही वर्षांपूर्वी अशाच बालवयात रंगभूमीवर येऊन असंख्य अंतःकरणे आपल्या सुरांनी झेलली होती. आणि आता हा एक नवा चमत्कार घडत होता. बालगंधर्व, कुमार गंधर्व आणि लता मंगेशकर! तिघांनी संगीतातल्या तीन निरनिराळ्या वाटा धरल्या आणि आपापल्या असामान्यत्वाने

उजळून ठेवल्या. संगीताच्या क्षेत्रात परंपरेचे स्थान मोठे मानले जाते. कलावंत मंडळी आपापल्या कुळाचा आणि गोत्राचा फार मोठा अभिमान बाळगत असतात. कित्येकदा तर काही जण त्य गोत्राच्याच मोठेपणावर नांदू पाहातात. पण सूर आणि लय यांनाच शंकर-पार्वती मानून गाणारे फार थोडे कलावंत मी पाहिले. 'झरा मूळचाचि खरा' म्हणजे काय ते ह्या कलावंतांचे गाणे ऐकताना कळते—मग ते "मम सुखाची ठेव देवा" असो, "म्हारो जी भूलो ना माने" असो, किंवा "आये गा आनेवाला" असो. चिमुकली लता 'शूरां मी वंदिले' म्हणून गेली त्याला पंचवीस वर्षे झाली. दीनानाथांचे सूर हवेतून विरले नव्हते. त्यांची धैर्यधराच्या भूमिकेतली ती गाणी, चमत्कृतींनी नटलेल्या गळ्यांतून आलेल्या त्या जागा लोकांच्या कानांत होत्या. त्यामुळे 'शूरा मी वंदिले' ऐकल्यावर लोक म्हणाले, "वा—दीनानाथांची आठवण झाली." त्यानंतर मात्र या त्यांच्या लाडक्या कन्येने वडलांचेच व्रत चालवले. वडलांची नक्कल करण्याचे नव्हे. ते त्या मानी गायकालाही रुचले नसते. त्याने तर मराठी रंगभूमीवर स्वतःची गायकी निर्माण केली होती. दीनानाथराव दीनानाथरावांसारखेच गात होते. त्यांच्या मुलीने हेच व्रत पुढे चालवले. त्यानंतर लता ही लतासारखीच गात आली. ह्या काळात अनेक नवीन गायिका चित्रपटांतली गाणी म्हणण्यासाठी आल्या. त्यांची धडपड 'डिट्टो लता' व्हायची होती. त्यातल्या कुणी 'लताची आठवण करून देतात' अशीही तारीफ झाली असेल. पण संगीताच्याच काय कुठल्याही कलेच्या क्षेत्रात अमक्या तमक्याची आठवण करून देणारा कलावंत सदैव दुय्यम दर्जाचा मानकरी होऊन राहतो. लताने गेल्या पंचवीस वर्षांत गझल, ठुमऱ्या, दादरे आणि हजारो विविध चालींनी नटलेली गाणी म्हटली—पण त्यांत तिने आठवण फक्त लताचीच करून दिली. कलावंत 'या सम हा' होतो तो असा!

लयीच्या आणि सुरांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म कणांनी जेव्हा चैतन्य धारण केलेले असते त्यावेळी त्या गाण्याची कोणी जातवारी पाहात नसतात. उगीचच भयंकर धीमा एकताल लावून दहा मात्रांपर्यंत सुरांच्या माशा हाकलीत जायचे आणि मग झोपेतून जाग आल्यासारखे शेवटच्या एकदोन मात्रांवरून उडी मारून समेच्या नाक्यावरची जकात चुकवायची आणि ख्याल गायक म्हणून मोठेपणा मिरवायचा याला काही अर्थ काही. संगीतात लयीतला प्रत्येक क्षण हा सुरांच्या मजकुराने भरून काढावा लागतो—नव्हे, तिथला सुरांचा अभाव असलेला विराम हा देखील बोलका असावा लागतो. चित्रपटासाठी गाइलेल्या साडेतीन मिनिटांच्या गाण्याला देखील चांगल्या ख्याल गायकाइतकीच लयकारीची जाणीव असावी लागते. लताचा सूर सारेच मानतात पण निर्मळ मनाने सर्व तऱ्हेच्या संगीताचा आस्वाद घेणारांना जर मंत्रमुग्ध करणारी कुठली गोष्ट असेल तर शब्दांची फेक करताना दिसणारी लताची विलक्षण मोठी अशी लयकारीची जाणीव! तिच्या सुराइतकीच सूक्ष्म. ढोबळ लयकारी नव्हे. एखाद्या फुलपाखराच्या पावलांनी लयीच्या एका कणावरून दुसऱ्या कणावर अल्लाद उडणारी. कुमार, बालगंधर्व आणि लता ह्यांना वरदान आहे ते लयकारीच्या ह्या अलौकिक जाणकारीचे! गाण्यात बोलत असते ती लय. आणि म्हणूनच लयीच्या जाणिवेचे हे दुर्मिळ दान घेऊन आलेल्या या कलावंतांनी गाइलेले गाणे दुसऱ्या कोणीही म्हटले की काहीतरी कमी आहे असे वाटते. लताची गाणी तर खूप चांगला आवाज असलेल्या कितीतरी मुली गातात. आवाजाची टीप गाठतात. पण मूळ चित्र आणि त्याचा प्रिंट यांत असतो तसा फरक दिसतो. याचे कारण लयीच्या सूक्ष्मतेच्या जाणिवेचा अभाव.

सुरांच्या वर्तुळातला मध्यबिंदू पकडणारा आणि लयकारीत वाहत्या काळातला निमिषानिमिषातला लक्षांश पकडणारा हा लताचा गळा आहे. आणि म्हणूनच तिच्या गीतातले शब्दच नव्हे तर व्यंजनमुक्त स्वरही आज किती आशयगर्भ वाटतात. लता 'धीरेसे आजा' म्हणून लोरी गाते पण 'आजा' नंतरचा तो स्वरांचा हलकासा शिडकावा लयीच्या अशा जागेवरून उठतो की त्याने कसल्या तरी परतत्त्वाचा स्पर्श केल्यासारखा वाटतो. ह्या साऱ्या उठावणी कमालीच्या मुष्किल आहेत. केवळ

स्वरांच्या करामतीमुळे नव्हे, उठावासाठी पकडलेल्या, साध्या नजरेला न दिसणाऱ्या स्थानांमुळे. लताच्या गाण्यातले असामान्यत्व मला तरी भासते ते इथे. झोप उडविणाऱ्या त्या अंगाई गीतातल्या स्वरांच्या शिडकाव्यासारखे कितीतरी शिडकावे आज तिने गाइलेल्या शेकडो तबकड्यांच्या रंध्ररंध्रातून लपलेले आहेत. तबकडीच्या त्या रंध्रात शिरून तिला गाती करणाऱ्या त्या सुईचे अग्र अधिक सूक्ष्म की त्या रंध्रातून उमटणारा लताचा सूर अधिक सूक्ष्म हे सांगणे कठीण आहे. होनाजीच्या भूपाळीतल्या 'आनंद कंदा प्रभात झाली' मध्ये वरच्या षड्जावर 'ई'कार लागला आहे. तो असाच सुराची सुई घुसल्यासारखा. 'जा जा रे जा साजना' मध्ये अशीच एक मूर्च्छनेसारखी जागा आहे. 'कैसे दिन बीते कैसे बीती रतिया' मध्ये 'हाये' वर अशीच एक सुरांची पखरण आहे. अशी किती म्हणून उदाहरणे दाखवायची? माडगूळकरांच्या 'जोगिया' कवितेतल्या नायिकेच्या गळ्यातून सूर उमटल्याचे वर्णन त्यांनी 'स्वरवेल थरथरे फूल उमलते ओठी' असे केले आहे. लताचे कुठलेही गीत ऐकताना मला ही ओळ आठवते. तिने गायलेले प्रत्येक गीत हे स्वरलतेवरचे फूलच आहे. अशी शेकडो फुले गेल्या पंचवीस वर्षांत फुलली आणि किती सहज सहज फुलल्यासारखी फुलली. शब्द, सूर आणि लय यांचे विलक्षण आकार, गंध आणि रंग घेऊन प्रकटलेल्या फुलांचे हे नंदनवन आहे.

मला नेहमी वाटते की मुंबईसारख्या शहरात एक संगीताचे टोलेजंग म्युझियम असावे. चित्रकलेचे किंवा इतर वस्तूंचे असते तसे. त्यात टेप्सवरून किंवा तबकड्यांवरून देशोदेशीचे आणि सर्व प्रकारचे संगीत ध्वनिमुद्रित करून ज्याला जे ऐकावेसे वाटेल ते ऐकवण्यासाठी छोटी छोटी दालने करावीत. हे सारे गायक व गायिका दिसत कसे होते, बोलत कसे होते, राहात कसे होते, हे दाखविणारी चित्रे आणि डॉक्युमेंटरीज कराव्यात. देशोदेशीच्या संगीताच्या इतिहासाची, शास्त्राची, कलावंतांच्या चरित्रांची तिथे मोठी लायब्ररी करावी. पुस्तकांची लायब्ररी, तबकड्यांची लायब्ररी, टेप्सची–डॉक्युमेंटरीजची लायब्ररी. सुरलयीच्या तृषार्तांनी यावे आणि तृप्त होऊन जावे. त्या लायब्ररीत एक पडवी फक्त लताच्या गीतांची होईल. इतक्या विविध प्रकारची गाणी गाइलेली दुसरी गायिका माझ्या तरी माहितीत नाही. आज पंचवीस वर्षे अहोरात्र या अलौकिक सुरांची उधळण चालू आहे. आमची पहाट लताच्या सुरांबरोबर उमलते, मांध्यान्ह, सांज, रात्र, मध्यरात्र ह्याच सुरांची साथ घेऊन येतात. वातावरणात कुठे ना कुठे तरी लताचा स्वर मावळत्या किंवा उगवत्या सूर्य-चंद्राच्या साक्षीने विहरत असतो. रेडियोतल्या एका इंजिनियरने मला सांगितले होते की साऱ्या जगात दुसऱ्या कुठल्याही गायकगायिकेच्या स्वराला वायुमंडलातल्या ध्वनिलहरींवरून इतका अव्याहत संचार करायचे भाग्य लाभलेले नाही. मला त्या विधानात अजिबात अतिशयोक्ती वाटत नाही. लताच्या सुरांची कधी, कुठे आणि कशी गाठ पडेल कुणी सांगावे? अनिलांच्या कवितेतली एक ओळ आहे :

'आज अचानक गाठ पडे—
भलत्या वेळीं भलत्या मेळीं
असता मन भलतीच कडे—'

कितीतरी प्रसंग आठवतात. भारतापासून शेकडो मैल दूर अशा इंडोनेशियातून प्रवास करीत होतो. दंडकारण्यातल्या जनस्थानासारख्या वस्तीत, ज्यांना आमच्या भाषेचा आणि आमच्या संगीताचा कुठलाही संस्कार नाही असा इंडोनेशियन ग्रामवासीयांचा छोटासा मेळावा फोनो लावून लताची गाणी ऐकत बसला होता. चिनी आक्रमणाच्या काळात हिमालयाच्या शिखरावर एका छावणीतल्या तंबूतली गोष्ट. लडाखच्या यात्रेत असताना आम्ही तिथे जाऊन पोहोचलो होतो. आठदहा सैनिकांच्या चिमुकल्या तुकडीला त्या जीवघेण्या थंडीत आणि त्या थंडीहून अधिक गारठून टाकणाऱ्या विजन-

वासातल्या भयाण एकान्तात सोबत होती ट्रँन्झिस्टरवरच्या लताच्या गीतांची. सैनिकांच्या कुरबानीची याद करा अशी लताच्या आवाजातली ती आर्त हाक लक्षलक्ष डोळ्यांच्या कडा भिजवून गेली. पण हिमशिखरावर लताचा आवाज ऐकताना तन्मय झालेल्या त्या जवानांच्या तुकडीकडे पाहून वाटले की जवानांच्या कुरबानीइतकीच ह्या अलौकिक आवाजाची जगावर केवढी मोठी मेहरबानी आहे. इंडोनेशियातले ते ग्रामवासी किंवा हिमालयावरचे आमचे जवान ही तर साधी माणसे. गायनशास्त्रातले कोणी पंडित नव्हेत. पण अल्लादिया खाँसाहेबांचे चिरंजीव भूर्जीखाँ म्हणजे शास्त्रीय संगीतातले केवढे मोठे विद्वान गृहस्थ. मी त्यांना भेटायला गेलो होतो, त्यावेळी लताच्या गाण्याची तबकडी ऐकण्यात रंगले होते. 'आयेगा आनेवाला' ऐकून कुमार गंधर्व म्हणाले, "तंबोऱ्यातून निघणारा गंधार ऐकायचा असेल तर लताच्या गळ्यातून ऐका." आडगावच्या गावठ्या मंडळींच्या अड्ड्या-पासून तो मलबार हिलवरच्या बंगल्यात राहणारांपर्यंत आणि शाळकरी पोरांपासून तो जख्ख म्हाताऱ्या-पर्यंत साऱ्यांनाच आपल्या स्वरांच्या जादूने भारून टाकणारी ही लता—लता कसली, चित्रपटसृष्टीला लाभलेली ही कल्पलताच आहे. सुरांच्या याचकाने जे मागावे ते देणारी. गझल, ठुमरी, दादरा, कवाली, भजन, पाळणे, लोकगीते, भावगीते, बालगीते, खानदानी संगीताच्या वळणाची गाणी ...मागणाराने मागत जावे. असली विविधता आणि तीसुद्धा असल्या दर्जाने दिसणारी, भारतीय संगीतात यापूर्वी कुणाच्याही गळ्यातून आली नसेल. हल्ली इलेक्ट्रॉनिक्सच्या साहाय्याने कॉम्प्यूटर्स म्हणतात त्या यंत्रावर वैज्ञानिकांनी अनेक चमत्कार करून दाखवायला सुरवात केली आहे. मानवी मेंदूला न साधणारे अनेक बौद्धिक पराक्रम ही यंत्रे करतात. उदाहरणार्थ, जे हिशेब करायला पंचवीस कारकुनांना एक महिना लागेल ते ही यंत्रे काही सेकंदांत करतात. लता हा संगीतातला देवाच्या दुनियेतून आलेला कॉम्प्यूटरच आहे. गळ्यातून एक जागा निघावी म्हणून एकेका गायक-गायिकेने जिथे मेहनतीचे पहाड फोडले त्या बिकट जागा, त्या ताना, त्या मुरक्या, लयकारीचे ते सूक्ष्म भेद ती सहज करून जाते. शास्त्रीय संगीतातली जातकुळी असलेले एखादे सिनेमातले गाणे असते. लताची त्या गीतातली तान ऐशी गेलेली असते की मी मी म्हणणाऱ्या उस्तादांनी आणि पंडितांनी मनाचा तितका प्रांजळपणा असला तर स्वतःचे कान पकडावे. मला खात्री आहे की उद्या एखाद्या पाश्चात्य संगीतदिग्दर्शकाने लताला जर इंग्लिश गाणे गायला बोलावले तर ह्या बाई तिकडल्या तमाम गाणाऱ्या मडमांना संकटात टाकतील. लताच्या सुराला 'अटक गमे जेथे दुःसहा' अशीच जिद्द आहे.

देवटाक्याच्या पाण्यासारखा हा गळा. रंग टाकणाराने आपल्या रंगाच्या निवडीची कमाल करावी. हा गळा त्या त्या रंगाची स्वरपुष्पे क्षणात फुलवून दाखवतो. हा स्वरच मुळी परिसाचा धर्म घेऊन आलेला. स्पर्श झाला की कशाचेही सोनेच व्हायचे. नुसता स्वरच काय अभिनयाची जाणकारी फार मोठी. चित्रपटातले गाणे हे संवादासारखे अभिनीत करायचे असते. मला तर लताला प्लेबॅक आर्टिस्ट का म्हणतात तेच कळत नाही. तिच्या गाण्यांना त्या नट्यांच्या अभिनयाचा प्लेबॅक असतो. बहुधा तो तिच्या शब्दस्वरांतून उमटलेल्या भावनांच्या उंचीला पोहोचत नाही. 'धूल का फूल' नावाच्या बोलपटातले 'तू मेरे प्यारका फूल है—' गाणे लताने म्हटले आहे. एका बेवारशी गणल्या जाणाऱ्या अर्भकाची आई हे गीत गाते आहे. अभिनय आणि संगीत ह्या दोन्ही दृष्टींनी ह्या गीताचा अभ्यास करावा. लताने त्या गीतांतला एक एक शब्द लयीच्या प्रवाहावर फुलाची एक एक पाकळी सोडावी तसा सोडला आहे. तिने म्हटलेल्या गीतांना कित्येकदा पडद्यावरच्या नटीच्या ओठांची, स्वतःच्या चेहऱ्याची घडी विस्कटू न देता सुरू झालेली निर्जीव हालचाल पाहिली की वाटते लताच्या गाण्याच्या वेळी या पडद्यावरच्या नटींना पडद्याआडच ठेवावे आणि कॅमेरा केवळ चंद्र, सूर्य, तारे, पाने फुले, पाणी, नद्या, डोंगर असल्या दृश्यांच्या दिशेला फिरवावा. आपल्या स्वरांनी आणि स्वराइतक्याच रेखीव अभिनयाने फुललेल्या गीतांनी लता अशी जादूनगरी उभी करते. त्यात

कित्येकदा त्या नटीच्या ओठांची निष्प्राण हालचाल लताच्या सुरांना दिलेल्या वरवरच्या लिपसिंपथी-सारखी खोटी वाटते. म्हणून मला वाटते की लता कसली पार्श्वगायिका–तिच्या गीताच्या अभिव्यक्तीतून होणाऱ्या भावनांच्या पातळीला न पोहोचणाऱ्या नटी या पार्श्वनायिका आहेत.

हिंदी चित्रपट हा काही माझ्या फारशा सलोख्याचा विषय नाही. पण अनेक तारे आणि तारकांनी चमचमणाऱ्या या अंगणातून उद्या लता आणि आशा ह्या भगिनींनी आम्हाला वगळा म्हटले तर ही तारांगणे एका क्षणात हतप्रभ होतील. सिलोन रेडिओचा व्यापार विभाग डळमळायला लागेल आणि आमची आकाशवाणी केविलवाणी होऊन जाईल. हिंदी चित्रपटांची दुनिया तर तिथल्या संगीतदिग्दर्शकांनी आणि मुख्यतः लताच्या आवाजाने तगवून धरली आहे. हे म्हणजे मिलिट्रीच्या बँडवाल्यांनी एखाद्या राष्ट्राचे संरक्षण केल्यापैकीच आहे. संगीत दिग्दर्शकाच्या भाग्याने लता नावाचा एक चमत्कार पंचवीस वर्षांपूर्वी हिंदी चित्रपटसृष्टीत आला. या सृष्टीची ती आज गेले पाव शतक सम्राज्ञी आहे. चंपाषष्ठीच्या योगासारखा तिच्या सार्वजनिक दर्शनाचा योग असतो. कुठले प्रीमियर, कुठली ज्युबिली असल्या प्रसिद्धीच्या नाना आकर्षणांपासून ती दूर असते. बाकी राणीला मिरवावें कुठे लागते? मिरवतात दासी. गेल्या पंचवीस वर्षात तिच्या स्वरांचे हजारो-लाखो अंतःकरणांवर अधिराज्य चालू आहे. संगीतदिग्दर्शक नवा असो, जुना असो; एकदा मायक्रोफोनपुढे आली की सुरांना प्राणांचा स्पर्श झाल्याचा साक्षात्कार घडवते आणि त्या बाजारातून नाहीशी होते. पंचवीस वर्षे हा गळा गातो आहे. तिच्या तीर्थरूपांनी मराठी रंगभूमीवर आपल्या गाण्याने मी मी म्हणणारांना बुचकळ्यात पाडले होते. माझ्या आयुष्याच्या ताळेबंदीत जमेच्या बाजूला जे महान क्षण आहेत त्यातले कितीतरी दीनानाथरावांच्या गाण्यांनी उजळलेले आहेत. सावरकरांसारख्या उत्तुंग प्रतिभावंताने केलेल्या गाण्यांची दीनानाथरावांच्या अश्वमेधाच्या घोड्यासारख्या विजिगीषु गळ्यातून निघालेली फेक आजही माझ्या मनात साठलेली आहे. त्यांची ती विजेच्या चपळाईने आणि तितक्याच बेगुमानपणे जाणारी तान आठवली की आजही जीव अस्वस्थ होतो. जिवाला बेचैन करणारे ते गाणे! अस्वस्थ करणारे, गुंगी आणणारे नव्हे. दीनानाथांच्या कलेचे राज्य त्या काळातल्या आणि व्यवसायाच्या परिस्थितीमुळे मर्यादित राहिले. त्यांच्या ह्या लाडक्या लेकीने त्या राज्याच्या सीमा अमर्याद वाढवल्या. गुणी गायकवादकांच्या सुरांचे हे ऋण कसे फेडायचे? लताच्या शेकडो स्वरांची ही सुखाची ठेव कुठे ठेवायची? ती स्मृतिवरी लिहावी आणि ते ऋण इथेच ठेवून जायचे! पाव शतकभर साठत आलेले हे ऋण. ऋणकोने धनकोबद्दल एकच भावना ठेवावी, ती म्हणजे धनको सदैव अधिकाधिक धनवान होत जावा हीच. आमच्या सुरांच्या मागण्याला अंत नाही. आम्ही ह्या बाबतीत सदाचेच भिकारी. सदैव मागतच राहणार. चोखोबाने विठ्ठलाशी मागणे मागताना 'पोटापुरतें देई विठ्ठला—मागणे लयी नाही लयी नाही' म्हणून मागितले. पोटापुरते देणाऱ्या विठ्ठलाला देताना कळले असेल की चोखोबाच्या पोटाची भूक कधीच भागणारी नव्हती. लताने कोट्यवधी अंतःकरणांच्या सुरांची भूक भागवता भागवता वाढवली आहे. हे स्वरभांडार तिच्या जिवात कोणी मोकळे करून ठेवले, काय सांगावे? मी वाडवडलांचे आशीर्वाद मानणारांतला आहे. मला वाटते, दीनानाथांनीच ही मर्मबंधातली ठेव आपल्या मुलामुलींना संभाळायला दिली. आळंदीच्या विठ्ठलपंतांची लेकरे जशी दुधाचे दात पडण्यापूर्वीच विश्वात्मक देवाच्या वाग्यज्ञाची सामुग्री गोळा करायला लागली तशी मंगेशीच्या दीनानाथाची ही मुले हातभर उंचीची असल्यापासूनच स्वरयज्ञाच्या तयारीला लागली. लताकडे दिदीपण आले. तिने हे वाण आपल्या हाती घेतले आणि अष्टदिशांना सूर पसरला. चित्रपटाच्या मयसृष्टीत कालचे हिरे आज दगडाच्या मोलाने दुर्लक्षिले जातात. तिथे आज लता पंचवीस वर्षे आपले स्थान टिकवून आहे. त्या सृष्टीत राहूनही ती एका विलक्षण अलिप्तपणाने जगत असते. आपल्या स्वराने सर्वांच्यात आहे. आणि आपण मात्र कुणाच्यातही नाही. दिवसातून किती

तरी वेळा आकाशवाणीवरून तिच्या नावाचा पुकारा होतो. आपल्या साऱ्या जीविताचे स्वरमय अलगुज करणारी ही कलावती. तिच्या गाण्याला कुठलीही फूटपट्टी लावून ते मोजता येत नाही. त्या साडेतीन मिनिटांच्या कालावधीत तिच्या गळ्यातून निघालेल्या प्रत्येक सुराला अंतिमत्व आहे. ताज-महालाच्या स्थापत्यात जशी सुधारणा सुचवता येत नाही किंवा चांदण्याची शोभा वाढवायला त्या चांदण्यात आणखी काही दुरुस्ती घडवावी असे वाटत नाही तसे त्या स्वराला 'तत् त्वम् असि' असे म्हणावे लागते. सुरांचा मर्मबंध गवसलेला हा गळा आहे. सूक्ष्म लयतत्त्व पाहणारी ही नजर आहे. लताची पंचवीस वर्षांपूर्वीची तबकडी काय आणि आजची काय, त्याच चैतन्याने उजळलेला तो सूर. कोमेजणे ठाऊक नाही. आणि त्याची नक्कलही होऊ शकत नाही.

असली ही गुणी मुलगी आणि तिची गुणी भावंडे. कोल्हापूरच्या पॅलेस थिएटरजवळ चिमुकल्या घरट्यात राहात होती तेव्हापासून आजतागायत आपल्या गात्या गळ्याने सुरांचे जग जिंकत चाललेली पाहात आलो आहे. या गळ्यांना कधीही थकवा न येवो. आणखी खूप वर्षे हे गळे असेच गात राहोत. ज्ञानदेवाच्या दारी सोन्याचा पिंपळ होता. ह्या भावंडांच्या दारी सुरांचा पिंपळ आहे. आज त्या पिंपळाच्या पानांपानांइतकी गीते गाऊन ह्या भावंडांनी शेकडो अंतःकरणे तृप्त केली आहेत.


संगीतातले वृद्धाचार्य सिनेमासंगीताला नाके मुरडीत असतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे ही मंडळी आपले कान चारी दिशांतून येणाऱ्या सुरांसाठी उघडेच ठेवीत नाहीत. वास्तविक सिनेमा-संगीत हे आजचे लोकसंगीत आहे. लता मंगेशकर ही आमची खरी 'नॅशनल आर्टिस्ट' आहे— राष्ट्रगायिका आहे. नॅशनल प्रोग्राममध्ये गायले म्हणजे नॅशनल आर्टिस्ट होत नसतो. त्याला आकाश-वाणीच्या स्टूडियोत घर करून चालत नाही. देशातल्या लोकांच्या अंतःकरणांत घर करावे लागते. ते भाग्य लताइतके दुसऱ्या कुठल्याही गायकाला किंवा गायिकेला लाभलेले नाही. आज पंजाब–सिंध–गुजरात–मराठा–द्राविड–उत्कल–बंग जर कोणी एकत्र बांधून ठेवला असेल तर लताच्या सुरांनी. निसर्गदत्त किंवा संकुचित मनाने ज्यांना बहिरेपणा आलेला आहे असे जर काही अभागी वगळले तर या सुरांनी आकृष्ट न होणारा या देशात कुणी असेल असे मला तरी वाटत नाही. लताने अपरंपार यश मिळविले आहे. तिचा स्वर ऐकला की वाटते देवाचे देणे मिळावे तर असे! आणि या देवदत्त प्रतिभेला या गायिकेने डोळस परिष्करणाची जोड दिली आहे. केवळ देवाची देणगी नाही. त्यामागे चांगली जाणकारी आहे. ह्या अद्वितीय यशावर राष्ट्रीय पदवीची तीन किंवा पाच अक्षरे कसला चांद चढवणार? पण कृतज्ञतेची जाणीव आपल्या आधीच्या पिढ्यांना नव्हतीच का, हा प्रश्न पुढल्या पिढ्यांनी करू नये म्हणून त्या अक्षरांचा तुरा तिच्या मस्तकी खोवला पाहिजे. सिनेमातले गाणे अल्पजीवी म्हणून हेटाळू नये. ते गाणारांची आणि ती गीते लिहिणाऱ्या प्रतिभावान गीतकारांची उपेक्षा होता कामा नये. तसे करायचे असेल तर वेलीवर फुलणाऱ्या जाई-जुईलाही तुच्छ मानावे लागेल. चित्रपटसंगीतात तबकडीवरची ही तीन साडेतीन मिनिटे सुरांच्या खजिन्यातून नवी नवी रत्ने काढून साजरी करणे हे काम सोपे नाही. त्या कालावधीतली प्रत्येक सेकंदाची पोकळी फार फार चतुराईने भरावी लागते. बहुधा गाणे न कळणारे उच्चभ्रू रसिक आपण शास्त्रीय संगीताखेरीज दुसरे काही ऐकत नाही वगैरे सांगत असतात. हे म्हणजे स्वतःला फुलांचा षौकीन म्हणवणाराने आपण फक्त भारतीय संस्कृतीचे प्रतीक असलेले कमल तेवढे मानतो, इतर जाईजुई वगैरे हलकी फुले मानत नाही म्हणण्यापैकी आहे. ही माणसे चुकून सुरांच्या राज्यात शिरली आहेत. वास्तविक पक्षघाताने विकल झालेल्या राजकारणातच शिरायची. डोळ्यांना झापडे आणि कानांवरून टापशी बांधलेली ही हट्टाग्रही माणसे. सिनेमा, नाटके, तमाशे, कीर्तने, भारुडे निरनिराळे सण यांतून सुरांची काय सुंदर सुंदर फुले फुललेली आहेत. त्यांचा आस्वाद का म्हणून घ्यायचा नाही? खानदानी

स्वरूपाच्या निर्गुण स्वरूपाकडे जाताना सुरांची ही मोहक सगुण रूपडी पाहायची सुद्धा नाहीत हा कसला दळभद्रेपणा ? आम्ही नाही त्या अहंकाराने आपण होऊन आपली मने गढूळ करून ठेवतो. डोळे, कान, मन हे चारी दिशांना मोकळे असावे. आज रेडिओने केवढी मोठी सोय केली आहे. देशोदेशीचे गाणे उशाशी आले आहे. अजाणपणाने लोक रेडिओ फार मोठ्याने लावतात हा चित्रपट-संगीताचा दोष नव्हे. भारतीय चित्रपटात संगीतदिग्दर्शकांनी स्वररचनेचे फार कौतुकास्पद चातुर्य दाखविले आहे. गीतकारांनी मोठी टपोरी गीते लिहिली आहेत. भारतीय संगीताच्या प्राथमिक शिक्षणाला ह्या गीतांचा केवढा उपयोग करून घेता येईल. आणि सच्चा सूर दाखवायला तिथे लताचा आवाज आहे. सुरांचा आणखी सुंदर संस्कार कुठला हवा ?

लताच्या सुरांनी जिंकलेले हे केवढे मोठे साम्राज्य आहे! ह्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही. सकाळ उजाडते. घरोघरीचे रेडिओ लागतात. एखाद्या रेडिओवरून बातम्या ऐकू येत असतात. युद्धाच्या, दंगलीच्या, जाळपोळीच्या, सत्तेच्या उलथापालथीच्या. मन विषण्ण करणाऱ्या—जगणे म्हणजे हेच का शेवटी? हा प्रश्न उभा करणाऱ्या—आणि अंधारातून प्रकाशरेखा जावी तसा एकदम लताचा सूर तीरासारखा घुसतो आणि मनाची काळोखी नष्ट करतो. काही नसले तरी हे सूर ऐकायला तरी जगले पाहिजे असे वाटायला लागते. अतिपरिचयाने देखील अवज्ञा झाली नाही अशी एकच गोष्ट म्हणजे लताचे सूर!

ते सूर कानी पडले की मनावर शिल्पासारखा कोरलेला तो प्रसंग डोळ्यांपुढे उभा राहतो. 'शूरा मी वंदिले' म्हणणारे परकलपोलक्यातले लताचे चिमुकले ध्यान दिसायला लागते. मनात म्हणतो—ह्या मुलीला कल्पनाही नसेल की ते 'शूरा मी वंदिले' ऐकताना त्या पॅलेस थिएटरातल्या अनेकांनी मनात म्हटले असेल की या असल्या अलौकिक 'सूरा मी वंदिले'...आज पंचवीस वर्षे अनेक ध्वनिमुद्रिका ऐकताना असंख्य अंतःकरणांतून "बस्स. ह्या सुरांना सलाम आहे." अशी दाद घेण्याचे भाग्य लताला लाभले आहे याहीपेक्षा ती दाद देण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे.

सुरांची चैतन्यफुले फुलवणाऱ्या लतेला वयापेक्षा कुठलीही वडीलकी नसणाऱ्या माझ्यासारख्याने अंतःकरणापासून एकच आशीर्वाद द्यायचा की "मुली, अशी ही दाद तुला अखंड मिळो—औक्षवंत हो."



पंचवीस वर्षे

गेली पंचवीस वर्षे लता सतत गात आहे. चित्रपटांतून ती गाइली आणि ध्वनिमुद्रिकांसाठीही ती गाइली. भारतातील बहुतेक प्रमुख भाषांतून तिने गीते म्हटली. गाण्याचे सर्व प्रकार तिने आळवले. अभिजात कवींपासून तो नवोदित गीतरचनाकारांपर्यंत अनेकांच्या रचना तिच्या गळ्यातून उमटल्या. अनेक संगीत दिग्दर्शकांनी तिच्या गीतांना चाली दिल्या. आणि अनेक चित्रपट तिच्या गाण्यामुळे गाजून गेले. या सर्वांची संपूर्ण यादी देणे कठीण आहे. पंचवीस वर्षांच्या त्या परिश्रमशील, आनंद-दायक, रोमांचकारक, बहुविध, संपन्न, समृद्ध, अखंड कार्यप्रवण कारकीर्दीचा हा एक ओझरता आलेख.

काही संगीतदिग्दर्शक

गुलाम हैदर, खेमचंद प्रकाश, श्यामसुंदर, अनिल विश्वास, नौशाद, सी. रामचंद्र, सचिन देव बर्मन, सज्जाद, हरिश्चंद्र बाली, हेमंत केदार (शिंदे), हंसराज बेहेल, नौशाद, धनीराम, पं. गोविंदराम, श्यामबाबू पाठक, अमरनाथ, हुस्नलाल–भगतराम, खय्याम, मन्ना डे, मुकेश, रोशन, रवि, एस. एन त्रिपाठी, चित्रगुप्त, दिलीप धोलकिया, सरस्वतीबाई, आर. सी. बोराल, शंकर–जयकिशन, कल्याणजी–आनंदजी, लक्ष्मीकांत–प्यारेलाल, लाला–सत्तार, ओमी–सोनिक, जग्गी–सप्पन, एन. दत्ता, राहुल देव बर्मन, गणेश, गुलाम महंमद, महंमद शफी, सुमंतराज, वसंत देसाई, रामलाल, पं. शिवराम, अलि अकबर खां, रविशंकर, जयदेव, हेमंतकुमार, उषा खन्ना, दक्षिणाबाबू, मदनमोहन, महेंद्रसिंग, शार्दूल पात्रा, सरदार मलिक, वसंतप्रकाश, भानू घोष, सलिल चौधरी, बी. एन. बाली, बुलो सी. रानी, भोला श्रेष्ठ, अविनाश व्यास, जमालसिंग, जी. एस. कोहली, व्रजभूषण, मनोहर, सी. अर्जुन, परदेसी, पुरुषोत्तम सोळंकुरकर, दादा चांदेकर, मा. कृष्णा, शंकरराव

कुलकर्णी, सुधीर फडके, दत्ता डावजेकर, वसंत प्रभू, वसंत पवार, राम कदम, जितेंद्र अभिषेकी, स्नेहल भाटकर, बाळ पार्टे, मीना मंगेशकर, हृदयनाथ मंगेशकर, आनंदघन, नंदीबाबू, फय्याज अहमद, नचिकेता, संतीनाथ, पुरुषोत्तम उपाध्ये, नागेश मसुदे, विश्वनाथ राममूर्ती, सी. सुब्रह्मण्यम, व्यंकटराघवन, कल्ला, आदिनारायणराव, लक्ष्मण बेरळेकर, बालसारा, रमेश नायडू, सुधीन, शैलेश मुकर्जी, बिपिन बाबुल, प्रेम धवन, किशोरकुमार, गजानन कर्नाड, डी. पी. कोरगावकर.

लताने गाइलेले काही गीतप्रकार

गझल, कवाली, ठुमरी, दादरा, टप्पा, ख्याल, कजरी, होरी, तरन्नुम लोरी (अंगाईगीत), भावगीत, भजन, बालगीत, श्लोक, अभंग, ओवी, लावणी, लोकगीत, भांगडा, गद्य, रंबासंबा, चाचाचा, जापानी, ध्रुपद, आरती, रवींद्रसंगीत, धमार.

लताने ज्यांतील गीते गाइली अशा भाषा व बोली

संस्कृत, मराठी, पंजाबी, बंगाली, आसामी, हिंदी, व्रज, अवधी, भोजपुरी, गुजराती, मैथिली, उडिया, नेपाळी, कानडी, तेलगु, सिंहली, उर्दू, मारवाडी (राजस्थानी), तमीळ, कोंकणी.

ज्यांची गीते लताने गाइली ते हे काही कवी

कबीर, सूरदास, मीरा, गालिब, रवीन्द्रनाथ ठाकूर, सुमित्रानंदन पंत, मैथिलीशरण गुप्त, साहिर लुधियानवी, पं. भरत व्यास, प्रदीप, शैलेंद्र, मधोक, कमाल अमरोही, राजा मेहेदी अलीखान, नेपाळ-नरेश महेंद्रसिंग, नरेंद्र शर्मा, ललितादेवी शास्त्री, शकील बदायुनी, कैफी आझमी, बाराबंकी, असद् भोपाली, राजेंद्र कृष्ण, प्रेम धवन, मजरूह सुलतानपुरी, हसरत जयपुरी, पं. गिरीश, पं. इंद्र, इंदीवर, नीरज, पं. सुदर्शन, गुलशन बावरा, कमर जलालाबादी, गुलजार, डॉ. इकबाल, अविनाश व्यास, नक्ष लियालपुरी, केदार शर्मा, आनंद बक्षी, सलील चौधरी, वर्मा, मलिक.

—आणि हे मराठी कवी

ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, गोविंदाग्रज, स्वातंत्र्यवीर सावरकर, भा. रा. तांबे, माधव ज्यूलियन, बी, स. अ. शुक्ल, वि. स. खांडेकर, शांताराम आठवले, ग. दि. माडगूळकर, पी. सावळाराम, राजा बढे, कुसुमाग्रज, योगेश, शांता शेळके, रमेश अणावकर, जगदीश खेबुडकर, आरती प्रभु, सूर्यकांत खांडेकर, यशवंत देव.

